Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



मराठी रियासत

५ पुण्यश्लोक शाहू

(पेशवा बाळाजी विश्वनाथ)

गो.स.सरदेसाई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२८ २ -

ओ३म्

पुस्तक संख्या ...... ४१५ / २२(५) E

पञ्जिका संख्या २८६०१

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

28701

CHECKED 1973

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

A HISTORY OF MODERN INDIA

IN THREE PARTS

MUSSALMANI, MARATHI & BRITISH RIYASATS

II MARATHI RIYASAT

5

CHHATRAPATI SHAHU

1 PESHWA BALAJI VISHVANATH

[1707–1720]

BY

GOVIND SAKHARAM SARDESAI, B. A.

KESHAV BHIKAJI DHAWALE

SHRI SAMARTH-SADAN, GIRGAON, BOMBAY

1942

Price Re. 1/-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[*All rights reserved by the author*]

Printed by D. B. Karnik, at the New Times Printery Ltd., Bombay 4.
Published by K. B. Dhawale, Shri Samarth-Sadan, Girgaon, Bombay.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास

मराठी रियासत

५

पुण्यश्लोक शाहू

१ पेशवा बाळाजी विश्वनाथ

[१७०७–१७२०]

लेखक

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

केशव भिकाजी ढवळे : श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई.

मूल्य एक रुपया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

प्रस्तावना ... ... पृष्ठें ६–९

साधननिर्देश ... ... पृष्ठें १०–११

बाळाजी विश्वनाथाचे पूर्वज व पेशव्यांची संपूर्ण वंशावळी व्यक्तिगत तपशीलासह ... ... पृष्ठें १२–१६

१ प्रतिबंधांतून राज्याप्रत—

१ परिस्थितीचा मेळ, २ माळव्यांतील अधिष्ठान, ३ बादशाही पाठिंब्याचा अवलंब, ४ शाहूचें स्वदेशीं आगमन, ५ ताराबाईशीं वाग्युद्ध, ६ बलाबलाचें निदान, ७ खेडची लढाई, ८ राज्याभिषेक व नेमणुका ... ... पृष्ठें १९–४६

२ आसनाची स्थिरता

१ बाळाजी विश्वनाथ, पूर्वपरिचय, २ पुणें प्रांत सोडविण्याचा उपक्रम, ३ रांगण्याची मोहीम, ४ धनाजीचा मृत्यु, ५ लोधीखानाचा पाडाव, ६ विरोधाचीं पहिली चुणूक ... पृष्ठें ४९–६४

३ विरोधकांची मालिका

१ चंद्रसेनाचा बंडावा, २ हरणाचा तंटा, ३ खटावकराचा दंगा, ४ कोल्हापूर गादीची उभारणी, ५ रामचंद्रपंताचा शेवट, ६ दमाजी थोराताचा उपद्याप, ७ रंभाजी निंबाळकर व पुणें, ८ उदाजी चव्हाण, उलाढाली ... ... पृष्ठें ६७–८६

४ बाळाजी विश्वनाथ व आंगरे

१ कान्होजी आंगरे, पूर्वपरिचय, २ बाळाजी वि० स पेशवाईचीं वस्त्रें, ३ प्रतिनिधि सेनापतींच्या नेमणुका, ४ आंगऱ्यांशीं सन्मान्य समेट, ५ सीदीची शरणागती, ६ आंगरे–इंग्रजयुद्ध ... ... पृष्ठें ८९–१११

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५ दक्षिणेंत बादशाहीची दैन्यावस्था

१ बादशाही दरबारांतील पक्ष व राजकारण, २ दक्षिणेंतील सुभेदार, दाउदखान पन्नीचा कारभार, ३ निजामाचें घराणें, ४ निजामउल्मुल्कचे दक्षिणेंतील व्यूह, ५ सय्यदबंधु, पूर्वपीठिका व कारभार, १६ उत्तरेंतील राजपूत राज्यें, बदललेलें राजकारण, ७ जयसिंगाचा माळव्यांतील कारभार ... पृष्ठें ११५–१३२

६ मराठी सत्तेला शिक्कामोर्तब

१ हुसेन सय्यद दक्षिणेंत, २ चौथाईचा तह, ३ मराठ्यांचें दिल्लीस प्रयाण, ४ दिल्लींत राज्यक्रान्ति, सनदांची प्राप्ति, ५ मातुःश्री येसूबाई ... . पृष्ठें १३५–१५२

७ कारभाराची पहिली आंखणी

१ तीन पृथक् चावती, २ एकंदर उत्पन्नाची वांटणी, ३ या व्यवस्थेंतील दोष, ४ सरंजामी पद्धत, ५ सरंजामी पद्धत, बदलता काल, ६ मराठेशाहीच्या फैलावाचें बीज, ७ मूळच्या उद्देशाचा विपर्यास, ८ सरंजामी पद्धतीचा उपयोग पृष्ठें १५३–१८०

८ बाळाजी विश्वनाथाची अखेर

१ कऱ्हाड-कोल्हापुरची मोहीम, २ बाळाजीचा मृत्यु व परिवार ३ बाळाजीची योग्यता, ४ द्वादशसूत्री पृष्ठें १८३–१९३

सूचि पृष्ठें १९७–२००

दुरुस्ती—पृ. ८७ च्या कालसूचींत व पृष्ठ १०१ वर आंगरे-तहाची तारीख २८ फेब्रु० नसून ८ फेब्रु० सन १७१४ समजावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

स. १९२० सालीं मराठी रियासतीचा बाळाजी विश्वनाथ व बाजीराव या पहिल्या दोन पेशव्यांचा भाग 'मध्यविभाग १' या संज्ञेनें प्रसिद्ध केला आणि त्यापुढचे नानासाहेब पेशव्याचे दोन भाग 'मध्यविभाग २ व ३' हे बाहेर आणिले, तेव्हांपासून गेल्या वीस वर्षांत या कालखंडाचें स्वरूप बदलून टाकणारी पुष्कळच नवीन माहिती निरनिराळ्या भाषांतली लोकांपुढें आली, त्यामुळें पूर्वीचे भाग बहुतेक निरुपयोगी व ऐतिहासिक दृष्टीनें त्याज्य ठरले. शिवाय त्या पहिल्या आवृत्तीच्या प्रतीही आतां दुर्मिळ झाल्या, यास्तव वाढतें संशोधन जमेस धरून हे तीनही भाग पुनः सर्व लिहून काढण्याची निकड उत्पन्न झाली. औरंगजेबाच्या मृत्युपर्यंतचा शिवकालीन इतिहास स. १९३६ अखेर छापून पुरा झाल्यावर त्यापुढचा हा पूर्वपेशवाईचा भाग मीं हातीं घेतला, पण अनेक कारणांमुळें हें काम अपेक्षेबाहेर मंदावत गेलें. तथापि तें आतां पुरें होऊन बाळाजी विश्वनाथाचा हा भाग वाचकांचे हातीं देण्यास मला संतोष वाटतो.

या नवीन संस्करणांत मुख्य पुरुषाच्या नांवावरून चरित्ररूपानें लहान मोठीं पुस्तकें बनतील तशीं प्रसिद्ध करावीं असा जो उपक्रम स्वीकारला, तोच या पेशवाईच्या भागांतही कायम ठेविला आहे. पूर्वी मराठी रियासत १, २, ३, ४ हे खंड पुरे झाले. आतां पुढें ५, ६, ७, ८ हे

(५) पुण्यश्लोक शाहू, पे० बाळाजी विश्वनाथ, स. १७०७–१७२०,

(६) पुण्यश्लोक शाहू, पे० बाजीराव, स. १७२०–१७४०,

(७) पुण्यश्लोक शाहू, पे० नानासाहेब, स. १७४०–१७४९,

(८) छत्रपति रामराजा, पे० नानासाहेब, स. १७४९–१७६१

असे पूर्वपेशवाईचे भाग सोयीचे पडतात, ते उत्तरोत्तर बाहेर येतील.

साहित्याची जमवाजमव करून एक एक विषयाची संगति जुळविण्यांत आरंभीं बराच काळ खर्च करावा लागला. महाराष्ट्रांत गेल्या वीस वर्षांत पुरंदरे दप्तर, पेशवे दप्तर इत्यादि नवीन साधनांची मोठी भर पडली, तशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्राबाहेरही मराठ्यांच्या उद्योगाला लागू पडणारें पुष्कळ नवीन साहित्य बाहेर येऊन पूर्वी प्रचलित असलेलें इतिहासाचें स्वरूप बहुतेक बदलून गेलें. जयपुर दप्तरांतले पुष्कळ बहुमोल कागद उपलब्ध झाले, तसेच ऊर्दू, फारसी, पोर्तुगीझ अशा भाषांतील बरीच माहिती ठिकठिकाणच्या संशोधकांनीं वेळोवेळीं प्रसिद्ध केली, ती तपासून घेण्यास वेळ लागला. हिंदुस्थानच्या सर्व भागांत, व्यक्तिशः किंवा युनिव्हर्सिटी, हिस्टॉ० रेकार्ड कमिशनसारख्या संस्थांच्या मार्फत, नानाविध विषयांची व प्रश्नांची चर्चा होऊन जो प्रचंड संशोधनप्रवाह निर्माण झाला, तो तपासून पाहण्यांत दोन तीन वर्षे सहज निघून गेलीं; आणि नवीन पुराव्यानें माझे स्वतःचे पूर्वीचे निर्णयही बहुतेक बदलून गेले. अयोध्येच्या नबाबांचा, निजाम उल्मुल्कचा, पंजाबच्या शीखांचा व माळव्याचा इतिहास आणि मुख्यतः सर जदुनाथ सरकारांचे मोगल-ऱ्हास-कालाचे तीन भाग इत्यादि विवेचक ग्रंथ बाहेर आले, त्यांचा सूक्ष्म अभ्यास केल्याशिवाय मराठ्यांच्या इतिहासांत पुढें पाऊल टाकण्याची सोय आतां राहिली नाहीं, हा प्रकार मशहूर झाला आहे.

पेशवे दप्तरांतून बाळाजी विश्वनाथाचीं कांहीं थोडीं पण बाजीरावाच्या कारभाराचीं दोन हजार पत्रें नवीन बाहेर आल्यानें त्याचा पूर्वीच्या आवृत्तीचा भाग सर्वच बदलणें ओघास आलें. शाहू छत्रपतीच्या आरंभाच्या हालचाली व पहिल्या पेशव्याची कर्तबगारी निश्चित करण्यास उपयोगी पडणारी माहिती बरीच एकत्र करतां आल्यामुळें हा भाग देखील आतां सुसंगत मांडण्याची सोय झाली आहे. प्रत्येक प्रकरणाच्या आरंभीं कालसूची दिली आहे, तिजवरून त्यांतील विषयाचें स्वरूप तर कळून येईलच, पण अद्यापि कोणत्या बाबतींत संशोधन अपुरें आहे, त्याचाही अंदाज अभ्यासकांस बांधतां येईल.

स. १८९८ सालीं रियासतीचा पहिला खंड प्रसिद्ध झाला, तेव्हांपासून आजपावेतों माझा उद्योग कसकसा वाढत गेला, पन्नास वर्षांपूर्वी आपल्या राष्ट्रेतिहासाची स्थिति काय होती, आणि आतांपर्यंत ती कशी बदलत आली आहे, हा प्रकार प्रत्येक खंडाच्या माझ्या प्रस्तावनेवरून कळून येतो. पुनः एकवार या प्रस्तावना नजरेखालीं घालतांना माझ्या या उद्योगाचा परिपोष लक्षांत येऊन मनास मोठी करमणूक झाली. अनेक सहकारी किंवा टीकाकारी दिवंगत व हयात व्यक्तींचें स्मरण ताजें होऊन उभयतांचा उपयोग मला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून घेतां आला आणि एवढें मोठें काम माझ्या हातून तडीस गेलें याबद्दल समाधान तर वाटतेंच, पण त्याबरोबर हीही जाणीव उत्पन्न होते कीं, अनेकांच्या साह्याचें ऋण डोक्यावर चढून मी त्याखालीं दडपून गेलों आहें. पण एकंदर मानवी व्यवहार असाच बनत जातो, त्यांत माझी कथा काय ?

जगामध्यें कोणतीही मानवी कृति निर्दोष किंवा परिपूर्ण नाहीं. प्रत्येक काम व कसब अनेकांच्या प्रयत्नानें सदैव सुधारत जात असतें. अशी सुधारणा मी आपल्या विषयांत करीत राहण्याची उत्साही मनोवृत्ति नेहमींच बाळगीत आलों आहें. निर्घृण टीकेचाही मीं अव्हेर केला नाहीं. आपली कृति सर्वांना पसंत पडेल अशी अपेक्षा कोणींही बाळगूं नये. मी हें रियासतीचें काम मुख्यतः स्वतःची करमणूक म्हणून करीत आलों आहें. त्यांत एखादें महनीय राष्ट्रहिताचें कार्य मी करतों आहें असें मीं कधीं मानलें नाहीं. जनतेला तें पसंत पडलें तर आनंद वाटणें साहजिक आहे, पण तें न पसंत पडलें तर त्याबद्दल खेद वाटण्याचेंही प्रयोजन मला दिसत नाहीं. रियासती लिहिल्या म्हणजेच तो इतिहासज्ञ बनतो असें मी समजत नाहीं. लेखनाचें काम न करूनही या विषयांत प्रावीण्य मिळविलेले पुष्कळ विद्वान आहेत. दोनशें वर्षांच्या इतिहासाचें साधनभांडार जुळवून त्यांतच अहर्निश गुंतून राहण्यांत मनास जें समाधान वाटतें तेंच माझें बक्षीस होय असें मी समजतों.

जगाच्या राहटीकडे व मुख्यतः प्रस्तुतच्या जागतिक घडामोडींकडे नजर टाकली म्हणजे इतिहासाचा खरा उपयोग काय हा प्रश्न वारंवार मनांत उद्भवतो आणि तदनुषंगानें दुसरेही अनेक बिकट प्रश्न पुढें येतात. इतिहास म्हणजे काय ? तो कसा बनतो व कसा रचला जातो, त्यांत सत्याचा अंश किती व अनुमानाचा किती, पुराव्याचें महत्त्व कसें ठरवावें, विद्यार्थ्यांस शिकवायच्या इतिहासाचें स्वरूप कसें असावें, अशा अनेक प्रश्नांची चर्चा अधिकारी व बिनअधिकारी लेखकांकडून होत आली असून पुढेंही ती चालेलच. मनुष्य प्राण्याला आपपर भाव सुटला नाहीं, म्हणून त्याची बुद्धि निर्भेळ निष्पक्षपाती असणें शक्य नाहीं. शिवाय प्रत्येकाच्या बुद्धीची ठेवण निराळी असते. अशा स्थितींत एकच निष्कर्ष निघतो कीं इतिहासांत नमूद केलेलीं विधानें त्या त्या लेखकाचीं व्यक्तिगत मतें होत. व्यासानें कौरव-पांडवांना जसें रंगविलें तसें महाभारताचें चित्र वठलें. पूर्वकालीन घडामोडींचें चित्र पुराव्यांत असेल तसें वाचकांस दिसावें म्हणून त्या वेळच्या लेखांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरपूर उतारे मी आपल्या रचनेंत मुद्दाम दाखल केले आहेत. नाहीं तर वाचकांस तरी त्या लेखभांडाराची ओळख व्हावी कशी ?

अर्थात् इतिहास म्हणजे लेखकानें रंगविलेलें चित्र होय. माझ्या लेखनांत हाच प्रकार आढळेल. माझ्या रियासतींची कालमर्यादा इ. स. १००० पासून १८५८ पर्यंतची असून तेवढ्या काळाचे पूर्वीच्या आवृत्तींत बारा भाग बनले आहेत. प्रत्येक भागाचीं सरासरी पांचशें पानें धरल्यास एकंदर विषय सुमारें सहा हजार पृष्ठांत सामावला आहे असें म्हणतां येईल. पैकीं कित्येक भागांच्या एकाहून जास्त आवृत्त्या निघाल्या, तर पानिपतोत्तर काळाच्या पहिल्याच चालू आहेत. या सहा हजार पृष्ठांत नानाविध निर्णय वा निष्कर्ष नमूद झाले असून त्यांतच ऐतिहासिक व्यक्तींचीं चरित्रें व स्वभावचित्रें तत्कालीन माहितीवरून बनविलेलीं आढळतील. कित्येक विषय पूर्वी अनिर्णीत होते, ते निश्चित करतां आले तर कित्येक नवीन प्रश्नही उपस्थित झालेले दिसतील. मिळून हा इतिहासप्रवाह सतत वाढत जाणारा असून त्यास अंत असा नाहींच म्हटलें तरी चालेल.

इतिहासाचें प्रयोजन सर्वांस असलें तरी पतित राष्ट्रास तें विशेष आहे. कठिण प्रसंगांत राष्ट्रास धीर देऊन भावी उत्कर्षाचा मार्ग दाखविणें हें त्याचें काम आणि संशोधन हा आधार आहे. नुसत्या संशोधनानें जनतेची तृषा भागत नसते, सामान्य वाचकांस संशोधन बहुधा कळतही नसतें. यास्तव सतत चाललेल्या संशोधनाचें सार इतिहासानें समाजाप्रत पोंचविलें पाहिजे. हें काम मी सतत निष्ठेनें, पापभीरु वृत्तीनें व यावच्छक्य निष्पक्षपातानें आजपावेतों करूं शकलों हेंच मी आपलें मोठें भाग्य समजतों. ही माझी सेवा पूर्वीप्रमाणें पुढेंही वाचकांनीं स्वीकारली म्हणजे माझे श्रम सार्थकीं लागलेसे होतील.

गो. स. सरदेसाई

कामशेत, ता. १.१.१९४२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधननिर्देश व संक्षेप

१	इतिहास संग्रह पेशवे दप्तरांतील माहिती—	इ. सं. पे. द.
२	इतिहास संग्रह, ऐतिहासिक गोष्टी, पारसनीस,	ऐ. गो.
३	,, चरित्रें, ,, ,,	ऐ. च.
४	,, टिपणें, ,, ,,	ऐ. टि.
	,, स्फुटलेख ,, ,,	ऐ. स्फु. ले.
५	ऐतिहासिक पत्रव्यवहार, समर्थ भारत प्रेस,	ऐ. प.
६	,, लेखसंग्रह खरेकृत भाग—	ऐ. ले.
७	,, संकीर्ण साहित्य, भाग—	ऐ. सं. सा.
८	काव्येतिहास संग्रह पत्रें यादी, चित्रशाळा,—	का. सं. प. या.
९	कुलाबकर आंग्रे, ढबूकृत—	कु. आं.
१०	कोटादप्तर, सिंदेशाहीचीं साधनें भा.—	को. द.
११	कोल्हापुरचा इतिहास मोडककृत,—	को. इ.
१२	चंद्रचूड दप्तर, भा. इ. सं. मंडळ,—	चं.
१३	जयपुर अखबारात (अप्रसिद्ध)	अखबारात
१४	त्रैमासिक, भा. इ. सं. मंडळ	त्रै.
१५	देवासकर पवारांचा इतिहास, गुजरकृत—	दे. प.
१६	धाकटे रामराजाचें चरित्र चिटणीसकृत,—	धा. रा. च.
१७	धार संस्थानचा इतिहास, लेलेकृत—	धा. सं. इ.
१८	नागपुर प्रांताचा इतिहास, काळेकृत,—	ना. इ.
१९	नागपुरकर भोसल्यांची बखर,	ना. भो. ब.
२०	नानासाहेब रोजनिशी भाग १-२	ना. रो.
२१	पानिपतची बखर रघुनाथ यादवकृत,	पा. ब.
२२	पुरंदरे दप्तर, भा. इ० सं० मंडळ, भाग—	पु. द.
२३	पेशवा दप्तर, भाग १–४५ मुंबई सरकार,	पे. द.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४ पेशव्यांची बखर काव्येतिहास संग्रह पे. ब.

२५ ,, ,, नाना फडणीस कृत पे. ब. खं. ४

२६ पेशव्यांची शकावली काव्ये. संग्रह, पे. श.

२७ प्रतिनिधींचा इतिहास औंध सं. प्र. इ.

२८ बावडा दप्तर भाग, सबनीस कृत, बा. द.

२९ भाऊसाहेबांची कैफियत काव्ये. सं. भा. कै.

३० भाऊसाहेबांची बखर काव्ये० सं.— भा. बा.

३१ भारतवर्ष शकावली, पारसनीस,— भा. व. श.

३२ मराठ्यांचे पराक्रम, बुंदेलखंड प्रकरण, पारसनीस—म. प.

३३ मराठी साम्राज्याची छोटी बखर काव्ये० सं.— म. सा. छो. ब.

३४ राजवाडेकृत म. इ. चीं साधनें खंड— रा. खं.

३५ राजवाडेकृत शकावली खं. २ रा. श.

३६ रुमाल १,२,३ मराठी दप्तर भावेकृत रु.

३७ शाहूमहाराजांचें चरित्र चिटणीसकृत शा. च.

३८ शाहूमहाराजांची रोजनिशी शा. रो.

३९ सातारा ऐतिहासिक लेखमाला १.२ सा. ले.

४० सावंतवाडीचा इतिहास, पिंगुळकर, सा. इ.

इंग्रजी पुस्तकांचा निर्देश पुस्तकांत सांगितला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाळाजी विश्वनाथ, पूर्वज

महादाजीपंत भट, देशमुख मामले दंडा राजपुरी

- नारो महादेव
  - महादाजी ऊ० बाबाजी
    - नारो
      - त्रिंबकपंत
    - आबाजी
      - महादाजी
- शिवाजी महादेव
  - कृष्णाजी
    - विठोजी
      - अंताजी
      - नारो
        - रामराव
          - त्रिंबकराव [कोंकणांत तळें येथें.]
  - अंताजी
  - विसाजी
    - कृष्णाजी
    - रुद्राजी
    - जानोजी
    - बाळाजी*
      - विसाजी (बाजीराव)
      - भिऊबाई
      - अंताजी (चिमाजी)
      - अनूबाई
    - विठ्ठल

* बाळाजी विश्वनाथास एक बहीण होती. ल. = बहिरव भट मेहेंदळे§

- विश्वनाथ
- गणपतराव
  - जनार्दन बाबा फडणीस, ल. = मुलगी
    - बाळाजी जनार्दन ऊ० नाना फडणीस
  - बळवंतराव (मृ. पानपतावर)

---

§ पहा पे. द. ९ ले. २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेशव्यांची संपूर्ण वंशावळी¶

१ बाळाजी विश्वनाथ = राधाबाई.　　बहीण ल. बहिरवभट मेहेंदळे, पुत्र गणपतराव, नातू बळवंतराव.

२ विसाजी ऊ० बाजीराव ल. काशीबाई.　३ भिऊबाई.　४ अंताजी ऊ० चिमाजी आपा.　५ अनूबाई.

रखमाबाई. | अन्नपूर्णा.

६ बाळाजी ऊ० नानासाहेब. ७ रामचंद्र. ८ रघुनाथ† ९ जनार्दन. १० सदाशिवराव. ११ बयाबाई ल. ओंकार.

गोपिकाबाई. |　जानकी व आनंदी. सगुणा. उमाबाबाई | पार्वतीबाई

१२ विश्वास. १३ माधव. १४ यशवंत. १५ मुलगा. १६ नारायण.　२ मुलगे.　२ मुलगे.

१८ † याचा पुत्र बाजीराव शेवटचा पेशवा.　　१७ सवाई माधवराव.

¶ आधार, तीन शकावल्या, पे. व. खं. ४, का. सं. प. या. ४९२ व ४९६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वंशावळींतील व्यक्तींचा विशिष्ट तपशील अंकांनुक्रमें—

१ मृ. २.४.१७२०. ल. राधाबाई अंताजी मल्हार बर्वे डुबेरकराची कन्या. तिचा मृ. १९.४.१७५३. बाळाजीची बहीण बहिरवभट मेहेंदळे यास दिलेली, तिचा नातू बळवंतराव मेहेंदळे.

२ ज. १८.८.१७००, मृ. २८.४.१७४०. ल. काशीबाई—चासकर महादाजी कृष्ण जोशी याची कन्या, मृ. २७.११.१७५८. काशीबाईची यात्रा रामेश्वरची मे १७४२, काशीची, जानेवारी–मे १७४६, इचा बंधु कृष्णराव चासकर. बाजीरावाची रक्षा मस्तानी, सती गेली. मुलगा समशेर; बहाद्दर ज. १७३४, लग्न ता. १४.१.१७४९, पेठचा लक्षधीर दलपतराव याची कन्या लालकुंवर, इचा मृ. १७५३, दुसरें ल. ता. १८.१०.१७५३ निंबगिरीकर गुलाम मोहिदीनखान याची कन्या मेहेरबाई; समशेर-बहाद्दर मृ. पानिपतावरून जखमी होऊन कुंभेर येथें. याचा पुत्र अलीबहाद्दर ज. १७५८, बांद्याचा नबाब, ल. रहिमतबिबी, इला पुत्र एक समशेरबहाद्दर ऊ० दादासाहेब व दोन मुली दुलनबेगम व प्यारीसाहेब - अलीबहाद्दर मृ. २८.८.१८०२, बायकोशिवाय याला दोन रक्षा होत्या, रामबाई व फुलबाई.

३ भिऊबाई, लग्न आबाजी नाईक जोशी बारामतीकर. मूल झालें नाहीं. मृ. ७.६.१७४७.

४ मृ. ३१.१०.१७४० क्षयानें, पहिली स्त्री रखमाबाई, त्रिंबकराव पेठ्याची बहीण, मुलगा सदाशिवराव; रखमाबाई मृ० ३१.८.१७३०. दुसरी बायको अन्नपूर्णा सती, मुलगी १ लहान बयाबाई.

५ अनूबाई, लग्न इचलकरंजीकर व्यंकटराव घोरपडे–मुलें दोन, वडील वेणूताई त्रिंबकराव पेठ्याची बायको, धाकटा नारायणराव. अनूबाई मृ. ३०.१२.१७८३.

६ नानासा० ज. ८.१२.१७२१, मुंज, ११.१.१७२८; ल. [१] गोपिकाबाई (रास्ते) ११.१.१७३०, गर्भाधान जानेवारी १७४०, अपत्यें ५ मुलगे, (२ लहानपणीं मृ.), मुलगी नाहीं. गोपिकाबाई मृ. ३.८.१७८८ नासिक पंचवटी येथें. दुसरें ल. [२] [illegible] ([illegible]) वय वर्षे नऊ,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२७.१२.१७६० या राधाबाईचा मृ. १९.११.१७००. एक लेकवळा हैबतसिंगदादा नांवाचा होता. †

७ रामचंद्र बाजी–स. १७२३–१७३३.

८ रघुनाथ बाजी–ज. १८.८.१७३४ मृ. ११.१२.१७८३; मुंज ४.२.१७४०; ल. जानकीबाई (गोपाळभट बर्वे) २५.२.१७४२, इचा मृ. २२.८.१७५५, प्रसूतीनंतर–मुलगा झालेला लवकरच वारला. इची मुलगी दुर्गाबाई (इचें लग्न ता. ७.२.१७७३ पांडुरंग बाबूजी नाईक); रघुनाथरावाचें दुसरें ल. आनंदीबाई (ओक) १७.१२.१७५५, इचा मृत्यु १२.३.१७९४, पहिला मुलगा भास्करराव ज. १८.३.१७६२, मृ. देवी येऊन मार्च १७६३; दुसरा मुलगा ज. १५.८.१७६४, मृ. एक वर्षानें; तिसरा मुलगा बाजीराव; चौथा मुलगा चिमाजी आपा ज. ३०.८.१७८४, यास पेशवेगिरी ता. २५.५ ते ता. २७.१० स. १७९६ पर्यंत. मृ. ९.६.१८३०; सहावा पुत्र दत्तक अमृतराव (भुसकुटे), दत्तविधान १९.४.१७६८, पेशवाई वस्त्रें अल्पकाळ १२.११.१८०२; अमृतरावाची पहिली बायको मृ. मे १८०३, इचा पुत्र विनायकराव ज. १७९२; अमृतराव मृ. ६.९.१८२४; विनायकराव मृ. १८५६.

९ जनार्दन बाजी ज. १७.७.१७३५ मृ. २१.९.१७४९, मुंज २६.३.१७४०, स्त्री सगुणाबाई रामाजी अनंत भिडे याची कन्या, ल. २०.४.१७४४, इची काशीयात्रा १७५७, मृ. १३.११.१७८३.

१० सदाशिव चिमणाजी ज. ५.७.१७३० मृ. १४.१.१७६१, मुंज ११.२.१७३६; लग्न उमाबाई ७.२.१७४०, पहिला मुलगा कृष्णराव ज. २४.११.१७४६, बारसें ३०.६.१७४७ जगला नाहीं; दुसरा मुलगा ३०.७.१७४८ अल्पवयी. उमाबाईचा मृ. २२.३.१७५०; दुसरें लग्न पार्वतीबाई (कोल्हटकर) २६.४.१७५०, इला दोन मुलगे झालेले लहानपणींच वारले. सदाशिवपेठेची वसाहत १७५८; मुज्फरखानाकडून खुनाचा प्रयत्न २८.१०.१७५९. पार्वतीबाईचा मृत्यु १६.८.१७८३, नंतर उभय नवराबायकोचें और्ध्वदेहिक एकदम झालें.

---

† म. द. रु. २ पृ. ९७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११ बयाबाई ज. सेप्टेंबर स. १७४०, ल. गंगाधर नाईक ओंकार ८.५.१७४५ मृ. १८.४.१७५९.

१२ विश्वासराव ज. २२.७.१७४२ मृ. १४.१.१७६१, मुंज ९.३.१७४९, लग्न लक्ष्मीबाई (दीक्षित पटवर्धन) २.५.१७५०, गर्भाधान एप्रिल १७५८, लक्ष्मीबाई मृ. १४.२.१७६३ पुणें येथें, पानपतावर गेली नाहीं.

१३ माधवराव ज. शनिवार १६ फेब्रुवारी १७४५ सकाळीं ११ घटिका (मकर राशी,) सावनूर येथें; पेशवेवस्त्रें १७.७.१७६१. मृ. क्षयानें थेउरास १८.११.१७७२, मुंज १४.२.१७५२, ल. ९.१२.१७५३ रमाबाई (जोशी), गर्भाधान ३.७. १७६५, मूल झालें नाहीं. सती गेली.

१४ यशवंतराव १३.८.१७४८ लहानपणीं मृत्यु.

१५ चवथा मुलगा ज. ५.९.१७५० जगला नाहीं.

१६ नारायणराव ज. १०.८.१७५५ मृ. ३०.८.१७७३, मुंज २८.५.१७६२, ल. गंगाबाई (साठे) १८.४.१७६३; गर्भाधान १७.७.१७६९; पुत्र माधवराव सवाई. गंगाबाई सकेशा स्थितींत मृ. १२.७.१७७७.

१७ सवाई माधवराव ज. १८.४.१७७४ मृ. २७.१०.१७९५; मुंज २१.४.१७७९; ल. रमाबाई (थत्ते यांजकडील) १०.२.१७८३, एक मूल होऊन जीर्ण ज्वरानें मृ. ३१.१.१७९३, दुसरें ल. ३.३.१७९३ यशोदाबाई (विजयदुर्गकर गणेश विश्वनाथ गोखले याची कन्या.) यशोदाबाईचा मृ. १४.१.१८११. इचा पुढें तोतया उत्पन्न झाला.

१८ बाजीराव ज. १७.१.१७७५ धार येथें, शेवटचा पेशवा, पेशवाईवर दाखल ता. ५.१२.१७९६ पासून ता. ३.६.१८१८ पावेतों. मृ. बिठूर ऊ० ब्रह्मावर्त येथें १४.१.१८५१. या दुसऱ्या बाजीरावाच्या विवाहित स्त्रिया ११; संतती फक्त दोन मुली, वडील योगाबाई ज. स. १८४३, लग्न स. १८५५ बापूसाहेब कुरुंदवाडकरांशीं, मृ. १८५८; दुसरी मुलगी कुसुमाबाई ऊ० बयाबाई आपटे ज. १६.१.१८४७ ल. स. १८५५ गणपतराव बापूसाहेब आपटे यांशीं; वैधव्य स. १८८३, मृ. १९.६.१९१७. बाजीरावाचा दत्तक पुत्र नानासाहेब ज. १८.५.१८२५, दत्तविधान ७.६.१८२७, मृ. नेपाळांत ता. ६.१०.१८५८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१

प्रतिबंधांतून राज्याप्रत

कालसूचि

१६८२ मे	१८	पुण्यश्लोक शाहू : जन्म, कोंकणांत रायगडाजवळ.
१६८९ नोव्हेंबर	३	शाहू बादशहाच्या कैदेंत सांपडला.
१६९६ जून	९	ताराबाईपुत्र शिवाजीचा जन्म.
१६९८ मे	२३	राजसबाई पुत्र संभाजी जन्म.
१७०७ फेब्रुवारी	२०	औरंगजेब मृत्यु अहंमदनगर येथें.
१७०७ मार्च	५	अजमशहाचें राज्यारोहण.
"	१३	अजमशहानें शाहूस पोषाख दिला.
मे	४	अजमशहा सिरोंज येथें दाखल.
	८	दोराहा मुक्कामाहून शाहू दक्षिणेस परतला; अंबुपांडे मिळाला; बीजागडच्या मोहनसिंगाचें साह्य; लांबकानी येथें कांहीं काळ वास्तव्य.
	२५	शाहूचा सासरा रुस्तुमराव जाधव यास हतसहस्री.
जून	८	अजमशहा मारला जाऊन बहादुरशहा पदापन्न. शाहूस लांबकानी येथें परसोजी भोसले मिळाला.
जुलई	—	शाहू चोरवड येथें; नंतर कुसुम्बी येथें.
ऑगस्ट	३	शाहूतर्फे ज्योत्याजी केसरकरास सनदाप्राप्ति.
ऑगस्ट ते सेप्टेंबर	–	शाहू अहंमदनगर येथें. पारदगढी घेतली, फत्तेसिंगाचा पुरस्कार, "शाहूस हक्क नाहीं" असें ताराबाईनें जाहीर केलें.
१७०७ ऑक्टोबर	४	शाहूनें औरंगाबाद लुटलें.
	१२	खेडची लढाई, शाहूचा विजय.
	२७	रोहिडा, राजगड, प्रचंडगड, विचित्रगड शाहूस प्राप्त.
डिसेंबर	१३	बादशहाकडून मदनसिंगाची शाहूकडे रवानगी.
१७०८ जानेवारी	१	शाहूनें सातारा घेतला.
	१२	शाहूचा राज्याभिषेक; बादशहाला पत्र.
मे	२७	बादशहाचें उत्तर आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१

प्रतिबंधांतून राज्याप्रत

१ परिस्थितीचा मेळ
२ माळव्यांतील अधिष्ठान
३ बादशाही पाठिंब्याचा अवलंब
४ शाहूचें स्वदेशीं आगमन
५ ताराबाईशीं वाग्युद्ध
६ बलाबलाचें निदान
७ खेडची लढाई, सातारा काबीज
८ राज्याभिषेक व नेमणुका

१ परिस्थितीचा मेळ (स. १७०७).—ता. २० फेब्रुवारी, स. १७०७ रोजीं औरंगजेब बादशहा अहंमदनगर येथें मरण पावला, ही गोष्ट मराठ्यांच्या व एकंदर हिंदुस्थानच्या इतिहासांत महत्त्वाचें परिवर्तन दाखविते. त्या वेळची अंतर्बहिर्गत परिस्थिति स्पष्टपणें नजरेपुढें ठेविल्याशिवाय या परिवर्तनाचें विशिष्ट स्वरूप लक्षांत येणार नाहीं. औरंगजेबाएवढे कर्तृत्ववान राज्यकर्ते भूतलावर फारसे झाले नाहींत. केवळ धार्मिक दुराग्रहाचे पायीं त्यानें आपल्या जीविताचा व मोगल बादशाहीचा नाश करून घेतला. त्याच्या अशा कष्टमय मृत्यूंत कोणते प्रकार अंतर्भूत होते आणि त्यांचें पर्यवसान कसें झालें हें समजून घेणें अवश्य आहे.

पंचवीस वर्षेपावेतों मराठ्यांनीं औरंगजेबाशीं जो प्रचंड झगडा केला, त्यामुळेंच मोगल सत्तेचा पोकळपणा उघड होऊन देशांत आपली सत्ता स्थापण्याचा आत्मप्रत्यय मराठ्यांस प्राप्त झाला. वरील दीर्घकालीन युद्धांतील घडामोडींचें वर्णन पूर्व भागांत येऊन गेलेलें वाचकांनीं पुढील संदर्भासाठीं ध्यानांत आणिलें पाहिजे.

संभाजीच्या वधानें बादशहाला लभ्यांश कांहींच झाला नाहीं. उलट त्यामुळें मराठी राष्ट्राला विलक्षण चेतना आली. संभाजीला आपल्या हयातींत विशेष कर्तबगारी दाखवितां आली नाहीं, पण ही उणीव त्यानें आपल्या मृत्यूनें भरून काढिली. आपल्या छत्रपतीला, राष्ट्राच्या मुख्य पुरुषाला, शिवाजी महाराजांच्या पुत्राला बादशहानें हालहाल करून ठार मारिलें, या कृत्याचा भरपूर सूड उगविण्याचा चेव मराठमंडळांत उत्पन्न झाला. तेणेंकरून जिवावरच्या झगड्यांतील समान संकटानें मराठ्यांचें राष्ट्रैक्य बनून आलें. दुर्बलानें प्रबलांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हताश करण्याचा प्रयोग यशस्वी होऊन राष्ट्राच्या उमेदी वाढल्या. त्यास युद्धाचा बहुमोल अनुभव मिळाला. शौर्य, गनिमी कावा व डावपेच इत्यादींनीं राष्ट्रोत्कर्ष कसा होतो, हें स्पष्ट झालें.

प्रत्यक्ष बादशहा देखील हा प्रकार जाणून होता. शाहूचें एकच मोहरें त्याच्या हातीं शिल्लक असून त्याचा उपयोग कसा करावयाचा ही विवंचना त्यानें आपल्या मनाशीं अहर्निश चालविली होती. शाहूला मुसलमानी दीक्षा देऊन आत्मिक बनविण्याचा त्याचा उद्देश सिद्धीस गेला नाहीं. संभाजीप्रमाणें त्याचा वध करण्यांत आपला फायदा नाहीं हें त्यास पक्कें कळून चुकलें. तेव्हां त्यास आपला ताबेदार बनवून त्याजकडून मराठमंडळांत फूट पाडणें एवढी एकच शकल त्यास उरली होती. तिचाही उपयोग त्यानें आपल्या हयातींत कसा केला हें मागें सांगितलें आहे. "माघ वद्य १ म्हणजे ता. १८ जानेवारी, स. १७०६ रोजीं बादशहांनीं शाहू राजे यांसी जाळींतून काढून झुल्फिकारखानासमागमें कोंडाणा घ्यावयास रवाना केले आणि आपण अहंमदनगरास येऊन मुक्काम केला. लगेच चैत्रमासीं धनाजीनें पातशाही लष्कराशीं भिडून लढाई केली." ¶ पण वरील सुटकेचें साहस शाहूनें स्वीकारलें नाहीं. तो बादशहाच्या छावणींत असतांच वर सांगितल्याप्रमाणें औरंगजेब मृत्यु पावला.

पश्चात् त्याचा द्वितीय पुत्र अजमशहा यानें बापाची अंत्यक्रिया उरकून लगेच ता. ५ मार्च रोजीं सिंहासनारोहण केलें, आणि वडील बंधूचा पाडाव करण्यासाठीं उत्तरेकडे प्रयाण चालविलें. शाहू व त्याचा परिवार त्याजबरोबर उत्तरेची वाट चालूं लागला. निघतांना अजमशहानें दाऊदखान पन्नी यास विजापुरास, बादशाही मनसबदार रायभानजी भोसले यास औरंगाबादेस, व चीनकिलीजखान म्हणजे निजाम उल्मुल्क यास बऱ्हाणपुर येथें नेमून दक्षिणचा बंदोबस्त केला. मात्र दक्षिणची मुख्य सुभेगिरी झुल्फिकारखानाचे नांवें असून खान शहाबरोबर उत्तरेस गेला. मराठ्यांच्या पुढाऱ्यांची व इकडील व्यवहारांची पुरेपूर माहिती संभाजीच्या वेळेपासून जशी झुल्फिकारखानास होती, तशी दुसऱ्या कोणास नव्हती; आणि प्रसंग पडल्यास पुढेंमागें आपण दक्षिणेंतच स्वतंत्र व्हावें असा त्याचा मनोदय असल्यामुळें त्याचें व दाऊदखानाचें कैक वर्षें बस्तान जुळलेलें होतें. इकडे बादशहाच्या छावणींत जो दीर्घ काल शाहूनें काढिला, त्यांत त्यानें आपल्या सौजन्याची छाप राजपूत

¶ ग. प्र. श., शि. च. प्र. पृ. ६९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व कित्येक मुसलमान मंडळीवर चांगलीच बसविली असल्यामुळें, शिवाजीच्या या नातवावर अनेकांचा मोठा लोभ जडला होता. त्याची पुरस्कर्ती झीनतुन्निसाबेगम भावाबरोबर वाट चालत होती. त्यांच्या मार्फत शाहूनें आपल्या सुटकेची खटपट चालविली. अजमशहाची इच्छा त्यास सोडण्याची नव्हती. वडील बंधूचा पाडाव करण्यांत तो गर्क असून त्या उद्योगास मराठ्यांनीं दक्षिणेंतून अडथळा करूं नये अशी तजवीज त्यानें ठेविली. ता. १३ मार्च रोजीं बऱ्हाणपुरच्या मुक्कामावर झुल्फिकारखानानें अजमशहाशीं शाहूची मुलाजमत करविली, शहानें त्यास पोषाख दिला.§ शाहूच्या सुटकेचाच हा उपक्रम होय. पुढें शाहू तसाच लष्कराबरोबर प्रवास करीत पुढें गेला. राजपुतांनीं व इतरांनीं शहास गळ घातली कीं शाहूस सोडावें. पण हातांतला डाव सोडण्याची बुद्धि त्यास झाली नाहीं. होतां होतां नर्मदा पार होऊन शहाचा मुक्काम ता. ४ मे रोजीं सिरोंजेस झाला. उत्तरोत्तर शाहूचें चित्त अधीर व चिंतातुर होऊं लागलें.

दोघां प्रचंड हत्तींप्रमाणें एकदां या शहाजाद्यांची झुंज जुंपली म्हणजे देशभर कसा धुमाकूळ उडतो आणि त्यांत कितीक निरपराध्यांचा चूर होऊन जातो हें प्रत्येक इसम जाणून होता. दारा व औरंगजेब यांच्या झोंबीचा प्रकार त्या वेळीं बराच ताजा होता. अशा मनःस्थितींत भोपाळच्या वायव्येस वीस मैलांवर दोराहा गांवीं मुक्काम असतां शाहूनें दक्षिणची वाट धरिली. शाहू छावणींतून पळून गेला असें मुसलमान लेखक सांगतात, तर शहाशीं कांहीं करार बोलण्यांत येऊन शाहू परत निघाला असें मराठी लेखक सांगतात. तो करार असा. " शाहूनें बादशाही ताबेदारींत राहून दक्षिणचें राज्य साध्य करावें, प्रसंग पडेल तेव्हां बादशहाची कुमक व सेवा करावी, मातुश्री वगैरे कबिले व मदनसिंग ओलीस दाखल बादशहाचे ताबीन ठेवावे, चौथाईसरदेशमुखीचे हक्क दक्षिणच्या सहा सुभ्यांतून वसूल करावे, त्यांच्या सनदा मागाहून तयार करून पाठविण्यांत

§ जयपुर अखबारात. 'शाहू' नांवाची उत्पत्ति चिन्त्य आहे. 'शहाजी' या नांवावरून हें नांव निघूं शकेल. पण 'साव' म्हणजे पतीचा माणूस याचें तें प्राचारिक रूप होय. साधु या संस्कृत शब्दाचा प्राकृत अपभ्रंश साधु—साव असून तो शब्द मराठींत रूढ झाला हें सावकार शब्दावरून दिसतें. पहिल्या शिवाजीच्या तुलनेनें हा संभाजीपुत्र शिवाजी साव होय असें औरंगजेब विनोदानें म्हणूं लागला, तेंच नांव पुढें रूढ झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येतील. तूर्त दोनशें स्वार रांगडे बरोबर घेऊन जावें. "§ करार ठरत असतांच बेगमेनें शाहूला प्रेमाचा निरोप दिला. किंबहुना तिनेंच भर देऊन त्यास निघण्याची त्वरा करविली. पण शहानें रीतसर पोशाख वगैरे देऊन त्यास स्पष्ट निरोप दिला नाहीं. बेगम बोलली, "तुम्ही आतांच निघून जा, उद्यां शहाची बुद्धि कशी फिरेल कोणी सांगावें!" त्याचा पाठलाग शहानें केला नाहीं यावरून त्याची मूक संमति शाहूस होती इतकाच अर्थ निघतो.

शाहूच्या आगमनाची तपशीलवार हकीकत पुढें येणार आहे. तथापि त्याची परिस्थिति नीट लक्षांत येण्यासाठीं कित्येक पुढील बनावांचा उल्लेख अगोदर करावा लागेल त्यास इलाज नाहीं. ता. ८ मे स. १७०७ च्या आंतबाहेर शाहू माळव्यांतून निघाला तो खानदेशांतून नगरास आल्यावर त्या भागांत दोन एक महिने त्याचा मुक्काम झाला. या अवधींत त्यानें ताराबाईशीं तडजोड चालविली. ती निष्फळ ठरून लढाईच्या निश्चयानें तो ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यांत दक्षिणेकडे चाल करून येत असतां खेडची लढाई फत्ते करून त्या महिन्याच्या चौथ्या आठवड्यांत शिरवळावर दाखल झाला. त्या वेळीं ताराबाईचा पक्षपाती शंकराजी नारायण सचिव यानें आत्महत्या केल्यामुळें शाहूचें बळ वाढलें. लगेच साताऱ्यावर चाल करून जानेवारीच्या आरंभीं तो राजधानीचा किल्ला त्यानें हस्तगत केला. त्यापूर्वींच ताराबाई तेथून पन्हाळ्याकडे गेली होती. लगेच 'क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी' या पदवीनें त्यानें राज्यकारभार हातीं घेतला. राज्यभिषेकसमारंभ माघ शुद्ध प्रतिपदा ता. १२ जानेवारी, स. १७०८ या दिवशीं झाला.

मात्र एवढ्यानें शाहूच्या अडचणी संपल्या नाहींत, उलट त्या वाढतच जाऊन कैक वर्षे त्याचें आसन अत्यंत डळमळीत राहिलें. तें स्थिर करून मराठ्यांच्या कारभाराची व्यवस्था ठरविण्यांत त्यास बाळाजी विश्वनाथाचा अत्यंत उपयोग झाला; म्हणून त्यासच शाहूनें ता. १७ नोव्हेंबर, स. १७१३ रोजीं मुख्य प्रधानकीवर नेमिलें, तेणेंकरून उत्तरोत्तर शाहूचा उत्कर्ष होत गेला. असा हा शाहूच्या सुटकेचा संक्षिप्त आराखडा आहे, त्यांतील तपशील पुढें सांगावयाचे आहेत, त्या पूर्वी या वेळची एकंदर परिस्थिति प्रथम लक्षांत आणिली पाहिजे.

---

§ जयपुर अखबारात, चिटणीस बखर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औरंगजेबाच्या दक्षिणच्या कारभारांत दरबारचे अधिकारी, राजपूत राजे, सेनानी व हिंदुमुसलमानांचे वजनदार पुढारी हे बहुधा मनांतून रुष्ट व बादशाहीचे द्वेष्टे बनले होते. हा अंतस्थ प्रकार ओळखून बाळाजीनें राजपुतांचा स्नेह संपादिला, हिंदूंचा पुरस्कार केला आणि कित्येक मुसलमान अधिकाऱ्यांशीं प्रेमादराचें नातें जोडिलें. त्या वेळीं बादशाही कारभाराची अवनति होत चाललेली उघड दिसत होती. राजपूत सत्ताधीश पूर्वी बादशाहीचे आधारस्तंभ बनले होते, ते आतां स्वातंत्र्याच्या पाठीस लागून स्वधर्माच्या नांवाखालीं मुसलमानी अंमलदारांस विरोध करूं लागले. हिंदु सत्ताधीशांचें ऐकमत्य होण्यास हा योग चांगला आला होता. तसा उपक्रम अल्प काल बोधपर्णतही आला, परंतु अनेक कारणांनीं तो विफल होऊन हिंदुपदपातशाही निर्माण झाली नाहीं, तरी पेशव्यांच्या कर्तबगारीनें त्या उद्देशाची मजल पुष्कळशी साध्य झाली हें निर्विवाद आहे. पुष्कर येथें राजपूतमंडळाचा विचारविनिमय दोन वर्षेपावेतों चालला त्याचा उल्लेख पुढें येणार आहे, त्यावरून वरील विचारसरणीचें प्रत्यंतर मिळेल.

२ माळव्यांतील अधिष्ठान.—पंचवीस वर्षांच्या युद्धानुभवानें मराठ्यांच्या राजकीय आकांक्षा व आत्मप्रत्यय वाढला, तसा वास्तविक शिवाजीच्या वेळींही वाढला नव्हता. अर्थात् त्यांच्या उद्योगास भरपूर क्षेत्राची गरज या वेळीं विशेष निर्माण झाली. औरंगजेबाचा उच्छेद करण्यांत त्यांनीं माळवा प्रांत बराच आक्रमिला होता. जिंजीतंजावरपर्यंतचें दक्षिण हिंदुस्थान त्यांनीं पूर्वींच व्यापलें होतें. मोगलांनीं दक्षिण देश जिंकण्याचें योजिलें तेव्हां माळवा प्रांत हा त्यांच्या उद्योगाचा मुख्य पाया बनला. उलट पक्षीं मोगलांचें निवारण करणें असेल तर त्यांचा हा मूळ पायाच उखळून काढला पाहिजे, हें मराठ्यांनींही तितकेंच ओळखलें. पैसा, फौजा, युद्धसामुग्री जी कांहीं औरंगजेब दक्षिणेंत आणी ती माळव्यांतून येत असतां तेथेंच लुटून हस्तगत करण्याचा सपाटा त्यांनीं आरंभिला, म्हणून बादशहाच्या नाड्या येथें विशेष आंखडल्या गेल्या. मिळून मोगलांस काय किंवा मराठ्यांस काय औरंगजेबाच्या पश्चात् भावी राजकारणाचें मुख्य आधारस्थल माळवा प्रांत होय ही गोष्ट त्या वेळीं स्पष्ट असलेली आजच्या अभ्यासकांनीं विशेष विचारांत घेतली पाहिजे. आपल्या स्वराज्यांत युद्धप्रसंग घडूं न देतां तो माळव्यांतच उत्पन्न करणें मराठ्यांस फायदेशीर व अपरिहार्य झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माळव्याच्या अंतःस्थितीचाही थोडा विचार ध्यानांत आणिला पाहिजे. तेथें पूर्वी जे स्थानिक अंमलदार वास्तव्य करून होते ते अलीकडे उखडले जाऊन तेथें नवीन राजपूत घराण्यांनीं आपलें वास्तव्य बनविलें होतें. पंचवीस वर्षांच्या औरंगजेबी युद्धांत तो मूळचा सधन प्रांत सर्वथा नागवला जाऊन बंडाळी व दंगेधोपे सारखे चालू राहिल्यामुळें पूर्वीचे उद्योगधंदे व आर्थिक व्यवहार बंद पडून लोक निर्धन बनले. जयपुरचा उदयोन्मुख सत्ताधारी सवाई जयसिंग यास माळव्याचा अभिलाष अनिवार उत्पन्न झाला. यमुनेपासून नर्मदेपावेतोंचा प्रदेश सलंग जयपुरखालीं आणण्याची हाव त्यानें धारण केली, त्यास बादशहाकडून आळा बसला नाहीं, यामुळें पुढील राजकारणास निराळें स्वरूप प्राप्त झालें. दक्षिण देश सांभाळण्यासाठीं बादशहा व सय्यदबंधू माळव्यावरचा आपला शह भक्कम करूं लागले. झुल्फिकारखान, निजाम, सादतखान, महंमदखान बंगश, गिरिधरबहादूर वगैरे अनेक कर्तबगार व्यक्तींचा कटाक्ष पुढें माळव्यावर कां उत्पन्न झाला, बादशहानें आपले मोठमोठे कामगार तेथें कां इरेस घातले, आणि मराठ्यांनीं तरी पुढें माळव्यांतच आपल्या राजधान्या कां निर्माण केल्या, याचें रहस्य ओळखणें जरूर आहे. दक्षिणच्या बचावासाठीं पुढें माळव्यांत चाल करून तेथें आपला जम बसविणें, हा कार्यक्रम राजाराम व ताराबाई यांच्या वेळेपासूनच मराठ्यांनीं निश्चित केला होता, आणि बराचसा अंमलांतही आणिला होता. गदाधर प्रल्हाद शकावलींत पुढील उल्लेख आहे. "शके १६२५ माघमासीं म्हणजे स. १७०४ च्या फेब्रुवारींत नेमाजी सिंदा, केसोपंत पिंगळे, परसोजी भोसले पंनास हजार स्वार मिळोन नर्मदा उतरोन काळाबागपावेतों गेले. त्यांचे पाठीवर बादशहानें गाजुद्दीखानास रवाना केलें." खानानें सिरोंज येथें नेमाजीचा पराभव करून बादशहाचा नक्ष राखिला. †

माळवा प्रांताची ही राजकारणी दुरवस्था व तींत गुरफटलेले पक्षोपपक्ष शाहू व त्याचे आद्य सल्लागार यांस पूर्णपणें माहीत होते. दक्षिणेंतील आपलें घर व्यवस्थित करण्यापूर्वी मराठे उगाच उत्तरेकडे वळले म्हणून त्यांची सत्ता दुर्बल राहिली असें जे लेखक प्रतिपादितात, त्यांनीं तत्कालीन कागदपत्रांचें आकलन केलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. उलट पक्षीं उत्तरेंत मजबुदी केल्याशिवाय

† या लढाईचें व माळव्याच्या राजकारणाचें मार्मिक स्पष्टीकरण Malwa-in-Transition या पुस्तकांत दाखल आहे. पृ० ५७-६०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिणेंतलें घरच मुळीं कबजांत राहत नव्हतें हा प्रकार शाहू आणि त्याचे पेशवे व सरदार यांनीं ओळखला आणि तदनुसार आपला उद्योग चालू केला, ही मंडळी अविचारी किंवा आंधळेपणानें वागणारी नव्हती. पेशवा बाळाजीपंत, त्याचे सहायक पुरंदरे वगैरे मुत्सद्दी, सेनापति खंडेराव दाभाडे, परसोजी व कान्होजी भोसले अशी अनेक कर्ती मंडळी प्रथम वरील उद्योगांत कशी पडली, आणि पुढें तोच उद्योग बाजीरावानें कां हातीं घेतला याचें कारण शोधलें पाहिजे. बाळाजी विश्वनाथानें दिल्लीच्या स्वारीचें साहस अंगीकारिलें, त्यांत दुहेरी हेतु होता. शाहूची मातुश्री व परिवार दिल्ली येथें ओलीस म्हणून ठेविलेला होता तो सोडवून आणणें, आणि त्याबरोबरच माळव्यांत आपला पाय भक्कम करणें हा द्विविध कार्यक्रम मराठमंडळास पूर्णपणें पटलेला होता.

३ बादशाही पाठिंब्याचा अवलंब.—शाहूच्या परिस्थितीचें आकलन करण्यांत अभ्यासकांचे मनांत पुष्कळसे दूषित ग्रह अगोदरच बनून गेलेले असतात. शाहू बादशहाच्या कैदेंतून सुटून आला, तेव्हां त्याला फक्त चुलतीशीं तेवढें लढावयाचें असून बादशहासंबंधानें त्याची बाजू निर्धास्त होती असें आपण गृहीत धरून चालतों. पण हा प्रकार साफ चुकीचा आहे. शाहूला बादशहाकडून सामान्य ताबेदारीपलीकडे विशिष्ट लेखी करार किंवा आश्वासन कांहीं एक मिळालेलें नव्हतें. कसा तरी तो निसटून परत आला इतकेंच. औरंगजेबाच्या मृत्यूबरोबरच मोगल बादशाही कोसळून पडली हा परिणाम पुढें पांचपन्नास वर्षांनीं लोकांस दिसूं लागला, तो आजचे अभ्यासक शाहूच्या आगमनकालाला चिकटवितात, आणि बाजीरावाची चढाई उत्तरोत्तर यशस्वी झालेली पाहून, त्या कल्पनेनें शाहूच्या पहिल्या परिस्थितीचें अनुमान बांधितात. औरंगजेबाला जरी दक्षिणच्या स्वारींत यश आलें नाहीं, तरी त्याचे तिन्ही विद्यमान पुत्र पराक्रमी व दक्षिणेंतच अनुभव मिळविलेले हरतऱ्हेच्या कारभारांत वाकबगार होते, म्हणून बापाचे हेतु सिद्धीस नेण्यास ते असमर्थ होते असें मानण्यास कांहीं कारण नव्हतें. ता. ८ जून, स. १७०७ रोजीं आगऱ्याजवळ लढाई होऊन अजमशहा मारला गेला * आणि बहादुरशहास राज्य मिळालें, तोच सर्वांत लायक होता. मिळून बहादुरशहा सिंहासनावर आला तेव्हां त्याची कारकीर्द भरभराटीची होऊन तो दक्षिण देश पूर्णपणें पादाक्रान्त करणार नाहीं,

* राज. खं. ८ ले ५४—५७ यांत बहादुरशहानें आपल्या विजयाची बातमी शाहूस कळवून त्यास आपल्या आज्ञेंत वागण्याविषयीं बजावलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा बापाचा अपुरा कार्यक्रम सिद्धीस नेणार नाहीं असें मानण्यास कांहीं जागा नव्हती. या बादशहाचें वय त्या वेळीं चौसष्ट असून तो अल्पावकाशांत मरण पावेल असेंही कोणास वाटलें नसतें. बापाचा दुराग्रह त्याचे स्वभावांत नसून सौम्य व समंजस वृत्तीमुळें तो सर्व राज्यास व्यवास्थित आळा घालून शहाजहानसारखा लौकिक बाढवील असाच आरंभीं संभव होता.

राज्यारोहणानंतर लगेच त्यानें कामबक्षावर दक्षिणेंत मोहीम केली, तेव्हां तर मराठे सरदारांची व शाहूची त्रेधा उडून गेली. शाहूस राज्याभिषेक झाला, त्या सुमारास बहादुरशहाचा मुक्काम जयपुरास होता. तेथून तो अजमिरास आला. स. १७०८ च्या उन्हाळयांत शाहू ताराबाईशीं रांगण्यावर लढत असतां बादशहा अहंमदनगराकडे दाखल झाला, आणि नांदेडजवळ गोदावरी उतरून पुढील ऑक्टोबरांत तो बेदरास पोंचला. शाहूला व मराठे सरदारांना त्यानें आपल्या मदतीस बोलाविलें. कोणी गेले, कोणी गेले नाहींत. शाहूनें स्वतः न जातां नेमाजी सिंदे यास फौजेनिशीं पाठविलें. दोन तीन महिनेपावेतों फौजेची व्यवस्था लावून ता. ३ जानेवारी, स. १७०९ या दिवशीं हैदराबादजवळ बहादुरशहानें कामबक्षाशीं लढून त्यास ठार मारिलें. त्यानंतर एकंदर राज्याची व्यवस्था लावीत तो तीन महिने हैदराबादेस राहिला. पुढें उत्तरेंत जाण्यासाठीं तो परत फिरला. मे महिन्यांत अहंमदनगरावर व जून महिन्यांत औरंगाबादेस मुक्काम करीत तो पुढें दिल्लीस पोंचला. बादशहाच्या या हालचालींवर लक्ष ठेवून आपण शाहूचा राज्योद्योग तपासला पाहिजे. बहादुरशहा पुढें तीन वर्षें राज्य करून ता. १७ फेब्रुवारी, स. १७१२ रोजीं मरण पावला. त्यानंतर जहांदरशहा व फर्रुखसियर हे बादशहा होऊन सय्यदबंधु प्रबळ झाले, त्यांच्या कारभाराचा परिणाम दक्षिणच्या राजकारणावर काय घडला, त्याचें वर्णन यथावकाश कळून येईल. सारांश, एका बाजूस बादशाही घडामोडी व दुसऱ्या बाजूस भाऊबंदकी व सरदारांची बंडाळी अशा अडचणींतून शाहूस आपला जम बसवायचा होता हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

स. १७०८ सालीं शाहू चुलतीशीं लढत असतां बहादुरशहा व कामबक्ष यांची झुंज चालू झाली. दोघेही मराठे सरदारांना आपापल्या बाजूस ओढूं लागले. बहादुरशहा दूर पण अधिकारी, कामबक्ष बंडखोर पण मराठ्यांचे छातीवर, अशी ही पकड होती. शाहूची मातुश्री व बंधु मदनसिंग आगऱ्यास होतीं. दक्षिणेंत निघण्यापूर्वीं बहादुरशहानें मदनसिंगास भेटीस बोलावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यास खिलत व चांद बक्षीस दिला, आणि शाहूला व सरदारांना आपल्या मदतीस आणण्यासाठीं दक्षिणेंत रवाना केलें, असा ता. १३-१२-१७०७ चा उल्लेख आहे.§ इकडे रायभानजी भोसले दक्षिणेंत मोगल मनसबदार होता, त्यास कामबक्षानें आपल्या पक्षांत वळवून घेतलें. तेवढ्यांत बहादुरशहाचाही त्यास हुकूम आला कीं आम्ही दक्षिणेंत येत आहों, तर तुम्ही शाहूछत्रपतीकडे जाऊन त्यांस व त्यांच्या सरदारांस आपापल्या फौजांनिशीं आमचे साह्यास घेऊन यावें. कान्होजी भोसले, रंभाजी निंबाळकर, नेमाजी सिंदे इत्यादि सरदारांकडे बादशहा व कामबक्ष असे दोघांचेही हुकूम येऊन दाखल झाले. अशा स्थितींत कित्येक सरदारांनीं दोघांच्याही फौजांवर ताव मारून आपला लाग साधून घेतला. शाहू स्वतः कोणाचेच भेटीस गेला नाहीं. वकिलांचे मार्फत बोलणीं करून त्यानें वेळ मारून नेली. निदान बादशहानें आपणांवर वक्र दृष्टि न ठेवितां पूर्वी बोलण्यांत आलेले करार अंमलांत आणावे एवढी तजवीज त्यानें रायभानजी व मदनसिंग यांचे मार्फत साधली, आणि चौथाईचा हक्क आपणांस मिळाला आहे अशा समजुतीवर त्यानें तो हक्क प्रांतांतून वसूल करण्याचा उद्योग चालविला.

पहिल्या एक दोन वर्षांत रायभानजी व मदनसिंग † हे दोघे शाहूचे मुख्य सल्लागार होते. दोघांनाही बादशाही कारभाराचा व मराठमंडळाचा कैक वर्षांपासून अनुभव असून बादशहाशीं लढून आपला निभाव लागणार नाहीं, त्याची ताबेदारी पत्करूनच पडेल तें पदरांत पाडून घेतलें पाहिजे, अशी यांची मनोवृत्ति दक्षिणच्या राजकारणांत बनलेली होती, त्यांचीच सल्ला शाहूनें स्वीकारली. शिवाजीची धडाडी शाहूच्या अंगीं नव्हती, हें तर उघडच आहे.

---

§ जयपूर अखबार

† **मदनसिंग**—हा संभाजीचा दासीपुत्र शाहूशीं जिव्हाळ्याच्या बंधुत्वानें वागत असे. बादशाही अखबारांत त्याचा उल्लेख वारंवार येतो. स. १७०९ च्या उन्हाळ्यांत दिल्लीस परत जातेवेळीं बहादुरशहानें नगरांतून शाहूस पोषाख पाठविला आणि मदनसिंगास आपल्याबरोबर उत्तरेंत नेलें. शाहूचें बस्तान बादशहाशीं यथायोग्य राखण्याचें काम त्यानेंच पुष्कळसें केलें. शंकराजी मल्हाराचें व सय्यदाचें कारस्थान त्यानें जमविलें. येसूबाईबरोबर परत दक्षिणेंत आल्यावर तो बहुतेक इकडेच राहिला. ता. ७.७.१७३० रोजीं मदनसिंगबावाचे घरीं बायकोस सणगें दिल्याची नोंध पे. द. २२ ले. ४७ यांत आहे. त्या पुढें तो कधीं वारला कळत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अद्यापि शाहूचा जम सांगण्यासारखा बसला नव्हता. स. १७०९ च्या आरंभीं कामबक्षाचा पाडाव झाल्यावर बक्षिसें उपटण्यासाठीं पुष्कळसे मराठे सरदार बहादुरशहाकडे रुजू झाले, त्यांत शाहूनें रायभानजीचे मार्फत सरदेशमुखी हक्कांची सनद मागितली. झुल्फिकारखानच बादशहाचा मुख्य सल्लागार असून त्याचा इतबार रायभानजीवर विशेष व पाठिंबा शाहूस होता. परंतु या वेळीं ताराबाईचेही वकील तेच हक्क मागण्यासाठीं बादशहाकडे गेले असल्यामुळें दोघांचाही डाव फसला. वजीर मुन्यिमखानाचें व झुल्फिकारखानाचें पटत नव्हतें, म्हणून वजिरानें ताराबाईचे मागणीस पुष्टि दिली. दोनही पक्षांनीं आपापल्यापरी बादशहाकडे शिकस्त केली. सरदेशमुखीचीं फर्मानें लिहून तयार होतीं, फक्त त्यांत नांव दाखल करून पुरीं करणें बाकी होतें. वजिरानें शक्कल काढिली कीं शाहू व ताराबाई यांनीं आपसांत लढून तंटा मिटवावा, म्हणजे विजयी पक्षास सनदा देण्यांत येतील. ही तोड बादशहानें मान्य केली. वास्तविक मराठ्यांस कमकुवत करण्याचा हा डाव औरंगजेबाचाच असून तो त्याच्या या पुत्रासही पूर्णपणें अवगत होता, तो इकडे चालू करून बहादुरशहा परत गेला.

वरील निकाल शाहूला बाधक झाला हें सांगणें नकोच. बादशाही पाठिंब्यानें आपण ताराबाईस ठिकाणीं बसवूं ही त्याची अपेक्षा निष्फळ ठरून लढाईनेंच हें आपसांतील भांडण मिटविण्याची निकड उत्पन्न झाली. ताराबाईनेंही जोर धरल्यामुळें उभयतांचा हा झगडा दोनचार वर्षें विशेष तीव्र बनला. एकमेकांचीं ठाणीं हस्तगत करणें, लालूच धाकदपटशा वगैरे साधनांनीं एकमेकांचे सहायक फोडून आपला पक्ष सबळ करणें, असले प्रकार कांहीं काळ कसे जोरांत चालले तें तत्कालीन मराठी कागदांत व बादशाही अखबारांत चांगलें दिसून येतें.

अभिषेक होतांच शाहूनें वकिलांचे मार्फत बादशहास कळविलें, "आमची चुलती व सर्व नोकर लोक मिळोन फिसाद करून आम्हांवर फौजा रवाना केल्या, आम्हांस बुडवावें, आपण राज्य करावें अशी चित्तीं द्वेषबुद्धि धरिली. त्यास बादशाही हुकमानें देशीं राज्यावर आलों, तों हा प्रसंग पडला, त्यास श्रीवरें शूरत्वें करून लढाई केली, त्यांत बादशाही कृपेकरून फत्ते पावलों. नोकर लोकांस धरून नसेती केल्या. बंदोबस्ती करण्याचा क्रम चालला आहे. बादशहांचा हुकूम कीं मनुष्य जरबेंत राखावें, रयत लोकांचें संरक्षण करावें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इन्साफवराई खुद्द जातीनें पाहवी, वंडें बुडवावीं, म्हणजे धक्का नाहीं. त्याप्रमाणें हुकूम चित्तीं दृढतर धरून हिंदुशास्त्राप्रमाणें राज्यपद्धतीनें चालत आहों." ही खबर बादशहास कळावी म्हणून अर्जी देऊन शाहूनें वकील पाठविले. त्यांनीं हुजूर अर्जदास्त रसीद करून "तुम्हांकडील नौकरांचे मुखें साकल्य मजकूर श्रुत केला. तुम्हांस जमेदारीबद्दल पेशजी फर्मान मिळाला आहे त्याप्रमाणें मुलकाचा वगैरे बंदोबस्त ठेवून कायम झालां हा फायदा तुम्हांस बादशाही कृपेनें झाला हा संतोष मानीत आहों." असें बादशहानें ता. २७ मे, स. १७०८ रोजीं शाहूस कळविलें. § एवंच बादशाही कृपा हाच शाहूचा मुख्य आधार असून या आधारावरच मराठशाहीची पुढील इमारत शाहूनें रचिली. बादशहाशीं व चुलतीशीं एकसमयावच्छेदें शाहूला लढणें शक्य नव्हतें. केवळ स्वतःच्या निभावणीचा मार्ग त्यानें स्वीकारिला तोच योग्य होता. बाळाजी विश्वनाथानें स. १७१९ त बादशहाकडून स्वराज्याच्या सनदा आणिल्या, 'त्या स्वातंत्र्याच्या नसून दास्याच्या शृंखला होत्या,' असें जे प्रतिष्ठित अभ्यासक कंठरवानें प्रतिपादितात त्यांस तत्कालीन परिस्थिति, राजकारणी शक्यता व त्या वेळचे मराठशाहीचे निष्ठावंत सेवक यांची बिलकूल माहिती नाहीं असें म्हणावें लागतें. असो. आतां वरील बनावाचे तपशील समजून घेणें अवश्य आहे.

४ शाहूचें स्वदेशीं आगमन.—शिवछत्रपतीचा नातू, संभाजी पुत्र शाहू याचा जन्म उत्तर कोंकणांत रायगडाखालीं माणगांवजवळ गांगवली येथें ता. १८ मे, स. १६८२ रोजीं झाला. † ता. ३ नोव्हेंबर, स. १६८९ रोजीं रायगड किल्ला बादशाचे कबजांत गेला, त्या वेळीं मातुश्रीसह शाहू पकडला जाऊन अटकेंत पडला, आणि बादशहाच्या छावणीबरोबर महाराष्ट्रांतच भ्रमण करीत जें अर्धमेलें जीवन त्याला कंठावें लागलें, त्याची हकीकत पूर्वी येऊन गेली आहे.* पुष्कळांचा समज आहे कीं शाहूला बादशहानें दिल्लीस नेऊन ठेविलें. हा समज साफ चुकीचा असून शाहूनें दिल्ली शहर कधींच पाहिलें नाहीं. बादशहाबरोबर त्याचा काळ दक्षिणच्या लष्करी लटांबरांत व युद्धाच्या धारावळींत रानावनांतील प्रवासाच्या अडचणी सोसण्यांत गेला.

§ खं. १५. २८९

† जेधे–करीणा

* स्थिरबुद्धि राजाराम, पृ. १०२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औरंगजेब बादशहा ता. २० फेब्रुवारी, स. १७०७ रोजीं अहंमदनगर येथें मरण पावला, त्या वेळीं शाहूचा मुक्काम तेथेंच मातुश्रीसह होता.

मृत्युसमयीं बादशहासन्निध त्याचा एकही पुत्र नव्हता. वडील शहाआलम अफगाणिस्तानकडे असून धाकटा कामबक्ष विजापुरास होता. अजमशहानें बापाची अंत्यक्रिया करून उत्तरेकडे चाल केली असतां रस्त्यांत माळव्यांतून शाहू परत निघाला हें मागें सांगितलें आहे. त्या वेळीं त्याजबरोबर स्वतःचे कांहीं सेवक तेवढेच होते. फौज अशी कांहीं नव्हती. सवाई जयसिंग वगैरे वजनदार राजपूत उत्तरेंत होते त्यांचा पाठिंबा शाहूस होता. “स्वामींचा व सवाई जयसिंगाचा घरोबा पूर्वीपासून चालत आला आहे, त्यांचें मनोधारण स्वामीस अगत्य” असे त्याजबद्दल शाहूचे उद्गार आहेत.§ मातुश्री येसूबाई दिल्लीस गेली, तिच्या बरोबर शाहूनें उद्धव योगदेव राजाज्ञा यास पाठविलें. मोरोपंत सबनीस, महादाजी कृष्ण जोशी, गदाधरभट नासिककर, मनरंजन करणार हिंदुस्थानी ब्राह्मण शुक्लजी हे शाहूबरोबर दक्षिणेंत आले.

बीजागड ऊर्फ बढवाणी म्हणून नर्मदेच्या दक्षिणेस जें लहानसें संस्थान अद्यापि विद्यमान आहे, तेथें मोहनसिंग रावळ नांवाचा राजपूत राजा मोगलांविरुद्ध लढत असलेला अलीकडे पांचचार वर्षें मराठ्यांस मिळून असे. स. १७०४ सालीं नेमाजी सिंद्यानें माळव्यांत शिरून जो प्रचंड झगडा केला, त्यास या मोहनसिंगाचें मोठें साह्य होतें.¶ शाहूचा व त्याचा पूर्वपरिचय होता म्हणून नर्मदा उतरतांच शाहू प्रथम त्याजकडे गेला. ‘हे स्वामींचे स्थापित, पूर्वीपासून स्वामींशीं निष्ठेनें वागले’ असें त्याजबद्दल शाहूचें वर्णन आहे.† मोहनसिंगानें फौज व पैसा देऊन शाहूची व्यवस्था लावून दिली. याच कारणास्तव नर्मदा उतरल्यावर शाहू पूर्वबाजूनें बऱ्हाणपुराकडील मोगल बंदोबस्त चुकवून पश्चिम मार्गानें सातपुड्यांतून बीजागड, सुलतानपुरवरून खानदेशांत आला. जोत्याजी केसरकर अजमशहाबरोबर सनदा आणण्यासाठीं म्हणून उत्तरेंत गेला, त्या सनदा त्यास बहादुरशहाकडून ता. ३ ऑगस्ट रोजीं ग्वाल्हेर येथें मिळाल्या असें विधान अखबारांत आहे. नंतर तो परत येऊन नगर येथें शाहूस भेटला. त्या सनदा उपलब्ध नाहींत.

शाहूला जरी प्रारंभीं लष्करी बळ फारसें मिळालें नसलें तरी महाराष्ट्राच्या नैतिक सहानुभूतीचा पूर त्याजवर लगेच लोटला. हा पाठिंबा नुसता हिंदूंचा

§ शा. रो. [illegible] ¶ See 'Malwa in Transition.' † [illegible] २०२, २०३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसून मुसलमानांचाही होता. औरंगजेबाच्या कारभारानें देशाची कशी नासाडी झाली ही सर्वांस चक्क दिसत होती. मराठ्यांचे पराक्रम व कैक वर्षांचे कष्ट लोकांच्या डोळ्यांपुढें होते. बादशहानें यांचा नाहक छळ चालविला आहे अशी सामान्य समजूत प्रचलित होती, तिचा फायदा शाहूस मिळाला; आणि तो परत निघतांच पुष्कळसे जमीनदार व सेनानायक त्यास अनुकूल झाले. मराठे सरदार तर केव्हां ताराबाईकडे व केव्हां मोगलांकडे जाऊनस्वार्थाच्या पाठीस लागणारे होते, त्यांस हें शाहूचें आगमन उपकारक झालें. कारण तो बादशहाची ताबेदारी पत्करून आला असल्यामुळें त्यास साह्य केल्यानें मोगल अधिकाऱ्यांचा त्यांजवर रोष होण्याचें प्रयोजन उरलें नाहीं. म्हणून जे तटस्थ वृत्तीचे होते ते देखील भराभर शाहूस सामील झाले. त्यानेंही आपल्या औदार्याची छाप चहूंकडे बसवून आपलें आसन दृढ केलें.

मोहनसिंगानें शाहूस मदत देऊन सुलतानपुरास पोंचविलें. सुलतानपुरा जवळच तापीचे कांठीं कोकरमुंडा किल्ला आहे, तेथील जमीनदार अंबू पांडे म्हणजे बहुधा अमृतराव कदम बांडे हा सधन होता, तो शाहूस मिळाला. दोघेही तापी उतरून स. १७०७ च्या मेअखेर लांबकानी येथें दाखल झाले. मावळ्यांतून निघाल्यापासूनच शाहूनें महाराष्ट्रांत चहूंकडे पत्रें पाठवून आपणास सामील होण्याविषयीं शेंकडों लोकांस विनंती कळविली. हें लेखनाचें व तजविजीचें काम बहुतेक गदाधर प्रल्हादानें केलें. शाहूचा सासरा रुस्तुमराव जाधव (सावित्रीबाईचा बाप) यास त्यानें ता. २५ मे रोजीं खालील मजकूर लिहिलेला आढळतो. "तुम्ही स्वामींचे आप्तविषयी लोक कित्येक कार्यास आलां, म्हणोन तुम्हांस हप्तहजारी मनसब मुक्रर केली असे." ‡ लांबकानीस शाहूचा मुक्काम एक महिना झालेला दिसतो. तेथें त्याचा जम लगोलग चांगला बसला. तेथील जमीनदार सुजनसिंग रावळ यानें शाहूस भरपूर मदत केली. § मल्हार तुकदेव पुरंदरे यास शाहू लिहितो, 'स्वामींचें आगमन स्वदेशास जालें तेव्हां तुम्ही अवघ्यां अगोदर लांबकानीचे मुक्कामीं येऊन स्वामींचें दर्शन घेतलें, कित्येक कार्यप्रयोजनें केलीं, एकनिष्ठेनें सेवा करीत

‡ रा. खं. २०-६० § शा. रो. १९५, १९८ व २०३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहां. ‡ अर्थात् हें पुरंदरे कुटुंब व त्यांचे स्नेही बाळाजी विश्वनाथ यांनीं शाहूचा पुरस्कार प्रथमपासूनच केला. कित्येक प्रभु मंडळी देखील त्यास मिळाली. परसोजी भोसल्याचा कारभारी बापूजी सोनाजी दिघे यजमानासह लांबकानीस आल्यावर ते दोघे शाहूची कामगिरी मनोभावानें करूं लागले. त्यांच्याच वजनानें नेमाजी सिंदे, हैबतराव निंबाळकर, पिंगळे पेशव्यांचा हस्तक पारोळ्याचा जागीरदार चिमणाजी दामोदर मोघे वगैरे उत्तरेकडे वावरणारे प्रतिष्ठित सरदार शाहूच्या सेवेंत रुजू झाले. लांबकानीचा हा जून महिन्याचा मुक्काम त्याला विशेष उपकारक झाला.

तथापि शाहूला पहिला मुख्य आधार मिळाला तो परसोजी भोसले याचा होय. ता. २७ जून स. १७०८ रोजीं मुठे खोऱ्याचा कुळकर्णी बापूजी सोनाजी दिघे यास शाहूनें पत्र लिहिलें तें असें. "स्वामी परराष्ट्रांतून स्वराज्यांत आले, त्या प्रसंगीं तुम्ही परसोजी भोसले यांची जमेनिशी करीत असतां त्यांचे तर्फेनें येऊन लांबकानीचे मुक्कामीं स्वामींचें दर्शन घेतलें. स्वामींचे आज्ञेनें परसोजीस दर्शनास आणिलें. ते प्रसंगीं तुम्ही सेवा बहुत एकनिष्ठेनें केली. पुढेंही निष्ठेनें वर्तत आहां. तुमचें ऊर्जित करणें स्वामींस अगत्य सबब इ०" अर्थात् वऱ्हाडांत परसोजी व त्याचा बंधु साबाजी हे सरदार कामगिरीवर असतां ते आपली फौज घेऊन लगोलग शाहूस मिळाले म्हणून शाहूचा जम बसला. "शाहू राज्याधिकारी नाहींत ऐसें ताराऊसाहेबांनीं उत्तर केलें असतां परसोजींनीं पुरतेपणीं अंगीकार करून राज्यासनीं बैसविलें." * यांनींच शाहू राज्याचा खरा वारस अशी खातरजमा केल्यावरून हैबतराव निंबाळकर, नेमाजी सिंदे वगैरे सरदार बागलपणांत होते ते शाहूस मिळाले. पिंगळे पेशव्यांचा मुतालिक चिमणाजी दामोदर त्यास सामील झाला. रखमाजी किन्हळे

‡ हें पत्र खेडची लढाई झाल्यावरचें ता. २४ डिसेंबर, स. १७०७ चें आहे. यावरून मल्हार तुकदेव खेडच्या लढाईत मारला गेला हें पुरंदरे बखरींचें विधान खरें नाहीं. हे पुरंदरे औरंगजेबाचे नोकरींत झुल्फिकारखानाचे दिमतीस होते. खान उत्तरेंत चालला तेव्हां ते धनाजीकडे आले. धनाजी पुणे प्रांतांत मराठ्यांचा अंमल बसवीत असून पुरंदरे त्या प्रांताचे चांगले माहितगार म्हणून त्यांचा उपयोग धनाजीस विशेष झाला. पुरंदरे व बाळाजी विश्वनाथ यांचा स्नेह असून दोघांनीं खेडच्या लढाईपूर्वी धनाजीचें मन शाहूचे पक्षास वळविलें, म्हणून त्यांच्या कुटुंबावर शाहूची मर्जी कायम बसली.

* द. गु. मा. २ पृ. ५७, ऐ. टि. ६. ५८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यास ११ जूनचें शाहूचें पत्र आहे त्यांत तो लिहितो, " स्वामींचा अभ्युदय-प्रसंग होऊन या प्रांतीं आगमन झालें हें ऐकतांच तुम्ही जमावानिशीं लांबकानीस हजर होऊन सेवाधर्म बजावला. " §

जुलईंत शाहू लांबकानीहून चोरवड येथें आणि तेथून कुसुंबीस आला. या ठिकाणीं दादाजी नीलकंठ नाईक पुरंदरकर त्यास मिळाला.‡ कुसुंबीहून ऑगस्टांत शाहूनें अहंमदनगरास येऊन तेथें सुमारें दोन महिने मुक्काम केला. येथून त्यानें पुढील राजकारण सिद्ध करून त्यास अनुरूप अशी आपली व्यवस्था ठरविली आणि १० ऑक्टोबरचे सुमारास पुणें प्रांतांत पाऊल ठेविलें.

दरम्यान शाहूजवळ कोणकोण मंडळी जमा झाली त्यांची नुसती नांवनिशीही पूर्णपणें देणें अशक्य आहे. परसोजी व कान्होजी भोसले, मानसिंग मोरे, अमृतराव कदम बांडे, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, रुस्तुमराव जाधव, चिमणाजी दामोदर व त्याजजवळ वागणारा चांबळीकर गणेश शंकर सरनाईक$, केसो त्रिमल पिंगळे, रामचंद्र त्रिंबक वाकनीस, पंताजी शिवदेव, हणमंते मंडळी, रायाजी प्रभु, कृष्णाजी नरस प्रभु, आनंदराव महादेव प्रभु, महादाजी यमाजी वोकील व त्यांचे कुटुंबीय, तसेंच पुरंदरे मंडळी इत्यादि शाहूच्या पक्षांत स्वस्फूर्तीनें सामील झाले. मागाहून खेडच्या लढाईनंतर मराठशाहीचा मुख्य लोंढा त्यास येऊन मिळाला त्याचें वर्णन पुढें येईल.¶

अहंमदनगरास राहून शाहूनें पुष्कळ कामें केलीं. ता. ७ ऑक्टोबर रोजीं शाहूनें शंकराजी महाडिकास पत्र लिहिलें त्यावरून त्याची मनस्थिति कळून येते. " पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन वर्तमान साकल्य कळलें. महाराजांच्या योगें मोगलाईंत कसाला सोसून भाग्योदयाचा मार्ग लक्षीत होतों, ते मनोरथ ईश्वरें सिद्धीस नेले, परंतु आमचें स्मरण होऊन पत्र न आलें म्हणून कितेक शब्द लावून लिहिलें, त्यास तुम्हा लोकांचें विस्मरण व्हावें ऐसा आमचा हेत नाहीं.

§ रा० खं. ६-६

‡ इ. सं. पे. द. १० $ शि. च. सा. १ पृ. १०२

¶ शाहूच्या सहायकांचे उल्लेख त्यानें दिलेल्या सनदांत भरपूर असून अशा सनदाही विपुल प्रसिद्ध आहेत. शाहू रोजनिशी वाडकृत, इ. सं. पेशवेदप्तरांतील सनदापत्रांची माहिती, पारसनीस व मावजीकृत सनदापत्रें व कैफीयती आणि पेशवे दप्तरांतील कांहीं भाग इत्यादिकांत जरूर ते तपशील सांपडतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुमचा व स्वामींचा घरोबा कांहीं नवा नाहीं. मनोमन साक्ष आहे. आपण तिळतुल्य दुसरा विचार मनांत न आणितां आपला समुदाय व आपणास कोणी पैगाम आले असतील त्यांस बोलावून समागमें घेऊन आलें पाहिजे. तुम्ही ज्यास जो कौल-बोल द्याल, तो स्वामी निश्चयें करून चालवितील. येविशीं सरदारांसही पत्रें पाठविलीं आहेत तीं देऊन सकळांस समागमें घेऊन आलें पाहिजे. सांप्रत आम्ही बालेघाट चढोन कडेवाळितांत आलों. येथून दर मजल पुढें येऊं. विलंब सर्वथा न लावणें."

ता. १२ ऑक्टोबरचें त्याचें आणखी एक पत्र पुण्याचे चित्रावास आहे तें असें. 'तुम्ही स्वामींच्या दर्शनास गोदातीरास आलेत. परमयोग्य अनुष्ठातें सत्कर्मे आचरोन महाराष्ट्र राज्यास कल्याण चिंतीत आहां.' असें सांगून त्यास नेमणूक बांधून दिली. महाराष्ट्राचें राज्य आपण संघटित करीत आहों अशी शाहूची भावना यांत उघड होते.

५ **ताराबाईशीं वाग्युद्ध.**—फौजेचा जमाव झाल्याबरोबर शाहूनें अहंमदनगराहून ताराबाईशीं बाटाघाट चालविली. तिचा निकाल लागण्यास वेळ लागला, म्हणून नगरास त्याचे दोन महिने मोडले. त्यानें असाही विचार चालविला कीं नगरासच राजधानी करून कायमचें राहावें. कारण निजाम-शाहीच्या वेळेपासून नगर हेंच दक्षिणच्या राजधानीचें मुख्य ठाणें होतें. शाहूची इच्छा शक्य तोंवर ताराबाईशीं युद्धप्रसंग टाळावा अशी होती. पण मराठशाहीची मुख्य गादी साताऱ्यावर, अष्टप्रधानादि मंडळाची जागा तीच आणि एकंदर राज्यचिन्हेंही तेथेंच, अशा स्थितींत सातारा जर हस्तगत केला नाहीं तर आपणास छत्रपति म्हणून कोणी मानणार नाहीं, आणि नगरांतून मोगल बादशहा आपणास केव्हां हुसकून देईल याचा नेम नाहीं, म्हणून ताराबाईशीं युद्धप्रसंग केल्याशिवाय भागत नाहीं असा प्रसंग उद्भवला, तो प्रकार आतां सांगितला पाहिजे.

नगरला येण्यापूर्वीच शाहूनें ताराबाईस कळविलें, 'आम्ही निघून स्वदेशीं परत येत आहों, आतां राज्य आम्ही करूं. बादशाही आज्ञाही अशीच आहे. आपण मातुश्री आहां, आपलें यथास्थित चालविण्यास आम्ही कमी करणार नाहीं. पुढचा मार्ग आक्रमण्यास आम्हांस आपला आशीर्वाद व अनुभव यांचाच उपयोग विशेष होईल.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'ताराबाईस वर्तमान कळलें तेव्हां त्यांहीं बातमीस पाठविलें. बातमी आणविली त्यास शाहू राजे यांचे डोईस केस होते. जोगडा गोसावी तोतया आहे असें राज्यलोभाचे अर्थें बोलून धनाजी जाधवरावांस चाळीस हजार फौजेनिशीं राजे यांजवर पाठविलें. तेहि दरमजल भीमातीरास खेड येथें आले.' §

शाहूस तोतया ठरविण्याचा ताराबाईचा डाव तिच्याच गळयांत आला. पंचवीस वर्षें तो महाराष्ट्रांतच नांदला असून प्रमुख मंडळीच्या चांगला परिचयाचा होता. हा डाव फसतांच तिनें शाहूस रोख जबाब पाठविला कीं, "तुमचा राज्यावर हक्क नाहीं आणि आम्ही तुम्हांस राज्य देत नाहीं." या आशयाचे हुकूम तिनें तमाम राज्यांत काढिले, त्याचें प्रत्यंतर पुढील ता. १७ सेप्टेंबर, स. १७०७ च्या पत्रांत मिळतें.

'स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित्सं० आश्विन शु० तृतीया, सौम्यवासरे, क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणीं सोमनाईक देसाई व देशकुलकर्णी ता सैतवडें यांसी आज्ञा केली ऐसीजेः राजश्री शाहूराजे ताम्रांचे निर्बंधांतून निघाले आहेत, म्हणून हुजूर वर्तमान आलें. यैशास, हें राज्य थोरल्या कै० स्वामींनीं बहुतां श्रमें मेळऊन, सर्वांर्थे संपूर्ण केलें होतें. तें राजश्री संभाजीराजे काका यांणीं विध्वंसून कैलासवासी स्वामी राज्याधिकारी झाले. त्यांणीं स्वपराक्रमें नूतनच राज्य संपादिलें. स्वामींनीं त्याचें संरक्षण करून ताम्राचा पराभव केला. राज्याची अभिवृद्धि होत चालली. दुसरी गोष्टी. हें राज्य थोरल्या कै. स्वामींनीं तीर्थस्व० कै० स्वामींस द्यावेंसें केलें होतें. ऐसें असतां त्यांस या राज्याशीं समंध नाहीं. त्या डोहणियांत जे मिळाले आहेत व मिळतील त्यांस नतीजा पाववायाची आज्ञा करून, रा. जयसिंग जाधवराऊ सेनापति व हंबीरराव मोहिते सरलष्कर व वरकड सरदारांस फौजेनशीं पाठविले आहेत. रा० परशराम पंडित प्रतिनिधि यांसही रवाना केलें आहे. ज्यांचें अनुसंधान त्यांकडे लागलें असेल त्यांचा हे मुलाहिजा होणार नाहीं, शासन करितील. तुम्हीं वतनदार एकनिष्ठ आहां. तुह्मांपासून अनसारखी वर्तणूक होणार नाहीं. परंतु शाहूराजे यांजकडील कागदपत्र तुह्मांस आले असतां कांहीं वर्तमान हुजूर लिहिलें नाहीं म्हणजे काय! त्यांकडून माणूस आले तेच कैद करून पाठवावयाचे होते. ते गोष्टी न केली. यामध्यें बरें काय विचारिलें आहे! याउपरी ऐसें करीत न जाणें. त्यांकडील कागदपत्र घेऊन माणूस येईल ते कैद

§ पे. व. खं. ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून हुजूर पाठवीत जाणें. कदाचित् कोण्ही त्यांकडे अनुसंधान लावील, राबता राखेल, तरी त्याचा उद्धार राहणार नाहीं. तुम्ही अनसारिखा प्रसंग मनांत आणाल, कागदपत्र येईल तो पन्हाम कराल, तरी तुमचें बरें होणार नाहीं. वतनापासून दूर व्हाल हें जाणोन, स्वामीच्या पायांशीं निष्ठा धरून राहोन, लिहिलेप्रमाणें वर्तणूक करणें. जाणिजे. मर्यादेयं विराजते. लेखनसीमा. सुरू सूद बार. §

या पत्रांत शाहू खोटा आहे असें ताराबाई म्हणत नाहीं. शिवाजीमहाराजांनीं कमावलेलें राज्य संभाजीनें घालविलें, तें फिरून राजारामानें नवीनच निर्माण केलें म्हणून त्याजवर आतां शाहूचा हक्क नसून आपल्याच पुत्राचा आहे, असें तिचें म्हणणें होतें. या तिच्या पुत्राचें नांव शिवाजी असें असून त्याचा जन्म ता. ९.६.१६९६ चा होता व या वेळीं तो अकरा वर्षांचा होता, म्हणून कारभार सर्व ताराबाई स्वतः करीत होती. शिवाय हा शिवाजी वेडसर असल्याची प्रसिद्धि महाराष्ट्रांत असल्यामुळें ताराबाईच्या पक्षास कांहीं अंशीं वैगुण्य प्राप्त झालें होतें.

मराठ्यांचा स्वभाव अत्यंत हिकमती तो ताराबाईच्या ठिकाणीं भरपूर उतरला होता. संताजी, धनाजी, शंकराजी नारायण इत्यादि कल्पक पुरुषांचीं धोरणें तिच्या अंगीं बाणलीं होतीं. हिकमत झाली म्हणून एखादा योजलेला डाव नेहमींच सिद्धीस जातो असें नाहीं. शिवाय आतां परिस्थिति अगदीं बदलून गेली. औरंगजेबाच्या पश्चात् नवीन बादशहा कसा येतो, तो मराठ्यांशीं आपलें धोरण कसें ठेवतो, या गोष्टींचा बिनचूक अंदाज आगाऊ कोणास कसा लागणार! पंचवीस वर्षें बादशहाशीं सारखें युद्ध खेळून मराठे सुद्धां अगदीं हैराण झाले होते, आणि कशी एकदां सुटका होऊन निरातीचे नेहमींचे व्यवसाय सुरू होतील असें प्रत्येकास होऊन गेलें होतें. खुद्द रामचंद्रपंत अशीच सल्ला ताराबाईस देत होता. सर्वांचा विचार एकच कीं मोगलांशीं मिटतें घ्यावें. अशा मनःस्थितींत शाहू सुटून परत आला, तेणेंकरून मानी व महत्त्वाकांक्षी ताराबाईला हातांतील अधिकार सोडण्याचें जिवावर आलें. पहिली बातमी येतांच हा खरा शाहू नव्हे अशी तिनें बाहेरच्या बाहेर हाकाटी चालविली. पण पंचवीस वर्षें शाहू सदा दक्षिणेंतच शेंपन्नास मैलांच्या कक्षेंत वावरत होता. अनेक सरदार व सेवक त्यास वारंवार भेटत. त्यास सोडवून

§ वि. ज्ञा. वि. १९२४ फे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परत आणण्यासाठींच तर सर्व मराठे बादशहाशीं लढून जिवाचें रान करीत होते. प्रत्यक्ष बादशहानें शेवटच्या तीनचार वर्षांत शाहूस मोकळा करून धनाजीच्या व झुल्फिकारखानाच्या मार्फत परत पाठवून चाललेलें युद्ध मिटविण्याची व मराठमंडळांत फूट पाडण्याची शिकस्त चालविली होती. हिंदुराव घोरपडे, नेमाजी शिंदे, परसोजी भोसले, रायजी थोरात, खंडेराव व कृष्णाजी दाभाडे, रंभाजी निंबाळकर, रायभानजी काका, माने, निंबाळकर असे किती तरी पुरुष बादशहाशीं लढून व प्रसंगानुसार बोलणीं करून शाहूस परत आणण्याची शिकस्त करून राहिले होते. येसूबाई, शिवछत्रपतीची राणी सकवारबाई इत्यादींचा ताराबाईकडे अंतस्थ संदर्भ कैक वर्षे सारखा चालू होता. संभाजीपुत्र मदनसिंग व जोत्याजी केसरकर हे तर दोन पक्षांमध्यें सदा येरझारा करीत होते. खंडो बल्लाळ वगैरे निकटवर्ती गृहस्थ त्या कारभारांत प्रत्यक्ष भाग घेत होते. एवढ्या मोठ्या युद्धाचा मुख्य उद्देश शिवाजीच्या या नातवास सोडवून राज्यावर आणणें हा असून समस्त महाराष्ट्राचा ओढा त्याजकडे होता. अशा स्थितींत ताराबाईनें शाहूविरुद्ध कितीही उठावा केला, तरी तिला राष्ट्रीय पुढाऱ्यांचा पाठिंबा मिळणें शक्य नव्हतें. शाहूशीं प्रत्यक्ष संबंध आला नाहीं असे दोनच ब्राह्मण ताराबाईचे साह्यकर्ते होते, एक परशुरामपंत प्रतिनिधि व दुसरा शंकराजी नारायण. दोघेही शाहूपुढें दुःस्थितीस पोंचले. तिसरा रामचंद्रपंत धरसोडीमुळें फुकट गेला.

झाला हा प्रकार राष्ट्रहिताच्या दृष्टीनें बरा झाला कीं वाईट हा प्रश्न आलाहिदा आहे. येथें फक्त तत्कालीन परिस्थितीचाच विचार कर्तव्य आहे. शाहू बादशहाचा अंकित होऊन आल्यामुळें मराठशाहीचें नुकसान झालें, त्यापेक्षां ताराबाईचा स्वतंत्र बाणाच राष्ट्राला फायदेशीर होता, असें कित्येक प्रतिपादितात. परंतु ताराबाईनेंही बादशहाची ताबेदारी पत्करण्याचें बोलणें शाहूप्रमाणेंच चालविलें होतें. तेव्हां ताराबाईनें तरी अंतीं शाहूपेक्षां जास्त राष्ट्रहित साधलें असतें असें म्हणण्यास काय आधार आहे ? शाहू दाखल होतांच त्याची समजूत काढण्याचा सल्लूखाचा मार्ग ती पत्करती तर आपसांतील युद्ध टळून समुचित राष्ट्राची शक्ति बादशाहीविरुद्ध एकवटली असती, आणि पुढें जो मराठशाहीचा फैलाव पेशव्यांनीं केला, तो बराचसा अगोदर सुरू होऊन समस्तांचें बरं दहांपटें नसतें, असें कां न म्हणावें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या दुभंगलेल्या घराचा परिणाम निजामशाहीची हैदराबादेस स्थापना हा होय. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांचा पुष्कळसा उद्योग घरांतील ही दुफळी मोडण्यांत वायां गेला हें उघड आहे. कोणतेंही काम एकदिलानें केल्याशिवाय यशस्वी होत नाहीं.

६ बलाबलाचें निदान.—शाहू नगरला असतां ताराबाईनें वर सांगितल्याप्रमाणें हक्काची सबब दाखवून शाहूस थारा न देण्याचे हुकूम राज्यांत जाहीर केले. शाहू खोटा आहे, तोतया होऊन आला आहे, त्यास पकडून मारून टाकावा, असे हुकूम तिनें काढल्याचें बखरकार सांगतात. अशा रीतीचा हा दुहेरी प्रयोग ताराबाईनें शाहूवर आरंभिला. प्रमुख मंडळीस जमवून तिनें निक्षून बजावलें कीं यास नाहींसा करून टाकावा. तिनें त्याजवर फौजा रवाना केल्या. लोकांत चलबिचल चाललेली तिला पूर्ण अवगत असल्यामुळें कोणीही शाहूस मिलाफी होऊं नये यासाठीं तिनें सर्व प्रमुखांकडून दूधभातावर हात ठेवून राजनिष्ठेच्या शपथा घेवविल्या. कित्येकांनीं साफ दिलानें आणभाक केली, तर कित्येकांनीं कांहीं कपट पोटांत ठेविलें. विशेषतः धनाजी व खंडो बल्लाळ यांचें अंतःकरण निःसंशय शाहूकडे होतें. संभाजीच्या वधापासूनच त्याच्या या पुत्रास बचावण्यासाठीं इतक्या वर्षें त्यांचा खटाटोप चालला होता.

राज्यांत दुफळी उत्पन्न करण्याचे प्रयत्न कैक वर्षें बादशहानेंच मुख्यतः चालविले होते. शाहूला कबजांत घेतल्यावर त्यानें असा पुकारा केला, कीं हा मराठ्यांचा राजा माझ्या ताबीन आहे. दक्षिण देश जिंकून तो शाहूच्या हवालीं करून आम्ही राजधानीस जाणार. शाहूला तर तो नेहमीं हेंच सांगत राहिला. पुष्कळसे मराठे सरदार बादशहाच्या नोकरींत होते, त्यांसही त्यानें हाच आपला हेतु वारंवार कळविला. शेवटीं शेवटीं तर शाहूला छावणीबाहेर पाठवून धनाजी वगैरे मराठे सरदारांची समजूत घालण्याचा त्यानें पुष्कळ खटाटोप केला. कामबक्षाला त्यानें दक्षिणचें राज्य दिलें आणि त्याच्या स्वाधीन शाहूला केलें. पण जोंपर्यंत मोगल फौजा छातीवर बसल्या आहेत, तोंपर्यंत मराठे ह्या डावास कसे भुलणार! मागें पुढें शाहू परत आल्याशिवाय राहत नाहीं ही गोष्ट दोनही पक्षांस उघड दिसत होती आणि शाहूस शक्य तितका बांधून घेऊन सोडणें एवढाच उपाय बादशहाच्या पुत्रांस व सल्लागारांस उरला होता, तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं अंमलांत आणिला. ताराबाई तरी विद्यमान परिस्थितींत दुसरा कोणता कार्यक्रम आंखणार होती ? बादशाही बंधनें शक्य तितकीं तोडून स्वातंत्र्य मिळविण्याचा मराठ्यांचा आणि तीं बंधनें शक्य तितकीं दृढ करण्याचा मोगलांचा प्रयत्न पुढेंही पन्नास वर्षे चालला. मानवी व्यवहारांचा शेवटचा निर्णय बलाबलावरच अवलंबून राहतो. औरंगजेबाचे पश्चात् बादशाही धोरण नरम पडत गेलें, तितका मराठ्यांचा जोर वाढला.

नगरच्या मुक्कामाहून शाहूनें अनेक गोष्टी साध्य केल्या. बादशहाचा रोष होऊं नये म्हणून औरंगजेबाच्या मृत्युभूमीचें दर्शन भक्तिपुरःसर घेऊन नंतर खुल्दाबादच्या रोझाला तो गेला. इकडे त्याच वेळीं आजूबाजूच्या प्रांतांत अंमल बसंविण्याचा उद्योग त्यानें चालू ठेविला. तो स्वतः व त्याचे हस्तक या कामीं खपत होते. दौलताबादच्या वायव्येस सुमारें २५ मैलांवर पारद नांवाची गढी शिवेर परगण्यांत होती. शाहूचे लोक सामान आणण्यासाठीं फिरत असतां गांवचे पाटलांनीं त्यांजवर गोळ्या झाडल्या. शाहूच्या लोकांनीं हल्ला केला. मोगलाई तर्फेनें गांवकरी गढी लढवूं लागले. शाहूनें हल्ला करून गांव फत्ते केला. गांवचा पाटील शहाजी लोखंडे मारला गेला, ते समयीं पाटलाची स्त्री होती तिनें आपला मुलगा आणून महाराजांचे पालखीं तघातला आणि बोलली, "यास वांचवावें, अन्यायी होते ते गेले, मुलाचा अपराध नाहीं." त्यावरून समाधान पावून मुलास व आईस आपले आश्रयास घेऊन ठाणें फत्ते झालें सबब मुलाचें नांव फत्तेसिंग भोसले ठेविलें. हा पुढें शाहूपाशीं प्रसिद्धीस येऊन राजपुत्र बनून अक्कलकोट जागिरीचा संपादक बनला. पुढें शाहूनें पारद गांव लोखंडे पाटलांस इनाम दिला, त्याच्या सनदेंत वरील हकीकत आहे. वरील प्रकार स. १७०७ च्या ऑगस्टांत घडला. यांत शाहूचा लौकिक वाढला. $

७ खेडची लढाई, सातारा काबीज.—धैर्य, तडफ, निश्चय, मुत्सद्देगिरी वगैरे गुण शाहूनें या पहिल्या पांच चार महिन्यांत इतके प्रगट केले कीं त्याजबद्दल महाराष्ट्रांत सर्वत्र मोठा आदर उत्पन्न झाला. याचमुळें ताराबाईचे मनोरथ ढिले पडले आणि शाहूचा मार्ग मोकळा झाला. ही त्याची पहिली तरतरी अखेरपर्यंत टिकती तर मराठी राज्याचा पुढील इतिहास पुष्कळसा

$ इ. सं.–पे. द. पृ. १२, १७६, १८०, व ऐ. जु. गो. भा. २ ले. ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निराळा झाला असता. 'भीवरे अलीकडे स्वामींचें स्वराज्य,' † असें शाहू लिहितो. म्हणजे भीमेच्या उत्तरेस मोगलांचा प्रदेश व दक्षिणेस मराठ्यांचें स्वराज्य अशी पहिली सीमा ठरलेली होती. खेड या भीमेच्या कांठीं आहे. परिपूर्ण तयारी होईपर्यंत शाहूनें भीमा उतरण्याची त्वरा केली नाहीं. नगरास राहून त्यानें आपला जम बसविला आणि ताराबाईच्या फौजा चालून येतात असें कळतांच सेप्टेंबर अखेर दसऱ्याचे मुहूर्तावर त्यानें नगरहून पुढें प्रयाण करून कडेवळित ओलांडून खेडवर मुक्काम केला. नदीपलीकडे कडूस येथें धनाजी जाधव, परशुराम त्रिंबक इत्यादि ताराबाईचे सरदार लढाईस सज्ज होऊन राहिले. आश्विन वद्य पक्षांत बहुधा धनत्रयोदशी म्हणजे ता. १२ ऑक्टोबरचे सुमारास खेड येथें लढाई होऊन शाहूस जय मिळाला.

लढाईचें वर्णन चिटणिसी बखरींत दाखल असलेलें यथायोग्य दिसतें. "महाराज लढाईस सिद्ध जाले. धनाजी जाधव व प्रतिनिधि चाल करून आले. परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर यांनीं घोडे चालवून लढाई केली. महाराजांनीं चालून घेतलें. प्रतिनिधि वगैरे मोड होऊन पळून गेले. त्यांचे दहा पांच हजार स्वार सांपडले. सेनापतींनीं आपले विचारांतील सर्वांस घेऊन घोड्यावरून उतरोन मुजरे करून भेटले. महाराजांनीं खेडच्या मैदानीं मुकाम केला. लोकांनीं कामें केलीं त्यांस बहुमान बक्षीस दिल्हें. दुसऱ्या दिवशीं सेनापतीच्या भेटी सन्मानें करून जाल्या. सुमुहूर्तावर सेनापतीस पदाचीं वस्त्रें व बहुमान दिला. खंडो बल्लाळ यांसही चिटणिसी वस्त्रें दिलीं." खंडो बल्लाळानें लढाईपूर्वी शाहूस गुप्तरूपें भेटून धनाजी व सरदार यांची खातरजमा करून सर्वांस महाराजांचे लक्षांत आणिलें. भेद करून कपटयुद्ध करविलें, लढाई झाली, प्रतिनिधि पळून गेले, असा मजकूर चिटणिसास दिलेल्या सनदेंत आहे.§ दुसरा एक लेखक म्हणतो, "राजश्रींचा पुण्यप्रताप मोठा, जे जे ताराबाईनें नेमिले, त्यांवर छाया पडली. शस्त्र उचलण्याची छाती झाली नाहीं."

खेडच्या लढाईंत जय मिळतांच शाहूनें आपण राज्याचा मालक समजून "क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति" या नांवानें आज्ञापत्रें सुरू केलीं.

† पे. द. इ. सं. पृ. २२

§ शा. च. पृ. १३ व स. प. पृ. २१९. लढाईंत खंडेराव दाभाडे ताराबाईच्या बाजूस लढून शाहूकडून पकडला गेला, त्यास धनाजीनें जामीन राहून आपल्या ताब्यांत घेतलें, असा पे. द. भा. १२ ले. १ चा निष्कर्ष दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लढाईच्या पूर्वी भेद करून ताराबाईकडील सरदारांचीं मनें शाहूचे पक्षास वळविण्याचें कारस्थान बाळाजीपंत नाना व नारो राम हे दोघे धनाजीच्या पदरचे अंमलदार होते त्यांनीं केलें. $ याच वेळीं त्यांस प्रधानपदांची लालूच दाखविली असावी. तसेंच मराठशाहींतील पूर्वीचे कामगार व सरदार-मराठे, ब्राह्मण, प्रभु वगैरे-भराभर येऊन शाहूस मिळाले. खंडो बल्लाळ चिटणीस व बाळाजी विश्वनाथ यांच्या कारस्थानानें शाहूचा खेडच्या लढाईंत जय होऊन त्याचा पुढें उत्कर्ष झाला, म्हणून त्या दोन्ही कुटुंबांवर त्याची मर्जी अखेरपावेतों कायम राहिली.

ताराबाई बायकोमाणूस, स्वतः रणांगणावर हजर नसल्यामुळें खेडच्या लढाईंत शाहूला जय मिळणें सुलभ झालें. परशुरामपंत प्रतिनिधि रंग ओळखून पळून गेला म्हणून हस्तगत झाला नाहीं. पूर्वकालीन घडामोडींचा पक्का माहितगार परसोजी भोसले, यानें 'विंच खरें' अशी सर्वांची खात्री केली. प्रतिनिधीनें चाकणास मुक्काम करून पुनः लढण्याचा बेत केला, पण फितव्याच्या वाटाघाटी उघड सर्वांस कळल्यामुळें प्रतिनिधीचे लोक लढण्यास पुढें जाईनात. असें पाहतांच तो लगेच परत साताऱ्यास जाऊन किल्ला बळावून युद्धास सिद्ध राहिला.

भाऊबंदकीच्या या झगड्यांत एकट्या ताराबाईलाच काय तो आवेश वाटला. इतरांना त्यांत पडणें मनापासूनच नको होतें. तोंडावर उलट बोलण्याची कोणाची छाती नसली तरी सरदार मंडळी स्वार्थावर नजर ठेवून आपापलीं वतनें दोनही पक्षांकडून बळकट करून घेत. † तथापि शाहूचा पाडाव करण्यासाठीं ताराबाईनें आपली शिकस्त केली हा प्रकार स्पष्ट आहे. रामचंद्रपंतानें तिला मनापासून साह्य केलें नाहीं म्हणून तिचा उद्योग निष्फळ झाला असेंही वाटतें. यासंबंधानें रा. खरे लिहितात—

'रामचंद्रपंत हे ताराबाईचे मुख्य कारभारी होते, तरी अलीकडे त्यांचा त्यांवर विश्वास नव्हता. त्यांची सारी भिस्त परशुरामपंतावर होती. परशुरामपंत व रामचंद्रपंत यांचें वैमनस्य होतें. त्यामुळें रामचंद्रपंतांनीं जो कारभार करावा

$ का. सं. प. या. ४९५ व ऐ. स्फु. ले. २. १

† सरदेसाई घ. च्या इतिहासांत ले. ७४ व ८० चे कागद वरील मनोवृत्तीचें उत्कृष्ट उदाहरण म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो प्रतिनिधींनीं ताराबाईस भलतेंच समजावून मोडवावा, असें नेहमीं होऊं लागलें व त्यामुळें रामचंद्रपंत यांस राग येऊन त्यांनीं शाहूमहाराजांस कांहीं उत्तेजनपर निरोप पाठविला. हें वर्तमान ताराबाईस कळतांच तिनें रामचंद्र-पंतांच्या पायांत रुप्याची बेडी घालून त्यांस वसंतगडावर कैदेंत ठेविलें. त्या योगानें रामचंद्रपंतांस अर्थातच अधिक क्रोध येऊन त्यांनीं धनाजी जाधव वगैरे मराठे सरदार फितूर करून त्यांस महाराजांकडे पाठवून दिलें. परशुराम-पंत प्रतिनिधि लढाईच्या इराद्यानें शाहूमहाराजांवर चालून गेला खरा, परंतु लढाईंत जाधवराव वगैरे सरदार तिकडे मिळालेले पाहतांच तो पळून साताऱ्यास आला. नंतर शाहूमहाराजांनीं सातारा काबीज करून परशुरामपंतास कैद केलें. हें वर्तमान येतांच ताराबाईनें रामचंद्रपंतास कैदेंतून सोडून रांगण्यास आणिलें आणि आपला मुलगा शिवाजी व सवतीचा मुलगा संभाजी या दोघांस रामचंद्रपंतांच्या मांडीवर बसवून राज्यसंरक्षण करण्याविषयीं त्यांची विनवणी केली, तेव्हां रामचंद्रपंत पुनः राज्यकारभार चालवूं लागले. इचलकरंजीचे संस्थापक नारो महादेव याची त्यांस उत्तम प्रकारची मदत होती. रामचंद्रपंतांचें मन वळविल्यावर, त्यांच्या मार्फत धनाजी जाधव, खंडो बल्लाळ व परशुरामपंत यांनाही शाहूकडून फोडून, आपल्या बाजूस आणण्याचा प्रयत्न ताराबाईनें केला, पण हा बेत फारसा सिद्धीस गेला नाहीं.' †

खेड येथें जय मिळाल्याबरोबर, भीमातीरास कांहीं दिवस मुक्काम करून शाहूनें पुढील चालीची सिद्धता केली. पुण्याचे होनप देशपांडे यांस त्यानें भीमातीरीं भेटीस बोलाविलें. ‡ नंतर पुढें भीमा उतरून चाकण येथें कचेश्वर बावा ब्रह्मे व त्याची पत्नी यांचा आश्रम होता, त्यांस भेटून शाहूनें त्यांचा आशीर्वाद घेतला. या आशीर्वादानेंच आपणास पुढें राज्य मिळालें हें व्यक्त करण्याकरितां शाहूनें बावास साताऱ्यास आणून उपदेश घेतला, तेव्हां लोक त्यास राजगुरु म्हणूं लागले. § लगेच पुढें चाल करून आळंदी तुळापुरावरून

† इच. इ. पृ. २२.

‡ म. सा. छो. ब. व रुमाल १, रा. खं. १८.४६

§ कचेश्वरबावा पुढें कृष्णातीरीं उंब्रज येथें जाऊन राहिला. त्याची समाधि माहुलीस आहे. त्याच्या दोघां पुत्रांस शाहूनें सहा गांव इनाम दिले ते चालू आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाहू पुण्यास व तेथून सुपें, जेजुरी, वीरवाल्हें या गांवांवरून झटपट शिरवळ-वर येऊन उतरला.† वाटेंत देवदर्शन व ब्राह्मणसंतर्पण आणि प्रांतांतील वसुलाचे रोखे त्यानें केले. शिरवळ हें मध्यवर्ती महत्त्वाचें ठाणें सचिवाचें असून तेथून रोहिड-खोऱ्यांत जाण्याचा मार्ग आहे. ताराबाईचा पुरस्कर्ता शंकराजी नारायण रोहिड्यावर राहत होता. त्यास शाहूनें भेटीस बोलाविलें. 'क्रियेस स्मरोन आले नाहींत. महाराजांनीं सांगून पाठविलें, आम्ही भेटीस येतों. ऐकून देहत्याग केला. दुसरे दिवशीं महाराज किल्ल्याखालीं गेले तों शव वरून उतरलें. हें पाहून वर जाऊन सचिवाची स्त्री येसूबाई इचें समाधान करून पुत्र नारो शंकर अल्पवयी होता त्याचे नांवें सचिवपद देण्याचें आश्वासन दिलें.'¶ राजगड, प्रचंडगड, विचित्रगड वगैरे किल्ले शाहूच्या कबजांत आले.

पूर्वी पारद येथील लोखंडे पाटलाचा व आतां सचिवाचा परामर्ष शाहूनें उदार अंतःकरणानें घेतला, त्यांच्याविषयीं मागील वैराचें शल्य बिलकूल दर्शविलें नाहीं, येणेंकरून त्याच्यावर लोकांची भक्ति तात्काळ बसली. ता. २७ ऑक्टोबरला शाहूचा मुक्काम शिरवळवर होता. पुढें अल्पावकाशांत तो दहिगांवावरून चंदनवंदनजवळ दाखल झाला. अगोदरच तेथील हवालदारांस पत्रें पाठविलीं होतीं, ते येऊन भेटले. त्यांचा सन्मान करून किल्ले घेतले. लगेच तेथून सातारा हवालीं करण्याचीं पत्रें प्रतिनिधीस पाठविलीं. शाहूचा असा जम बसलेला पाहून ताराबाई सातारा लढविण्याची कामगिरी प्रतिनिधीवर सोंपून आपण मुलासह पन्हाळ्याकडे निघून गेली.¶ अर्थात् मालक जाग्यावर नसल्यामुळें शाहूचें

† खंड १५. ५७, ५९, ६०; शाहूच०; जु. ऐ. गो.; का. सं. प. या. ४९४; खं. ३.६४.

* शंकराजी नारायणाचा मृत्यु कार्तिक शु. १२, ता. २७ ऑक्टोबर, स. १७०७ रोजीं झाला. हीच श्राद्धतिथि अद्यापि भोरला पाळतात. नारो शंकराचा जन्म श्रावण शक १६२८ चा म्हणजे ऑगस्ट, १७०६ चा आहे. त्याजवर पुढें शाहूचा लोभ अखेरपर्यंत कायम होता. शंकराजी नारायण हिरकणी खाऊन मेले. नीरेच्या कांठीं अंबवडें येथें देहविसर्जन झालें, असे त्या वेळचे उल्लेख आहेत. का. सं. प. या. ले. ४९५ म. सा. छो. ब., इ. सं. पे. द. पृ. १८८ च्या कागदांत शाहूचा सचिवावरील आदर व्यक्त होतो.

¶ 'शाहूमहाराज दिल्लीहून आले ते समयीं त्यांस अनुकूल न व्हावें म्हणोन मातुश्री ताराबाईनीं रामचंद्रपंतांजवळून शपथ घेवविली, शाहू महाराज सातान्यास राहिले, मातुश्री पन्हाळ्यास राहिली.' असा मजकूर रामराजाचे लेखांत आहे. इ. सं. पे. द. पृ. ३३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काम तितकें सुलभ झालें. किल्ल्याचा हवालदार वाईचा राहणारा शेख मिरा निकरानें लढूं लागला. त्यास शाहूनें किल्ला स्वाधीन करण्याचा हुकूम केला, तो त्यानें मानला नाहीं. त्याचीं मुलें माणसें शाहूनें वाईहून पकडून आणून त्यांस तोफेनें उडवून देतों असा धाक घातला. त्यावरून शेख मिऱ्यानें प्रतिनिधीस बोध केला कीं किल्ला शाहूचे स्वाधीन करावा. तें प्रतिनिधीनें मानलें नाहीं, त्यावरून शेख मिऱ्यानें प्रतिनिधीस अवचित पकडून किल्ला महाराजांचे हवालीं केला. येणेंकरून आठ दिवसांत किल्ला घेण्याचा त्यानें संकल्प केला होता तो खरा होऊन धनाजीस देखील आश्चर्य वाटलें. शनिवारीं सकाळींच किल्ला हस्तगत झाल्याची खूण म्हणून फत्तेची नौबत शनिवारीं वाजविण्याचा प्रघात पडला. †

८ राज्याभिषेक व नेमणुका (ता. १२.१.१७०८).—जानेवारींत म्हणजे शाहू माळव्यांतून निघाल्यापासून आठ महिन्यांनीं सातारा राजधानी त्याचे कबजांत येऊन तो मराठी राज्याचा मालक बनला. त्यानंतर सुमुहूर्त पाहून माघ शु. १ सोमवार शक १६२९ तारीख १२ जानेवारी, स. १७०८ रोजीं त्यानें आपला राज्याभिषेक समारंभ उरकला.‡ प्रधानांच्या व इतर नेमणुका त्यानें पूर्वीं प्रसंगोपात केलेल्या या वेळीं कायम केल्या. या नेमणुकांसंबंधानें एक प्रकार लक्षांत ठेवणें जरूर आहे. शिवाजीनें दोन विशिष्ट दंडक राज्य-कारभाराचे विचारपूर्वक ठरविले, कीं सुईच्या अग्रावर राहील इतकी देखील जमीन कोणास तोडून देऊं नये आणि राज्याच्या नोकऱ्या लायकी पाहून ठरवाव्या, वंश-परंपरा चालूं नयेत. हे दोनही नियम बुद्धिपुरःसर किंवा परिस्थितीमुळें शाहूनें बदलून वंशपरंपरा चालणारी नोकरीची प्रथा राज्यांत सुरू केली. दुसरा नियम जागिरी संबंधाचा, त्याचा विचार पुढें यथावकाश सांगण्यांत येईल. मात्र पहिल्या चार पांच वर्षांत नोकरांची अदलाबदल पुष्कळ झाली. स. १७१३ त बाळाजी विश्वनाथाची पेशवेपदावर नेमणूक झाली, त्या वेळीं बहुतेक सर्व प्रधान व इतर पदें एकदा निश्चित झालीं तीं पुढें वंशपरंपरागत चाललीं. बहुधा हा कटाक्ष बाळाजी विश्वनाथानें पेशवेपदाचा स्वीकार करितांनाच शाहूशीं

† इ. सं. पे. द. पृ. १० ले. ११ व पृ. १८८ ले. ३६. का. सं. प. या. ले. ४९५, खं. १५. २८८, २८९, ३६०. ना. भो. व., स. प. पृ. ५७.

‡ म. द. रु. १ पृ. ११६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरविला असावा. उद्यां आपणाकडे पद टिकतें कीं नाहीं अशी अनिश्चिति राहिल्यास लोक आपापलीं कामें झटून करणार नाहींत, निदान त्या वेळीं तरी प्रधानपद म्हणजे कमाईची बाब नसून उलट कर्जे काढून व प्रसंगीं जीव देऊन सरकारची चाकरी करायची तर त्यास तसेंच आमिष पाहिजे, या सबबीवर बाळाजीनें आपलें पद स्वीकारिलें आणि जो वंशपरंपरेचा दंडक त्यानें आपल्या पदास लाविला, तोच इतरांच्या संबंधानेंही अंमलांत आणणें ओघास आलें. बाळाजीच्या पश्चात् बाजीरावाला पेशवेपद देण्याचें हें कारण आहे.

राज्याभिषेकसमयीं शाहूनें नेमणुका केल्या, त्या बहुधा पूर्वी कामावर असलेल्या कुटुंबांतूनच केल्या. कांहीं पुरुष ताराबाईच्या पक्षांत राहिले, त्यांचेच भाई शाहूनें हाताशीं धरले. त्या नेमणुका अशा—‡

पेशवा—बहिरो मोरेश्वर. याचा भाऊ निळोपंत ताराबाईकडे राहिला.

सेनापति—धनाजी जाधव, कापशीकर पिराजी घोरपडे ताराबाईकडे.

सचिव—नारो शंकर अल्पवयी, मुतालिक पंताजी शिवदेव.

अमात्य—बाळकृष्ण वासुदेव ऊर्फ अंबूराव हणमंते, मुतालिक प्रथम बाळाजी विश्वनाथ, पुढें महादाजी गदाधर.

सुमंत—गदाधर प्रल्हादचा पुत्र महादाजी गदाधर, मागाहून आनंदराव रघुनाथ.

मंत्री—रामचंद्रपंत पुंडे, मागाहून रामचंद्र त्रिंबक व नारो राम.

न्यायाधीश—होनाजी अनंत.

पंडितराव—आरंभीं महादाजी गदाधर, मागाहून मुद्गलभट उपाध्ये.

प्रतिनिधि—गदाधर प्रल्हाद, परशुराम त्रिंबक कैदेंत. आरंभीं दोन वर्षें शाहूचा कच्चा कारभार हा गदाधर प्रल्हाद पाहत असे.

गदाधर प्रल्हाद हा काश्यपगोत्री ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण त्रिंबकेश्वरचा राहणारा भिक्षुकी पेशाचा गृहस्थ असून रायगडचे वेळ्यांत शाहूबरोबर मोगलांचे कैदेंत पडला. त्या वेळीं त्याच्या एकनिष्ठ सेवेमुळें त्याजवर शाहूचा लोभ जडला. दोन तीन वर्षांतच राजकारणांत त्याची नालायकी व्यक्त होऊन

‡ इ. सं. पे. द. मा० पृ. ३२१; खं. २१ ले. ३२८; खं. २० ले. ४४; खं. ४ बखर पृ. ३२; खं. ३ ले. १३५; वतनपत्रें व निवाडे ले. १७; पे. द. भा. ३० पृ. २२६; खं १५ ले. १७९ इत्यादि संदर्भांत भिन्न उल्लेख आढळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाहूनें ता. १६.१२.१७१० रोजीं त्यास दूर करून परशुराम त्रिंबकास प्रतिनिधिपद दिलें. पुढें गदाधर प्रल्हाद तीन महिन्यांनीं मृत्यु पावला. त्याचा पुत्र महादाजी गदाधर यास अमात्यपद मिळालें.¶

सेनासाहेब सुभा परसोजी भोसले, सरलष्कर हैबतराव निंबाळकर, पोतदार महादाजी कृष्ण नाईक जोशी, राजाज्ञा रंगराव उद्धव, † पोतनीस आनंदराव महादेव, सेनाखासखेल खंडेराव दाभाडे अशीं कित्येक पदें सोयीप्रमाणें वाटण्यांत आलीं. यावरून आपल्या सहायकांचा संतोष करून पुढील उद्योग शक्य तितका सुकर बनविणें हाच शाहूचा मुख्य हेतु या वेळीं होता.

राज्याभिषेकापासून मृत्यूपर्यंत ४२ वर्षें शाहूची कारकीर्द झाली, म्हणजे मोघमपणें अर्धा शतकपावेतों त्याची छाप मराठशाहीवर पडलेली दिसते आणि या काळांत मराठशाहीचें जें रूपान्तर झालें त्याचें जनकत्व शाहूकडे येतें. राज्यकर्ता या नात्यानें शाहूच्या उद्योगाचा जर कोणता विशिष्ट व ठळक परिणाम कायमचा घडून आला असेल तर तो हा एकच कीं राज्यकारभारास लागणाऱ्या हरएक पेशांत त्यानें असंख्य माणसें नवीन तयार केलीं. पुढील इतिहासांत येणाऱ्या नुसत्या कुटुंबांची यादी देखील शेंकड्यांनीं मोजतां येते, यावरून वरील गोष्ट स्पष्ट होते. शिवाजीनेंही नवीन माणसें तयार केलीं; पण शाहुकालीन परिवर्तनांत तीं कुटुंबें बरीचशीं गडप होऊन इतउत्तर नवीन पुढें आलीं.

¶ पहा पे. द. भा. ४४ ले. ४१ पृ. ८२, शा. रो. ११९.

† याचा बाप उद्धव योगदेव पूर्वी राजाज्ञा असून त्यानें येसूबाई व शाहू बादशहाचे अटकेंत असतां त्यांची सेवा मनोभावानें केली, म्हणून त्याच्या या पुत्रास शाहूनें तें पद दिलें. ता. १६ ऑगस्ट, स. १७१३ रोजीं शाहूनें तें पद नारो राम यास दिलें. पुढें तीन वर्षांनीं स. १७१६ च्या ऑक्टोबरांत नारो रामास मंत्रीपद देऊन राजाज्ञा पदावर पंताजी शिवदेवाची नेमणूक केली. 'राजाज्ञा' शब्द 'हुकमतपन्हा'चा संस्कृत पर्याय होय. स. १७२४ त चिमणाजी दामोदर राजाज्ञा होता (त्रै. व. ७ पृ. ७७.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसनाची स्थिरता

कालसूचि

१६६० (सुमारें) बाळाजी विश्वनाथाचा जन्म.

१७०८ फेब्रुवारी २८—ताराबाईचें खेम सावंतास पत्र.

मार्च ते जून—रांगण्याची मोहीम.

मार्च ३१ ताराबाईचें दैन्य.

मे—पुणें प्रांत सोडविण्याचा शाहूचा उपक्रम.

जून २७—शाहू पन्हाळ्यावर, धनाजी जाधव मृत्यु.

जुलई ७—दाभाड्यांचें वतन काढून फत्तेसिंगास दिलें.

नोव्हेंबर २०—बाळाजी 'सेनाकर्ते', बहादुरशहाचें आगमन.

१७०९ जानेवारी ३—कामबक्षाचा पाडाव व मृत्यु.

मार्च—बहादुरशहा उत्तरेस निघाला.

मे—बहादुरशहा अहंमदनगरास, शाहूस पोषाख.

,, १६—लोधीखानाचा मृत्यु.

जून—बहादुरशहा औरंगाबादेस, मदनसिंगास बरोबर घेतलें.

ऑगस्ट २३—रायभानजी भोसले मृत्यु.

१७१० परसोजी भोसल्याचा मृत्यु.

मार्च १२—हमीदखान-चंद्रसेन झटापट. हमीदचा पराभव.

ऑगस्ट १५—चंद्रसेनानें फत्याबाद लुटलें.

डिसेंबर—रंभाजी निंबाळकर दाऊदखानास मिळाला, नगरास फौजदार झाला.

१७११ ऑगस्ट १७—चंद्रसेन दाऊदखानास मिळाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२

आसनाची स्थिरता

१ बाळाजी विश्वनाथ, पूर्वपरिचय २ पुणें प्रांत सोडविण्याचा उपक्रम
३ रांगण्याची मोहीम ४ धनाजींचा मृत्यु
५ लोधीखानाचा पाडाव ६ विरोधाची पहिली चुणूक

१ बाळाजी विश्वनाथ, पूर्वपरिचय.—शाहूला राज्यप्राप्ति झाल्यावर त्याचा जम बसविण्यांत श्रीवर्धनकर बाळाजी विश्वनाथ भट याला त्यानें हाताशीं धरिलें, तेव्हांपासून त्याच्या कुटुंबास प्राधान्य येऊन उत्तरोत्तर मराठशाहीचा एकंदर कारभार त्याचे तंत्रानें चालूं लागला. या कारभारास पेशवाई असें नांव आहे. पेशवे ब्राह्मण असल्यामुळें त्यांच्या पुरस्कारानें पुष्कळशीं ब्राह्मण घराणीं युद्धाचा पेशा पत्करून प्रसिद्धीस आलीं. पहिला पेशवा बाळाजीपंत नाना या नांवानें ओळखला जातो तर त्याच्या पुत्रास 'बाजीपंत' न म्हणतां 'बाजीराव' म्हणतात, यांतच क्षत्रिय पेशा व्यक्त होतो. शिवाजीचें वास्तव्य पुण्यास असल्यामुळें त्याच्या पहिल्या सहायकांत पुणें प्रांतांतील पुष्कळशीं देशस्थ ब्राह्मण घराणीं प्रसिद्धि पावलीं. त्या पूर्वीच्या मुसलमानी अंमलांतही लेखनाचा व हिशेबी कारभार बहुधा ब्राह्मणांच्याच हातीं होता. दळणवळणाचीं साधनें त्या काळीं अल्प असल्यामुळें कोंकणांतील ब्राह्मण घराणीं देशावर फारशीं आलीं नाहींत, पण शिवाजीनें कोंकण प्रांत काबीज केल्यावर त्या बाजूचे ब्राह्मण, मराठे वगैरे लोक देशावर येऊन राज्यकारभारांत वावरूं लागले. कोंकणांत व मावळांत प्रभु कुटुंबें होतीं त्यांचाही भरणा शिवाजीच्या नोकरींत झाला. ब्राह्मणांचा पहिला पेशा भिक्षुकीचा असतांही अंगच्या बुद्धिमत्तेमुळें राज्यकारभारांतही त्यांचा प्रवेश होऊन त्यांना नवीन उद्योगास क्षेत्र मिळत गेलें.

पश्चिम किनारा ताब्यांत घेऊन शिवाजीनें मराठी आरमार निर्माण केलें, तेव्हां जंजिऱ्याचे सीदीशीं त्याचा झगडा उत्पन्न होऊन, पुढें मराठी आरमारावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंगऱ्यांची नेमणूक होतांच तो झगडा आंगऱ्यांनाच लढावा लागला. पश्चिम किनाऱ्यावर चित्पावन ब्राह्मणांची वसती पुष्कळ असल्यामुळें त्यांना या आंगरे-सीदींच्या चुरशींत भाग घेणें ओघास आलें, आणि गोब्राह्मण-प्रतिपालनाचें ब्रीद धारण करून शिवाजीनें स्वतंत्र मराठी राज्याची उभारणी केल्याबरोबर कोंकणांतील ब्राह्मणांनीं देशावर जाण्याचा प्रघात सुरू झाला. एकाच्या अनुकरणानें दुसरा अशा रीतीनें तो संचार वाढला. बाळाजी विश्वनाथाचें घराणें दीर्घ काल सीदीच्या राज्यांत श्रीवर्धन येथें नांदत असून त्याजकडे त्या परगण्याची देशमुखी असल्यामुळें त्यांस तत्कालीन कागदांत देसाई किंवा देशमुख म्हटलेलें आढळतें.

मुंबईच्या दक्षिणेस बाणकोट खाडीच्या उत्तर मुखावर हरेश्वर व श्रीवर्धन हे प्रसिद्ध गांव हबशाचे ताब्यांत होते व आहेत. तेथील देशमुखी पंधराव्या शतकाचे अखेरीस भटांच्या घराण्यांत आली. स. १५७५ च्या सुमारास बाळाजीचा पणजा महादाजीपंत भट देशमुखीवर होता, तेव्हांपासून दुसऱ्या बाजीरावाच्या अखेरीपर्यंत देशमुखी या घराण्याकडे होती. बाळाजी विश्वनाथ केव्हां तरी प्रथम कोंकणांतून घाटावर गेला आणि स. १६८९ च्या आंतबाहेर मराठी राज्यांत प्रतिष्ठित नोकरीवर असलेला आढळतो.¶ राजारामाचे कारकीर्दींत तो पुण्याच्या सरसुभेगिरीवर होता, त्या संबंधाचें विवेचन पूर्वीच्या भागांत आलें आहे. स. १७०५ त वणी दिंडोरीच्या बाजूस त्यानें स्वारी केल्याचा उल्लेख आहे. शाहू बादशाही कैदेंत असतां त्याचा बाळाजीशीं परिचय घडला. सासवड येथें राहणारे पुरंदरे घराण्याचे पुरुष त्या वेळीं बादशहाच्या नोकरींत होते, त्यांच्याशीं बाळाजीचा स्नेह जमून पुढें या दोन घराण्यांनीं एकमेकांचें चांगलें साह्य केलें. सासवडजवळ गराडें गांव आहे, तेथील पाटीलकी बाळाजीनें खरेदी घेतली. पुढें सुपें, सासवड, पुणें वगैरे स्थळें त्यास शाहूनें इनाम म्हणून दिलीं. §

¶ त्रै. व. २२ अं. १. बाळाजीचा भाऊ विठ्ठल विश्वनाथ स. १७०१ मध्यें मेढें येथें हवालदारीवर असल्याचा उल्लेख सत्का. ९.११२ येथें आहे. भट पेशव्यांचे नासिकचे तीर्थोपाध्ये हिंगणे यांच्या चोपडींत विठ्ठलपंत व बाळाजीची स्त्री राधाबाई यांचीं शके १६०१ चीं हस्ताक्षरें उपलब्ध आहेत.

§ त्रै- १०. पृ. १४२, ऐ- सं- सा. १ ले. १३८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सीदीच्या राज्यांत ब्राह्मणांचा छळ थोडाबहुत होत असे. शिवाजीनें सीदीशीं युद्ध करण्याचें तें एक कारण होतें. सीदी हे औरंगजेबाच्या आरमाराचे अधिकारी असल्यामुळें त्यांना बादशहाचे हुकूम पाळावे लागत. सीदीकडून उच्छेद झाल्यामुळें बाळाजीपंत श्रीवर्धन सोडून घाटावर आला असें बखरकार सांगतात. बाळाजीचा वडील भाऊ जानोजी देशमुखीवर असून बाळाजी चिपळूणच्या मिठागरावर जकातवसुलीची नोकरी करी. कांहीं कारणावरून जानोजीला सीदीनें समुद्रांत बुडवून ठार मारलें, त्यामुळें बाळाजीनें मातृभूमीचा त्याग केला असा जो प्रवाद आहे तो खरा नाहीं. बाळाजीचे बंधू रुद्राजी व जानोजी हेही शाहूचे पदरीं नोकर होते. कोंकणांत बाळाजीपंत मिठागराचे कामावर असतां मीठ पिकलें नाहीं, सीदीस ऐवज द्यावयाचा त्याचा फडशा झाला नाहीं; संभाजीपंत मोकाशी पैशास जामीन होता, सबब या संभाजीपंतास हबशानें समुद्रांत बुडवून ठार मारलें, असा प्रकार आतां कागदपत्रांच्या आधारें सिद्ध झाला आहे.†

सारांश प्रत्यक्ष शिवाजीच्या वेळीं जरी बाळाजी विश्वनाथ वरघांटीं आला नसला तरी राजारामाची कारकीर्द त्यानें पाहिली असून रामचंद्रपंत अमात्याचा मराठ्यांचा कारभार व औरंगजेब बादशहाचा मोगल कारभार त्यास पूर्ण परिचित होता; म्हणूनच दोहोंच्या मिलाफाचा पुढील मार्ग त्यास सुचला असें म्हणणें सयुक्तिक दिसतें. स. १७२० त मृत्युसमयीं तो साठीजवळ असल्याचें धरल्यास त्याचा जन्म स. १६६० च्या आंतबाहेर असूं शकेल. पेशवेपद मिळण्यापूर्वी त्याची मुद्रा अशी होती—॥ श्री ॥ उमाकान्त पदांभोजभजनास-समुन्नतेः। बाळाजी विश्वनाथस्य मुद्रा विजयतेतराम् ॥

शाहू व बाळाजी विश्वनाथ यांचा जो सेव्यसेवकभाव यदृच्छेनें वा पूर्वसंकेतानें जडला, त्याचाच मुख्य परिणाम पुढील राजकारणावर घडला यांत संशय नाहीं; आणि तत्कालीन परिस्थितींत हा परिणाम राष्ट्रहितोपकारकच झाला असें म्हटलें पाहिजे. महाराष्ट्रांतील तत्कालीन व्यक्तींत पराक्रमाच्या दृष्टीनें हें पेशव्याचें घराणें एकंदरींत कसें वरचढ ठरलें, हा प्रकार उत्तरोत्तर व्यक्त होईल.

शाहूकालीन घडामोडींशीं ब्रह्मेंद्रस्वामीचा. संबंध बराच निकट आहे. स्वामीचें वास्तव्य परशुराम येथें असतां त्याच्याशीं बाळाजीचा परिचय घडला,

† पे. द. भा. ७ ले. १, २ व ४०; तृ. सं. बृ. पृ. ८५ वर जुन्या बखरीचीं त्रुटित पानें छापलेलीं जिज्ञासूंनीं पाहावीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यावरून त्याची हुशारी स्वामीस पटून पुढें त्यानें त्याचा व त्याच्या कुटुंबाचा सर्वथा पुरस्कार केला, ही गोष्ट स्वामीच्या विस्तृत पत्रव्यवहारांत निदर्शनास येते. एखादा इसम एकदम उच्चासनाच्या प्रकाशांत आला म्हणजे त्याला पुढें आणण्याचें श्रेय घेणारे चहूंकडून गर्दी करतात, तसाच कांहींसा प्रकार बाळाजीचाही झालेला आढळतो. चासकर जोशी, पुरंदरे, नारो गंगाधर मुजुमदार वगैरे अनेकांनीं आपापल्यापरी पेशव्यांच्या घराण्यास पुढें आणल्याचे उल्लेख उपलब्ध आहेत. §

२ पुणें प्रांत सोडविण्याचा उपक्रम (मे, स. १७०८).—आदल्या वर्षी सातारा किल्ला शाहूचे हातीं पडणार असा संभव दिसतांच ताराबाई पुत्रासह निघून पन्हाळयास गेली, त्या वेळीं तिला एकदम पकडण्याचा निकर शाहूनें केला नाहीं. राज्याभिषेक होतांच आपण मराठ्यांचा स्वामी या नात्यानें त्यानें तिच्या पुत्रास वारणेच्या दक्षिणेकडील दरोबस्त मुलूख किल्ले ठाणीं सुद्धां देऊं करून युद्ध थांबविण्याचा पहिला प्रयत्न केला. $ यांत त्याची उदार बुद्धि व्यक्त होते. अशा प्रकारें गृहकलह मिटवून बादशाही ताब्यांतला स्वराज्याचा मुलूख सोडविण्याचा उद्योग त्यानें स्वीकारिला. हें स्वराज्य केवळ मोघम होतें. स्पष्ट लेखी करार असा कांहीं झाला नव्हता. बादशहाच्या हुकमांत राहून मराठ्यांचें राज्य करावें एवढीच परवानगी झालेली होती; पण तेवढेही हुकूम प्रांतिक अंमलदारांस बादशहानें सोडले नव्हते; आणि इकडचे अंमलदारही तसे हुकूम सुखासुखी मानण्यास तयार नव्हते. दक्षिणेंत चौथाई वसूल करण्याचा आपला अनिर्णीत हक्क मराठे कैक दिवस बजावीत होते, त्यास अनुसरूनच शाहूनें पुण्यापासून पन्हाळ्यापर्यंतच्या प्रदेशांतून चौथाई घेण्यास आरंभ केला. स्वतःच्या सामर्थ्यानें मिळवूं तेवढें आपलें अशी शाहूची खात्री झाली.

स्वराज्याचा मुख्य गाभा शिवाजीपासून मराठ्यांनीं आपला म्हणविलेला जो जुन्नरपासून शिरवळपर्यंतचा प्रदेश तो मोगल अंमलदार सोडीनात. पलीकडे नासिक, बागलाण, खानदेशपावेतोंचा मुलूख शाहूनें येतांनाच काबीज करून तेथें आपले अंमलदार नेमिले होते. सातारा हातीं आल्यावर त्यानें

§ मावजीकृत कैफीयती.

$ खं. २० ले. २८२ ता. १६-१-१७०८ चा तह.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुणें-जुन्नर प्रांतांतून करवसुलीकरितां धनाजीस रवाना करून बाळाजी विश्वनाथास त्याजबरोबर दिलें. 'हरिश्चंद्रगडचे मुल्यांतून पंधरा हजार रुपये यावयाचे त्यांतून एक रुका आला नाहीं' असें बाळाजी विश्वनाथ ता. १० मे, स. १७०८ रोजीं लिहितो. 'आम्ही समुदायानसीं घाट चढून आलों; लोदीखानाशीं युद्धप्रसंग जाला, नंतर ओतुरावर येऊन देशीं येणार तों करीमबेगानें आमच्या लष्कराचीं घोडीं व वस्तभाव नेली. तेव्हां आम्हीं त्याचा पाठलाग करून जुन्नर शहर लुटलें.' ¶ याच सुमारास धनाजी जाधव गदाधर प्रतिनिधीस लिहितो, 'स्वामी यशस्वी हें प्रयोजन सामान्य नव्हे. आम्ही राजश्री स्वामींची आज्ञा घेऊन खानदेश प्रांतें गेलों. रायाजी प्रभु यांजबरोबर थोरात दाभाडे यांजकडे कितेक साधक बाधक विचार सांगोन पाठविले. त्यांनीं आपले दोन गृहस्थ रायाजी प्रभुबरोबर पाठविले. त्यांची आमची भेटी जाली. नंतर बागलाणांत पिंपळनेरास गेलों. त्या ठिकाणीं दाभाडे व थोरात अक्षतृतीयेचे दिवशीं येऊन भेटले. त्यांनीं मुद्दे घातले. दाभाड्याचा सरंजाम पूर्ववत् करार करून द्यावा, सर्व अन्याय क्षमा करावे, राजश्री स्वामींनीं बहुमान गौरवास अंतर न करावें. ते सर्व मुद्दे मान्य करून त्यांची फौज समागमें घेऊन गोदातीरास आलों, तों राजश्री स्वामींचें पत्र आल्यावरून त्यांचे संनिध जात असों. प्रस्तुत आम्हां समागमें जानोजी व रंभाजी निंबाळकर, बाळाजी विश्वनाथ, राजजी व दमाजी थोरात, खंडेराव दाभाडे, केरोजी पवार, रायाजी प्रभु वगैरे सरदार आहेत.' हा प्रकार स. १७०८ च्या मे महिन्यांतला आहे. या वेळीं शाहू स्वतः रांगण्याचे स्वारींत असून धनाजी त्याजबरोबर तिकडे नव्हता हें वरील पत्रांत उघड आहे. शाहूच्या भेटीस येत असतां तो जून महिन्यांत वारणेच्या कांठीं वडगांव येथें पायाचा व्रण असाध्य होऊन मरण पावला. शाहूची त्याची भेट झाली नाहीं.

३ रांगण्याची मोहीम (मार्च–जून, स. १७०८).—वारणे पलीकडील मुलूख स्वीकारून स्वस्थ बसण्याची शाहूची सूचना ताराबाईनें मान्य केली नाहीं, उलट शाहूशीं लढण्याचीच तयारी केली, तेव्हां तिच्यावर मोहीम करणें त्यास भाग पडलें. परशुरामपंत प्रतिनिधि साताऱ्यावर कैदेंत होता, त्यामुळें ताराबाईचा पुरस्कार करणारा एकटा रामचंद्रपंत राहिला. अंतस्थ

¶ हरिश्चंद्रगड जुन्नरचे उत्तरेस १५ मैल. वरील पत्रें त्रै. व. ७ पृ. ८४ व पुढें दाखल आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुसंधान मात्र परशुरामपंतानें चालू ठेविलें. शाहूनें फेब्रुवारींत पन्हाळ्याकडे कूच केलें, तेव्हां ताराबाई पन्हाळा सोडून रांगण्यावर गेली. लोक शाहूला मिळूं लागलेसें पाहून तिनें धाक घातला कीं जे कोणी वतनदार शाहूराजांस मिळतील त्यांचें सडकून पारिपत्य करण्यांत येईल. याबरोबरच तिनें कित्येकांस आपल्या बाजूस वळविण्याचा उद्योग चालविला. ता. २ फेब्रु., स. १७०८ रोजीं वाडीकर खेम सावंतास ताराबाई लिहिते, "आपण स्वामींची सेवा निष्ठेनें करीत आहों, पुढें अन्यत्र अवलंब न धरितां सर्व प्रकारें सेवा करावी हा निश्चय आहे, हशमाचे बेगमीस मुकासा दिला पाहिजे म्हणून लिहिलें तरी तर्फ साळसीचा मुकासा नेमून दिला आहे, हशम पाठवून देणें."$ दुसऱ्याच दिवशीं पुनः ताराबाईनें खालील मजकूर खेम सावंतास लिहिला—"शाहू राजे यांचा फितवा सांप्रत निर्माण होऊन राज्यांत डोहाणा जाहला. कितेक सेवक लोकांनीं अवक्रिया करून त्यांस मिळाले. तुम्ही स्वामींशी निष्ठेनें वर्तणूक करून, शाहूराजांकडे अनुसंधान लावणार नाहीं, स्वामींची सेवा करून संतोष पाववूं, सहा महालचा मुकासा वतनदाखल चालवावा अशी विनंति विश्राम अनंत व जिवाजी राम या उभयतांनीं तुम्हांकडून येऊन निवेदन केली, त्यावरून तुमचे एकनिष्ठेचा अर्थ चित्तांत आणून रामचंद्र पंडित अमात्य यांस व गिरजोजी जाधव यांस आज्ञा केली. तुम्ही माणगांवीचे मुक्कामीं येऊन यांची भेटी घेतली, आणि आराध्य देवतेची क्रिया करून एकान्तःकरणें वर्तावयाचा निर्वाह केला. त्यावरून संतोषी होऊन सहा महाल वतना दाखल तुम्हांकडे चालवावयाची आज्ञा केली आहे." तथापि शाहूची छाप त्वरेनें चहूंकडे बसत गेली. बहीरजी हिंदुराव घोरपडे, खेम सावंत वगैरे ज्यांचे प्रदेश पन्हाळ्याच्या आटोक्यांत होते असे कांहीं थोडे सरदार नाइलाजानें ताराबाईकडे राहिले.

साताऱ्याहून 'महाराज कूच करून पन्हाळ्यावर व तेथून पंचगंगेवर गेले. मार्गीं वसंतगड, पन्हाळगड, पावनगड वगैरे घेऊन कोल्हापुरीं ठाणें बसविलें. परशुराम त्रिंबकाच्या कारभाऱ्यानें विशाळगड शाहूच्या स्वाधीन केला. ताराबाईनें रांगण्यावरून खेम सावंत व कान्होजी आंगरे यांस मदतीस बोलाविलें. रामचंद्र नीलकंठाचा भाऊ नारोपंतही तिला मिळाला. शाहूनें लागोलग पुढें जाऊन रांगण्यास वेढा घातला. त्यापूर्वीच ताराबाई बचावाचें

$ बा. द. १.७०,७१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काम रामचंद्रपंतावर सोंपवून आपण पुत्रासह मालवणाकडे निघून गेली. तिची अवस्था किती कठिण होती ती तिनें ता. ३१ मार्च स. १७०८ च्या पत्रांत रामचंद्रपंतास कळविलेली आढळते.

केसो त्रिमल पिंगळे (रामचंद्रपंताचा चुलत सासरा) सातान्यास होता; † त्यास ताराबाईनें पेशवाई देण्याची लालूच दाखवून सातारा काबीज करण्याची खटपट रामचंद्रपंतामार्फत केली. सचिवाचा मुतालिक त्रिंबक शिवदेव यास फितविण्याचा उद्योग तिनें केला. याप्रमाणें गड किल्ले हातीं आले कीं शाहूराजांची कंबर मोडून ते हतप्रभ होतील, या उद्देशानें तिनें चहूंकडे कळविलें, " शाहू रांगण्याखालीं आहे तोंच त्यास पायबंद बसवावा." रायाजी मल्हार नांवाचा एक सरदार शाहूकडे होता त्यास तिनें आपल्या बाजूस वळविलें. रामचंद्रपंत तिच्यासाठीं कसून मेहनत करीत होता, तरी तिच्याबद्दल पंताचें मन साफ नव्हतें. वरील पत्रांत ती पंतास लिहिते, 'तुम्ही घडीघडी मनांत संदेह करावा हे गोष्टी उचित नाहीं. येविशीं साहेबीं उदंड सांगितलें अगर लिहिलें, तें तुम्हांस प्रमाण वाटतें ऐसें नाहीं. या उपरी निःसंदेह होऊन राज्याभिवृद्धीस प्रवर्तोन संतोष पावणें. राज्यभार तुम्हांवरी टाकिला आहे.'



संवत्सर प्रतिपदेस म्हणजे १२ मार्चला शाहूचा मुक्काम रांगण्याखालीं पाटगांव, चिखलवाडी, माणगांव इकडे असून जून २७ ला तो पन्हाळ्याला होता. $ रामाजी नारायण कोल्हटकर

† हा पुढें स. १७३१ त संभाजीचा पेशवा झाला.

$ ऐ. जु. गो. २.८ व खं. १५.५९; खं. ३. १८२; इ. सं. पे. द. पृ. १२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परसोजीचा गुरु पाटगांवास येऊन शाहूला भेटला, त्यास शाहूनें नेवरें येथें वृत्ति करून दिली. बहुतेक प्रमुख सरदार व मुत्सद्दी शाहूबरोबर स्वारीस होते. खंडेराव दाभाडे मात्र ताराबाईस मिळाला म्हणून त्याचें वतन जप्त करून शाहूनें तें फत्तेसिंग भोसल्यास दिलें (ता. ७ जुलै, स. १७०८). मूळ हें वतन खंडेराव दाभाडे यास राजाराम छत्रपतीनें ता. १९ ऑक्टोबर, स. १६९८ रोजीं दिलें. जुन्नरपासून सासवडपर्यंतच्या प्रदेशांतील ७२० गांवांच्या सरपाटिलकीचें पुत्रपौत्रादिवंशपरंपरेचें करून दिलेलें तें इनाम होतें. या प्रदेशांत पुढें पेशव्यांचा अंमल झाला, म्हणून दाभाडे नाराज झाले. ¶

स. १७०८ चा पावसाळा शाहूनें पन्हाळ्याचे बाजूस काढिला. चहूंकडे मजबुदी करण्यासंबंधानें त्याची नजर सारखी फिरत होती. मावळांतील प्रभु मंडळीचा बराचसा उच्छेद शंकराजी नारायण सचिवानें केला होता, सबब शाहू येतांच ते शाहूचा पुरस्कार करूं लागले. बापूजी सोनाजी दिघे व कृष्णाजी दादाजी प्रभु यांचीं उदाहरणें ठळक दिसतात. कृष्णाजी दादाजी यास शाहूनें आपला वकील म्हणून बऱ्हाणपुरावर बहादूरशहाचे भेटीस पाठविलें.† तसेंच शिवाजीचा जावई हरजीराजे महाडिक संभाजीचे वेळीं कर्नाटक प्रांत सांभाळून होता, त्याचा पुत्र शंकराजी यास शाहूची बहीण भवानीबाई दिलेली असून त्याचा ओढा शाहूकडेच होता. § पन्हाळ्यावरील मुक्कामांत शाहूनें भवानीबाईस भेटीस बोलावून तारळे महालचें सरदेशमुखी वतन तिला कायमचें ठरवून दिलें आणि शंकराजीस कर्नाटकचे बंदोबस्तास रवाना केलें.

४ धनाजीचा मृत्यु.—ता. ९ जुलई, स. १७०८ च्या पूर्वी थोडे दिवस सेनापति धनाजी जाधव मृत्यु पावला. त्याची बायको गोपिकाबाई इनें सहगमन केलें. वडील बायकोचा पुत्र संताजी व धाकटीचे चंद्रसेन व शंभुसिंग तिघेही मृत्युसमयीं जवळ होते. अंत्यविधीला मोठी यात्रा जमली. उत्तरकार्यांत भूमिदान करण्यांत आलें, त्याची सनद छ २ जमादिलावल शके १६३२ म्हणजे ता. ९ जुलईची आहे. $ त्यापूर्वी बारा दिवस धनाजीचा मृत्यु झाला असावा. वडील पुत्र संताजी तामसी असून बापापासून अलग साताऱ्यानजीक बोरगांव

¶ त्रै ८. १२४

† या भेटीचें वर्णन रा. खं. १५ ले. २८९ यांत आहे तें अभ्यासूंनीं लक्षांत आणावें.

§ प्राचीन मराठे सरदार पृ. १० व १५ $ जाधवांची कैफियत, पृ. ७१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाडळी येथें वडिलोपार्जित वतन होतें तेथें राहत असे. चंद्रसेन कर्तृत्ववान व बापाचा आवडता होता, त्यासच शाहूनें सेनापतिपद व यथापद्धति बहुमान वस्त्रें जरीपटका वगैरे सातान्याहून पाठवून दिलीं, आणि शंभुसिंग यास त्याचा मुतालिक नेमिलें.

शिवाजीच्या वेळेपासून धनाजी राज्याच्या कामांत खपत असून त्यानें औरंगजेबाशीं कसा प्रचंड झगडा केला त्याचें वर्णन पूर्वीच्या भागांत आलें आहे. त्याचा जोडीदार संताजी घोरपडे याचा स. १६९७ त खून झाल्यावर पुढील दहा वर्षांत मोगलांशीं लढण्याचें काम मुख्यतः धनाजीनेंच केलें. बादशहानें शाहूस सोडण्याची वाटाघाट धनाजीशीं केली, म्हणून शाहूकडे त्याचा ओढा असून, त्यास सोडवून स्वदेशीं आणण्याचे त्याचे प्रयत्न अव्याहत चालले होते. ताराबाईनें चंद्रसेनास लिहिलेल्या पत्रांत धनाजीची प्रतिष्ठा रसभरित वर्णनानें दाखविली आहे, ती केवळ चंद्रसेनास चढविण्यासाठीं केली असल्याचा भास होतो. ताराबाईशीं त्याचा जिव्हाळा कसा होता हें समजण्यास साधन नाहीं, तथापि तो लगोलग शाहूस मिळाला यावरून तिच्या संबंधानें त्यास मोठासा आदर होता असें म्हणवत नाहीं. युद्धांत सुद्धां तो संताजीच्या खालींच होता हें उभयतांच्या तुलनेंत मागें सांगण्यांत आलें आहे. यजमानास पदोपदीं अडवून स्वतःचा व आपल्या आप्तस्वकीयांचा स्वार्थ साधून घेण्यांत संताजी काय, धनाजी काय किंवा दुसरा कोणी काय, सर्वच मराठे एका कोटींत बसण्याजोगे होते. राष्ट्राचा उत्कर्ष करण्याचें उच्च ध्येय फारच थोड्यांच्या ठिकाणीं दिसून येतें. पिसाळ व जगदाळे यांचे दरम्यान मसूर कन्हाडच्या देशमुखीबद्दल तीव्र झगडा चालू असतां धनाजीनें शाहूस नानाप्रकारें गळ घालून कसें नडविलें, त्याचे कागद भरपूर उपलब्ध आहेत,† त्यांवरून धनाजी शाहूचे मर्जीतून बराच उतरला असावा असें म्हणतां येतें. पुढें चंद्रसेनानें तर शाहूला उघड विरोध चालविला.

५ लोधीखानाचा पाडाव (१६ मे १७०९).—महादाजी कृष्ण जोशी सावकार याचा उपयोग शाहूस कैदेंत असतां विशेष झाला असल्यामुळें त्याजवर शाहूचा लोभ भारी होता. जोशी व बाळाजी विश्वनाथ यांचाही घरोबा मोठा. 'बाळाजीची स्थापना रांगण्याचे मुक्कामीं महादाजीनें

† खं. १५. ५९; रा. खं. ३. ६४. पहिल्यांत धनाजीच्या वर्तनावर टीका आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली ' असें विधान त्या जोशांचे टिपणांत आहे § तें तात्पर्यार्थानें बरोबर दिसतें. बाळाजीनें शाहूचा जम बसविण्यांत मनापासून कष्ट केले ते लक्षांत घेऊन पन्हाळ्याचे मुक्कामीं किंवा त्यापूर्वी राज्याभिषेकाच्या वेळींच त्यानें बाळाजीस 'सेनाकर्ते' पद दिलें.‡ येणें करून फौज जमवून चहूंकडच्या अडचणी बाळाजीनें सोडवाव्या असा शाहूचा उद्देश दिसतो. त्याला ही वेळ आणीबाणीची होती. बहादुरशहा दक्षिणेंत कामबक्षावर चालून आला होता. त्याच्या युद्धाचे परिणाम काय होतात इकडे सर्वांचे डोळे लागले होते. स. १७०९ च्या आरंभींच कामबक्षाचा निकाल होऊन बहादुरशहाचें आसन स्थिर झालें. मदनसिंग व रायभानजी त्याजपाशीं राहून शाहूचा कैवार घेत होते. आपण स्वतः बादशहाचे भेटीस न जातां शाहूनें आपला प्रतिनिधि गदाधरपंत यास त्याजकडे पाठविलें. तारीख २६ मे, स. १७०९ चें शाहूचें गदाधर प्रतिनिधीस गेलेलें खालील पत्र खुलासेवार आहे. "तुम्ही विनंती पत्र पाठविलें तें वर्तमान विदित होतां स्वामी बहुत संतोषी झाले. पातशहा सेनासमुदायानशीं उत्तर पथास चालिला. इकडे मातबर उमराव ठेवून जावें ऐसा त्यांचा विचार होता, परंतु स्वामींची एकनिष्ठता, व हा प्रांत आतां अनुकूलच जाला आहे ऐसा भाव दाखवून, त्यांचा मोहरा मुरडिला. आपलीं सैन्यें खानदेशांत जाऊन वरील बोलीस विरुद्ध दिसोन न यावें म्हणोन लिहिलें, तरी हा अर्थ स्वामींनीं चित्तांत आणून तमाम सैन्यांस हुजूर बोलाविलें होतें. संनिध आले आहेत. दरम्यान एक प्रसंग जाला तो तुम्हांस कळावा म्हणोन लिहिला असे. $

"चाकणकर पठाण लोधीखान पूर्वीपासून विरोधी वर्तणूक करीत होता. पुणें वगैरे प्रांत पुरंधरपावेतों स्वाऱ्या करून उध्वस्त केला. सैन्यें डोंगरवाटेनें

§ पं. स. वृ. पृ. ६

‡ ता. २४.१२.१७०८ च्या पे. द. ३०.२ च्या कागदांत बाळाजीस सेनाकर्ते म्हटलें आहे. त्यापूर्वी दोनतीन महिने त्याला हें पद मिळालें. ता. २४.७.१९१७ च्या केसरींत छापलेला एक कागद आहे त्यांत ता. २०.११.१७०८ रोजीं बाळाजीला सेनाकर्ते हें पद लावलेलें आहे. या पदाचा सरंजाम शा. रो. १०१ मध्यें पहावा. ता. २४ डिसेंबरच्या वरील कागदांत "नासिक पेठ्याचा निमे मोकासा खंडेराव दाभाड्याकडून दूर करून बाळाजी वि. सेनाकर्ते यांजकडे जमावाचे बेगमीबद्दल दिल्हा असे," असा मजकूर आहे.

$ ऐ. व. ७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येतात हें ऐकोन भिल्लांनीं जमाव करून घाट बंद केला. सरदारांनीं त्यानास सांगोन पाठविलें कीं हें कर्म तुम्ही बरें करीत नाहीं. जंगामुळें नुकसान दोन्ही तर्फेचें आहे. तरी तुम्ही घाट सोडून जाणें. हे गोष्टी न ऐकतां लढाईस उभा राहिला. परस्परें लढाई झाली. लोधीखान मारला गेला. इकडीलही लोक बहुत मारले गेले. तसेच करीमबेग जुन्नरकर व बुणगे कांहीं हाता लागले. तोही हस्तगत जाला. परंतु करीमबेग स्वामींसीं एकनिष्ठ होता, त्यास सोडावें हें स्वामींस अगत्य, व पातशहाशींही सौरस्य, कोणेविशीं विरुद्ध न दिसावें हें स्वामींच्या चित्तीं; परंतु ठाणेदार बदमस्त, आपखुशीनें आपलें वाईट करून घेतात, त्यास इलाज नाहीं. सोमाजी जगथाप, यासीनखान पूर्वस्नेह विसरोन मुलकांत धामधूम करितात, तरी या लोकांस हलखूद§ ठेवणें. श्यामलानें कोंकणांत शेखी फार मांडली आहे, त्याजविशीं इलाज करणें. तुम्ही लिहिलें कीं कोंकणप्रांतींचे किल्ले घ्यावे ऐसा प्रसंग केला आहे. तर कोंकणप्रांत म्हणजे अधिराज्य, ते किल्ले केवळ राज्याचा जीव, ही गोष्ट आधीं करून घेणें. दुसरें तुम्ही लिहिलें कीं सेनासमुदाय हाताखालीं घालून पन्हाळा प्रांतें जाऊन सावंत अनुकूल करून एक वेळ रांगणा हस्तगत होय ऐसा पदार्थ केला पाहिजे. तरी सेनासमुदाय जाल्यावर सांप्रत हाच विचार आहे. सावंत मुख्य तो वारला. पुत्र आहे त्याचें समाधान पत्रें पाठवून केलें आहे.

"तुम्ही लिहिलें कीं आपणास पातशहाचें दर्शन झालें. मनसब व सिरपाव दिला. औरंगाबादेस पोंचल्यावर निरोप होणार. मार्गीं येतां जमेत बराबर भारी पाहिजे. तरी निरोप होईल त्या अगोधर लिहून पाठविणें. संनिध फौज असेल तीस पत्रें पाठवावीं, ते तुम्हांस घेऊन येतील. खर्चाविशीं लिहिलें तरी बाळाजी विश्वनाथ हुजूर येत आहेत, ते आल्यावर पाठवून देऊं. तुम्ही मुलांचेविशीं लिहिलें, तरी तीं लेकरें स्वामींचीं आहेत. तुम्हीं लिहावें मग चालवावें ऐसा अर्थ नाहीं. तुम्हीं आणखी लिहिलें कीं कागदपत्र स्वामींचे सेवेसीं पाठवून आपण श्रीच्या महायात्रेस जाऊं. तरी हरघडी उदास होऊं नये. ये गोष्टीचें स्वामीस समाधान नाहीं. तुम्हांहून अधिक आणखी अर्थ

§ हलखूद = निरुपद्रवी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वामीस नाहीं. नबाबास * पत्र लिहिलें आहे त्याचा तर्जुमा हेंदवीत करून पाठविला आहे, तो मनास आणून प्रविष्ट करणें. " ¶

वरील पत्रांतील मजकुरास बादशाही अखबारांचा उत्कृष्ट दुजोरा आहे. ता. १६ मे, स. १७०९ (१६ रबिलावल) ची अखबार सांगते, " संगमनेरच्या हरकाऱ्यांनीं बादशहास बातमी कळविली कीं राजा भूपतराव, चंद्रसेन, राव रंभा वगैरे तीस हजार फौज घेऊन बागलाणावर चालून गेले. प्रांत लुटून गुरें व संपत्ति घेऊन डोंगरांतून परत येत असतां लोधीखानानें त्यांजवर हल्ला केला. १२ रबिलावल रोजीं लोधीखान मारला गेला, त्याची पालखी व घोडे पळवून नेले. "

स. १७०९ च्या उन्हाळ्यांत शाहू साताऱ्याचे बाजूस राहून ठिकठिकाणचे व्यवहार सांभाळीत होता. पैसा व सेनासमुदाय जमविण्याची कामगिरी बाळाजी विश्वनाथ करीत असून तो चंद्रसेनाबरोबर बागलाणचे स्वारींत होता हें वरील पत्रांत दिसतें. वाडीकर खेम सावंत वारल्यामुळें ताराबाईचा आधार तुटला आणि पुढें रांगण्याचें महत्त्वही उरलें नाहीं. कल्याण, माहुली, त्रिंबक वगैरे कोंकणप्रांत व किल्ले मोगलांचे ताब्यांत असून पूर्वी मातबरखानानें कल्याणच्या सुभ्याची व्यवस्था फार चांगली ठेवली होती. तो खान स. १७०४ त वारला, तरी प्रांत बादशाहींत मोडत असून मोगलांचा नाविक अंमलदार राजपुरीचा सीदी शाहूला कोंकणांत अंमल बसवूं देईना. कोंकणचा हा प्रश्न लवकर सुटला नाहीं. माहुली, जंजिरा, वसई वगैरे करतां करतां पेशवा बाजीराव संपला. त्रिंबक किल्ला तर १७५१ त शाहूचे पश्चात् मराठ्यांस मिळाला.

स. १७०८ व ०९ सालांतील शाहूच्या हालचाली खुद्द त्यानें गदाधर प्रल्हादास लिहिलेल्या पत्रांवरून खुलासेवार कळतात. स. १७०८ च्या

---

* नबाब झुल्फिकारखान.

¶ ऐ. व. ७ पृ. ८६. खेम सावंत दुसरा स. १७०९ त मृत्यु पावला. जानेवारींत कामबक्षास गारद करून मार्चांत बहादुरशहा गुलबर्ग्याहून परत निघाला. मे महिना त्यानें नगरास व जून महिना औरंगाबाद येथें घालविला, आणि पुढें तो परत दिल्लीस गेला. या मुक्कामांत नगर येथें गदाधर प्रल्हादानें बादशहाची गांठ घेतली, वगैरे मजकूर वरील पत्रांत असून या कठिण प्रसंगांत शाहू आपलें राजकारण कसें चतुराईनें खेळवीत होता, सर्व गोष्टींची तर्तूद दूरदृष्टीनें करून माणसें कशीं जोडीत होता, हें त्यांत व्यक्त होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिपवाळीस पन्हाळयाचा मुक्काम हालवून शाहू सातारा प्रांतांत आला. त्याबरोबर ताराबाईनें मालवणाहून परत येऊन रामचंद्रपंतांच्या साह्यानें पन्हाळा परत घेतला. तथापि शाहू इतउत्तर तिच्या वाटेस गेला नाहीं. परसोजी भोसल्यास त्यानें कोल्हापूर प्रांताच्या बंदोबस्तास ठेवून दिलें. स. १७१० त परसोजी मरण पावला आणि पुत्र कान्होजी कारभारावर दाखल झाला. †

स. १७०९ त शाहूची नजर मुख्यतः बहादुरशहाकडे होती. पावसाळ्यांत छावणी मदचीवर मैदानांत ठेवून शाहूनें आपला मुक्काम जवळच्या वंदन किल्ल्यावर ठेविला. उत्तरोत्तर लढाईचें काम वाढत जाऊन तोफा व दारुगोळा हातांशीं असल्याशिवाय नुसत्या धांवपळीनें भागणार नाहीं असा अनुभव आल्यामुळें शाहूनें मुंबईचा इंग्रज अधिकारी निकोलस वेट याजकडे तोफा व माणसें देण्याची याचना केली, पण इंग्रजांनीं ती मान्य केली नाहीं. §

स. १७०९ च्या जुलैंत शाहूनें गदाधर प्रतिनिधीस लिहिलेल्या पत्रांत त्याची हकीकत कळून येते ती अशी—

"तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. औरंगाबादेहून कार्य करून देवितों म्हणोन नबाबसाहेबीं करार केला आहे ये अर्थें +++ दाखल जालों, कार्य मनोगतानुरूप सिद्धीस पाववून स्वार होऊन येतां म्हणौन लिहिलें, तरी तुम्हीं कार्य मनाजोगें करून याल हा भरंवसा स्वामींस आहे. दुसरें लिहिलें कीं पदाजी घाटगे यानें कितेकांचे मार्फतीनें बदगोईचा प्रसंग केला होता तो नबाबास सांगोन फाजित केला, स्वामींनीं ते प्रांतीं त्याचीं ठाणीं व वस्तभाव असेल ती तंबी केलीं पाहिजेत म्हणौन लिहिलें, तरी सरदार लोकांचे दिलासे करणें आहेत व दोन मास प्रथम यांचा बंदोबस्त करून भाद्रपदमासीं खुद्द स्वारी करून ज्या ज्यांस नतीजा पाववणें तो स्वामी पाववतील, येविशीं आपलें समाधान असों देणें. तुम्हीं लिहिलें कीं आपण आलियावर सर्वेच कोंकण प्रांत स्वारीस जावयाचा निश्चय करून त्या प्रांतींचा बंदोबस्त करूं. लोकांचा तलाश करणें तो होत आहे. तुम्ही करीमबेगाचे विशीं लिहिलें कीं नबाबानें हरप्रकारें सांगितलें आहे कीं त्याची सत्वर मुक्तता करून पाठविलें पाहिजे, तरी करीमबेग हुजूर आणिला आहे, त्याचे सुटकेचा इलाज स्वामींनीं केला आहे. थोडक्याच दिवसांत मुक्त करून नबाबाकडे रवाना होईल. कसबे पुणें येथें ठाणें घालून करीमबेगाची नायबी—पंत करीत होता, ऐदियास जुन्नरचा

† ऐ. प. ले. ४ § ग्रँट डफ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसंग जाल्यावर करीमबेग स्वामीसमीप आला, मग पुणें जागा पुरातन आहे, तेथें स्वामींचेंच ठाणें असावें हा हेतु स्वामींच्या चित्तीं बहुत, आतां ते जागा खालीं जाली. तरी आपले तर्फेनें ठाणेदाराची नेमणूक करून तुम्ही नबाबास सांगोन मुलूख स्वाधीन करून घेणें. व तुम्हांस जाते समयीं मातुश्रीचे सुटकेविशीं सांगितलें होतें, ऐशीयास नबाबांस सांगोन या प्रसंगांत त्यांची सुटका होय ये गोष्टीचा सहसा विसर पडों न देणें. व तुम्हांस आणखी कामें जाते समयीं रुबरू सांगितलीं त्याप्रमाणें करून घेणें. आणखी जो प्रसंग स्वामींच्या हिताचा उचित वाटेल तो हातींचा जाऊं द्याल ऐसा अर्थ नाहीं. कार्याचा भार तुमचे शिरीं आहे. कार्यभाग उत्तम प्रकारें सिद्धीस पावबून मग स्वामींकडे यावयाचें करणें. पूर्ण होईल तें पुढें लिहून पाठविणें. इकडील कार्य प्रयोजनाविशीं नबाबाची साह्यता मिळवून वतनी गाव बिसकलित जालेले बदस्तुर साबीक बहाल होत तें करणें. रायभानजी काकांचे जागिरींत गोपाजी सिंदा बदसामली करीत आहे. बारशीस राजयावर उठोन खसखस लाविली, त्यास ताकीद होय कीं इकडील तर्फेच्या जागिरींच्या वाटेस न जाय. यांच्या बहालीचीं सनदापत्रें ताकीद करवून त्वरेनें होय ते गोष्टी करणें. इकडील सविस्तर वर्तमान यादो गोपाळ यांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. जाणिजे. ” † अशा प्रकारें शाहूचीं दोन वर्षें खलास झालीं.

६ विरोधाची पहिली चुणूक.—शाहूच्या या वेळच्या भानगडी व त्यांची उस्तवारी यांची कल्पना वरील पत्रांवरून येईल. पुणें प्रांत सोडविणें हें त्यानें आद्य कर्तव्य मानलें. लोक सर्व हवालदील झाले होते. चंद्रसेन, उदाजी चव्हाण, सिधोजी हिंदुराव घोरपडे अशा प्रमुखांचीं अंतःकरणें द्विधा होऊन पुढें शाहूचा जम बसतो कीं मोगल त्यास भारी होतात अशी विवंचना लोकांत पसरली होती. ‡ लोधीखान मारला जाऊन करीमबेग कैद झाला, येणेंकरून शाहूचा वचक बसत चालला. इतक्यांत याच संधीस त्याचा मुख्य सल्लागार रायभानजी भोसले ता. २३ ऑगस्ट, स. १७०९ रोजीं मरण पावल्यानें शाहूची मोठी हानि झाली. ता. १७ जुलैच्या अखबारेंत खालील मजकूर आढळतो. “ पुण्याकडील बातमी चंद्रसेन, रंभा, राजजी थोरात § व मानाजी (मोरे)

† त्रै. व. ७

‡ या संबंधांत पे. द. भा. ४५ ले. ४ व ५ हे कागद अभ्यासूंनीं सूक्ष्मतेनें पहावे.

§ पहा पे. द. भा. ३१ ले. १०५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इत्यादि सरदार चंदनवंदनवर जाऊन शाहूला भेटले. त्यानें रंभा व मानाजी यांस पोषाख व शिरपाव दिल्हे; आणि राजजीला वर आपल्या भेटीस आणण्याची आज्ञा केली. हा प्रकार मानाजीस न आवडून तो किल्ल्यावरून पळून गेला. शाहूनें दोनशें स्वार पाठोपाठ पाठवून त्याचे हत्ती वगैरे सामान लुटून घेतलें, राजजी व सुलतानजी यांस पकडून आणून अटकेंत ठेविलें. दुसरे दिवशीं रंभानें शाहूस भेटून कळविलें, "मला आपली सेवा पसंत नाहीं. ज्या सरदारांची समजूत घालून मी आपलेपाशीं आणिलें त्यांना आपण लुटून घेतलें हें योग्य कीं काय? त्यांस सोडून चीजवस्त परत द्या. त्यावरून शाहूनें त्यांस सोडून दिलें. चीजवस्त परत देऊन समाधानी केली." यावरून वस्तुस्थितीचा थोडा बहुत बोध होतो. थोरात मंडळी, चंद्रसेन, रंभाजी निंबाळकर असे कित्येक गृहस्थ शाहूवर नाराज होऊं लागले, आणि पुढें ते त्यास सर्वथा सोडून गेले.

ता. २४ सेप्टेंबर, स. १७०९ (२० रजब) ची अखबार–'राजा शाहू मोठी फौज घेऊन चंदनगडांतून बाहेर पडला. त्यानें मराठे सरदारांस आज्ञा केली, बादशहानें सरदेशमुखी वतन आम्हांस बहाल केलें आहे, तुम्ही उत्तर प्रांतांतून त्याचा वसूल आणा. चौथाईचाही वसूल यावयाचा तो आला नसेल तर बादशाही खजिने लुटून भरपाई करून घ्या.'

ता. २९ सप्टेंबर, 'हमीदखान वगैरे मोगल सरदार बंकापुरच्या बाजूस मराठ्यांवर चालून गेले.' ता. १४ नोव्हेंबरास 'हमीदखान विजापुरीं दाखल झाला. हिंदुराव (घोरपडे) सहा हजार स्वारांनिशीं येऊन हमीदखानास मिळाला. हमीदखानानें लढाईची तयारी केली होती. पुढें हिंदुराव हमीदखानास सोडून सोलापुराकडे गेला.' या बातम्यांना मराठी कागदांत दुजोरा मिळतो. शंकराजी महाडिकास शाहूनें लिहिलें, 'हमीदखान, हिंदुराव घोरपडे व नारो महादेव एकत्र झाले होते ते विजापुरास दाखल झाले. त्यांनीं दुष्टबुद्धि धरोन चालून यावेंसें केलें आहे. स्वामीही फौजबंदी करून त्या प्रांतीं येत आहेत. घोरपडीयांचा हिसाब आहे ऐसें नाहीं. मारून गर्देस मिळविले जातील. तुम्ही तेथें जमाव करून सावध राहणें. रांगणेकर वळवळ करितात, त्यांस फावलें. त्यांस नतीजा पावविणें. जाणिजे. §

§ इ. सं. प्रा. म. स. पृ. १४. शाहूच्या पत्रांस तारीख नाहीं, ती या बादशाही अखबारांनीं निश्चित करतां येते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील उठावा ताराबाई व रामचंद्रपंत यांनीं केला, आणि त्यांत रंभाजी निंबाळकर व चंद्रसेन सामील झाले. रांगण्यावर असतां ताराबाईनें घोरपडे वगैरे सरदार फोडून विजापुरच्या हमीदखानास मिळून शाहूवर चढाई चालविली. तुम्ही उभयतांनीं आपसांत लढून निकाल ठरवा, असा जो मतलब बादशहानें उत्तरेंत जातांना व्यक्त केला, त्याचा हा परिणाम होय. ता. ३ एप्रिल, स. १७१० ची अखबार सांगते, " चंद्रसेन गोदावरीच्या कांठीं शहागड येथें असतां त्यास हमीदखानानें येऊन वेढा घातला. शाहूनें हमीदखानास पकडण्यास फौजा रवाना केल्या. ही मदत येतांच चंद्रसेनानें हमीदखानास शहागडावर कोंडून धरलें. तेव्हां खानाचा निरुपाय होऊन शरण येऊन त्यानें १२ मार्च, स. १७१० रोजीं चंद्रसेनाची भेट घेतली. उभयतांनीं एकमेकांस पोषाख देऊन सल्ला केला. हमीदखान बऱ्हाणपुरचे ठाण्यास परत गेला. "

ता. १५ ऑगस्ट, स. १७१०. ' या दिवसांत चंद्रसेनानें धारूर ऊर्फ फत्याबाद यथेच्छ लुटून तेथील किल्ल्यास वेढा घातला, तेव्हां दाऊदखान पन्नीनें औरंगाबादेहून फौज पाठवून धारूरचा वेढा उठविला.' ता. ७ ऑक्टो० ' राजा शाहूचा मुकाम साताऱ्याखालीं आहे. त्यानें चंद्रसेनास आपल्याकडे बोलविलें आहे. राणी ताराबाईनेंही त्यास आपल्याकडे बोलाविलें आहे. '

ता. १० व १६ डिसेंबर. ' रंभा निंबाळकर औरंगाबादेस जाऊन दाऊदखानास भेटला. खानानें रंभाचा सत्कार करून आपल्या पदरीं ठेविलें. रंभाजीबरोबर चार हजार स्वार व चार हजार पायदळ असा जमाव आहे. दाऊदखानानें रंभाजीच्या मुक्कामावर जाऊन परतभेट दिला. बादशहाचा हुकूम आणून रंभाजीची नेमणूक अहंमदनगरचा फौजदार म्हणून झाली. '

ता. १७ ऑगस्ट, स. १७११ ची अखबार. ' धनाजीचा पुत्र चंद्रसेन जाधव शाहूला सोडून बहादूरगड येथें दाऊदखानास सामील झाला. ' अशा रीतीनें शाहूला जो थोडथोडा विरोध मराठमंडळांत सुरू झाला, त्याची अल्पकाळांत वृद्धि होऊन त्रेधा उडाली, तो प्रकार पुढील प्रकरणीं कळून येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३

विरोधकांची मालिका

कालसूचि

१६९९— विठोजी चव्हाणाचा मृ०, पुत्र उदाजीस हिंमतबहादुरी.

१७११— थोरात मंडळी शाहूकडून फुटली.

१७११ (उन्हाळा)—हरणाचा तंटा; चंद्रसेनाचा बंडावा.

ऑगस्ट १७ चंद्रसेन दाऊदखान पन्नीस सामील.

,, २१ बाळाजीस पंचवीस लाखांचा सरंजाम.

व्यासरावाचीं बायकोमुलें धरलीं.

ऑक्टोबर १ संताजी जाधवास सेनापतिपद.

नोव्हेंबर २० परशुरामपंत प्रतिनिधीस अटक.

डिसेंबर २ खटावकराचा बंडावा मोडला.

१७१२ ते १७१४ थोरात प्रथम ताराबाईस व मागून मोगलांस मिळाले.

१७१३ फेब्रु०— निजामुल्मुल्क यास दक्षिणची सुभेदारी.

१७१३ नोव्हेंबर १७ बाळाजी वि० पेशवाई.

१७१४ जुलै— ताराबाई व शिवाजी यांस कैद, राजसबाई व संभाजी यांजकडून कोल्हापुर गादीची उभारणी.

१७१५— रंभाजी निंबाळकर निजामास मिळाला.

१७१५ नोव्हें० १९ रामचंद्रपंताचें आज्ञापत्र—राजनीति.

१७१६ जानेवारी १३ राजजी व इतर थोरातांचें हुसेनअलीशीं संगनमत.

१७१६ ते १७१८— दमाजी थोराताचा पुंडावा.

१७१६ मार्च ९ भगवंत रामचंद्र ‘ हुकमतपन्हा ’चा उल्लेख.

ऑगस्ट ५ दमाजीकडून हिंगणगांवास बाळाजीला कैद,-पुढें सुटका.

१७१७ मार्च— दमाजी थोरातानें सचिवास कैद केलें.

१७१८ मे— हिंगणगांव काबीज, दमाजीस कैद केलें;—पुढें सुटका.

१७२६— ताराबाईपुत्र शिवाजीचा मृत्यु.

१७५१ एप्रिल २६ कोल्हापुरकर राजसबाईचा मृत्यु.

१७६२ नोव्हेंबर— उदाजी चव्हाणाचा मृत्यु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३

विरोधकांची मालिका

१ चंद्रसेनाचा बंडावा	२ हरणाचा तंटा
३ खटावकराचा दंगा	४ कोल्हापूर गादीची उभारणी
५ रामचंद्रपंताचा शेवट	६ दमाजी थोराताचा उपद्व्याप
७ रंभाजी निंबाळकर व पुणें	८ उदाजी चव्हाण, उलाढाली

१ **चंद्रसेनाचा बंडावा.**—मागील प्रकरणांतील उल्लेखांवरून शाहूच्या विरुद्ध ताराबाईनें उठावा कसा केला त्याची अटकळ बांधतां येते. पुणें प्रांत हातचा न सोडणारे कित्येक मुसलमान अंमलदार असून, धनाजीनें जसा नेटानें शाहूचा पुरस्कार केला, तसा त्याचा पुत्र चंद्रसेन यानें केला नाहीं. चंद्रसेन व रंभाजी निंबाळकर असे कित्येक सरदार प्रसंग पडेल तशी धरसोड करूं लागले, तेव्हां त्यांजवर विसंबून राहणें शाहूस धोक्याचें वाटून त्यानें बाळाजी विश्वनाथास सेनाकर्ते पद देऊन फौज जमविण्याची आज्ञा केली. अर्थात् चंद्रसेनाच्या क्षेत्रांत हा अतिक्रम उद्भवला. सरदारांची ही चलबिचल ताराबाईला कळून तिनें लगोलग परिस्थितीचा फायदा घेतला. शाहूविरुद्ध नवीन कारस्थान उभें राहिलें. या कारस्थानाचें वर्णन तिनेंच चंद्रसेनास लिहिलेल्या ता. २४ ऑगस्ट, स. १७११ च्या पत्रांत केलें आहे. ता. १३ ऑगस्ट रोजीं पत्र लिहून चंद्रसेनानें ताराबाईस कळविलें, 'शाहूच्या लोभाची आस्था मनांत न बाळगितां आम्ही प्रथम राजजी व दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर व संताजी पांढरे † यांस सामील करून घेतलें, आणि आपल्या समाधानार्थ परशुराम पंत प्रतिनिधि व खंडेराव दाभाडे यांस पाठवावें असा मुद्दा शाहूस कळविला.' त्यावरून त्या उभयतांस व मानसिंग मोरे यांस शाहूनें चंद्रसेनाचे समजुतीस पाठविलें. भेटी होऊन बोलणीं झालीं, त्यांत चंद्रसेनानें त्या सरदारांचीं मनें वळवून शाहूविरुद्ध कट उभा केला. नंतर त्यानें हैबतराव निंबाळकर सरलष्कर व केरोजी पवार

† हा पुढें चंद्रसेनाशीं लढून मरण पावला. पहा शा. रो. ९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांसही आणून त्या कटांत सामील केलें. मुख्य पुढाकार चंद्रसेन व परशुरामपंत यांनीं घेऊन आपल्या सह्यांनिशीं गुप्त पत्रें गडकिल्ल्यांस पाठविलीं. इतकें केल्यावर चंद्रसेन ताराबाईस लिहितो, 'आतां साताऱ्यावर चाल करून तें स्थल हस्तगत करण्याच्या उद्योगांत आहों.' इतरांनींही याच अर्थाचीं पत्रें ताराबाईस लिहिलीं. त्यावर ताराबाईनें चंद्रसेनास व इतरांस उत्तेजनाचे जबाब ताबडतोब पाठविले. चंद्रसेनाची तर तिनें फारच वाहवा केली आणि त्याला चढविण्यासाठीं त्याच्या बापाच्या पराक्रमाची ओतप्रोत स्तुति केली. हें सर्वच पत्र अभ्यसनीय आहे. †

हा कट स. १७११ च्या उन्हाळ्यांत घाटून सिद्ध झाला. चंद्रसेन दाऊदखान पन्नीस मिळाल्याचें अखबार सांगते. धनाजी जाधवाचा पुत्र प्रत्यक्ष त्याच्या शत्रूस जाऊन मिळतो असा देखावा स्वराज्यांत गैर दिसला असता, म्हणून शाहूवर रुसून ताराबाईकडे जाण्याचें ढोंग त्यानें कांहीं काळ निर्माण केलें. मोगलांकडे जाण्याचा अंतःकरणांतला ओढा त्यानें अखेरीस सिद्धीस नेला. त्याच्या घरांतला तिवा बंधूंचाच बेबनाव हें त्या कृत्यास कारण असेल. मोगल सुभेदार दाऊदखान पन्नी हुशार व प्रत्येक मराठा सरदाराचें इंगित ओळखून होता. झुल्फिकारखान व खुद्द बादशहा यांची त्या वेळीं चलती असून मराठ्यांस हाणून पाडण्याचा त्यांचा निश्चय ठरलेला होता. रंभाजी निंबाळकर व थोरात मंडळी यांचा ओढा प्रथमपासून मोगलांकडे होता. त्यांजकडे व चंद्रसेनाकडे दाऊदखानानें सारखीं कारस्थानें चालविलीं होतीं. खानाशीं बळकट संधान सिद्ध झाल्यावरच चंद्रसेनानें शाहूकडे दरडावणी चालू केली. त्याचीं हीं कारस्थानें चाललेलीं शाहूच्या जाणण्यांत होतीं. परशुरामपंत प्रतिनिधीला तर शाहूचा पक्ष कधींच पसंत नव्हता. अशा स्थितींत धनाजीच्या पश्चात् शाहूचें लक्ष बाळाजी विश्वनाथाकडे लागून उत्तरोत्तर आपण संपुष्टांत येणार अशी धास्ती चंद्रसेनास वाटून तो बिथरला. तथापि शाहूनें शक्य तितकी डोळेझांक त्याजकडे केली आणि परशुरामपंत व खंडेराव दाभाडे यांस आपल्या समजुतीस पाठवा, असें चंद्रसेनानें कळविल्यावर त्यांत कांहीं कपट असेल असें शाहूला वाटलें नाहीं. दोघांसही त्यानें तात्काळ पाठवून दिलें. या भेटींत चंद्रसेनानें फक्त ताराबाईच्या पुरस्कारापुरतीच त्यांना सल्ला दिली; मोगलांकडे जाण्याची

† ऐ. प. ले. ५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोष्ट तो बोलला नाहीं. मराठी राज्यांत फूट पाडण्याचा डावही या प्रसंगीं मोगल अधिकाऱ्यांनीं बहुतेक सिद्धीस नेला होता, परंतु तो डाव अंतीं बाळाजी विश्वनाथाच्या चतुराईनें फसला हें पुढें निदर्शनास येईल. चंद्रसेनाच्या उघड बंडखोरीस निमित्त पाहिजे होतें तें हरणाच्या तंट्यानें उत्पन्न झालें, तो प्रकार प्रथम सांगितला पाहिजे.

२ **हरणाचा तंटा.**—(स. १७११ चा शिशिरर्तु) दमाजी थोरात, उदाजी चव्हाण वगैरे बंडखोरांच्या बंदोबस्तासाठीं शाहूनें चंद्रसेनास रवाना करून बरोबर बाळाजीस दिलें. त्या स्वारींत क्षुल्लक कारणावरून त्यांचा तंटा जुंपला. एके दिवशीं उंबरजच्या आसपास लष्करचें कूच होत असतां एक हरण उठलें, त्याचे पाठीस बाळाजीच्या पथकांतील पिराजी राऊत नांवाचा सरदार लागला. पळतां पळतां, मुक्कामावर डेरे राहुट्या होत्या, त्यांत व्यासराव म्हणून जाधवरावाकडील एक ब्राह्मण कारकून होता, त्याचे राहुटींत तें हरण शिरलें. त्यावरोबर व्यासराव व पिराजी यांचा झगडा लागून पिराजी आपली शिकार मागूं लागला. व्यासराव म्हणाला, 'आम्ही ब्राह्मण, आमचे राहुटींत आलें त्याचें संरक्षण आम्ही करणार.' शेवटीं पिराजीनें भाला टाकला तो व्यासराव पुढें झाला त्यास लागला. जखम झाली. हें वर्तमान पिराजीनें बाळाजीस जाऊन कळविलें. इकडे व्यासरावानें जाधवरावाकडे फिर्याद केली. तेव्हां पिराजीस आमचे स्वाधीन करा असें जाधवरावानें बाळाजीस कळविलें. बाळाजीनें उत्तर दिलें, 'पिराजी आम्हांस शरण आला आहे, त्यास काय शिक्षा करावयाची ती आम्हीच करितों.' त्यावरून दोघेही आग्रहास पडले. जाधवानें बाळाजीवर फौज रवाना केली व पिराजीस पकडून आणण्यास सांगितलें. तें पाहून बाळाजी आपल्या पथकासह छावणी सोडून निघाला. जाधवरावानें पाठलाग सुरू केला. तेव्हां बाळाजी पळत पळत पुरंदर किल्ल्यावर सचिवाच्या आश्रयास गेला. त्याउपर जाधवानें बारामतीवरून पुण्यास येऊन लगोलग पुरंदरास शह दिला व इकडे सचिवास सांगून पाठविलें कीं, 'बाळाजीस काढून द्या, नाहीं तर तुमचा खराबा करूं.' यावरून सचिवानें बाळाजीस घालवून दिलें. बाळाजी बाहेर पडून, कुटुंब, मुलें व अंबाजीपंत पुरंदरे यांसह निघून, पांच सातशें स्वारांनिशीं निरेवर आला. तेथें जाधवाशीं लढाई होऊन बाळाजी पराभव पावला. तेव्हां तो परिंचे गांवावरून पलीकडच्या रानांत शिरला. या वेळीं बाळाजीच्या शिलेदारांत पिलाजीराव जाधव वाडीकर व परिंच्याचा नाथाजी धुमाळ हे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन गृहस्थ होते, त्यांनीं व शाहूचा सासरा कान्होजी राजे शिर्के ‡ यांणीं बहुत युद्धप्रसंग करून बाळाजीस व त्याचे कुटुंबास वाईनजीक पांडवगडचे किल्ल्यावर सुरक्षित पोचविलें. या स्वारींत † बाळाजीचा मुलगा बाजीराव यास लढाईचा पहिला अनुभव मिळून त्याचा पिलाजी जाधवावर लोभ जडला. चंद्रसेनाचा कारकून व्यासराव याचीं बायकामुलें बाळाजीनें पकडून आणलीं, त्याचा उल्लेख ता. ११ ऑक्टोबर, स. १७११ चा आहे, त्यावरून वरील तंट्याची निश्चिति होते. §

बाळाजीनें ही हकीकत महाराजांस कळविण्याकरितां अंबाजी पुरंदरे याजला पांडवगडाहून साताऱ्यास पाठविलें. अंबाजी व खंडो बल्लाळ यांचा स्नेह होता. त्याच्यामार्फत शाहूस सर्व हकीकत कळली, तेव्हां त्यानें बाळाजीस साताऱ्यास बोलावून घेतलें. शाहूनें त्यास आश्रय दिल्यामुळें चंद्रसेनानें निक्षून कळविलें कीं, 'स्वामींनीं बाळाजीस माझ्या स्वाधीन करावें; त्यास आश्रय दिल्यास आम्हांस महाराजांचे पाय सुटतील.' ह्या उद्धटपणाबद्दल जाधवाची खोड मोडण्याकरितां शाहूनें हैबतराव निंबाळकरास बोलाविलें. तो अहमदनगराकडे होता, तो लगेच फलटणास आला. चंद्रसेन पांडवगडाजवळ होता. हें प्रकरण विकोपास न जावें म्हणून शाहूनें रदबदल केली, पण चंद्रसेनास ती मान्य झाली नाहीं. चंद्रसेन पांडवगड सोडून निघाला, त्याची व हैबतरावाची गांठ आंदरकीच्या घाटाखालीं जेऊर येथें पडून एक लढाई झाली (स० १७११ वसंत ऋतु). तींत जाधवाचा पुरा मोड झाला. नंतर तो पळून रहिमतपुरावरून पन्हाळ्यास गेला व उघडपणें ताराबाईस मिळाला.

बंडाचा फैलाव : सेनापति सोडून गेल्याबरोबर अनेक प्रमुख मंडळींचीं मनें शाहूसंबंधानें डळमळूं लागलीं. सावंत, आंगरे, खंडेराव दाभाडे ही मंडळी तर ताराबाईचे पक्षांत भक्कम होतीच, पण चंद्रसेनाचे चिथावणीनें हैबतराव निंबाळकरही शाहूची दुरवस्था पाहून त्यास सोडण्याचे बेतांत आला. परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर हे दोघेच शाहूच्या बाजूचे राहिले, पण ते खानदेशाकडे होते. पेशवा बहिरोपंत पिंगळे होता त्यानें विशेष हालचाल केली

‡ इ. वृ. शके १८३५ पृ. ४६६. † शा. म. व. व. म. द. रु. २ पृ. ७३.

§ पे. द. भा. ७. १३. व्यासराव पुढें शाहूच्या पदरीं पुष्कळ वर्षें नांदत होता. पे. द. १०. २९ व भाग ३० पृ. २४६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. बाळाजीनें मात्र पिलाजी जाधव, पुरंदरे वगैरेंच्या मदतीनें पैसा व फौज जमविली. चंद्रसेन सोडून गेल्याचें समजतांच शाहूनें नवीन फौज जमविण्याचा उद्योग करून चंद्रसेनाचें सेनापतिपद काढून, तें ता. १.१०.१७११ रोजीं त्याचा भाऊ संताजी यास दिलें. ¶ जाधवांस शक्य तितकें कमी दुखविण्याचा शाहूचा विचार होता. चंद्रसेन गेल्याबद्दल हताश न होतां, बाळाजीनें अंबाजी-पंताचे साह्यानें कर्ज काढून नवीन फौज लगोलग बनविली. सावकारांच्या कर्जास तारण पाहिजे म्हणून शाहूकडून बाळाजीनें पंचवीस लाखांचा सरंजाम करून घेतला; † आणि शाहूच्या मंडळींत उत्साह उत्पन्न करून कारभारांत प्रमुखत्व संपादिलें. चंद्रसेन गेल्यानें बाळाजीला पराक्रम दाखविण्याची संधि मिळाली. शाहूच्या या कठिण प्रसंगांत कृष्णाजी नाईक जोशी व त्याचा पुत्र महादाजी कृष्ण चासकर व बाबूजी नायकाचा चुलता कृष्णाजी नाईक जोशी बारामतीकर यांनीं पैशाचें साह्य भरपूर केलें, त्यावरून शाहूनें त्यांचा पुढें सदैव पुरस्कार केला. परशुरामपंत प्रतिनिधि शाहूकडे होता तोही ताराबाईशीं सामील होणार, असें दिसल्यावरून ता. २०.११.१७११ रोजीं त्यास कैद करून सरंजाम, घर जिंदगीसुद्धां जप्त केलें. § या प्रसंगीं त्याचे डोळे काढण्याचा शाहूनें विचार ठरविला तो खंडो बल्लाळाचे मध्यस्थीनें रहित झाला.

पुढें हळूहळू चंद्रसेनाचें कारस्थान मोडून शाहूनें आपला जम बसविला. खटावकर, थोरात, चव्हाण या सर्वांस ताराबाईनें शाहूविरुद्ध उठवून मोठा पेंच उत्पन्न केला होता, तो शाहूनें धिमेपणानें निवारला.

शाहूचा जम चांगला बसत चालला, नुसता पुणें प्रांतच सोडवून स्वस्थ न बसतां दक्षिणेस कर्नाटकांत व उत्तरेस नर्मदेपावेतों त्याचे हस्तक संचार करून शिवाजीच्या वेळेप्रमाणें मराठ्यांचें स्वतंत्र राज्य निर्माण करूं लागले. तोंडानें जरी शाहूनें बादशहाची ताबेदारी कबूल केली, तरी प्रत्यक्ष कृतींत मोगलांची सत्ता त्वरेनें नाहींशी होत चालली हें दाऊदखानास व ठिकठिकाणच्या मोगल अधिकाऱ्यांस दुःसह झालें. शाहूच्या सरदारांशीं युद्ध करण्याचा क्रम तर त्यांनीं चालविलाच, पण त्याहीपेक्षां अंतस्थ फितुरीचें हत्यार त्यांनीं जास्त प्रभावानें चालू केलें. खटावकर, थोरात, चव्हाण, रंभाजी निंबाळकर, जुन्नरचे

¶ पे. द. ७. १२; ३१. १०९ व ११०. † ता. २१.८.१७११ शा. रो. १०१

§ शा. रो. १२० व पे. द. पृ. ३२५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेग, तुरुक ताजखान, मुहकमसिंग, अशा अनेकांस दाऊदखानानें शाहूवर उठवून त्याचें आसन उखडण्याचा कसून प्रयत्न केला. शाहूचा सर्व आधार सेनापति चंद्रसेन, तोच दाऊदखानास वश झाल्यामुळें, शाहूवर कठिण प्रसंग निर्माण झाला; आणि या अडचणीचा फायदा ताराबाईनें घेतला. खटावकर, थोरात, चव्हाण इत्यादि सरदार शाहूच्या विरुद्ध वागतातसें पाहून तिनें त्यांस आपल्या तर्फेनें आणखी चेव आणिला. कान्होजी आंगरे कुलाबेकर व परशुरामपंत प्रतिनिधि यांनीं शाहूविरुद्ध जो उठावा केला तो तिच्याच कारस्थानाचा परिणाम होय. स. १७१३ त निजामउल्मुल्क अधिकारी झाला, त्यामुळें शाहूचें संकट दुणावलें. मिळून स. १७११ पासून तब्बल सहा वर्षें म्हणजे स. १७१६ अखेरचा काळ शाहूला अत्यंत जाचक गेला, तो त्याचें नैसर्गिक सौजन्य व बाळाजी विश्वनाथाचें धारिष्ट्य यांमुळें निभावला. स. १७१४ त कोल्हापुरास क्रान्ति होऊन ताराबाईच्या हातांतील सत्ता गेली, आणि स. १७१६ त सय्यद हुसेनची चलती झाली, तिचा फायदा शाहूस मिळाला. त्यामुळें पुढील राजकारणास अगदीं निराळें स्वरूप प्राप्त झालें. या सर्व घडामोडी आतां पृथक्पणें सांगणें जरूर आहे. कांहीं प्रकरणें लगोलग उरकलीं, तर कांहीं म्हणजे दमाजी थोरात व उदाजी चव्हाण यांचीं दहावीस वर्षांहूनही जास्त काल चालू राहिलीं.

३ खटावकराचा दंगा (स. १७११).—चंद्रसेनाचा फितवा हेंच शाहूवर आलेलें सर्वांत मोठें अरिष्ट होय. या अरिष्टाची उठावणी दाऊदखान पन्नीच्या कारवाईनें सिद्ध झाली, ताराबाईनें त्यांत भर घातली, आणि शाहूवर नाराज झालेल्या कित्येक व्यक्ती त्यांत सामील झाल्या. पण या पहिल्या बंडाचा उपशम वर्ष सहा महिन्यांच्या आंत झाला. शाहूच्या एका आज्ञापत्रांत खालील मजकूर आहे. "किल्ले महिमान गडाखालीं लष्कराचा मुक्काम असतां खटावकर रुजू न होतां बदराहा वर्तणूक करूं लागले, म्हणून फौजेची तयारी करून कसबे खटाववर इसन्ने छ २ जिल्कादीं (म्हणजे ता. २ डिसेंबर, स. १७११ रोजीं) चालोन घेतलें. तेव्हां झुंज निकराचें झालें, त्यांत तुकोजी गायकवाड शिपाईपणाची शर्थ करून स्वामिकार्यावर ठार झाले." यांत खटावच्या लढाईची मिति निश्चित होते.†

† इ. सं. पे. द. पृ. १३ ले. १८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खटावचें ठाणें कोरेगांव रेल्वे स्टेशनच्या पूर्वेस १५ मैल आहे. तेथें कृष्णराव खटावकर नांवाचा मोगलांचा मनसबदार घराण्याचें आनुवंशिक वतन अनुभवून राहत होता. पुष्कळ प्रतिष्ठित ब्राह्मण घराणीं पूर्वापार मुसलमानी अमदानींत नांदत होतीं, त्यांतलेंच हें एक घराणें होतें. शाहू स्वराज्यांत येऊन दाखल झाला तरी त्याचा चांगला जम बसेपर्यंत खटावकरासारखीं पुष्कळ घराणीं मोगलांनाच आपले धनी समजत. शाहू आपला अंमल बसवीत चालला, तेव्हां असे मनसबदार सहजासहजीं आपल्या वतनावर पाणी सोडण्यास तयार झाले नाहींत यांत आश्चर्य नाहीं. चंद्रसेन व ताराबाई यांनीं जेव्हां शाहूवर शस्त्र उगारलें, तेव्हां खटावकरासारख्यांची तारांबळ उडाली, त्यांत शाहूच्या फौजेनें खटाववर चाल केली, तेव्हां लढाई होऊन कृष्णराव व त्याचा वडील मुलगा मारले गेले आणि राहिलेले दोन मुलगे शाहूस शरण आले. शाहूनें त्यांस क्षमा करून पदरीं घेतलें, आणि पूर्वीचें वतन त्या घराण्याकडे चालू ठेविलें, तें अद्यापि त्यांजकडे चालत आहे.[१]

खटावच्या लढाईचें वृत्त वर दिलेंच आहे. शाहूनें बाळाजी विश्वनाथ सेनाकर्ते याची रवानगी खटाववर केली, त्यावेळीं परशुरामपंत प्रतिनिधि साताऱ्यावर अटकेंत असून शाहूची मर्जी प्रसन्न करून आपली सुटका करून घ्यावी अशी त्यास बुद्धि झाली. त्यानें पुत्र श्रीपतराव यास कळविलें, "तुम्ही सेनाकर्ते यांजबरोबर जाऊन लढाईची शर्थ करावी आणि महाराजांस संतोषित करून

---

१ खटावकर हे देशस्थ ब्राह्मण. पूर्वी यांचा लौकिक संस्कृत विद्येंत मोठा होता.

संबाजी ऊर्फ नारोपंत
├── राघव पंडित
│   └── भगवंतराव
│   └── कृष्णराव (लढाईंत मृ. १७११)
└── कृष्णाजी

स्वतः कृष्णरावही विद्वान असून त्यानें विष्णुसहस्रनामावर द्वैत मताची टीका लिहिलेली उपलब्ध आहे. संभाजीला मारल्यावर औरंगजेबानें कृष्णरावास खटावची जागीर दिली, तेथें कोट बांधून तो बंदोबस्तानें राहूं लागला. परंतु युद्धापेक्षां देवतार्चनांत त्याचें लक्ष विशेष होतें. खटाव येथें त्यानें दत्तमंदिर बांधलें. घरांत नेहमीं संस्कृत ग्रंथ उतरून घेणारे पुष्कळ लेखक त्यानें बाळगिले होते. यांचा कुलस्वामी जेजुरीचा खंडोबा असून, तेथचें मंदिर प्रथम कृष्णरावानें बांधलें, तें पुढें अहल्याबाईनें वाढविलें. या घराण्याचे पुरुष विद्वान व साधु वृत्तीनें राहणारे होते. लौकिकांत त्यांस राजे व महाराज असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्हांस सोडवावें अगर मरून जावें." त्याप्रमाणें श्रीपतराव बाळाजी-बरोबर खटावबर चालून गेला. उभयतांनीं शौर्यानें लढून ठाणें काबीज केलें. त्यावरून शाहूची मर्जी परशुरामपंतावर प्रसन्न झाली; आणि पंतास त्यानें पेशवाईचें पद दिलें, तें अल्पकाळ चालवून पुनः प्रतिनिधिपदावर त्यास रुजू केलें.

४ कोल्हापुर गादीची उभारणी.—(ऑगस्ट स. १७१४) शाहूच्या पाडावासाठीं ताराबाईनें पराकाष्ठा केली. तरी समंजस महाराष्ट्र मंडळाचें पाठबळ तिला मिळालें नाहीं. रामचंद्रपंत तिचा पक्ष सांभाळीत होता, तरी त्याचाही उत्साह संपून प्राप्त परिस्थितींत काळ कंठण्यापलीकडे किंवा स्पष्ट संन्यास घेऊन निघून जाण्याशिवाय दुसरा मार्ग त्यास उरला नव्हता. स. १७११ त चंद्रसेन रुसून शाहूला विरोध करूं लागला तेव्हां अल्प काळ ताराबाईनें कंबर बांधिली, पण चंद्रसेनाचा प्रयत्न मराठी राज्य तारण्याचा नसून मोगलांकडून स्वतःची सुव्यवस्था लावण्यापुरताच होता, हा प्रकार उघड होण्यास विलंब लागला नाहीं. वर्ष सहा महिन्यांत चंद्रसेन, खटावकर, थोरात, चव्हाण इत्यादि विरोधकांचा यावत्शक्य बंदोबस्त करून शाहूनें आपला जम बसविला, त्यामुळें ताराबाई निराधार बनली. अशा स्थितींत स. १७१४ त ती व तिचा पुत्र शिवाजी दोघेंही कैदेंत पडून तिची सवत राजसबाई व तिचा पुत्र संभाजी यांचे हातीं मुखत्यारी गेली. हा प्रकार कां व कसा घडला याची स्पष्टता होत नाहीं. या संबंधानें ताराबाई लिहिते. † 'कालपरत्वें आमचा प्रसंग विसकळित होऊन संभाजीराजे व राजसबाई यांनीं गिरजोजी यादव, अंताजी त्रिमळ व गडकरी व तुळाजी शितोळे यांसी पुढें करून किल्ले पन्हाळा येथें संभाजीराजे यांसी राज्यपदास बैसविलें. आम्हांस संकटीं घातलें, बहुत निकड केली.' ही क्रान्ति घडविण्यांत शाहूचा कांहीं भाग असणें शक्य आहे. तसेंच हा प्रकार जुलई ते ऑक्टोबर स. १७१४ एवढ्या अवधींत घडला असा निश्चय होतो. बावडा दप्तर भा. १ ले. ९१ चें ता. ११.७.१७१४ चें आज्ञापत्र शिवाजीच्या नांवचें असून त्यापुढील ले. ९२ चें ता. १४.१०.१७१४ चें आज्ञापत्र संभाजीच्या नांवचें आहे. यावरून क्रान्तीची मिति निश्चित होते. शिवाजीचा जन्म ता. ९ जून, स. १६९६ चा असून, संभाजीचा ता. ७ मे स. १६९८ चा आहे.§ शिवाजीला दोन बायका होत्या, भवानीबाई व पार्वतीबाई. त्या दोघीही

† खं. ८. १६९.

§ जेधे व गदा. श; राजसबाई मृत्यु पे. द. ६. १९० पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील क्रान्तीच्या वेळीं कैदेंत पडल्या. राजसबाई पुढें २६ एप्रिल, स. १७५१ रोजीं मृत्यु पावली, पण ताराबाईप्रमाणें तिनें राजकारणांत भाग घेतला नाहीं.

शाहूचा स्वभाव प्रेमळ असल्यामुळें त्यानें कधीं कोणाचा छळ केला नाहीं, त्यांतल्या त्यांत त्यानें कोल्हापुरकर बंधूच्या कुटुंबावर सदैव कृपादृष्टि ठेविली, म्हणूनच कोल्हापुर गादीचा बचाव झाला. नाहीं तर संभाजीला साफ उखडून काढणें त्यास अशक्य नव्हतें. शिवाय आतस्वकीयांच्या बाबतींत त्यानें पेशव्यांची किंवा इतरांची मध्यस्थी किंवा ढवळाढवळ कधीं चालूं दिली नाहीं. मुलखांतील दंगे मोडून शांतता प्रस्थापित करण्यास या धोरणाचा अवलंब शाहूस फारच फायदेशीर झाला. 'जे जे अष्टप्रधान, कारखानदार व दरकदार येऊन निष्ठेनें राहिले, त्यांचे अधिकार त्यांस देऊन चालविलें. वडील असून आईसाहेबांकडे राहिले, आणि धाकट्यांनीं सेवा केली, त्या धाकट्यांसच पदें दरख दिल्हे. सर्वांचे सन्मान करून आपले लक्षीं लाविलें. सर्व मनुष्यमात्रांस कृपा, ममता लावून वेध लाविला. तैनाता, नेमणुका, जमिनी, इनामगांव ज्याचे जसे श्रम, साहस, सेवा, त्याप्रमाणेंच बक्षिसें द्यावीं. गुण तितका प्रगट करून घ्यावा, अवगुण घेऊं नये.' असे उल्लेख आहेत.

ताराबाईच्या कठोर वृत्तीमुळेंच तिला बंदिवास प्राप्त झाला असें दिसून येतें. सहायकांस तिच्याकडून योग्य पाठबळ मिळालें नाहीं, आणि शाहूचें उदार धोरण जगजाहीर होऊन कोल्हापुर गादीवरील लोकांचा प्रेमभाव उत्तरोत्तर ओसरत गेला. ¶ दिल्लीवरील स्वारी यशस्वी करून पेशवे व सरदार परत आले, तेव्हां शाहूचें भाग्य चढून कर्तबगार माणसांच्या अभावीं कोल्हापुरच्या वांट्यास अखेरपर्यंत दैन्य आलें. इंग्रजांच्या तडाख्यांतून तें वांचलें हाच लाभ मानला पाहिजे. ताराबाईचा पुत्र शिवाजी स. १७२७ त मरण पावला. ता. १८.६.१७२७ छ ९ जिल्काद संमान अशरीनची एक सनद उपलब्ध आहे, तींत "चि. शिवाजी राजे यांचें उत्तरकर्म भूमिदान, संकल्पपूर्वक करून दिल्हें;" असे शब्द आहेत.

५ रामचंद्रपंताचा शेवट—रामचंद्रपंताचें सुप्रसिद्ध आज्ञापत्र संभाजीला उद्देशून लिहिलेलें आहे, यावरून त्याला गादीवर आणण्यांत पंताचा पुरस्कार असावा असें वाटूं लागतें. या कामीं त्यानें निजामाचा सहकारही स्वीकारला असावा. कारण आपलें सोनवळें येथील वतन निजामाकडून सोडविण्याची

¶ तरी अधूनमधून उभयपक्षांचे रणसंग्राम सारखे चालत. स. १७१८ त वडगांवावर युद्ध झाल्याचा उल्लेख असून तसा प्रकार कैक वर्षें चालू होता. (रा. खं. ३.५६६)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठी खटपट स. १७१५ चे आरंभीं त्यानें केलेली स्पष्ट आहे § पण वर्ष सहा महिन्यांत सय्यदांचें कारस्थान रंगांत येऊन शाहू व बाळाजी विश्वनाथ यांनीं त्यांस साह्य करण्याचा नवीन उपक्रम स्वीकारला, तशा प्रकारचा एखादा आकर्षक उद्योग कोल्हापुर रियासतीस राहिला नाहीं. शाहूला विरोध करण्याकरितां निजामालारख्यांचा पक्ष स्वीकारून मोगलांचा आश्रय घेणें हा एकच मार्ग त्यांस उरला आणि त्याचा अवलंब त्यांनीं वारंवार केला. पण हा राष्ट्रविघातक उपद्व्याप पंतास बिलकूल मान्य झाला नाहीं; आणि मोठ्या उद्विग्नतेनें त्यानें राजकारणांतून आपलें अंग साफ काढून घेतलें.¶ त्याचा वडील भाऊ नारो नीलकंठ हुशारींत कमी होता, पण अमात्य-पदाच्या लालसेनें त्यानें शाहूकडे पुष्कळ खटपट केली. रामचंद्रपंतानेंही शाहूकडे असा संदर्भ केला, त्याची चर्चा पूर्वी येऊन गेलेली लक्षांत ठेविली पाहिजे. $

वरील आज्ञापत्राचा काळ ता० १९ नोव्हेंबर, स. १७१५ आहे. हें त्याचें शेवटचें लेखन होय. त्याचा पुत्र भगवंत रामचंद्र ऊर्फ बाजीराव याचा जन्म ता. ६ फेब्रुवारी स. १६७७ चा असून तो या वेळीं चाळिशीच्या उमरीस पोचलेला कर्तबगार होता. परंतु कोल्हापुर व सातारा दोन्हीकडच्या अविश्वासांत त्याच्या जन्माचें मातेरें झालें. भगवंत रामचंद्र अमात्य हुकमतपन्हा अशा उल्लेखाचें ता. ९ मार्च, स. १७१६ चें पत्र उपलब्ध आहे,‡ त्यावरून स. १७१६ च्या आरंभीं रामचंद्रपंत निवृत्त झाला असें म्हणतां येतें. स. १७२० च्या सुमारास रामचंद्रपंताचा काल झाला असा अंदाज कित्येकांनीं केला आहे. त्याशिवाय दुसरा भक्कम पुरावा पंताच्या निधनतिथीचा सांपडत नाहीं. † त्यांची समाधि पन्हाळगडावर श्रीरघुवीराचे देवालयासन्निध

---

§ रा. खं. ८.७५, अथवा बा. द. १–९४.

¶ रा. खं. ३ ले २४० हें ता. ९–१०–१७१५ चें पत्र रामचंद्रपंतानें हुकमतपन्हा म्हणून लिहिलेलें आहे. $ स्थि. रा. पृ. १५४. ‡ स. घ. भा. १ ले. १६५.

† “थोरले पंत कैलासवासी झाले, त्या समयीं भूमिदानानिमित्त सबा अशरीन सालीं दोन बिघे जमीन लक्ष्मणभट ठकार यांस मौजे दाभोल तो आजरें येथें देण्यांत आली,” असा मजकूर ठकारांना कृष्णराव भगवंत अमात्यानें दिलेल्या सनदेंत आहे. थोरले पंत म्हणजे कृष्णराव भगवंत यांचे आजे. रा. खं. ८ ले. १५२ मधील पंताचा उल्लेख बहुधा नारो नीलकंठाचा असावा. त्रै. व. २२ अं. १ पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांपडली असून तिजवर " श्री रामचंद्र नीलकंठ " अशीं अक्षरें दगडावर कोरलेलीं आहेत.

पंताचें आज्ञापत्र : शिवाजीच्या राज्यपद्धतीचीं धोरणें काय होतीं, आणि तीं पुढें कां व कशीं सुटत गेलीं हा प्रश्न इतिहासाध्ययनाला उपयोगी आहे, त्यासंबंधांत संभाजीचें आज्ञापत्र म्हणून जो लेख प्रसिद्ध झालेला आहे त्यांत रामचंद्रपंत अमात्यानें शिवाजीची पद्धति स्पष्ट रीतीनें दाखविली आहे. हें आज्ञापत्र शके १६३७ म्हणजे इ. स. १७१५ ता. १९ नोव्हेंबरचें रामचंद्रपंत अमात्य हुकमतपन्हा यानें लिहिलेलें आहे. प्रधान कसे नेमावे, फौजेची, किल्ल्यांची, आरमाराची वगैरे व्यवस्था कशी ठेवावी, इत्यादि गोष्टी यांत सांगितलेल्या आहेत. सावकारांच्या प्रकरणांत पाश्चात्यांविषयीं केलेला खालील उल्लेख लक्षांत ठेवण्यासारखा आहे. 'फिरंगी, इंग्रज, वलंदेज डिंगमारादि टोपीकर हेही लोक साहुकारी करितात, परंतु ते वरकड साहुकारांसारखे नव्हत. त्यांचे प्रत्येक खावंद राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकुमानें हे लोक साहुकारीस येतात. टोपीकरांस या प्रांतीस प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावीं हा पूर्णाभिमान, हे हट्टी जात, हातास आलें स्थळ मेल्यानें सोडावयाचे नव्हत. त्यांस जागा कधींही देऊं नये. आरमार, तोफा, दारुगोळा हेंच यांचें बळ. आरमार पाठीशीं देऊन त्याचे बळें त्या बंदरीं नूतन किल्लाच निर्माण करणार. त्यांस जागा देऊं नये, शहराचा उपद्रव चुकवून नेमून देऊन वखारा घालाव्या. इमारतीचें घर बांधूं देऊं नये.' कोणासही इनाम अगर कायमची जमीन देऊं नये असें यांत प्रतिपादन केलें आहे. याच्या अगदीं उलट प्रकार महाराष्ट्रांत शाहूच्या कारभारानें सुरू झाला, तो राष्ट्रोद्योगास उपकारक किंवा अपायकारक कसा झाला याचें विवेचन पुढें यथास्थल करण्यांत येईल.

६ दमाजी थोरात (स. १७१६–१८).—शाहूच्या विरोधकांत चंद्रसेनाच्या संगतीनें वागणारे दमाजी थोरात व उदाजी चव्हाण हे आणखी दोन गृहस्थ प्रमुख होते. त्यांचीं प्रकरणें पुढें बराच काळ गाजलीं, तथापि पहिल्या दहापांच वर्षांत मात्र त्यांचा उपद्रव शाहूला विशेष जाचला. बाळाजी विश्वनाथानें दिल्लीची स्वारी यशस्वी करून स्वराज्याच्या सनदा आणल्यावर शाहूची मालकी महाराष्ट्रांत कायम झाली. तदनंतर त्याचे सरदार देशभर मराठी सत्ता गाजवूं लागले, तेव्हां जवळचे हे अल्प बंडखोर आपोआप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठिकाणीं असले. राज्यक्रांतीच्या काळांत स्थानिक सत्ताधीशांची अशी कुचंबणा होतच असते.

औरंगजेबाच्या अंमलांत निंबाळकर, माने, थोरात, चव्हाण वगैरे पुष्कळ मराठे सरदार प्रसंग पडेल त्याप्रमाणें वागून आपला लाग साधीत असत. शाहू महाराष्ट्रांत आल्यावर ताराबाईचें द्वैत निघालें, त्यामुळें तर हे मराठे सरदार एका क्षणीं शाहूकडे, पुढच्या क्षणीं ताराबाईकडे, तर तिसऱ्या क्षणीं मोगलांकडे अशी बतावणी करून आपापला लाग साधूं लागले. वास्तविक पाहतां शाहूच्या वृत्तींत कठोरपणा नव्हता, म्हणून ही मंडळी निभावली, नाहीं तर त्यांस प्राणांस मुकावें लागलें असतें. मात्र द्विधा वृत्तीमुळें त्यांच्याकडून कोणतेंही विधायक कार्य होऊं शकलें नाहीं व इतिहासांत त्यांना माहात्म्यही आलें नाहीं. बाजीरावासारख्याच्या हाताखालीं वागून पराक्रम करते तर त्यांना लहानमोठीं राज्यें स्थापण्याची संधि मिळाली असती. असो. दमाजी थोरातानें पेशवा बाळाजी विश्वनाथ व सचिव नारो शंकर यांस पकडून अटकेंत ठेवलें, म्हणून त्याच्या बंडखोरीस अल्पकाळ महत्त्व प्राप्त झालें. तो भाग आतां तपशीलवार सांगितला पाहिजे.

दमाजी थोरातास रामचंद्रपंत अमात्यानें प्रथम पुढें आणिलें. दक्षिणेंत जिंजीचा वेढा चालू असतां त्यानें दमाजीस सुपे व पाटस हे दोन परगणे जागीर देऊन पुणें देशच्या पूर्वभागाचे बंदोबस्तास नेमिलें. तेव्हां हिंगणगांवास ¶ गढी करून दमाजी राहूं लागला. थोरात मंडळींचा कौटुंबिक जमाव मोठा असून त्यांस 'रुस्तुमराव' असा किताब होता. दमाजीचे आणखी पुष्कळ भाऊ त्याच्याच सारखे पराक्रमी होते. राजजी थोरात हा त्याचा वडील भाऊ असावा. § शाहूनें स्वराज्यांत येतां क्षणीं थोरातांस आपल्याकडे मिळवून घेण्याचा प्रयत्न केला.

धनाजी जाधव स. १७०८ त खानदेश प्रांतीं गेला असतां त्यानें थोरात व दाभाडे यांजकडे वकील पाठवून त्यांस भेटीस आणिलें. † त्यानंतर राजजी

¶ पुण्याचे पूर्वेस २५ मैल, मुळामुठा नदीचे कांठीं.

§ सिधोजी, कृष्णाजी, येसजी म्हणून आणखी नांवें येतात. हिंगणगांव व आष्टें अशीं थोरातांचीं दोन घराणीं असल्यामुळें त्यांतील नांवांची गफलत होणें शक्य आहे. रा. खं. ३.४५३ चें घराणें व आष्टेकर यांची लढाई सातारा हि० सो० ऐ० ले० २ ले. २६० पहा.

† त्रै. व. ७ पृ. ८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोरात व रंभाजी निंबाळकर यांस चंद्रसेनानें स. १७०९ च्या जुलैंत शाहूचे भेटीस बोलाविलें, त्या वेळीं ते नाराज झाले तोही प्रकार संदर्भासाठीं लक्षांत आणिला पाहिजे. स. १७११ त चंद्रसेनानें थोरात, रावरंभा इत्यादि सरदारांस शाहूचे पक्षांतून फोडिलें, आणि ताराबाईकडे जम न बसल्यामुळें ते मोगलांचे आश्रयास जाऊन शाहूच्या प्रदेशांत दंगा करूं लागले. शाहूचा पेशवा बहिरोपंत पिंगळे यास आंगऱ्यानें पकडून नेलें, तेव्हां या मंडळींचा दंगा विशेष वाढला.

अशा तऱ्हेनें थोरात, चंद्रसेन, रंभाजी वगैरे सरदारांनीं शाहूच्या विरुद्ध बंडाळी माजवून स. १७१२-१४ पावेतों सुमारें दोन अडीच वर्षे ताराबाईचा पुरस्कार केला. स. १७१२ त दमाजी थोरात ताराबाईकडे असल्याचा उल्लेख आढळतो. † स. १७१३ व १४ या सालांत त्यास शाहूच्या आज्ञा गेलेल्या आढळतात. म्हणजे या तीन वर्षांत तो स्वराज्यांत वावरत होता. पुढें ताराबाई व तिचा पुत्र कैदेंत पडतांच ते उघडपणें मोगलांकडे गेले.

स. १७१३ पासून दोन वर्षे दक्षिणच्या कारभारावर निजाम उल्मुल्कची नेमणूक होती. स. १७१५ च्या एप्रिलांत निजामाची बदली उत्तरेंत होऊन त्याचे जागीं सय्यद हुसेनअली याची नेमणूक झाली. हुसेनअली इकडे येत असतां दाऊदखान पन्नी त्याजवर चालून गेला. बऱ्हाणपुरजवळ ता. २६ ऑगस्ट, स. १७१५ रोजीं त्यांची लढाई होऊन दाऊदखान मारला गेला आणि हुसेनअली सालअखेर औरंगाबाद येथें आपल्या कामावर दाखल झाला. ता. १३ जानेवारी, स. १७१६ रोजीं राजजी थोरात व त्याचे बंधु यांनीं अहंमदनगराहून येऊन हुसेनअलीची भेट घेतली, त्यास नजर वगैरे देऊन त्याचा संतोष केला. हुसेनअलीनें परत पोषाख देऊन थोरातांचा गौरव केला, असा मजकूर बादशाही अखबारांत आहे. याप्रमाणें थोरात मोगलांचे सेवक बनले.

चंद्रसेनाचे तंत्रानें वागून दमाजीनें अल्पकाळ शाहूविरुद्ध प्रचंड उठावा केला. ता. १०.२.१७१६ चें बाळाजीचें शाहूस पत्र गेलें, त्यांत तो लिहितो, "स्वामींचें आज्ञापत्र सादर जालें. भोजजी पाटलास सोडून देण्याची आज्ञा केली, त्यास येसजी थोरात, विठोजी चव्हाण, भोजजी पाटील हे सर्व हरामखोर. मुद्दे खरे झाले, म्हणून कैद करून खंड केला आहे. निर्गम केलीया सोडून देऊंही. हरामखोरीचा मुलाहिजा करावासा नाहीं. आम्ही कोणाचे बोलें करितोंसें

† पु. द. १ ले ४४, ४६, ४९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं." यावरून स. १७१६ च्या आरंभीं थोरातबंधूंचा दंगा मिरजेच्या बाजूस चालू झाला असें दिसतें.

एकंदरींत पाहतां स. १७१६ चा डिसेंबर व त्यापुढील जानेवारी या काळांत शाहूच्या विरोधकांनीं त्याच्याविरुद्ध भिन्न क्षेत्रांत उद्योग चालविले. त्यांच्या हालचालींचे उल्लेख उपलब्ध आहेत, त्यांवरून पाहतां चंद्रसेन जाधव, मुहकमसिंग, तुरुकताजखान, रंभाजी निंबाळकर ही मंडळी खुद्द सातान्यावर चालून येत होती, त्यांचे मुक्काम नीरानरसिंगपूर, म्हसवड, रहिमतपूर, माहुली, निंबगोवें, रोहिडेश्वर, लोणी–भापकर इत्यादि ठिकाणीं झाले. खुद्द शाहूला धास्ती पडून त्यानें खंडेराव दाभाडे, सुलतानजी निंबाळकर, बाळाजी विश्वनाथ, मानसिंग मोरे, रायाजी जाधव, पंताजी शिवदेव, चिमणाजी दामोदर इत्यादिकांस वारंवार पत्रें पाठवून त्यांना तांतडीनें आपल्या मदतीस बोलाविलें; शत्रुपक्षीय मंडळींच्या मुक्कामाची रोजरोज बातमी आणण्यासाठीं त्यानें घाईघाईनें जासूद रवाना केले, अशा आशयाच्या नोंदी आहेत. † त्यांवरून शाहूवरील हा उठावा स. १७१६ सालीं विशेष जोरांत होता असें दिसतें. चंद्रसेनानें शाहूस व दमाजीनें बाळाजीस अशा दोघां मुख्यांस पकडून घेतलें कीं शाहूचा कारभार संपला, असा व्यूह मोगलांनीं रचिलेला होता, त्याचें निरसन खंडेराव दाभाडे, सुलतानजी निंबाळकर वगैरेंनीं लगोलग केलें. 'अतुल पराक्रमी सेवक' या अर्थाचें शाहूनें बाळाजीस लिहिलेलें पत्र ¶ स. १७१६ तील वरील प्रसंगाचें असलें पाहिजे. पे. द. भा. ७ ले. २६ च्या अपुऱ्या पत्राचा आरंभ छापला आहे तो सदरहू पत्राचा पहिला भाग असावा.

याच दंगलींत बाळाजी विश्वनाथास दमाजी थोरातानें पकडून कैदेंत ठेविलें. चंद्रसेनानें थोरातांस आपले बाजूस ओढून दंगा आरंभिला तो स. १७१६ त विशेष तीव्र बनला, म्हणून त्यास नरम करण्याचें काम बाळाजीनें अंगीकारलें. प्रथम बोलाचाली होऊन घरोब्याच्या नात्यानें हिंगणगांवास भेटी व्हाव्या असें ठरलें. दोन वर्षांपूर्वी आंगऱ्याची भेट घेऊन त्यास जसें बाळाजीनें सामोपचारानें मार्गास आणिलें, तसाच प्रकार थोराताचा आपण बनवूं असा त्याचा उद्देश होता. हिंगणगांव व पुणें येथून उभयतांचे दरम्यान वाटाघाटी होऊन कौटुंबिक स्नेह दृढ करण्याकरितां बाळाजीनें मुलांमाणसांसह जाऊन थोराताचा पाहुणचार

† पे. द. भा. ३० पृ. २३३–२४१. ¶ पुढें हें पत्र सविस्तर दिलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घ्यावा असें बोलणें झालें आणि थोराताकडून बेलभांडाराची शपथ आणवून, बायको राधाबाई, दोघे पुत्र व अंबाजीपंत पुरंदरे अशा मंडळीनिशीं बाळाजी थोराताचे भेटीस हिंगणगांवास गेला. गढींत येण्याबरोबर थोरातानें त्यांस कैद करून जबर दंडाची मागणी केली. उपाशीं वगैरे ठेवून प्रत्यक्ष त्यांचे हाल किती केले त्याची स्पष्टता होत नाहीं. राखेचे तोबरे वगैरे साहित्य धाक घालण्यासाठीं आणिलें. त्या प्रसंगीं उभयपक्षीं मोठा गहजब उडाला. बाळाजीनें थोरातास शपथेची आठवण दिली, त्या वेळीं तो बोलला, 'बेलभांडार म्हणजे तरी काय, एक झाडाचा पाला व दुसरी हळद आपण रोज खातों. त्यांत शपथेचें प्रमाण काय राहिलें ?' अशीं उत्तरें होऊन निकरावर गोष्ट आली, तेव्हां बाळाजीनें बायकामुलें, अंबाजीपंत पुरंदरे वगैरे मंडळी थोराताचे कबजांत ओलीस ठेवून, धडफळे कुटुंबांतील दोघां प्रमुखांस जामीन दिले; आणि आपण जाऊन महाराजांस हकीकत कळविली. नंतर आपाजी माणकेश्वर, मोरशेट करंजे इत्यादिकांचे मार्फत द्रव्य जमवून दंड भरला व ओलीस ठेवलेली मंडळी सोडवून आणली. अटकेचा हा प्रकार छ २७ साबान म्हणजे ५ ऑगस्ट, स. १७१६ रोजीं घडला असें शकावलींत नमूद आहे.

पुढें थोराताचे पारिपत्याचा विचार सुरू झाला. या वेळीं मानसिंग मोरे शाहूचा सेनापति होता, परंतु या मराठे सरदारांचा शाहूस तितका विश्वास येत नव्हता आणि खुद्द मोरे या वेळीं आजारी होता, ‡ म्हणून थोरातावर कोणाची योजना करावी याची विवंचना शाहूस पडली. उत्पन्नदार सरदारांत सचिव प्रमुख असून पुरंदर, सिंहगड वगैरे किल्ले पूर्वीपासून त्याचे कबजांत होते. सचिव नारो शंकर लहान नऊ वर्षांचा, पण त्याची मातुश्री येसूबाई व्यवहारदक्ष होती, तिनें आपला कारभारी रांझेकर यास हाताशीं घेऊन थोरातावर स्वारी करण्याचें काम अंगावर घेतलें. पण थोरातही मोठा वस्तादच भेटला. सचिवाची फौज चालून येतेसें पाहून त्यानें अल्पवयी नारो शंकर याचा मुकाम रोहिडा ऊर्फ विचित्रगडाखालीं असल्याचा शोध आणून, अचानक माणसें पाठवून त्यास पकडून हिंगणगांवास बंदोबस्तानें ठेविलें आणि तुम्ही आमच्या वाटेस जाल तर पुत्रास ठार मारूं, असा येसूबाईस धाक घातला. (मार्च १७१७).

‡ शा. रो. १५८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येणेंप्रमाणें थोरातानें शाहूच्या दोन प्रधानांवर मात करून त्यांस अल्पकाळ पेंचांत आणिलें. पण शाहूनें आपली शांत व उदार वृत्ति कायम ठेवून आलेल्या प्रसंगाची निभावणी केली. सचिवाची आई अत्यंत दुःखी झाली. सचिव गढींत असल्यामुळें हिंगणगांवावर एकदम हल्ला करण्याची सोय राहिली नाहीं. कांहीं तरी युक्तीनें प्रथम नारो शंकरास सोडवून आणणें जरूर होतें. पंताजी शिवदेव सोमण हा सचिवाचा मुतालिक कल्पक व धोरणी होता, त्यास शाहूनें ती कामगिरी सांगितली (ता. २९ मार्च, १७१७). † पंताजीनें पिलाजी जाधव वाडीकर याचे मार्फत दमाजीशीं बोलणें चालविलें. त्याला पुष्कळसे पैसे पाहिजे होते, स्वार्थापलीकडे दमाजीचा दुसरा कांहीं उद्देश नव्हता. अशा स्थितींत पुनः भला मोठा द्रव्यदंड स्वीकारून दमाजीनें नारो शंकरास सोडून दिलें. चार आठ महिने नारो शंकर त्याचे कैदेंत असावा.

शाहूच्या ऐश्वर्याची कमान कशी चढत होती याचें भान दमाजीस राहिलें नाहीं. शिवाय पेशवा व सचिव अशा दोन सर्पांच्या शेपटीवर पाय देणें हें मोठेंच धाडस होतें. या बाबतींत बाळाजीनें वस्तादगिरी केली. चहूंकडे त्यानें सूत्रें खेळविलीं. शंकराजी मल्हारचे मार्फत हुसेन सय्यदशीं त्याचें सूत्र जुळलें होतें. थोराताच्या विश्वासघातकी वर्तनानें शाहूचा कोपही वाढला होता. स. १७१७ च्या दसऱ्यानंतर त्यानें स्वतः फौज घेऊन थोरातावर चाल केली. शाहूची इच्छा थोराताची समजूत घालून त्यास कामास लावावें अशी असल्यामुळें त्यानें जेजुरीस मुक्काम करून थोरातास अभयवचन देऊन भेटीस आणिलें. पण थोराताची चढेल वृत्ति निवळली नाहीं. त्यानें उद्दाम-पणाचेंच भाषण केलें. वचन दिलेलें असल्यामुळें शाहूनें त्यास सुखरूप परत पाठविलें, नाहीं तर पाहिजे ती शिक्षा लगेच करतां आली असती. स. १७१८ च्या फेब्रुवारींत सय्यदांचा तह ठरला. त्याबरोबर मोगलांचा तोफखाना मदतीस घेऊन बाळाजीनें हिंगणगांवास मोर्चे लावून तें ठाणें काबीज केलें, § व थोरातास पकडून पुरंदरावर अटकेंत ठेविलें. हिंगणगांवची गढी मुळा नदींत फेकून पांढरीवर गाढवाचा नांगर फिरविला. सुमारें एक वर्षभर दमाजी पुरंदरावर अटकेंत राहिला असावा. बाळाजी विश्वनाथ

† शा. रो. १४४

§ ब्र. च. १८३. या पत्राची ता. २९–५–१७१८ आहे [९ रजब]; पं. प्र. श-पृ. ३; पे. द. ३० पृ. ३४५. बाळाजीचा मुक्काम जनसध्यें हिंगणगांवास आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिल्लीहून परत आल्यावर अंबाजीपंताचे मार्फत शाहूच्या राण्यांनीं दमाजीस सोडण्याचा आग्रह केला, त्यामुळें महाराजांनीं आज्ञा करून सोडला. परंतु स. १७२८ त कोल्हापुरकर संभाजी निजामास मिळाला त्या संधींत दमाजीनें पुनः शाहूच्या विरुद्ध बंडाळी केली. तेव्हां त्याजवर चालून जाऊन त्यास लढून घेऊन फिरून पुरंदरावर बंदींत घातला. तेथें तो लवकरच मरण पावला. § दमाजी थोरात हिमतीचा माणूस, पण घरसोडीमुळें फुकट जाऊन त्याच्या कर्तबगारीचा फायदा राज्यास मिळाला नाहीं. मोगलांचा तोफखाना आणून दमाजीचें पारिपत्य करावें लागलें यावरून स्वतःचा तोफखाना नसल्यामुळें मराठ्यांचें युद्धबळ कसें लंगडें पडे हेंही येथें स्पष्ट होतें.

थोरातानें शाहूशीं जो एवढा झगडा केला, त्यांत त्यास चंद्रसेनाचें पाठबळ होतें हें आपण पाहिलें आहेच. 'रा. चंद्रसेन जाधव थोरातानची पाठ राखीत, त्याचे बंदोबस्तासाठीं पिलाजी जाधवानें वाडीस कोट बांधिला, परंतु त्याच कोटाचा उपयोग करून थोरातानें रा. बाळाजीपंतास धरिलें. तीच वाडी पुरंदरास मोर्चा जाहला व मुलूख हैराण झाला.¶ आम्ही सांगत होतों तें न ऐकलें.' असें शाहू लिहितो. असो.

७ रंभाजी निंबाळकर व पुणें.—दमाजी थोरातासारखें रंभाजी निंबाळकराचें प्रकरण इतिहासांत गाजलें नाहीं, तरी तो त्याच वर्गापैकीं होय. आरंभीं तो इतर मराठे सरदारांबरोबर बादशाही मुलखावर ताव मारून प्रसिद्धीस आला. अजमशहा उत्तरेंत निघाला तेव्हां त्याच्या लष्करावर अचानक हल्ले करून रंभानें त्याचा भारी उच्छेद केला. नंतर बहादुरशहा दक्षिणेंत आला असतां 'रंभा बंडवाला मोगल प्रदेशावर ताव मारीत आहे,' अशी बातमी त्यास पोंचली.† असे हे भटके मराठे सरदार कोणाच्याही हुकमतींत न वागतां मन मानेल तसे अत्याचार करून स्वार्थ साधीत आणि त्याची जबाबदारी दक्षिणचा राज्यकर्ता या नात्यानें शाहूवर येई.

महादाजी निंबाळकर = सखूबाई
(शिवाजीचा जामात)
|
रंभाजी (दासीपुत्र)
|
जानोजी — रावरंभा
(पहा उग्र. सं., पृ. १००)

§ शकावल्या. ¶ खं. २, पृ. ६६.

† रंभाजीचे उपद्व्याप बादशाही तवारिखांत वारंवार आढळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा अनिश्चितीचा खेळ बाळाजीनें हळूहळू बंद पाडला. स. १७१५ च्या सुमारास चंद्रसेन व रंभाजी यांचा बाळाजी विश्वनाथाकडून उच्छेद झाल्यामुळें ते दोघेही मोगल सुभेदार निजाम उल्मुल्क याच्या आश्रयास गेले. निजामानें रंभाजीस 'रावरंभा' किताब दिला. दोघांचेही वंशज हल्लीं निजामशाहींत विद्यमान आहेत. करमाळें येथें त्यांस जागीर होती.

शाहूनें रंभाजीचा उच्छेद करण्याचें मनावर घेतलें, ह्यासंबंधाचा मुख्य प्रश्न पुण्याच्या जागिरीवरून उद्भवला. शिवाजीच्या या निवासस्थानावर मराठ्यांचा पहिला हक्क होता असें असतां, लोधीखानाच्या मृत्यूनंतर दाऊदखानाच्या शिफारशीवरून बादशहानें पुण्याची जागीर रंभाजी निंबाळकरास देऊन टाकली. पुण्याची जागीर म्हणजे पुण्यापासून पूर्वेकडचा टापू, त्यांत सुपें, सासवड, बारामती, इंदापुर इत्यादींचा समावेश होता. रंभाजीनें आपल्या तर्फेनें बाजी कदम व गुंडाजी नाईक शेकदार हे दोन अंमलदार कारभार करण्यास नेमले. शाहूनें हा प्रांत आपल्या कबजांत घेण्याचा हुकूम बाळाजी विश्वनाथास केला. बाळाजीनें पुण्याची चौथाई वसूल करण्यासाठीं व्यंकोजी ढमढेरे यास पाठविलें. रंभाजी म्हणाला, 'आम्ही मराठ्यांस चौथाई देणार नाहीं.' त्यावरून पुण्यांत दोन अंमल चालू झाले. पुढें शाहूचा नेट वाढून बादशाही अंमल उठला. पेशवाई मिळाल्यापासून बाळाजीला हाच मोठा उद्योग दोनचार वर्षे करावा लागला. बाळाजीचें पहिलें वास्तव्य सुपें येथें होतें.¶ सुप्याचा देशपांडे आपाजी माणकेश्वर अंबीकर यानें बाळाजीला चांगलें साह्य केलें. पुढें सुप्यास निभाव लागेना तेव्हां बाळाजी २३ मे, स. १७१९ला सासवडास जाऊन राहिला.§ परंतु सर्व शत्रूंचा डोळा मुख्य पुण्यावर; ज्याच्या हातांत पुणें तो मालक अशी परिस्थिति कैक वर्षे उत्पन्न झाली. खुद्द निजाम देखील पुण्यावर चाल करण्याचा इरादा वारंवार करी. या कारणास्तव पुण्यास ठासून बसणारा सामर्थ्यवान सरदार असल्याशिवाय निभाव नाहीं असें दिसून आल्यावर शाहूनें मुद्दाम बाजीरावास पुण्यास राहण्याची आज्ञा केली. स. १७२१ त तो तेथें जाऊन धडफळे यांचे वाड्यांत राहिला.‡ मग कांहीं वर्षांनीं त्यानें पुण्यास

¶ पे. द. ७. २९, पं. प्र. शकावली.

§ ना. रो. २. ३०९.

‡ ध. या. पृ. ३८२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतःचा वाडा बांधला. पुण्याचा इतिहास पुढचा असला तरी राजकारणाचे धागे उकलण्यास तो प्रथमपासून लक्षांत आणणें जरूर आहे. असो.

पुणें, सासवड, सुपें अशा कोणत्या तरी ठिकाणीं कायमचें वास्तव्य करण्याची बाळाजीची धडपड कैक वर्षे चाललेली होती. ता. ९ जानेवारी, स. १७१८ रोजीं तो लिहितो, 'सुपें येथें राहावयाची आम्हांस महाराजांची आज्ञा झाली आहे, तरी तेथें कोटाची मजबुदी कशी, पाणी कसें तें लिहून पाठविणें.¶' दमाजीस पुरंदरावर अटकेंत टाकल्यानंतर बाळाजीनें बाजी कदमास घालवून पुणें कबजांत घेतलें.$ नंतर त्या बाजूची व्यवस्था सचिवाकडून काढून शाहूनें बाळाजीकडे दिली. पुण्याच्या पूर्वेकडची सरहद्द चांगल्या बंदोबस्तांत ठेवणें अगत्याचें होतें, त्यासाठीं सचिवाचीं ठिकाणें सासवड § व पुरंदर बाळाजीनें शाहूच्या हुकमानें आपल्या ताब्यांत घेतलीं; आणि पुढें त्यानें हळूहळू पुण्यास कायमचें वास्तव्य केलें. सय्यदांचा तह झाल्यावर पुण्यांतील मोगलांचा अंमल उठला.‡ पुण्याच्या संरक्षणास पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले फार उपयोगाचे असून, पहिला याच वेळीं व दुसरा पुढें बाळाजीच्या नातवानें शाहूचे पश्चात् सांगोल्याचे व्यवस्थेंत सचिवाकडून काढून आपल्या कबजांत घेतला. सचिवानें हा सौदा खुशीनें केला नाहीं हें सांगणें नकोच.† कसबा पुणें ता. २ एप्रिल, १७२६ रोजीं शाहूनें बाजीरावास वंशपरंपरेनें इनाम दिला.*

८ उदाजी चव्हाण, उलाढाली.—दमाजी थोरातांप्रमाणेंच उदाजी चव्हाण हा दुसरा एक शूर गृहस्थ ताराबाईचे तर्फे शाहूला त्रास देण्यांत प्रमुख होता. हें घराणें डिग्रजकर चव्हाण म्हणून सांगलीचे हद्दींत हल्लीं नांदत आहे. राणोजी चव्हाण म्हणून यांचा मूळ पुरुष मालोजी घोरपड्याजवळ होता. राणोजी लढाईंत पडल्यावर त्याचा मुलगा विठोजी यास मालोजीनेंच वाढविलें. मालोजीच्या मृत्यूनंतर विठोजी चव्हाण व संताजी घोरपडे यांनीं

¶ पे. द. ७.२९

$ बाजी कदम पेशव्याचे नोकरींत दाखल होऊन दिल्लीच्या स्वारींत होता, पे. द. ३० पृ. २५८.

§ ता. ९ ऑगस्ट, १७१९ रोजीं. पहा शा. रो. १०४ ‡ रा. खं. २१. १०२

† पुण्याच्या व्यवस्थेसंबंधानें धडफळे यादी व शकावली यांत भरपूर उल्लेख आहेत, त्यांचा उपयोग अभ्यासकांस होईल. * शा. रो. १०६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बादशहाच्या तंबूवर छापा घालून सोन्याचे कळस काबीज करून आणिले,§ त्या वेळीं हिंमतबहाद्दर हा किताब विठोजीस मिळाला. तेव्हांपासून विठोजी रामचंद्रपंताचे हाताखालीं असे. ता. २२ मे, स. १६९९ रोजीं कर्नाटकांत युद्ध चालू असतां महानगर ऊर्फ बंगलोर येथें विठोजी मारला गेला.¶ नंतर त्याचा पुत्र उदाजी यास हिंमतबहाद्दरपदाचीं वस्त्रें रामचंद्रपंतानें दिलीं; तालुका विजापूर व ठाणें मणगुत्ती वगैरे अटरा परगणे, शिरोळ रायबाग वगैरे जागीर त्याजकडे लावून दिली. उदाजीही पूर्वजांसारखाच पराक्रमी असून, शाहू आल्यावर ताराबाईचे पक्षांत जाऊन बत्तीसशिराळयास गढी करून राहिला होता. त्याचा दंगा फार वर्षें अधूनमधून चालूच होता. उदाजी चव्हाण व दमाजी थोरात या उभयतांनीं सातारा प्रांतापर्यंत स्वारी करावी, चव्हाणचौथाई म्हणून घ्यावी, गांव लुटावे, मारावे, असा क्रम चालविला होता. चंद्रसेन जाधवानें त्यांस उत्तेजन देऊन शाहूस पुष्कळच हैराण केलें; आणि शाहूनेंही त्याजवर लहान मोठ्या अनेक स्वाऱ्या केल्या. स. १७२७ त संभाजी जेव्हां निजामास जाऊन मिळाला तेव्हां उदाजीच त्याचा मुख्य साह्यकर्ता होता. तीन वर्षांनीं शाहूनें संभाजीशीं लढून त्यास पकडून आणिलें, तेव्हां उदाजीसही त्यानें कैद करून साताऱ्यास आणिलें. नंतर वारणेचा तह ठरला त्यांत उदाजीनें संभाजीचे पदरीं राहण्याची कबुली दिली, त्याप्रमाणें तो संभाजीबरोबर गेला. तथापि त्यानें शाहूचा पिच्छा सोडला नाहीं. शेवटीं मुद्दाम त्यास नरम करण्यासाठीं शाहूनें मिरजेच्या बाजूस स्वारी केली, तेव्हां उदाजी पळून निजामाचे आश्रयास गेला. अशा रीतीनें साठ वर्षें या पुरुषानें अनेक उलाढाली करून तीनही पेशव्यांस अगदीं पुरेपुरे केलें. त्याचा स्वाभाविक मनाचा ओढा संभाजीकडे असून रामचंद्रपंतास त्याचें साह्य आरंभीं पुष्कळ झालें. बाजीरावानें त्यास थोडेंबहुत धाकांत ठेविलें होतें. शाहूवर त्यानें एकदा मारेकरीसुद्धां घातले होते. पुढें तो निजामास मिळाला तेव्हां शाहूनें स. १७३७ त प्रतिनिधीस पाठवून त्याचें आथणीचें मुख्य ठिकाण काबीज केलें. पुढें नानासाहेब पेशव्यानें त्याची समजूत करून परत आणिलें आणि डिग्रज येथें सरंजाम दिला. उदाजी चव्हाण एका लढाईंत ता. १२ नोव्हेंबर, स. १७६२ रोजीं मरण पावला.†

§ का. सं. प. या. ९ स्थि. रा. पृ. १९. ¶ प्रा. म. स. पृ. १६.
† ऐ. ले. सं. पृ. १७९, का. सं. प. या. ले. ९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४

बाळाजी विश्वनाथ व आंगरे

कालसूचि

१६५८			शिवाजीच्या आरमाराची स्थापना.
१६९८			सिधोजी गुजराचा मृत्यु, कान्होजीस सरखेली.
१७०९	मार्च	२३	शाहूस कान्होजीचें पत्र, सामान पाठविल्याचें.
१७११	अखेर		कान्होजी आंगरे ताराबाईच्या पक्षास मिळाला.
१७१३	मार्च ते जून		परशुरामपंत पेशवा–त्यानंतर प्रतिनिधि.
	ऑगस्ट	२५	तुकोजी गुजर यास कान्होजीवर पाठविलें.
	नोव्हेंबर	१७	बाळाजी विश्वनाथास पेशवाईचीं वस्त्रें.
१७१२—१७१६			मानसिंगराव मोरे सेनापति.
१७१४	फेब्रु०	२८	बाळाजी व आंगरे यांची भेट, तह.
१७१५	जाने०	३०	सीदीनें शरण येऊन पेशव्याशीं तह केला.
	मार्च	२५	जेजुरीस शाहू व कान्होजी यांची भेट.
	डिसें०	२६	चार्लस् बून मुंबईस प्रेसिडेंट.
१७१७	जाने०	११	खंडेराव दाभाडे सेनापति.
१७१८ व १७२५			आंगरे व शाहू यांच्या भेटी.
१७१८—१७२४			आंगरे–इंग्रजांचें युद्ध.
१७१८	एप्रिल	१७	इंग्रजी आरमार विजयदुर्गावर.
	जून	१८	,, ,, अपयशानें मुंबईस परत.
	नोव्हें०	२	बूनचा खांदेरीवर हल्ला.
१७१९	सेप्टेंबर	१९	वॉल्टर ब्राउन, विजयदुर्गावर चाल.
१७२१	ऑगस्ट	२०	इंग्रज–पोर्तुगीजांचा मदतीचा तह.
	नोव्हें०	२९	इंग्रज–पोर्तुगीज फौजा चौल येथें.
	डिसें०	१२	कुलाब्यावर हल्ला, नौकापति मॅथ्यूज जखमी.
	,,	१९	ब्रेथवेटचा पराजय, इं०–पो० बेबनाव.
१७२२	जाने०	९	बाजीराव–पोर्तुगीज तह.
१७२४	फेब्रु०	१९	कान्होजी व वाडीकर सावंताची मैत्री.
१७२५			इंग्रज कैद्यांची सुटका.
१७२९	जुलई	४	कान्होजी आंगरे मृत्यु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४

बाळाजी विश्वनाथ व आंगरे

१ कान्होजी आंगरे, पूर्वपरिचय २ बाळाजी वि० स पेशवाईचीं वस्त्रें
३ प्रतिनिधि सेनापतींच्या नेमणुका ४ आंगऱ्यांशीं सन्मान्य समेट
५ सीदीची शरणागति ६ आंगरे-इंग्रज युद्ध

१ कान्होजी आंगरे, पूर्वपरिचय.—मराठी आरमाराचा अधिपति आंगरे हा बाळाजी विश्वनाथाच्या उदयाला निमित्तकारण झाला. शाहूच्या आगमन-प्रसंगीं तो ताराबाईच्या हुकमतींत वागून मोगल व सीदी यांचा प्रतिकार पश्चिम किनाऱ्यावर चांगल्या प्रकारें करीत होता. इंग्रजांची नाविक सत्ता व व्यापार वाढत चालल्यामुळें त्यांच्याशीं देखील आंगऱ्यांची स्पर्धा वाढत असून नानाविध शत्रूंच्या घोळक्यांत आपली सत्ता कशी टिकवावयाची याची त्याला धास्ती वाटत होती.

तुकोजी संकपाळ
|
कान्होजी आंगरे
|
सेखोजी वगैरे ४ बंधु

स. १६५८ च्या सुमारास शिवाजीनें आरमार बनविण्याची सुरुवात केली, तेव्हां कान्होजीचा बाप तुकोजी संकपाळ नोकरींत दाखल झाला आणि दर्यावर पराक्रम करून त्यानें सुवर्णदुर्गची किल्लेदारी मिळविली. याच ठिकाणीं कान्होजी जन्मला. जवळच उत्तरेस सीदीचें वास्तव्य जंजिरा येथें असल्यामुळें त्याच्याशीं झगडण्यांत आंगऱ्यांना जीवन कंठावें लागलें. संभाजीच्या कारकीर्दींत आरमारी युद्धाचे प्रसंग अनेक घडले, त्यांत कान्होजीचें शौर्य व नाविक कौशल्य चांगलें व्यक्त होऊन कुलाब्याचा नौकाधिपति सिधोजी ऊर्फ भीवजी गुजर याचा तो मुख्य मदतनीस बनला. सिधोजी राजारामाबरोबर जिंजीस गेल्यावर मागें कारभार कान्होजीनें केला. स. १६९८ त सिधोजी मरण पावला, तेव्हां त्याचे जागीं कान्होजीची नेमणूक झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' शहाणे, शूर, मर्द जाणोनं राजारामानें आंगरे यास सुवर्णदुर्गी ठेविलें. त्यांनीं तेथें राहून बहुत खबरदारीनें सर्व जंजिरे व प्रांत राखिला; कांहीं किल्ले व ठाणीं पातशाहींत गेलीं तीं जवामर्दीनें घेतलीं. झाडींतून हिंडणें, स्वाऱ्या करणें, खराब केलेले मोडलेले जागे नीट करून स्वारी शिकारी करणें, असे बहुत कर्ते, त्याजवरून राजाराममहाराज चंदीहून आल्यावर, त्यांनीं सर्फराजी करून कान्होजीस ' सरखेल ' हा किताब दिला. ' स. १७०३ त तो सरखेल असल्याचा उल्लेख आहे. कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग व सिंधुदुर्ग हीं चार मराठी आरमाराचीं ठाणीं असून मलबारपासून गुजरातपावेतोंच्या सबंध किनाऱ्यावर कान्होजीनें आपली दहशत बसविली. मराठ्यांचा बादशहाशीं तीव्र झगडा चालू असतां कान्होजीनें चांगला पराक्रम गाजवून शत्रूंना हतवीर्य केलें. मराठ्यांचीं पुढें लहान मोठीं राज्यें निर्माण झालीं, त्यांत आंगऱ्यांचें घराणें प्रमुख असून त्याचा संस्थापक कान्होजी होय. तो अंगानें स्थूल, वर्णानें काळा व बांध्यानें मजबूद होता. त्याचा चेहेरा उग्र व डोळे पाणीदार होते. त्याचे हुकूम कडक असून ते मोडणारास जबरदस्त शिक्षा होत असे. परंतु हाताखालच्या लोकांशीं तो उदारबुद्धीनें, ममतेनें व बरोबरीच्या नात्यानें वागे. दर्यांत साहसकृत्यें करून खजिना मेळविला, सामर्थ्य वाढविलें. जातीनें मर्द.§

सुमारें पंचवीस वर्षेपावेतों कान्होजीनें पांच सामुद्रिकांशीं निकरानें लढून जे आरमारी विजय संपादिले, ते इतिहासांत विशेष स्मरणीय बनले.

पश्चिम किनाऱ्यावरील प्रत्येक सत्ताधीश आपणांस स्वतंत्र मानून कोणाचेंही नियंत्रण पाळीत नसे. मराठे आपणांस शिवाजीच्या स्वराज्याचे मालक समजून इतरांवर अधिराज्य गाजवीत. मुंबईचे इंग्रज नाविक सत्तेच्या जोरावर आंगरे वगैरे मराठ्यांस चांचे समजून त्यांचें निरोधन करीत. पोर्तुगीझांची सत्ता अलीकडे पुष्कळ खालावल्यामुळें ते कोणाशीं तरी स्नेह जोडून आपली निभावणी करीत. औरंगजेबावर मराठ्यांनीं पगडा बसविला, त्या आधारावर कान्होजीनें पश्चिम किनाऱ्यावरील सर्व सत्ताधीशांस आपले अंकित बनविण्याचा उद्योग चालविला, आणि किनाऱ्यानें संचार करणाऱ्या सर्व जहाजांवर व व्यापारी मालावर जकात घेण्याचा रिवाज पाडिला. त्यासाठीं प्रत्येक जहाजानें पैसे

§ खं. ४ पे. ब; वि. ज्ञा. वि. १९२४ पृ. ४९२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरून आपला परवाना घ्यावा असें त्यानें ठरविलें, तेव्हां या बाबतींत त्याचा इंग्रजांशीं तंटा जुंपला. इंग्रज म्हणत, 'आम्ही दर्यांचे मालक, आम्हीच सर्वांना परवाने देऊं.' आंगरे म्हणे, 'आम्ही मराठे पश्चिम किनाऱ्याचे रखवालदार, आमचे परवाने जे कोणी घेणार नाहींत त्यांस आम्ही बेलाशक लुटून घेऊं.' स. १७१२ च्या सुमारास इंग्रज व पोर्तुगीझ या दोघांशींही कान्होजीचा झगडा सुरू होऊन त्यानें त्यांचीं पुष्कळ जहाजें पकडून लुटलीं आणि भली मोठी पैदास केली. द्रव्य मिळाल्याबरोबर त्यानें नवीन फौज जमविली आणि ताराबाईच्या प्रोत्साहनानें शाहूवर चढाई केली, तो प्रकार पुढें सांगावयाचा आहे. बाळाजी विश्वनाथ त्याजवर चालून गेला तेव्हां कान्होजीचा इंग्रजांशीं व सीदीशीं बेबनाव होत चालला होता; म्हणूनच कान्होजीनें बाळाजीशीं समेट करून पुढील उद्योगास छत्रपतीचा पाठिंबा मिळविला.

शाहू दक्षिणेंत येऊन राज्य करूं लागल्यामुळें मराठी राज्यांत दुफळी उत्पन्न झाली, तिच्याकडे कान्होजीनें प्रथम लक्ष दिलें नाहीं. त्याचा उत्कर्ष राजाराम व ताराबाई यांजकडून झाला असल्यामुळें त्यांजकडेच त्याच्या मनाचा ओढा साहजिकपणें होता, आणि रामचंद्रपंत अमात्याचे हुकूम तो मानीत असे. पश्चिम किनाऱ्यावरील निरनिराळ्या सत्ताधीशांशीं त्याचा संबंध मुख्यत्वें येई. मुंबईस इंग्रज, त्याच्या उत्तरेस वसई येथें पोर्तुगीझ, दक्षिणेस कुलाबा येथें खुद्द आंगरे, नंतर जंजिरेकर हबशी, विजयदुर्गच्या दक्षिणेस मालवणचे बाजूस पन्हाळकर छत्रपति, त्यापुढें वाडीचे सावंत व वेंगुर्ल्याचे डच आणि त्याचे दक्षिणेस गोव्याचे पोर्तुगीझ अशा सर्वांना धाकांत ठेवून मराठ्यांची आरमारी सत्ता टिकविण्याची कामगिरी कान्होजीनें केली. प्रत्यक्ष शाहूशीं त्याचा बरावाईट संबंध आरंभीं आला नाहीं. तथापि मराठी राज्याचा हा प्रतिष्ठित नाविक सरदार शाहूचे आगमनानंतर लवकरच त्याचे पक्षास मिळाला. ता. २३ मार्च, स. १७०९चें त्याचें खालील पत्र उपलब्ध असून त्याच मासल्याचीं आणखी पत्रें पुढील दोन वर्षांतलीं मिळतात. कापड व नानाप्रकारचे रोजच्या उपयोगाचे जिन्नस बाह्य प्रदेशांतून जलमार्गानें आलेले कान्होजीच्याच मार्फत शाहूला मिळणें शक्य होतें. शाहूनें आपला विश्वासू सेवक बसवंत खोजा यास असे जिन्नस आणण्यासाठीं कान्होजीकडे पाठविलें, असें पुढील पत्रावरून कळून येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पे॥ छ ८ सफर श्री (२३ मार्च, स. १७०९)

महाराज राजश्री छत्रपति स्वामींचे सेवेसीं

सेवक कान्होजी आंगरे कृतानेक विज्ञापना. येथील व्रत ता. छ २२ मोहरम सु॥ तिसा मया आलफ पावेतो स्वामींचे कृपादृष्टिकरून यथास्थित असे. राजश्री वसवंतराव समागमे नगद व जिनसाची नेमणूक करून ठेविली होती ते हाली रवानगी बराबर दामाजी जामदार व विसो हरि पाठविले असे.

नगद रुपये ५००० सणगे—४२७३, कापड ८७९८, वजनी जिनस २००, लागवड ६७ पिकदाणी, समया, गुलाबदाणी, पलंग, पानदाने, वेलची, लवंग, गोरोचन.

एकूण अठरा हजार तीनशें एकुणचाळीस रु. अकरा आणे एकबेरजी जिनस व नक्त व लागवड सेवेसीं पाठविलें असे. याचा जाब सादर करावयास स्वामी धनी आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.¶

यावरून स्पष्ट होतें कीं कान्होजी आंगरे शाहूच्या आगमनापासून ताराबाईचे पक्षांत नव्हता. स. १७११ च्या अखेरीस जेव्हां चंद्रसेनाचें कारस्थान निर्माण झालें, तेव्हां ताराबाईचे हुकूम मान्य करून कान्होजीनें शाहूविरुद्ध चढाई आरंभिली. म्हणजे खटावकर, थोरात वगैरेंनीं ताराबाईचा पुरस्कार केला त्यांत कान्होजी सामील झाला. त्यास आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न शाहूनें केला कीं नाहीं तें समजत नाहीं.

चंद्रसेनाचा बंडावा स. १७१२ त वाढून शाहूला अल्प काळ मोठा पेंच उत्पन्न झाला, तेव्हां प्रत्येक विरोधकाच्या बंदोबस्तास शाहूनें आपले हस्तक रवाना केले. उत्तरेकडचा कल्याण प्रांत शिवाजीच्या वेळेपासून स्वराज्याचा मुख्य आधार असून त्याजवर बहुधा पेशव्याची हुकमत असे. शाहूचा पेशवा बहिरोपंत पिंगळे तिकडे होता, त्यास त्यानें आंगऱ्याच्या बंदोबस्ताचें काम सांगितलें. आंगरे चढाई करून आला. कल्याण प्रांत हस्तगत करून व राजमाची, तुंगतिकोना, घनगड हे किल्ले घेऊन तो पुढें थेट पुणें साताऱ्यावर चालून येणार अशी गडबड उडाली. बहिरोपंताला लढाईचें किंवा राजकारणाचें धोरण नव्हतें. खुद्द आंगरे कसलेला सरदार लष्करी पेशानें वावरणारा असून त्यास कबजांत आणण्याचें साधन बहिरोपंतास नव्हतें. बहिरोपंत लोहगडावर जाऊन पुढील उद्योग करणार,

¶ पेशवा दप्तर; अप्रकाशित.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतक्यांत कान्होजीनें एकदम चालून येऊन लोहगड किल्ला काबीज केला, आणि बहिरोपंतास व निळो बल्लाळ चिटणीसास पकडून कुलाबा येथें अटकेंत ठेविलें. अर्थात् हा मोठाच पेंच शाहूला उत्पन्न झाला. या बनावाचे तपशील किंवा मिति उपलब्ध नाहीं. ता. २५ ऑगस्ट, स. १७१३ ची एक नोंद मिळते ती अशी कीं, "स्वामींचे भेटीस तुकोजी गुजर आले. भेट झाल्यावर गुजराचा बहुमान केला." † तुकोजी गुजर आरमारी सरदार. भिवजी व सिधोजी गुजर पूर्वी आरमाराचे मुख्य कामगार असून, त्यांचे पश्चात् कान्होजीस अधिकार मिळाला. प्रस्तुत कान्होजी जेव्हां शाहूविरुद्ध उठला, तेव्हां त्यास काढून त्याचे जागीं तुकोजी गुजराची नेमणूक करण्याचा विचार शाहूनें ठरविला आणि बहुधा कान्होजीवर चालून जाण्याची कामगिरी त्यास सांगितली. तुकोजीनें काय उद्योग केला त्याचा पत्ता लागत नाहीं.

मिळून स. १७१३ त चहूंकडून आभाळ फाटल्यासारखी शाहूची स्थिति झाली. याच वेळीं निजामउल्मुल्क दक्षिणच्या कारभारावर आला, त्यानेंही अंतस्थ कारस्थानें करून शाहूला काढण्याची शिकस्त केली. पुणें प्रांतांत तर त्यानें मोठीच गडबड उडविली. शाहूपाशीं पैसा नाहीं. सौजन्य व युक्तिबाजी भरपूर. मुख्य आधार पेशव्याचा, तो तर नाकर्ता बनून आंगऱ्याचे अटकेंत पडला. दंड भरणें आला तर त्याची तर्तूद जवळ नाहीं. परशुरामपंत प्रतिनिधि केलेला पुरुष, नुकताच शाहूच्या पक्षांत आला होता, त्यास शाहूनें आज्ञा केली, तुम्ही पेशवाई स्वीकारून राज्याचा बंदोस्त करा, आंगऱ्यांनीं घेतलेले किल्ले परत मिळवा. परंतु परशुरामपंतानें तें काम स्वीकारलें नाहीं. एक तर त्याला आपला पूर्वीचा प्रतिनिधीचा वरचढ हुद्दा पाहिजे होता; दुसरें आंगरे मोठा बलवान सरदार, सहज जिंकण्याजोगा नव्हे, त्यास खुद्द ताराबाईचा पाठिंबा, म्हणून त्याजवर शस्त्र चालविणें म्हणजे ताराबाईवरच आघात केल्यासारखें होणार. सबब ही आंगऱ्यावरील स्वारीची आपत्ति त्यानें युक्तीनें टाळिली. $

† पे. द. ३० पृ. २३१

$ या वेळीं (चैत्र शु० १ शके १६३५ ता. १६ मार्च, स. १७१३ रोजीं) परशुरामपंतास शाहूनें अल्पकाळ पेशवा केलें असे उल्लेख आढळतात. इतक्यांत नारो प्रल्हाद मरण पावला, प्रतिनिधि पद रिकामें झालें. तें शाहूनें खंडोबल्लाळच्या शिफारसीवरून आषाढ शु. ७ शके १७३५ ता. १९ जून, स. १७१३ रोजीं परशुरामपंतास दिलें. सुमारें तीन महिने पावेतों पेशवेपद पंतानें स्वीकारलें असण्याचा संभव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ बाळाजी विश्वनाथास पेशवाईचीं वस्त्रें, (१७ नोव्हेंबर, १७१३).—खटावकरावरील स्वारी फत्ते करून आल्यामुळें बाळाजीपंताची पत वाढली. पैसा, फौजा, साथीदार वगैरे जोडण्यांत बाळाजीचें तेज चमकूं लागलें असतां स. १७१३ च्या पावसाळयांत आंगऱ्याचा बंडावा अनावर होऊं लागला. आंगरे व ताराबाई यांनीं पनवेलजवळचा कर्नाळा व दुसरे किल्ले मोगलांकडून घेतले.§ तेव्हां बाळाजीपंताशिवाय दुसऱ्या कोणाचे हातून हा प्रसंग निभावणार नाहीं असाच अभिप्राय खंडोबल्लाळ, परशुरामपंत इत्यादि झाडून साऱ्यांनीं शाहूस कळविला. त्यावर शाहूनें बाळाजीस सांगितलें, तुम्ही मोहीम स्वीकारून आंगऱ्याचा बंदोबस्त करा, म्हणजे तुम्हांस पेशवेपद देऊं. यावर बाळाजीनें विनंती केली,—

" महाराजांची आज्ञा मला प्रमाण आहे. पण पदाचा जोर माझ्या मागें असल्याशिवाय कामगिरी कशी निभावेल ! प्रत्यक्ष पेशव्यासच जर आंगऱ्यानें अडकावून ठेविलें आहे तर दुसरा पेशवा पदावर कायम आहे असें कान्होजीस दिसेल तरच तो नरम होईल. आपण मला पेशवेपदाचा अधिकार देऊन रवाना करावें, म्हणजे छत्रपतींचा पेशवा आपल्यावर चालून येतो अशी सर्वांची खात्री होईल. " शाहूनें या विषयाची पुष्कळ वाटाघाट करून शेवटीं बाळाजीस पेशवाईपद देण्याचें निश्चित केलें. या कामीं परशुरामपंत व बाळाजी यांनीं एकमेकांची साथ चांगली केली असें दिसतें. प्रथम परशुरामपंतास प्रतिनिधि-पद देण्यास बाळाजीनें महाराजांना भीड घातली. उपरान्त परशुरामपंतानें तशीच भीड महाराजांना घालून पेशवाईपद बाळाजीस देवविलें. थोड्याशा देवघेवीनें सर्वांचा संतोष साधण्याची ही हातोटी शाहूनें धारण केली, हें त्याच्या भावी यशाचें बीज होय.

आपली कर्तबगारी आंगऱ्याचे निदर्शनास आणणें शाहूलाही अवश्यच होतें. पदांच्या नेमणुका आम्ही आपल्या मर्जीप्रमाणें करूं शकतों, आंगरे बेफामपणा करूं लागेल तर त्यास दूर करून दुसरा इसम सरखेलीवर नेमणें भाग पडेल, हा प्रकार त्यास कळवावयाचा होता; आणि तोच शेवटीं बाळाजीनें सिद्ध करून शाहूची इभ्रत व राज्याची बळकटी वाढविली. पुण्याचे दक्षिणेस आठ मैलांवर मांजरी येथें मुक्काम असतां शाहूनें बाळाजीस छ ९ जिलकाद

§ अखबारात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मु. स. आर्बा अशर, मार्गशीर्ष शु. ११ शके १६३५, ता. १७ नोव्हेंबर, स. १७१३ रोजीं पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. बादली सणगें सहा, जवाहीर, शिरपेंच तुरा, कंठी, चौघडा, ढाल तलवार, शिक्के, कट्यार, साहेब नौबत, हत्ती घोडे, जरीपटका, असा या वस्त्रांचा तपशील असून पदास सरंजाम महाल व कर्डीरांजणगांव वगैरे पांच महालांचें सरदेशमुखी वतन नेमून दिलें. अंबाजीपंत पुरंदरे यास मुतालिकी व रामाजीपंत भानु यास फडणिसी असे दरख नेमिले.

तसें पाहिलें तर पेशवेपदासाठीं बाळाजीची नेमणूक ही अनुरूपच होती. स. १७०८पासून किंवा स. १७०७च्या ऑक्टोबरांतील खेडच्या लढाईपासूनच बाळाजी शाहूचा साह्यकर्ता बनला होता. पहिलीं पांच वर्षें शाहूचीं आणीबाणीच्या विपन्नावस्थेंत गेलीं, त्यांतून त्याची निभावणूक बाळाजीमुळें झाली. त्या दोघांचे स्वभाव एकमेकांस पोषक होते. शाहू अंतःकरणाचा कनवाळू, कृतज्ञ व पापभीरु होता. दुसऱ्यास दुःख देणें त्याच्या जिवावर येई. या त्याच्या स्वभावाचा परिणाम मराठ्यांच्या एकंदर राजकारणावर घडला. बाळाजीपंत समयज्ञ, अंतःकरणाचा खोल, प्रसंग पडेल तसें वागून आलेला प्रसंग धूर्ततेनें निभावून नेणारा व धन्याशीं सदा अनुरक्त असा होता. शाहूला संतुष्ट ठेवून प्राप्त परिस्थितींत मराठी राज्याचा फैलाव शक्य तितका करावयाचा हें त्याचें मुख्य ध्येय. परिस्थितीची जाणीव त्यास चांगली होती. मराठे व मुसलमान पक्षांतील प्रमुख व्यक्ति, त्यांचे वर्तनोद्देश, त्यांचे अंतर्गत रागद्वेष तो पूर्ण ओळखून होता. कठिण अवस्थेंतून त्यानें केवळ अंगच्या चतुराईनें प्रतिपक्षांस निर्वीर्य बनवून शाहूचा पक्ष सुदृढ केला, ही त्याची मोठी कामगिरी होय.

३ प्रतिनिधि-सेनापतींच्या नेमणुका.—शाहूच्या सौम्य धोरणामुळें मराठ्यांच्या राजकारणावर बरेवाईट परिणाम कसे होत गेले त्याचें विवेचन प्रसंगानुसार वर केलें आहे. जशी त्यानें चुलतबंधूची नांदणूक कोल्हापुरास होऊं दिली, त्याच पद्धतीनें पूर्वी कामावर असलेले सरदार व कामगार यांचीही व्यवस्था ज्याच्या त्याच्या सोयीप्रमाणें त्यानें घडवून आणिली. पूर्वीच्या कुटुंबांतील एक पुरुष शाहूकडे तर दुसरा संभाजीकडे अशी वांटणी बनत जाऊन ती पुढें वंशपरंपरा कायम झाली. बाळाजी विश्वनाथ व त्याचे पुत्र पराक्रमी निघाले, तेव्हां राज्याची सत्ता पेशव्यांचे हातीं जाऊन इतर प्रधान नामशेष बनले. कोल्हापुरच्या राज्यांत तसा पराक्रमी प्रधान अगर सरदार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरचढ निपजला नाहीं, म्हणून तें राज्य पुढें साताराच्या तुलनेनें मागें पडलें. याच्या उलट संभाजीचे अंगीं पराक्रम असता किंवा शाहूच्या पेशव्यांप्रमाणें त्याच्या पदरचा कोणी पुरुष पराक्रमानें वरचढ बनता, तर कोल्हापुरचें तेज वाढून शाहूला दुय्यमपण आलें असतें. ज्या कोणाच्या अंगीं कांहीं पराक्रम आहे अशा सर्वांस पुढें येण्यास शाहूनें उदार अंतःकरणानें वाव दिला, तेणेंकरून समष्टीच्या न्यायानें शाहूचें तेज व राज्याची शक्ति वाढत गेली. या दृष्टीनें या दोन राज्यांच्या भावी कारभाराची तुलना केल्यास ती बोधप्रद वाटेल.

राज्याभिषेकसमयीं केलेल्या नेमणुका केवळ तात्पुरत्या होत्या. पुढें बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाली त्याच सुमारास इतर प्रधानांच्या नेमणुकाही कायम झाल्या. त्यांतल्या त्यांत प्रतिनिधि व सेनापति या दोन नेमणुकांना विशिष्ट कारणानें महत्त्व आलें. परशुरामपंत प्रतिनिधीस कैदेंत घालून शाहूनें सातारा किल्ला काबीज केला, तेव्हांपासून शाहूची चलती पंताचे नजरेस येऊन त्यानें सुटकेचे इलाज चालविले. उलट पक्षीं पंताचें कर्तृत्व शाहूस माहीत असल्यामुळें त्याला कामावर घ्यावें अशी मनोवृत्ति त्याची देखील बनली. पंताची कैद अगदीं नांवाची होती. कारण ताराबाईशीं त्याचा पत्रव्यवहार व दळणवळण सारखें चालू होतें. अशा स्थितींत पहिल्या दोनतीन वर्षांत परशुरामपंतास अमात्यपद व अल्पकाळ पेशवेपद दिलें. त्याला मोकळा करून कामावर घेण्याचा आग्रह खंडो बल्लाळ वगैरे शाहूचे हितचिंतक विशेष करीत होते. ता. २० ऑगस्ट, स. १७०८ रोजीं पंतास अमात्यपद देण्यांत आलें, ‡ तें रामचंद्रपंतास मुद्दाम हिणवण्यासाठीं असावें. स. १७०८ च्या उन्हाळ्यांत रांगण्याच्या लढाईंत रामचंद्रपंतानें शाहूवर मोठाच गहजब उडविला होता. अशाखालीं स. १७०९ साल निघून गेलें.

नंतर स. १७१० सालीं गदाधर प्रल्हादाचे हातून कारभार रेटत नाहीं असा प्रकार शाहूचे नजरेस आला. पेशवा बहिरोपंत पिंगळेही कर्तृत्ववान नव्हता. यावरून त्या सालीं शाहूनें परशुरामपंतास अल्पकाळ पेशवेपद दिलें असावें; † आणि त्या सालच्या अखेरीस म्हणजे ता. १६ डिसेंबर, स. १७१० रोजीं परशुरामपंतास शाहूनें प्रतिनिधिपदावर यथायोग्य रुजू केलें. ¶ या गोष्टीस आठचार महिने होतांच चंद्रसेनाचा बंडावा सुरू झाला. त्याच्या

‡ शा. रो. १५१.

† खं. २१ ले. ३२८. ¶ शा. रो. ११९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजुतीस म्हणून शाहूनें पंतास पाठविलें असतां पंतानें उघडपणें चंद्रसेनास मिळून शाहूच्या विरुद्ध मोहीम चालविली, त्याबरोबर शाहूनें पंतास कैद करून प्रतिनिधिपदावर नारो प्रल्हादाची नेमणूक केली. ¶ पंतांकडून 'स्वामिसेवेस अंतर पडलें हे सबबे सरदेशमुखी वतन ता. २०.११.१७११ रोजीं अनामत करण्यांत आलें. मशारनिल्हेस कैद करून सरंजाम व घर जिंदगी मुद्धां जप्त केलें.' ममतेनें वागविल्यावरही जेव्हां पंत शाहूच्या विरुद्ध वागूं लागला, तेव्हां त्यास चांगली दहशत बसेल अशी सजा करण्याचें शाहूनें मनांत आणिलें. त्याचे डोळे काढावयाचे वगैरे जो प्रसंग बखरकारांनीं वर्णिला आहे तो या वेळचा असला पाहिजे. खंडो बल्लाळास वर्तमान समजतांच तो धावत महाराजांकडे गेला, व अशा अविचारी क्रूर कृत्यानें आपल्याच पक्षाची शक्ति कमी होईल, पराक्रमी सेवक माणूस असे मारूं नयेत, अघटित कामावर घालून मारावे, इत्यादि नाना प्रकारें महाराजांची समजूत खंडोबानें घातली. तेव्हां आपल्या स्वभावानुरूप शाहूनें परशुरामपंताची शिक्षा रद्द करून त्यास पुनरपि कैदेंत ठेविलें. या प्रसंगांतील चिटणिसाचा उपकार स्मरण्याकरितां प्रतिनिधीच्या घरीं श्राद्धाच्या दिवशीं चिटणिसांकडील एका खाशास जेवणास बोलावून, त्यास ब्राह्मणांबरोबर भोजनास बसविण्याची वहिवाट बरेच दिवस चालली होती, असें सांगतात.

पुढें चंद्रसेनाचें कारस्थान मोडल्यावर आंगऱ्याचा प्रसंग उद्भवला. आंगऱ्यानें बहिरोपंतास पकडून ठेविलें, तेव्हां 'तुम्ही जाऊन बहिरोपंतास सोडवून आणा,

¶ या नेमणुकांचे संबंधांत नानाप्रकारच्या भानगडी झालेल्या नजरेस येतात. पुष्कळांचे शिक्के देखील त्यांच्या मृत्यूनंतर कैक वर्षें चाललेले आढळतात. त्यांस आतां ऐतिहासिक महत्त्व नाहीं. सत्का. खं. ९ चे खालील लेखांक लक्षांत घ्यावे:

१५५ ता. २४. १०.१६९९ परशुराम त्रिंबक प्रधान;
२२९ ता. ९. ११. १७१० गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि;
३०२ ता. १.६. १७११ नारो प्रल्हाद प्रतिनिधि;
२३३ ता. ३. ३. १७१२ ,, ,, ,, ;
४१४ ता. १२. २. १७३३ शिक्का परशुराम त्रिंबकाचा.
रा. खं. १५ ले. ३६१ ता. ६. ९. १७११ परशुराम त्रिंबक प्रतिनिधि.
रा. खं. ३ ले. २३९ ता. ११. ११. १७१३ ,, ,, कोल्हापुरकर शिवाजीचा.

तसेंच इ. सं. पे० दप्तरांतील माहिती पृ. ३२५ वरील मजकूर अभ्यसनीय आहे. चिटणिसी बखर, शा. च. पृ. ३१ वरील नेमणुकाही लक्षांत घेतल्या पाहिजेत. पे. द. भा. ३० पृ. २३० व पुढील नोंदी पहाव्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुम्हास पेशवेपद देतों,' अशी सूचना शाहूनें पंतास केली. पण पंतानें ती स्वीकारली नाहीं. तरी बाळाजी व खंडो बल्लाळ यांच्या आग्रहास्तव ता. १९ जून, स. १७१३† रोजीं शाहूनें पुनः परशुरामपंतास प्रतिनिधिपद दिलें. पदाच्या कायम सनदा ता. ८.४.१७१४ रोजीं दिलेल्या आढळतात. साताऱ्यास परशुरामपंताचा कायमपणा झाल्यावर मग कोल्हापुरास कृष्णाजी परशुरामही कायमचा प्रतिनिधि झाला. तोच हल्लींच्या विशाळगडकरांचा पूर्वज होय. परशुरामपंत ज्येष्ठ शु. ८ शके १६४० ता. २६.५.१७१८ रोजीं वारला. § त्या वेळीं त्याचें वय ५८ वर्षांचें होतें. त्याचे पश्चात् श्रीनिवासराव यास शाहूनें प्रतिनिधिपद दिलें. परशुरामपंतास कृष्णाजी, त्र्यंबकराव, श्रीपत ऊर्फ श्रीनिवास, सदाशिव आणि जगजीवन ऊर्फ दादोबा असे पांच मुलगे असून त्यांपैकीं श्रीनिवासराव हा, चुलता माधवराव यास दत्तक दिला होता. परंतु शाहूनें तें दत्तविधान रद्द करून श्रीनिवासरावास आपल्याजवळ आणून प्रतिनिधि केलें, आणि त्याजवर अखेरपर्यंत अकृत्रिम लोभ ठेविला. गोदूबाई व येसूबाई अशा दोन मुली परशुरामपंतास होत्या. त्याच्या बायकोचें नांव बयाबाई. परशुरामपंत चतुर व अनुभवी होता. औरंगज़ेबाच्या युद्धांत ताराबाईची सेवा त्यानें एकनिष्ठपणें केली. शाहू आल्यावर त्याची तारांबळ झाली, आणि त्याचा पराक्रम गाजला नाहीं. मुख्य प्रधानकी त्यास देण्याचा शाहूनें विचार काढिला, तेव्हां त्यानें आपण होऊन तें काम बाळाजी विश्वनाथास देवविलें. जमीन महसुलाच्या व हिशेबी कामांत परशुराम त्रिंबक चांगला वाकब होता. त्यानें जमिनीची पाहणी करून वसुलाचे धारे बांधिले. त्याचीं संस्कृत व मराठी कवनें छापिलेलीं आहेत. त्याचें वृंदावन माहुलीस आहे.

"याप्रमाणें अष्टप्रधान, दरकदार, सरकारकून वगैरे नेमिले. नवीन व पूर्वींचे उपयोगी ऐसे पाहून घालमेली करून, यथापद्धति बहुमान देऊन, सर्वांनीं राज्याचे बंदोबस्तांत निःसीम सेवा करावी ऐशी आज्ञा केली. देवब्राह्मण ह्यांचे इनाम, अग्रहार, पूजा, नैवेद्य, नंदादीप व उत्साह वगैरे यथायोग्य चालावे, अतिथि विन्मुख जाऊं नये असें ठरविलें." सारांश, पेशव्याबरोबरच राज्यांतील इतर सर्व नेमणुका नवीन करण्यांत आल्या.

† प्रति. घ. इ. भाग. १ पृ. २७३

§ मा. व. री. पृ. ३; शा. च. पृ. ४४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिनिधीप्रमाणें सेनापतीच्या बाबतींतही शाहूला अखेरपावेतों पुष्कळशी आपत्ति भोगावी लागली. चंद्रसेनास काढल्यावर त्यानें त्याचा भाऊ संताजी यास सेनापतिपद दिलें, पण त्याचे अंगीं कांहींच कर्तृत्व नसल्यामुळें शाहूनें स. १७१२ त मानसिंग मोरे यास त्या जागीं नेमिलें आणि त्याचे दिमतीस आपल्या भरंवशाचा अंबाजीपंत पुरंदरे यास नेमिलें.¶ मानसिंगानें तें काम चार वर्षे केलें, पण त्याच्या हातून विशेष कामगिरी झाल्याचें दिसत नाहीं. स. १७१६ त तो आजारी झाल्याबद्दल शाहूनें कळकळ दाखविलेली आढळते. ता. ११ जानेवारी, स. १७१७ रोजीं शाहूनें खंडेराव दाभाड्याची नेमणूक सेनापति म्हणून केली.‡

खरें म्हटलें तर अष्टप्रधानांपेक्षांही ज्यास्त महत्त्व दुसऱ्या कित्येक सरदारांस आहे. कान्होजी भोसले, नेमाजी सिंदे, हैबतराव निंबाळकर अशा किती तरी सरदारांचीं व त्यांच्या कृत्यांचीं विस्कळित वर्णनें शाहूच्या अव्वलीस ठिक-ठिकाणीं आढळतात. अलीकडे सांपडलेल्या जयपुरच्या बादशाही अखबारांतही त्यांचा उल्लेख पुष्कळ येतो, पण त्यांची संगति जुळवून व्यवस्थित मांडणी करण्याइतकी माहिती उपलब्ध नाहीं. यावरून आपला इतिहास अद्यापि किती अनिश्चित व अपुरा आहे हें लक्षांत येईल. एकच उदाहरण देतों.

'तुळसाबाई निंबाळकर हैबतरावाची मातुश्री यांस हैबतराव चांद्याचे भांडणीं स्वामिकार्यावरी पडल्याबद्दल शाहूनें इनाम गांव दिला, खमस अशर.'† याच संबंधांत ता. ५ मे, स. १७१४ च्या अखबारेंतील मजकूर, 'हैबतराव निंबाळकर मारला, त्याचा सूड घेण्यासाठीं सुलतानजी, गंगाराम वगैरे सरदार चांद्यावर धावून आले. चांद्याचा दिवाण परशा त्यांजवर चालून गेला.' कान्होजी भोसले हाच शाहूचा पहिला मोठा सहायक वऱ्हाड नागपुरकडील प्रदेश जिंकून तिकडच्या बाजूनें मोगलांचा प्रतिकार करीत होता. 'परसोजी भोसले शाहू महाराजांच्या उपयोगी पडले म्हणून त्यांस सेनासाहेबसुभा पद व जरीपटका साहेब नौबत व शिक्के कटार वस्त्रें देऊन वऱ्हाड प्रांताचे बंदोबस्तास शके १६३० (स. १७०८) सालीं रवाना केलें. पुढें स. १७१० त त्यांचा काळ झाला, तेव्हां त्यांचे चिरंजीव कान्होजी यांस तें पद देऊन

¶ पे. द. ३१. ११३. ‡ शा. रो. १५६ व १५८; पे. द. ३० पृ. २३७ वर खंडेराव डिसेंबर २९ स. १७१६ ला सेनापति असल्याचा उल्लेख आहे.

† इ. सं. पे. द. पृ. १४ ले. २०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामगिरीवर पाठविलें. कान्होजी चांद्याचे बाजूस मोहिमेवर असतां त्याचे मदतीस हैबतराव निंबाळकर गेला, तो लढाईंत ठार पडला. यावरून शाहूचा आरंभींचा उद्योग अजमावतां येतो. हैबतराव निंबाळकरास सरलष्कर पद होतें तें त्याचा पुत्र सुलतानजी यास देण्यांत आलें. वरील युद्धाचें कारण व तपशील अज्ञात आहेत.

४ आंगऱ्याशीं सन्मान्य समेट (ता. ८.२.१७१४).—स. १७१३ च्या पावसाळ्यांतच आंगऱ्यावरील स्वारीची सिद्धता शाहू व बाळाजी या दोघांनीं नेटानें चालविली. या हालचाली कान्होजीला कळत होत्या. आज चार पांच वर्षें मराठशाहीची दुफळी व तिचें बलाबल बाहेर चांगलें जाहीर असून चंद्रसेनाचा खटाटोप अल्पकालांत विफल ठरला. एकंदरींत शाहूचें उदार धोरण व मनुष्यबळ लोकांस पटून त्या मानानें ताराबाईचा पक्ष कमजोर दिसूं लागला. अर्थात् ताराबाईच्या पक्षांत राहून शाहूशीं विरोध केल्यानें आपला निभाव कितीसा लागेल याचा विचार कान्होजीनें चालविला. त्याचें मुख्य बळ आरमारांत. इंग्रज, सीदी वगैरे शत्रू कुलाब्यावर झडप घालण्यास टपलेले, अशा स्थितींत लोहगड, पुणें, किंबहुना साताऱ्यापर्यंत अल्पकाळ चढाई केली तरी एवढा प्रदेश कुलाब्याहून संभाळण्याची ताकद आपणांस नाहीं हें कान्होजी पूर्ण जाणून होता. शिवाय हे सर्व प्रकार त्याला नीट पटवून देण्याची अंतस्थ खटपट बाळाजीनें आपापल्या हस्तकांमार्फत चालविली, तेणेंकरून पुढचा पोंच ठेवणें हेंच आपलें कर्तव्य अशी कान्होजीची मनोभावना बनली.

पेशवाईचीं वस्त्रें घेतल्याबरोबर बाळाजी युद्धाची सिद्धता करून आंगऱ्यावर चालून गेला, आणि दोन अडीच महिन्यांत एकंदर प्रकरण राज्याच्या दृष्टीनें यशस्वी करून शाहूची मर्जी संपादिली. “ तीन चार हजार फौजेसह लोहगडाखालीं आले. कागदोपत्रीं उभयतांचा घरोबा पूर्वींचा होताच. कान्होजी आंगऱ्यांस पत्रें पाठविलीं. आंगरे किल्ल्यावरून खालीं येऊन ओलवण येथें पेशव्यास भेटले. बोलणें करून कुलाब्यास गेले. मागाहून दरमजल पेशवेही कान्होजीचे भेटीस कुलाब्यास गेले. सरखेलांनीं सामोरे येऊन भेटीचा समारंभ यथोचित झाला. उपरांत खलवतास बसोन त्यांस सांगितलें कीं, ‘ तुमचा आमचा भाऊपणा. पेशवाई तुमच्या घरांत. आयते किल्ले देत असाल तरी तसेंच सांगावें. ’ शिक्के कटार व वस्त्रें त्यांस दाखविलीं व त्यांस विचार सांगितला, कीं सरखेलीचें पद ताराबाईकडून आहेच; इकडूनही करून देववितों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराजांचे चाकर होऊन कृपा संपादून घ्यावी. त्याजवरून त्यांनीं मान्य करून राजमाची मात्र ठेवून, लोहगड, घनगड व तुंगतिकोना या किल्ल्यांच्या चिठ्या देऊन किल्ले देवविले. जंजिरेकर हबशाचा व आंगरे यांचा कलह लागला होता तो तह करून दिला. बहिरोपंतास सोडवून समागमें घेऊन आले. महाराजांचे लोक किल्ल्यांवर चढविले. साताऱ्यास जाऊन महाराजांचें दर्शन घेतलें. कान्होजी आंगरे यास सरखेलीचें पद करून वस्त्रें व शिक्के कटार पाठविली." आंगऱ्यानें तह लिहून दिला त्याचा सारांश,—शाहू राजांच्या पायांशीं पूर्वी अंतर न जालें, यापुढेंही करणार नाहीं. पेशव्यांनीं थोरातांशीं अवक्रिया करूं नये. भाकर दिली आहे, ते त्यांनीं खावी. सनदी पत्रांखेरीज कोठें त्यांनीं उपसर्ग न करावा. वरघाटचे किल्ले आंगऱ्यानें घेतले असतील ते स्वाधीन करावे. तळघाटचे किल्ले पेशव्यांनीं घेतले असतील ते आंगऱ्यांस द्यावे. प्रतिवर्षी दसऱ्यापासून मार्गशीर्षपर्यंत कोंकणची मसलत पेशव्यांनीं करावी, हबशी फिरंगी मारून गर्देस मिळवावे. एकमेकांचे चाकर इसम असतील ते एकमेकांनीं ठेवावे, परंतु पुढें न ठेवावे. रायगड आंगऱ्यांनीं घेतला तर छत्रपतींकडे द्यावा. लोहगड, तुंग, तिकोना, कोरगड, घनगड सामानसहित पेशव्यांकडे द्यावे. राजमाची वगैरे किल्येक आंगऱ्याकडे द्यावे. याशिवाय महालांच्या वांटणीची यादी आहे.§ ता. २८.२.१७१४.

आंगऱ्यासारखा बलिष्ठ सरदार केवळ मुत्सद्दीगिरीच्या जोरावर, रक्तपात किंवा अन्यकलह बिलकूल न करितां, बाळाजीनें शाहूचे पक्षांत आणिला, ही त्याची करामत राष्ट्रांत विशेष वाखाणली गेली. शाहूच्या मनास पसंत पडणारा असाच हा मुत्सद्दीगिरीचा प्रभाव व्यक्त झाला. शाहू महाराजांवर कान्होजीची निष्ठा दृढ होऊन त्याचे हयातींत किंवा पुढेंही पुष्कळ काळ ही निष्ठा कायम राहून उभयपक्षीं उपकारक झाली. कान्होजीनें साताऱ्यास येऊन अनेकदा महाराजांची भेट घेतली. अशा भेटींचे उल्लेख उपलब्ध आहेत ते वाचले म्हणजे उभयतांचा प्रेमभाव सहज नजरेंत भरतो.

---

§ पे. व. खं. ४; तह व करारमदार पृ. १९७; आणि ढवूकृत आंगरे पा. १६ पहा. तहांत दोन तीन गोष्टी अगदीं स्पष्ट दिसतात. दमाजी थोराताचा संभाळ करावा अशी मागणी कान्होजीनें केली. त्यानें शाहूशीं राजनिष्ठ राहण्याचें कबूल केलें. रायगड राजधानी हस्तगत करण्याची शाहूची आतुरता त्यांत व्यक्त झाली. खांदेरी, कुलावा, सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे आंगऱ्याकडे देण्याचें ठरलें. (पहा Downing p. XIII.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स. १७१४ च्या फाल्गुन शु. ५ स आंगऱ्याचा तह पुरा केल्यावर बाळाजीपंत बहिरोपंतासह साताऱ्यास महाराजांचे भेटीस गेला. त्यांस मोठी खुषी झाली. एवढें मोठें प्रकरण गोळी वाजल्याशिवाय सिद्धीस गेल्यानें बाळाजीची छाप सर्वत्र बसली. ताराबाईचा पक्ष सर्वथा हतबल होऊन लगेच त्या पावसाळ्यांत ती कैदेंत पडून संभाजीची स्थापना पन्हाळयावर झाली. इकडे कान्होजीची व महाराजांची भेट समारंभानें व्हावयाची त्याची तयारी उभय पक्षीं सुरू झाली. बसवंत खोजानें ता. ८.११.१७१४ च्या पत्रांत भेटीला लागणाऱ्या सामानाची व्यवस्था छत्रपतींस कळविली आहे. § कान्होजीला माणसें पाठवून शाहूनें जेजुरी येथें भेटीस बोलाविलें. आपणही यथाकाल जेजुरीस गेला. शके १६३७ च्या गुढी पाडव्यास (ता. २५.३.१७१५) मोठ्या हर्षभरांत भेटीचा समारंभ सुरू होऊन तो कैक दिवस चालला. सबंध चैत्र महिना शाहूचा मुक्काम जेजुरीस होता. त्याजबरोबर संताजी जाधव वगैरे सरदार असून रावरंभा व इतर विरोधकांस पुणें प्रांतांत राहण्याची मोठी धास्ती उत्पन्न झाली होती. रावरंभानें आपला पुत्र जानोजी यास सावध राहण्याची इशारत दिली. † पुढें साताऱ्यास समारंभानें येऊन कान्होजी रजा घेऊन कुलाब्यास परत गेला. यावेळीं सुऱ्या, घड्याळें, तऱ्हेवाईक कापडें, मेणबत्या, गुलाबपाणी, दारूकाम वगैरे प्रकार युरोपांतून येत त्यांचा खप हौशी लोकांत फार होऊन इंग्रजांस किफायत चांगली मिळे. अशा प्रकारचे युरोपीय जिन्नस कान्होजीनें मागवून महाराजांस वारंवार पाठविल्याचे उल्लेख आढळतात.¶

कान्होजीनें इतउत्तर अनेकवार महाराजांचे भेटीस येऊन राजनिष्ठा व्यक्त केली. सन १७१८ व स. १७२५ या सालीं भेट झाल्याचे उल्लेख विशेष स्मरणीय आहेत. 'महाराजांनीं आंगऱ्याचा सन्मान केला. बादली चादर घातली. आंगऱ्यांनीं नजर केली. बंदरी जिन्नस उत्तम पदार्थ बहुत आणले, ते सर्व व खजिना महाराजांस नजर केला. जेजुरीस शिमगी पौर्णिमा झाली. प्रतिपदेस कूच होऊन निघाले, तेव्हां आंगरे यांनीं पांच रंगाचा गुलाल व रंगीत सामान बहुत आणलेलें दरकूच हत्तीवर रंग व गुलाल भरून पांच चार कोस मजल करावी तेथपर्यंत तक्तराव्यावर नाच रंग गुलाल खेळत मुक्कामापर्यंत चालवें. ऐसें करीत पंचमीस सातारा येऊन पावले. जेजुरीपासून सातारापर्यंत

§ पे. द. ७.२१ † Akhbarat; शा. रो. १३४, १३५. पे. द. ७.२४
¶ पे. द. ८. ५२ व. ५५ इ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रस्ता गुलालांनीं भरला. बहुत सफाईचीं बोलणीं होऊन महाराजांस डेऱ्यास नेऊन पंचमीस समारंभ करून वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे ऐसें देऊन, अष्टप्रधान सरदार दरखदारसुद्धां वस्त्रें देऊन मेजवानी केली. आरमारी सुभ्याच्या सनदा व महाराजांनीं बहुमान दिला तो घेऊन आंगरे परत गेले.'† यापुढें स. १७२५ तही अशीच भेट झाल्याचे उल्लेख असून, उल्लेख नाहींत अशाही आणखी अनेक भेटी झाल्या असतील.

मराठी राज्याचा एक आधार पश्चिम किनारा होय. कल्याणपासून राजापुर मालवण, वेंगुर्लें, फोंडा (गोवा) इत्यादि किनाऱ्याचीं ठिकाणें कबजांत आणण्यास शिवाजीनें कष्ट व अट्टाहास धरिला. पुढें अमात्य प्रतिनिधि वगैरेंनीं हा पश्चिम किनारा संभाळण्याची शिकस्त केली. राज्याच्या सुदैवानें कान्होजी आंगरे हा दर्यावर्दी पुरुष ऐनवेळीं तें जोखीम सांभाळण्यास निर्माण झाला; आणि कोंकणचें महत्त्व पूर्णपणें ओळखणारा बाळाजी विश्वनाथ पेशवाईवर येतांच आंगरे पेशव्यांच्या सहकारानें पश्चिम किनाऱ्यावर मराठी सत्ता स्थिरावली व बळावली. सहकारानें केवढीं कामें यशस्वी होऊं शकतात याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. मराठी राज्याचा पुढील प्रपंच बांधण्यांत बाळाजीनें दाखविलेली चौकस दूरदृष्टि एक प्रकारें अनुपमच म्हटली पाहिजे. राज्याच्या बळकटीचे असे अनेक उपाय त्यानें यथावकाश व यथायोग्य धारण केले म्हणून राज्याचा विस्तार झटपट होऊन मराठ्यांस एवढें महत्त्व प्राप्त झालें. पश्चिम किनारा या वेळीं निर्धास्त न होता, तर मराठ्यांचें पाऊल बाह्य प्रांतांत पडूं शकलें नसतें. ताराबाईचा पक्ष मोडणें व राज्याची घडी बसविणें या दोन गोष्टी बाळाजीनें एका डावांत साधून घेतल्या.

आंगऱ्याला ही गोष्ट पटली म्हणूनच त्यानें मोकळेपणीं तह करून शाहूचें स्वामित्व पत्करिलें. यांत त्यानें आपली, आपल्या घराण्याची व मराठी आरमाराची मजबुदी करून घेतली. त्याच्या उद्योगास एकंदर राज्याचा पाठिंबा मिळून सीदी, इंग्रज, पोर्तुगीझ अशा सर्वांना कबजांत ठेवण्याचें सामर्थ्य कान्होजीस प्राप्त झालें. इतउत्तर इंग्रजांशीं जो तीव्र झगडा त्यानें चालविला, त्याचें स्वरूप इंग्रजांच्या जळफळाटांत आपणास पहावयास सांपडतें. 'दर्यावरील चोर' या शेलक्या विशेषणाचा अहेर इंग्रज लेखक कान्होजीस करितात त्याचें इंगित कान्होजीच्या यापुढील पराक्रमांवरून कळून येतें. पुढील पंधरा वर्षांत

† शा. च. पृ. ४२, शा. रो. १३४, १३५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें आपलें सामर्थ्य अपरंपार वाढवून पश्चिम किनाऱ्याची मालकी संपादिली. यानंतर चाळीस वर्षें पावेतों मराठ्यांनीं आरमाराचे जे पराक्रम गाजविले त्यांचें बीज बाळाजीच्या या पहिल्या उपक्रमांतून निघालें.

कान्होजीशीं अशा तऱ्हेनें समेट घडवून आणण्यांत बाळाजी विश्वनाथ शाहूच्या तत्त्वानुसारच वागत होता. चंद्रसेन जाधव फुटून मोगलांस मिळाला तसा प्रसंग येऊं नये म्हणून मराठे सरदारांचे स्वसंचारास पाहिजे तेवढें क्षेत्र तोडून देऊन, सर्वांनीं राज्याच्या एकंदर हितास जपत जावें, हें कारभाराचें तत्त्व, ही मराठमंडळाची संघटना (जीस पुढें 'मराठा कॉन्फेडरसी' असें नांव मिळालें), तिचा आरंभ शाहू व बाळाजी यांनीं या वेळीं केला. बाळाजीस पेशवाईपद देतांना सरदारांचें संघटन हेंच त्याचें मुख्य कर्तव्य ठरविण्यांत आलें होतें. या कर्तव्याच्या बजावणींत मराठशाहीची जशी वृद्धि झाली, तशीच नवीन जबाबदारीही उपस्थित झाली. आंगऱ्याचा समावेश मराठ-मंडळांत झाल्याबरोबर त्याचे शत्रु ते मराठ्यांचे शत्रु बनले.

५ सीदीची शरणागति.—'दोन शत्रु हबशी व फिरंगी, हे दोघे मारून गर्देस मिळवावे' असें आंगऱ्याशीं झालेल्या समेटांत एक कलम असल्याचें आपण पाहिलेंच आहे. या कलमांत जंजिरा व वसई या दोन मोठ्या स्वाऱ्यांचें बीज पेरलें गेलें. तथापि तूर्त तरी सीदीशीं विशेष झगडा करण्याचें प्रयोजनच पडलें नाहीं. आंगऱ्याला शाहूचें पाठबळ मिळालें असें पाहतांच सीदीचा जोर साफ उतरला व कोंकणचें राजकारण बदलून गेलें. सीदीच्या या शरणागतीचें महत्त्व पूर्णपणें आकलन होण्यास त्याची पूर्वीची बळावलेली नाविक सत्ता लक्षांत घेतली पाहिजे.

औरंगजेब मृत्यु पावतांच त्यानें पूर्वी जे किल्ले काबीज केले होते, त्यांज-वरील किल्लेदार भराभर किल्ले सोडून निघून जाऊं लागले, तेव्हां ते किल्ले सीदी हस्तगत करूं पाहत होता. विशाळगडचा किल्ला औरंगजेबानें काबीज करून तेथें उदितसिंग नांवाचा किल्लेदार नेमिला. औरंगजेब मृत्यु पावतांच उदितसिंग किल्ला सीदीचे स्वाधीन करून निघून जाणार हें पाहून कृष्णाजी भास्करानें उदितसिंगाशीं राजकारण करून ता. १२.४.१७०७ रोजीं किल्ला प्रतिनिधीचे हवालीं केला. स. १७०८.९.१० सालीं हबशानें मराठ्यांचे मुलुखावर स्वाऱ्या केल्याचे उल्लेख आहेत.$ मुठेखोऱ्यावर हबशानें स्वारी केल्यामुळें रयत उठून

$ खं. १६--४०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेली होती.‡ आंगऱ्याशीं तर सीदीचा कलह नेहमींचाच होता. राजपुरी खाडीच्या मुखावर कांसें ऊर्फ पद्मदुर्ग किल्ला आहे त्याचा कबजा घेऊन सीदीनें त्याची सोन्याची किल्ली स. १७१० त बादशहाकडे नजर केली. बादशहानें त्याचा गौरव केला. पुढें दोन तीन वर्षें सीदीला पोशाख पाठवून उत्तेजनही दिल्याचे उल्लेख अखबारांत आहेत. स. १७१३ त कान्होजी शाहूवर चढाई करीत असतांच सीदी याकूतनें सुवर्णदुर्ग किल्ला काबीज केला.

पण आंगऱ्याला पेशव्याचें साह्य मिळतांच त्यानें लगेच सीदीवर चढाई करून सुवर्णदुर्गादि स्थळें परत घेतलीं. त्याबरोबर सीदीनें शरण येऊन पेशव्याशीं तह केला (३० जानेवारी, १७१५). याप्रमाणें हें प्रकरण एवढ्यावर तात्पुरतें मिटलें, तरी पुनः पुढें मोठी स्वारी हबशावर करणें पेशव्यांना भाग पडलें, त्याची हकीकत यथावकाश सांगण्यांत येईल.

६ आंगरे-इंग्रज युद्ध (स. १७१८–२४).—बाळाजीपंत नानानें कान्होजी आंगऱ्याशीं समेट घडवून आणिला, तो मोठ्या दूरदृष्टीचा एक डाव होता. त्या योगानें मराठी राज्याची पश्चिम हद्द निश्चित व निर्धास्त होऊन त्यास एका बाजूस ठरीव आकार प्राप्त झाला, तर दुसऱ्या बाजूस आंगऱ्याचा कर्तव्यभाग स्पष्ट झाला. पूर्वी औरंगजेबाचे युद्धसमयीं वाटेल त्यानें मर्जीप्रमाणें धुमाकूळ मांडावा हा जो प्रकार चालू होता तो इतउत्तर बंद होऊन मराठी राज्याच्या पश्चिम किनाऱ्याची जबाबदारी आंगऱ्याकडे आली. हा किनारा सुरतपासून कारवारपर्यंत व्यापारी दृष्टीनें आंगऱ्याचे कक्षेंत आला, आणि मुंबईजवळील खांदेरीपासून वेंगुर्ल्याजवळील रेडी ऊर्फ यशवंतगड एवढा भाग तर प्रत्यक्ष त्याच्या मालकीचा बनला. या टापूंतील बंदरें, खाड्या व जलदुर्ग यांजवर आंगऱ्याची सत्ता कायम बसली. कुलाबा व विजयदुर्ग हीं दोन मुख्य तटबंदीचीं स्थलें त्याचीं असून इतरांवर त्याचा शह चालू झाला. वीस वर्षें खपून जें आरमार त्यानें सिद्ध केलें त्याचा खरा उपयोग व्यापार व सत्ता वाढविण्याकडे त्यास आतां करतां आला. या आरमारांत तीस चाळीस तोफा वर असलेलीं अनेक प्रचंड जहाजें असून, त्यांवर शूर व प्रवीण दर्यावर्दी खलाशी धन्याचे हुकूम ताबडतोब उठविणारे जय्यत असल्यामुळें कान्होजी आंगरे हा सरदार शत्रूंना कर्दनकाळासारखा वाटूं लागला. हा परिणाम

‡ ऐ. टि. २--२४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेशव्याच्या शिष्टाईनें घडविला; आणि तो लगेच इंग्रज व पोर्तुगीझ यांस जाचक झाला यांत नवल नाहीं.

या पाश्चात्यांची एक ठाम व अवास्तव समजूत बनलेली होती कीं समुद्राचे मालक आपण, आपणासच यथेच्छ जलसंचार करण्याचा हक्क आहे, इतर कोणी त्यांत हात घालतों म्हणतील तर त्यांचें आपण पारिपत्य करूं. या समजुतीमुळें जलसंचार करणाऱ्या दुसऱ्या लोकांस अगर व्यक्तींस हे पाश्चात्य लोक चांचे किंवा चोर या नांवानें संबोधीत. आपल्याकडे अशा प्रकारचा समुद्रावरील मालकीचा प्रश्नच उपस्थित झाला नाहीं. हवा जशी सर्वांच्या मालकीची, तसाच समुद्रही सार्वजनिक समजला जात असे. त्याजवर पाहिजे त्यानें गलबतें चालवावीं, व्यापार करून द्रव्य मिळवावें, त्यांत एकानें दुसऱ्यास अटकाव करूं नये असा सामान्य प्रघात होता. शिवाजीनें स्वतःचें आरमार बनवून पश्चिम किनाऱ्यावर व तन्निगडित दर्यावर आपली सत्ता बसविली, तेव्हांपासून पाश्चात्यांच्या अनियंत्रित व्यापारास मराठ्यांचा प्रतिबंध सुरू होऊन तो आतां आंगऱ्यांचे द्वारा त्यांना विशेष नुकसानकारक बनला.

परंतु मुद्दाम इंग्रजांशीं कलह वाढविण्याची कान्होजीची इच्छा नव्हती. बाळाजी विश्वनाथाशीं समेट केल्याबरोबर त्यानें इंग्रजांशीं सख्य जोडण्याचे हेतूनें त्यांचे वकील कुलाब्यास बोलाविले आणि आपसांतील कलह मिटविण्याचा प्रयत्न केला. समुद्रावर संचार करणाऱ्या व्यापारी जहाजांनीं आपलीं दस्तकें घेतलीं पाहिजेत, तशा लेखी परवानगीशिवाय संचार केल्यास त्यांस आपण जप्त करून लुटून घेऊं, अशी वहिवाट मराठी राज्याचा हक्क म्हणून कैक वर्षांपासून आंगऱ्यांनीं आपल्या टापूंत सुरू केली होती. याचे उलट इंग्रजांनीं मुंबईस आपलें ठाणें कायम केल्यापासून त्यांच्या बंदरांत जा ये करणाऱ्या जहाजांवर त्यांनीं आपलीं दस्तकें लागू केलीं. अर्थात् पश्चिम दर्याचे मालक कोण, इंग्रज कीं आंगरे हा वादाचा मुख्य प्रश्न असल्यामुळें त्याचा निकाल ‘बळी तो कान पिळी’ या न्यायानें लागत असे. इंग्रजांच्या वकिलांनीं कुलाब्यास येऊन कान्होजीशीं समेट ठरविला तो असा कीं, इंग्रजांच्या खास जहाजांना कान्होजीनें आपल्या बंदरांत उपद्रव देऊं नये; तसेंच मुंबईच्या बंदरांत व खांदेरीपासून माहीमपर्यंतच्या टापूंत आंगऱ्याचीं जहाजें जातील त्यांस इंग्रजांनीं अटकाव करूं नये. एकमेकांनीं एकमेकांच्या बंदरांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जकात भरावी. आंगऱ्यांशिवाय दुसरे कोणी मराठे सरदार इंग्रजांस उपद्रव देतील तर त्याचा बंदोबस्त आंगऱ्यांनीं करावा.

हा ठराव अत्यंत मोघम होता. खुद्द इंग्रजांच्या व्यापारी जहाजांस आंगऱ्यानें कधींच अटकाव केला नाहीं. पण इंग्रजांच्या आश्रयाखालीं वागणारे सीदी व दुसरे अनेक व्यापारी इंग्रजांचीं दस्तकें घेऊन आंगऱ्यांची जकात चुकवीत, तो प्रकार त्यास मान्य झाला नाहीं. युरोपांतून आणलेल्या मालाची विक्री करणें व किनाऱ्यानें चालणाऱ्या एतद्देशीय मालाचा व्यापार करणें यांत मोठा फरक होता. हिंदी व्यापारावर इंग्रज आपला ताबा बसवूं लागले तो प्रकार आंगऱ्यांना मानवला नाहीं. त्यांचा मुख्य शत्रु व शेजारी जंजिरेकर सीदी, तो इंग्रजांच्या कच्छपीं लागून चढाई करी, तिला कान्होजीनें विरोध केला. इंग्रजांशीं सख्य जोडून त्यानें लगोलग सीदीचा समाचार घेतला, हें वर सांगितलेंच आहे.

पण इंग्रजांचा समेट लटपटित होता. स. १७१५ च्या डिसेंबर ता. २६ रोजीं चार्ल्स् बून हा उपदव्यापी गृहस्थ मुंबईच्या गव्हर्नरीवर दाखल होतांच इंग्रजांचें उग्र स्वरूप कान्होजीस पदोपदीं नडूं लागलें.

'पश्चिम किनाऱ्यावर आमच्या अनिरुद्ध संचारास अडथळा करील त्याची मी खोडकीच जिरवणार,' असा या नवीन गव्हर्नरानें आपला निश्चय लगेच प्रगट केला. दोन वर्षांचे आंत नऊ उत्कृष्ट लढाऊ जहाजें त्यानें मुंबईच्या बंदरांत नवीन तयार केलीं. त्यांचीं नांवेंच वाचलीं असतां, पाश्चात्यांच्या कठोर स्वभावाची साक्ष पटते.§ या सर्वांवर मिळून १४८ तोफा व साडेबाराशें लढाऊ खलाशी होते. यांशिवाय जमिनीवरून लढण्यासाठीं अडीच हजार युरोपियन व दीड हजार एतद्देशीय एवढी फौज. मुद्दाम. विजयदुर्ग वगैरे आंगऱ्यांचे किल्ले पाडाव करण्यासाठीं इंग्रजांनीं तयार केली. कुलाब्याची दहशत इंग्रजांना तितकीशी नव्हती. पण विजयदुर्गास आंगऱ्याची जमियत प्रचंड असून तेथून सर्व किनाऱ्यावर आंगऱ्याला नाविक सत्ता गाजवितां येत असे. ही 'चांचेगिरी' साफ बंद पाडण्याचा निश्चय गव्हर्नर बूननें जाहीर केला. इंग्रजांचे या वेळचे उद्गारच किती कुरापतीचे आहेत त्याचा एक मासला पहा. 'दर्यावर

§ Britannia ब्रिटानिया, Victory विजय, Defiance मज्जाव, Revenge सूड, Fame कीर्ति, Hunter चाबूक, Hawk ससाणा, Eagle गरुड, Princess Amelia राजकन्या आमिलिया, अशीं तीं नांवें होतीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लूट करणाऱ्या या आंगऱ्याची धाव नुसता विजयदुर्ग घेऊनच थांबली नाहीं. पोर्तुगीझ व इतर व्यापारी यांस घालवून पश्चिम किनाऱ्यावर तो एक स्वतंत्र राजाच बनला आहे. एकदा सुंदर आरबी घोड्यांनीं भरलेलें जहाज सहजगत्या त्याच्या हस्तगत झालें, त्या घोड्यांनीं त्यानें स्वारांची नवीन फौज बनविली. हिंदु, मुसलमान, डच, पोर्तुगीझ, फ्रेंच वगैरे तमाम लोक रक्तानें रंगविलेल्या या चोराच्या निशाणाला मान देतात.' अशा या लेखांवरून आंगऱ्याच्या सत्तेबद्दल इंग्रजांस केवढा जळफळाट वाटूं लागला, त्याची कल्पना होते.

इंग्रज आपणांवर चालून येतात असें दिसतांच आंगऱ्यानें इंग्रजांचीं तीन मोठीं जहाजें, सक्सेस, रॉबर्ट व ऑटर या नांवाचीं एकदम पकडून घेतलीं. जहाजांवर कंपनीचा माल असला तरी तीं इंग्रजांच्या मालकीचीं नव्हतीं अशी सबब आंगऱ्यानें सांगितली. इंग्रजांनींही लगेच माहीमजवळ आंगऱ्याचें असेंच एक जहाज पकडलें, त्याबरोबर उभयतांचें युद्ध उघड सुरू झालें. ता. १७ एप्रिल, स. १७१८ रोजीं इंग्रजांचें जंगी आरमार विजयदुर्गावर चालून गेलें. इंग्रजांनीं किल्लयावर कसून मारा केला, पण कान्होजीनेंही तशाच निकरानें व कौशल्यानें किल्लयाचा बचाव केल्यामुळें त्या लढाईंत इंग्रजांचे दोनशें लोक मयत व तीनशें जखमी झाले, आणि अपयश घेऊन त्यांना परत मुंबईस जावें लागलें. (१८ जून, स. १७१८).

या अपजयानें बून खचून गेला नाहीं. पर्जन्यकाळ संपतांच ता. २ नोव्हेंबर, स. १७१८ रोजीं त्यानें आपलें जंगी आरमार घेऊन स्वतः खांदेरीवर चाल केली. तेथेंही इंग्रजांचा इलाज चालला नाहीं. त्यांनीं अनेक हल्ले चढविले ते सर्व आंगऱ्यानें मारून काढिले. पुनः नामोहरम होऊन बून ता. २४ नोव्हेंबर, रोजीं परत मुंबईस गेला. पुढें अल्पकाळ उभयतांमध्यें सलुखाची वाटाघाट चालली, पण आंतून त्यांनीं युद्धाची तयारी कसून चालविली. विजयदुर्ग काबीज करण्याचा नाद इंग्रजांनीं सोडला नव्हता. ता. १९ सेप्टेंबर, स. १७१९ रोजीं वॉल्टर ब्राऊनच्या हाताखालीं इंग्रज आरमार जय्यत तयारीनें त्या किल्लयावर चालून गेलें. ब्राऊन बिलकूल अशा युद्धास लायक नव्हता. त्यानें आंगऱ्याचीं कित्येक जहाजें बुडविलीं, पण विजयदुर्गास भंग झाला नाहीं. परत येत असतां ब्राऊनचें आरमार लुटलें गेलें, आणि तो स्वतः हात हालवीत मुंबईस परत गेला. अशा रीतीनें आपल्या एकट्याच्या हातून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंगऱ्यास वठणीस आणतां येत नाहींसें पाहून मुंबईकरांनीं गोविकर पोर्तुगीझांशीं वाटाघाट करून उभयतांनीं मिळून कुलाब्यावर स्वारी करण्याचा ठराव केला (ता. २० ऑगस्ट, स. १७२१). आंगऱ्याचा पाडाव केल्यावर कुलाबा पोर्तुगीझांनीं व विजयदुर्ग इंग्रजांनीं घ्यावा आणि उभयतांनीं चौल येथें जमून तेथून एकदम कुलाब्यावर चढाई करावी असा बेत वरील तहांत निश्चित झाला.

या बनावाची वर्दी कान्होजीला भरपूर होती. एके बाजूनें त्यानें समेटाचें बोलणें चालविलें आणि दुसऱ्या बाजूनें युद्धाची तयारी करून शाहू छत्रपती-कडूनही तांतडीनें मदत मागितली. इकडे युरोपांतून मुंबईकरांस आणखी लढाऊ गलबतांची मदत आली. ता. २९ नोव्हेंबर स. १७२१ रोजीं पोर्तुगीझ व इंग्रज युद्धनौका चौल येथें एकत्र झाल्या. उभयतांचे मिळून सहा हजार कसलेले खलाशी आंगऱ्यावर चढाई करण्यास सिद्ध झाले. इकडे शाहूनें पिलाजी जाधव व बाजीराव यांस निकडीचे हुकुम पाठवून आंगऱ्याचे साह्यास रवाना केलें. खुषकीकडून असा भयंकर हल्ला युरोपीय नाविकांवर येऊन त्याचा प्रतिकार करण्याचें साधन हातीं नसल्यामुळें त्यांची त्रेधा उडाली. ता. १२ डिसेंबर, स. १७२१ रोजीं त्यांनीं कुलाब्यावर हल्ला चढविला, त्या प्रसंगांत इंग्रज नौकापति मॅथ्यूज यास मराठ्यांनीं भाल्यानें जखमी केलें. पुढें ता. १९ रोजीं कर्नल ब्रेथ्वेटनें तटावर चाल करतांच बाजीरावानें मागून अशा त्वेषाची हातघाई केली कीं इंग्रज जीव घेऊन पळून गेले. त्यांच्या तोफा व दारूगोळा मराठ्यांचे हातीं पडला. या अपजयामुळें इंग्रज व पोर्तुगीझ यांचें सडकून वांकडें आलें. या संधीचा फायदा घेऊन बाजीरावानें पोर्तुगीझांशीं स्वतंत्र तह करून त्यांस इंग्रजांपासून अलग केलें, (ता. ९ जानेवारी, स. १७२२).‡ ‘ फिरंगीयांनीं हिराकोटावर लगट केली ते समयीं पिलाजी जाधवांनीं जातीनशीं अंगेजणी करून फिरंगी व इंग्रज मारून काढला. तरवारेची शर्थ करून जागा जतन केला. ’ असें वर्णन वरील युद्धाचें शाहूनें केलें आहे.§ लढाई व राजकारण दोन्ही कामांत बाजीरावास पहिला बहुमोल अनुभव वरील प्रसंगांत प्राप्त झाला.

‡ सह्याद्रि–बाजीराव अंक, पिसुर्लेकर, पृ. ४२९. § इ. सं. पे. द. पृ. १९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यानंतर इंग्रजांचा जोर अगदींच थंडावला. कान्होजीला युद्ध नको होतें. त्यानें समेटाचें बोलणें चालू केलें. गव्हर्नर बून कारभार सोडून गेला आणि त्याचे जागीं फिप्सूची नेमणूक झाली. त्यास कान्होजीनें स. १७२४ त समजुतीचें पत्र लिहिलें, त्यावर फिप्सचा जबाब कान्होजीस उद्दामपणाचा आला, त्यास कान्होजीनें ता. २३ जुलै, स. १७२४ चें उत्तर दिलें तें असें. "आमचा कारभार चोरीच्या धंद्यावर चालला आहे हें म्हणणें तुमच्यासारख्या व्यापाऱ्यांस शोभत नाहीं. शिवाजीमहाराजांनीं चार पातशहांशीं युद्ध करून मराठी राज्य स्थापिलें, त्यांचा मी केवळ एक चेला आहें. कायदेकानू पाळून जे कोणी व्यापार करतील त्यांस आमचेकडून उपद्रव लागणार नाहीं. आमचे कैदी तुमचे कबजांत आहेत ते तुम्ही सोडून द्या म्हणजे तुमचे कैदी आम्हीं अटकेंत ठेविले आहेत ते सोडून देऊं.‡" स. १७२५ त उभय कैद्यांची सुटका झाली. तदुत्तर त्यांच्या हर्षामर्षाचे अनेक प्रसंग घडले. मराठ्यांचा हबशांशीं मोठा झगडा स. १७३३ त झाला व पुढे तसाच फिरंगी म्हणजे पोर्तुगीज यांशीं स. १७३७–३९ पर्यंत तीव्र झगडा झाला. त्यांत इंग्रजांनीं धूर्तपणानें वागून हबशी अगर पोर्तुगीझ यांस साह्य केलें नाहीं, किंवा प्रत्यक्ष पेशव्यास दुखविण्याचें धाडस फार दिवस केलें नाहीं. आंगरे आपणास निष्कारण जाच करतो म्हणून त्याचा प्रतिकार करणें आपल्या ओघास येतें, बाकी पेशव्यांशीं अगर शाहूशीं आपला विरोध नाहीं, ही गोष्ट पत्रव्यवहारानें किंवा वकिलांचे मार्फत इंग्रज अधिकारी मुद्दाम पेशव्यांस वारंवार कळविण्याची खबरदारी घेत असत. असो.

इंग्रजांशीं चाललेलें युद्ध आटपतांच कान्होजीची सत्ता वृद्धि पावली. ता. १९.२.१७२४ रोजीं त्याचा व कुडाळकर सावंताचा स्नेहसंबंध शाहूनें घडवून आणिला.† कान्होजीच्या पदरीं शंकोजी मोहिते, राणोजी गोळे, खंडोजी नाळकर, रुमाजीराव खराडे, कृष्णाजी मोड, हसनखान जमादार इत्यादि मातबर सरदार जमा झाले. त्यांनीं युद्धप्रसंग व श्रमसाहस करून कोंकणांतील राज्य राखिलें, याबद्दल शाहूनें त्यांस पालखी व इनाम गांव देऊन त्यांचा संतोष केला. कान्होजी ता. ७ जुलै, १७२९ रोजीं वारला. तोंपावेतों पाश्चात्यांचा इलाज पश्चिम किनाऱ्यावर बिलकुल चालला नाहीं. हे पुढील परिणाम लक्षांत

‡ Forrst Home Series II P. 40 no. x. † पे. द. ३०. ३५१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेतले म्हणजे बाळाजी विश्वनाथाचा स. १७१४ चा कुलाब्याचा तह मराठ्यांच्या राज्यवृद्धीस कसा पोषक झाला तें ध्यानांत येतें, आणि पश्चिम किनाऱ्यावरील पुढील झगडे या पहिल्या उपक्रमांतून कसे निर्माण झाले त्यांची संगति लावतां येते. ¶

¶ कान्होजी आंग्रे ह्याबद्दलची एकंदर संकलित माहिती श्री. दिघे यांच्या Sardesai Commemoration Volume मधील इंग्रजी लेखांत पहावी. गोव्याचे श्री. पिसुर्लेंकर यांचे लेख सदरच्या मराठी भागांत व सह्याद्रीच्या बाजीराव अंकांत पहावे. हा विषय विशिष्ट अभ्यासाचा असून त्याचें साहित्य अनेक ठिकाणीं विखुरलेलें आहे. रा. [illegible] आंग्रे " [illegible] उपयोग होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिणेंत बादशाहीची दैन्यावस्था

कालसूचि

१७०८ ते १७१३	दाउदखान पन्नी दक्षिणचा सुभेदार
१७१३ फेब्रु. ते १७१५ एप्रिल	निजाम उल्मुल्क. ,, ,,
१७१५ मे ते १७१८ नोव्हें.	सय्यदहुसेन अली ,, ,,
१७१८ डिसें. ते १७२० ऑग.	आलम अली ,, ,,
१७२० ऑग. ते १७२२ जाने.	निजाम उल्मुल्क ,, ,,
१७०९ ते १७१०	उदेपूर, जयपूर, जोधपूर त्रिकुटाचा बादशहाविरुद्ध संघ.
१७११	वजीर मुन्यिमखानाचा मृत्यु; शाहू वाई घेतो.
१७१२ फेब्रु. १७	बहादुरशहाचा मृत्यु, जहांदरशहाचें राज्यारोहण.
१७१३ जाने. १९	जहांदरशहाचा खून, फर्रुखसेअरचें राज्यारोहण.
१७१३ नोव्हेंबर ते १७१४ जुलै.	हुसेन सय्यदाची मारवाडवर स्वारी, अजितसिंहाचा पराभव, इंद्रकुमारी आणली.
१७१३	सवाई जयसिंग माळव्याचा सुभेदार नेमला.
१७१४ फेब्रु.	सवाई जयसिंग उज्जन येथें दाखल.
,, मे २०	शाहूचें सरदारांस पाचारण.
१७१५ एप्रिल १,२	दाभाडे व कान्होजी भोसले माळव्यांत उतरले; देपाळपूरचा विध्वंस, दुसरी टोळी कंपेल येथें.
,, मे १०	माळव्यांत मराठ्यांचा पराजय, जयसिंगास शाबासकी.
,, ऑगस्ट २६	दाउदखान व हुसेन सय्यद यांचें युद्ध बऱ्हाणपुर येथें, दाउदखान पडला.
१७१६ एप्रिल २	रावरंभा व दाभाडे युद्ध, रंभाचा पुत्र पडला. अजितसिंह गुजरातचा सुभेदार.
१७१७ ऑक्टोबर	संताजी भोसले माळव्यांत, रूपरामास कैद, हंडिया परगणा मिळविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५

दक्षिणेंत बादशाहीची दैन्यावस्था

१ बादशाही दरबारांतील पक्ष व राजकारण
२ दक्षिणेंतील सुभेदार, दाउदखान पन्नीचा कारभार
३ निजामाचें घराणें
४ निजाम उल्मुल्कचे दक्षिणेंतील व्यूह
५ सय्यदबंधू, पूर्वपीठिका व कारभार (१७१३–१८)
६ उत्तरेंतील राजपूत राज्यें; बदललेलें राजकारण
७ जयसिंगाचा माळव्यांतील कारभार

औरंगजेबाच्या मृत्यूपासून बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळेपर्यंत सहा वर्षांचा काळ शाहूची स्थिरस्थावर होण्यांत गेला. पुढें मराठी राज्याच्या कारभारास निराळें स्वरूप प्राप्त होऊन पूर्वींचें केवळ बचावाचें धोरण मागें पडून चढावाचें धोरण स्वीकारण्यांत आलें. या विषयास आतां आरंभ करतांना प्रथम मोगल दरबार व त्यांचा दक्षिणचा कारभार यांचें तत्कालीन स्वरूप तपशीलवार समजणें अवश्य आहे. त्यांत अनेक पक्षांचा व व्यक्तींचा संबंध येत असून त्यांतील नानाविध भानगडींचें व्यवस्थित स्पष्टीकरण झाल्याशिवाय ऐतिहासिक व्यवहारांची गुंतागुंत उकलणार नाहीं.¶

१ बादशाही दरबारांतील पक्ष व राजकारण.—मोगल, इराणी व तुराणी असे पक्ष बादशाही दरबारांत असून, त्या पक्षांच्या रचनेवर राज्यकारभाराचें धोरण पुष्कळ अंशीं अवलंबून असे. मुसलमानांनीं हिंदुस्थान देश जिंकल्यावर येथील संपत्तीच्या व सुखसाधनांच्या लालसेनें पश्चिम व वायव्य दिशांकडून बाहेरच्या मुसलमानांचा प्रवाह या देशांत सारखा येत होता. मोगल बादशाहीचा संपादक बाबर येथें आल्यावर ऑक्सस नदीच्या

¶ या प्रकरणास अर्व्हिनच्या ‘ उत्तरकालीन मोगल ’ भाग १ व २ या पुस्तकांचा मुख्य आधार आहे. अर्व्हिननें इंग्रजी मित्या नवीन पद्धतीच्या स्वीकारल्यामुळें, घोटाळा होऊं नये म्हणून त्यांत १० दिवस कमी धरून पुढील मित्या दाखल केल्या आहेत. मनूशीचा ग्रंथ, सियरुल मुताखरीन इत्यादींचाही उपयोग करण्यांत आला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पलीकडील त्याच्या जन्मभूमींतील लोकांस मोगल बादशाहीवर आपला हक्कच आहे असें वाटून, तेव्हांपासून तिकडच्या बाजूचे लोक इकडे विशेष येऊं लागले. राज्याच्या लष्करी बंदोबस्ताची मुख्य भिस्त बादशहा या बाहेरच्या स्वजातीयांवरच ठेवीत असत. औरंगजेब बादशहा दक्षिणेंत येऊन लढूं लागल्यावर त्यानें मुद्दाम बाहेरचे लोक एकसारखे लष्करांत आणविण्याचा क्रम सुरू केला. ऑक्सस नदीच्या उत्तरेकडील प्रांतास तुराण हें नांव असून तिकडच्यांस तुराणी व दक्षिणेकडील प्रदेशास इराण हें नांव असून त्या बाजूच्यांस इराणी म्हणण्याचा प्रघात होता. तुराणी हे बहुधा सुनी पंथाचे असून, इराणांत शिया पंथाचें प्राबल्य असल्यामुळें, इराणी लोक शिया असत. मोगल बादशाहींत तुराणी लोकांचाच भरणा विशेष असे. तथापि कांहीं इराणी घराणींही येथें येऊन स्थिर झालीं. इराणांत शिराज हें नामांकित शहर असून, कवि, हकीम व विद्वान् लोक बहुधा शिराजहून हिंदुस्थानांत येत. शिया व सुनी या धर्मभेदांमुळें इराणी व तुराणी या दोन पक्षांमध्यें दरबारांत मोठा विरोध असे; मात्र हिंदु लोकांशीं प्रसंग पडला कीं ते दोघे एक होत. निजाम उल्मुल्कचें घराणें तुराणी होय.

सिंधु नदीच्या पश्चिमेकडील अफगाण प्रदेशांतून जे लोक येत त्यांस अफगाण म्हणत. त्यांसच पठाण अशीही संज्ञा होती. हिंदुस्थानास जवळ असल्यामुळें यांचाच भरणा बादशाही फौजेंत विशेष असे. उत्तर हिंदुस्थानांत मोठमोठीं गांवें या पठाणांनीं वसविलेलीं आहेत. बरेली गांव अलीमहंमदखानानें व फर्रुखाबाद महंमदखान बंगसानें वसविलें. अफगाण लोक शूर असत, पण राज्यकारभारांत त्यांचा फारसा प्रवेश नव्हता. त्यांस बुद्धि व विद्वत्ता बेताचीच असून, पैशाचा लोभ अनिवार असल्यामुळें, ते वाटेल तेव्हां एक धनी सोडून दुसऱ्याकडे जात. शहाजहानच्या वेळेस अफगाणांचें प्रस्थ अगदींच मोडलें, तरी औरंगजेबाच्या दक्षिणेंतील युद्धांत पुनः त्यांचा भरणा जोरानें वाढला. रोहिले, अब्दाली, घोरी इत्यादि लोक पठाण या संज्ञेनें ओळखले जात.

यांशिवाय आरब, हबशी, रूमी, फिरंगी वगैरे कित्येक परकी लोक बादशाहींत होते. युरोपीय लोकांस सामान्यतः फिरंगी म्हणत; आणि कान्स्तांतिनोपलकडील तुर्क लोकांस रूमी अशी संज्ञा होती. शिवाय हिंदुस्थानांत कायमचे येऊन राहिलेल्या लोकांची जी संतति उत्पन्न होई त्यांस हिंदुस्थानी असें नांव होतें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानी म्हणविले जात. राजपूत,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाट वगैरे लोकांचाही हिंदुस्थानी म्हणूनच उल्लेख केला जात असे. खालच्या कारकुनी पेशाच्या नोकऱ्या बहुधा हिंदूंस मिळत. खत्री, बनिया, कायस्थ वगैरे अनेक हिंदु जाती नोकरींत असत. काश्मीरचे मुसलमानही नोकरींत प्रमुख होते. हिंदुस्थानी लोकांत पुनः दोन भाग असत, पश्चिमेकडचा तो पंजाबी, व बंगाल, बहार वगैरे पूर्वेकडचा तो पूर्बिया. असे अनेक पक्ष व प्रकार बादशाहींत असून फर्रुखसेयरच्या वेळेस तर ज्याच्यावर बादशहाची मर्जी त्याचें प्रस्थ वाढून, बाकीचे वर सांगितलेले भेद तात्पुरते नष्ट होत.

राजा सभाचंद खत्री म्हणून एक हुशार हिंदु गृहस्थ झुल्फिकारखानापाशीं नोकरींत असून हा खान वजीर झाल्यावर सभाचंदाच्या तंत्रानें चाले. पुढें सय्यदांच्या मदतीनें फर्रुख्सेयर गादीवर आला, तेव्हां झुल्फिकारखान, त्याचा बाप आसदखान व सभाचंद या सर्वांचा शिरच्छेद करण्यांत आला.

बादशाहींतील या घडामोडींकडे शाहूचें लक्ष नेहमींच असे, आणि बादशाही पाठिंब्यामुळेंच त्याचा मराठी राज्यांत निभाव लागला. मराठशाहींतील दुफळी कशी मोडावी हा त्याजपुढें मुख्य प्रश्न असून, ही दुफळी मोडण्यासाठीं त्यास दिल्लीच्या कारस्थानांत पडावें लागलें. औरंगजेबाचा पुत्र बहादुरशहा ता. १७ फेब्रुवारी, स. १७१२ रोजीं लाहोर येथें मरण पावला. पुढें बहादुरशहाच्या मुलांत लढाया होऊन वडील मुलगा जहांदरशहा झुल्फिकारखानाचे साह्यानें गादीवर बसला. एक वर्षाच्या आंत फर्रुख्सेयरनें सय्यद बंधूंच्या मदतीनें जहांदरशहास ठार मारून ता. ११ जानेवारी, १७१३ रोजीं बादशाही तख्त मिळविलें. फर्रुख्सेयरची ही कारकीर्द ता. १८ फेब्रुवारी, स. १७१९ पावेतों टिकली. याच कारकीर्दींतील कारस्थानें व घडामोडी मराठ्यांच्या संबंधानें महत्त्वाच्या आहेत.

२ दक्षिणेंतील सुभेदार, दाऊदखान पन्नीचा कारभार.— दक्षिणेंत बादशाही मुलुखाचे बऱ्हाणपुर (खानदेश), वऱ्हाड, हैदराबाद, बेदर, विजापुर व कर्नाटक असे सहा सुभे असून, त्या सर्वांवर मुख्य सुभेदार बहुधा औरंगाबाद येथें राहत असे. शिवाय दिवाण नांवाचा एक मुलकी व हिशेबी कामदार सुभेदाराच्या मदतीस असे. शाहूच्या आगमनापासून येथें खालील मुख्य सुभेदार झाले—

१ दाऊदखान पन्नी,–स. १७०८–१७१३ जानेवारी;

२ निजाम उल्मुल्क,–फेब्रुवारी १७१३ पासून एप्रिल १७१५;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ सय्यद हुसेनअली,–मे १७१५ पासून नोव्हेंबर १७१८;

४ आलमअली,–डिसेंबर १७१८ ते ऑगस्ट १७२०;

५ निजाम उल्मुल्क–(पुनः) ऑगस्ट १७२० ते जानेवारी १७२२.

हे काल नेमणुकांचे आहेत. प्रत्यक्ष कारभार सुरू होण्यास थोडा अवधि लागे.

दाऊदखान पन्नीचा कारभार (स. १७०८–१७१२).—औरंगजेब बादशहाच्या वेळेपासून दक्षिणच्या सहा सुभ्यांस विशेष महत्त्व आलें. पुढें पुढें तर दिल्लींतील कारभाऱ्यांचें आपसांत पटेनासें झालें, म्हणजे दक्षिणेंत येऊन स्वतंत्र कारभार करण्याची हाव त्यांस उत्पन्न होत असे. झुल्फिकारखानास दक्षिणची सुभेदारी पाहिजे होती; परंतु बहादुरशहानें त्यास आपल्याबरोबर दिल्लीस नेल्यामुळें, दक्षिणच्या सुभेदारीवर दाऊदखान पन्नी यास झुल्फिकारखानाचा दुय्यम म्हणून बादशहानें नेमिलें. ही व्यवस्था फर्रुखसेयर गादीवर येईपर्यंत म्हणजे स. १७१३ जानेवारीपर्यंत चालली. पूर्वी शाहूशीं केलेले चौथाई सरदेशमुखीचे ठराव अमलांत आणावे असें झुल्फिकारखानानें दाऊदखानास कळविलें, तें त्यानें मान्य केलें. दाऊदखान हिंदूंचा बराच पक्षपाती होता; आणि मराठे सरदारांची त्यास चांगली ओळख होती. औरंगजेबाच्या मरणसमयीं मराठ्यांनीं शिवाजीच्या वेळचें स्वराज्य म्हणून जेवढें होतें तेवढें बहुतेक सोडवून कबजांत घेतलें असलें तरी मोगल अंमलदार निरनिराळे प्रदेश सांभाळून होते. मोगलांच्या सहा सुभ्यांवर चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्कही शाहूस देण्यांत येणार होता; आणि त्याचे बदल्यांत त्यानें फौज घेऊन बादशहास मदत करावी अशीं मोघम बोलणीं झालीं होतीं. पुढें ताराबाईच्या विरोधामुळें वरील हक्कांच्या लेखी सनदा शाहूस मिळाल्या नाहींत; आणि ताराबाईशीं लढून आपला हक्क स्थापन करावा असा मुन्यिमखान वजिरामार्फत शाहूस जबाब मिळाला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हा वजीर मुन्यिमखान स. १७११ त मरण पावला, आणि मराठे सरदारांचा उपद्रव मोगलांचे मुलखास होऊं लागला. प्रथमच मार्च १७११ त वाईचें ठाणें शाहूनें हस्तगत केलें.§ पुढें सहा सुभ्यांवर चौथाई वसूल आपण होऊन तुम्हांस देतों असा करार दाऊदखानानें लिहून दिला. मात्र ही चौथाई मराठ्यांनीं परभारें वसूल करूं नये, दाऊदखानानें वसूल करून द्यावी, असा ठराव होता.

§ खं. ३. ४७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झुल्फिकारखानाचा वध झाल्याबरोबर दक्षिणची व्यवस्था बदलली. चीनकिलीचखानाचें साह्य बादशहास झालें, म्हणून त्यास निजाम उल्मुल्क किताब देऊन दक्षिणच्या सुभेदारीवर नेमिलें आणि दाऊदखानाची बदली गुजरातवर केली. दाऊदखानानें निघून जाण्यास पुष्कळ आढेवेढे घेतले. जो एक प्रकारचा मेळ त्यानें शाहूशीं बसविला होता, तो इतउत्तर बिघडला, आणि पुढें निजामाचें व मराठ्यांचें दक्षिणेंत वैमनस्य येऊन पुढील इतिहास बनला. यास्तव या निजामाची पूर्वपीठिका समजून घेणें अवश्य आहे.

३ निजामाचें घराणें.—निजाम उल्मुल्कचा बाप, आजा व पणजा हे मोठे पराक्रमी पुरुष होते. एकसारखे पुष्कळ पिढ्यांपर्यंत पराक्रमी पुरुष निपजल्याचीं जीं थोडीं घराणीं इतिहासांत आढळतात, त्यांपैकीं हें एक प्रमुख आहे. औरंगजेब दक्षिणेंत असतां त्याच्या तालमींत जीं माणसें तयार झालीं त्यांत हें घराणें अग्रगण्य आहे. बुद्धिमत्ता, शौर्य, राज्यचातुर्य, दीर्घायुष्य इत्यादि गुण आनुवंशिक प्रघातानें ह्या निजामाचे वंशांत दिसून येतात. निजामाचा आजा ख्वाजा आबीद हा बुखाऱ्याहून मक्केस जाण्याकरितां हिंदुस्थानांत आला. मक्केस जाण्याची सोय मोगल बादशहांनीं सुरतेहून ठेविली होती, त्यामुळें पुष्कळसे बाहेरचे मुसलमान हिंदुस्थानांत येत. मनाजोगता रोजगार मिळाला तर ते येथेंच वास्तव्य करून राहत. ख्वाजा आबीद मक्केहून परत आला तेव्हां राजपुत्र औरंगजेब बापाचें राज्य घेण्याकरितां दक्षिणेंतून दिल्लीकडे चालून जात होता. त्या वेळीं औरंगजेबानें आबीद यास आपल्या नोकरींत घेतलें. पुढें औरंगजेबास राज्य मिळाल्यावर आबीद यानें अजमीर, मुलतान वगैरे ठिकाणीं मोठ्या दर्जाचीं कामें केलीं. ख्वाजा आबीद यास कलीचखान असा किताब बादशहानें दिला. तो तारीख ३० जानेवारी, स. १६८७ रोजीं गोवळकोंड्याचे वेढ्यांत गोळी लागून मरण पावला. त्यास पांच मुलगे होते, त्यांपैकीं तीन पराक्रमी निघाले. सर्वांत वडील मीरशहाबुद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन फिरूजजंग हा विशेष प्रसिद्ध होय.

मीरशहाबुद्दीनचा जन्म समरकंद येथें स. १६४९ त झाला. उदेपुरच्या राण्याशीं युद्ध चालू असतां, औरंगजेबाची एक नाजूक कामगिरी स्वतःचा जीव धोक्यांत घालून त्यानें बजावल्यामुळें बादशहानें त्यास मोठ्या पदवीस चढविलें, आणि ता. २ जानेवारी, स. १६८४ रोजीं गाजीउद्दीन हा किताब दिला. पुढें हैदराबादचा किल्ला त्यानें काबीज केला. औरंगजेबानें आपला वडील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलगा शहाआलम व त्याचा मुलगा यांस कैद केलें, तें कामही बादशहानें या गाजीउद्दीनकडून करविलें. स. १७०३-४ सालीं मराठ्यांनीं माळव्यांत मोठी स्वारी केली तेव्हां गाजीउद्दीननें त्यांचा पाठलाग केला हें मागें सांगितलें आहे.† स. १७०७ त बादशहाचे मरणसमयीं तो वऱ्हाडच्या सुभ्यावर होता. बहादुरशहाची मर्जी या तुराणी मंडळीवर चांगलीशी नसल्यामुळें, त्यानें गाजीउद्दीन यास दक्षिणेंतून काढून गुजरातच्या सुभ्यावर पाठविलें, तेथें तो ता. ८ डिसेंबर, स. १७१० रोजीं मरण पावला, त्या वेळीं त्याचें वय साठ वर्षांचें होतें. त्याजवळ लाखों रुपयांची संपत्ति होती ती त्याच्या मृत्यूनंतर धर्मशास्त्रानुसार जप्त करण्यांत आली. त्या वेळच्या तुराणी सरदारांत गाजीउद्दीनची गणना प्रामुख्यानें आहे. तो सुस्वभावी, रुबाबदार व शूर असून राज्यकारभारांत त्याची बुद्धि दांडगी होती. शहाजहानचा प्रसिद्ध वजीर सादुल्लाखान याची मुलगी गाजीउद्दीन यास दिलेली असून तिच्याच पोटीं चीन-किलीचखान ऊर्फ निजाम उल्मुल्क याचा जन्म ता. ११ ऑगस्ट, स. १६७१ त झाला.§

गाजीउद्दीनचा मुलगा तेरा वर्षांचा असतां त्यास १०० घोडेस्वारांच्या तुकडीचें काम औरंगजेबानें दिलें. स. १६९० त त्यास चीन-किलीच-खान हा किताब मिळाला सातारा किल्ला जिंकतांना त्यानें बहादुरी केल्यावरून बादशहानें त्यास बढती देऊन विजापूरच्या सुभेगिरीवर त्याची नेमणूक केली. त्याच कामावर तो बादशहाचे मरणसमयीं होता. झुल्फिकारखानाचा व या कुटुंबाचा खासगी द्वेष असून चीन-किलीचखान व त्याचा चुलता अमीनखान यांची बहादुरशहानें मुरादाबाद व अयोध्या या सुभ्यांवर

निजाम उल्मुल्कची वंशावळ

आलमशेख, समर्कंदचा

ख्वाजा आबीद	**मीर बहुद्दीन**
मीर शहाबुद्दीन, (गाजीउद्दीन फिरूजगंज)	**महंमद अमीनखान** (वजीर)
चीन किलीचखान, निजाम उल्मुल्क	**कमरुद्दीनखान, वजीर** (१७३९-४८)

† पृ. २४. § ता. २१ मे, १७४८ त मरणसमयीं त्याचें वय ७७ वर्षांचें होतें. १०४ वर्षांचें त्याचें वय असल्याचा प्रवाद ग्रँट डफनें प्रचलित केला तो खोटा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बदली केली. वजीर मुन्यिमखानानें पुढें त्यास जास्त महत्त्वाचें काम दिलें. कांहीं दिवस नोकरी सोडून तो घरीं बसला. बापाच्या मृत्यूनंतर तो पुनः दिल्ली दरबारीं गेला, तेथें त्यास गाजीउद्दीन व फिरूजजंग हे किताब मिळाले. जहांदर बादशहाच्या व झुल्फिकारखानाच्या मृत्यूनंतर सय्यदांनीं त्यास दक्षिणच्या सहा सुभ्यांचा अधिकार व खानखानान, निजाम उल्मुल्क बहादुर, हे किताब दिले. त्या वेळीं बादशहानें सहा सुभ्यांवर खालील अंमलदार नेमून त्या सर्वांवर औरंगाबाद येथें निजामाची नेमणूक केली.

बऱ्हाणपूर–शुकुल्लाखान; बऱ्हाड–ऐवजखान; विजापुर–मनसूरखान;
कर्नाटक–सादुल्लाखान; बेदर–अमीनखान; हैदराबाद–यूसुफखान.

बऱ्हाणपुरास दाऊदखान पन्नी होता त्याची बदली गुजरातच्या सुभ्यावर होऊन निजामाच्या मदतीस मुलकी कामावर 'दिवाण' म्हणून हैदरकुलीखान याची नेमणूक झाली. स. १७१३ च्या जुलैंत दाऊदखान औरंगाबादेहून निघून गेला आणि पुढील ऑक्टोबरांत निजाम तेथें पोचला. येतांना माळव्यांत मराठे गेले होते त्यांस त्यानें परत फिरविलें.

४ निजामाचे दक्षिणेंतील व्यूह.—फार दिवस दक्षिणेंत राहिल्यामुळें इकडची भाषा, रिवाज, पूर्व इतिहास व प्रस्तुतचीं कारस्थानें निजामास चांगलीं माहीत होतीं. औरंगजेबाच्या राजनीतीचें त्यास बाळकडूच होतें; आणि दिल्लींतील धामधुमीचा फायदा घेऊन दक्षिणेंत स्वतंत्र पंथ काढण्याचा विचार त्यानें ठरविला. परंतु दुर्दैवानें या प्रसंगीं दक्षिणचा कारभार त्याजकडे दोन वर्षांपेक्षां जास्त राहिला नाहीं. मराठ्यांस चौथाईचा वसूल द्यावयाचा नाहीं असा प्रथमपासून निश्चय करून त्याप्रमाणें त्यानें आपला उद्योग चालू केला.

या उद्योगांचें स्वरूप असें कीं निजामानें कोल्हापुरकर संभाजीस हाताशीं धरिलें; आणि इकडे बाह्यतः शाहूशीं सलोखा करून त्यास आपणाकडे वळविण्याचेही प्रयत्न त्यानें करून पाहिले. शाहूच्या मनांत बादशाहीसंबंधानें पूज्यभाव असून त्यांचा ताबेदार म्हणवून घेण्यांत त्यास वाईट न वाटतां उलट एक प्रकारचें भूषण वाटे. चंद्रसेन जाधव शाहूवर रुसून निघून गेला, त्यास निजामानें आश्रय दिला; आणि फौजेच्या खर्चाकरितां बेदरच्या पूर्वेस भालकी व बहामनाबाद येथें भली मोठी जागीर त्यास नेमून दिली. दक्षिणच्या व्यवहारांत निजाम सर्वथा चंद्रसेनाच्याच तंत्रानें वागूं लागला. चंद्रसेनाबरोबरच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्जेराव घाटगे हा एक नामांकित सरदार शाहूस सोडून गेला, त्याचाही निजामानें परामर्श घेऊन, संभाजीकडून त्यास कागल येथें जागीर देवविली, ती अद्यापि त्या घराण्याकडे चालते.

औरंगजेबाच्या मृत्युसमयीं पुणें प्रांत मोगलांच्या ताब्यांत होता. या प्रांताचें मुख्य ठाणें बारामतीस असून त्याजवर मोगलांचे तर्फे हणमंतराव निंबाळकर स. १६८३ पासून १६९३ पावेतों ठाणेदार होता. त्यानंतर दहा वर्षे यासीनखान व पुढें रंभाजी निंबाळकर पुण्याचे ठाणेदार झाले. रंभाजीस दाऊदखानानें पुण्यास जागीर दिली ती स. १७०९ पासून १७१६ पर्यंत चालली. हणमंतराव निंबाळकराचा पुत्र हैबतराव शाहूस मिळाला, त्याचप्रमाणें रंभाजीसही आपल्याकडे वळविण्याची शाहूनें शिकस्त केली. पण शेवटीं चंद्रसेनाचा पगडा त्याजवर जास्त बसला, आणि दोघांसही निजामानें आपल्या बाजूस ओढिलें, तेव्हां शाहूनें खंडेराव दाभाडे यास त्यांजवर रवाना केलें. ता. २ एप्रिल, स. १७१६ रोजीं रंभाजी व खंडेराव यांची लढाई होऊन, रंभाजीचा पुत्र मारला गेला,† तेव्हांपासून पुण्यावरचा मोगलांचा शह हलका होऊं लागला. वरील हैबतरावाचा पुत्र सुलतानजी निंबाळकर हाही निजामाकडे गेला.§

हाच रंभाजी पुढें रावरंभा निंबाळकर म्हणून निजामशाहींत प्रसिद्धीस आला. रंभाजीनें आपला हस्तक बाजी कदम यास मुद्दाम पुण्यास ठेवून दिलें. 'स. १६२९ च्या वैशाखमासीं [मे १७०७] बाजी कदम फौजदार व गुंडाबा नाईक सेखदार हे सरदार रंभाजी निंबाळकर याजकडून आले. त्यांनीं पुण्यांत अंमल बसवून ठाणें घेतलें. आठ वर्षे अंमल पुण्यांत होता.' निजाम जरी स. १७०७त सुभेदार नव्हता, तरी इकडेच तो सुभेदाराच्या हाताखालीं होता. रंभाजी हा शिवछत्रपतीचा जांवई महादाजी याचा नातू $ असून मोगलांस जाऊन मिळाला होता. स. १७१३ पासून दोन वर्षेपावेतों निजाम, चंद्रसेन, रंभाजी निंबाळकर व संभाजी वगैरेंनीं शाहूचा उच्छेद करण्याची पुनः शिकस्त केली. पुण्यांतील मोगलांचा अंमल उठवून देणें हें बाळाजीचें उद्दिष्ट; आणि तें साधूं न देणें हा या मंडळीचा उद्योग. 'शहाजी निंबाळकर वगैरेंनीं एकत्र होऊन जमाव केला आहे. वाई देशीं येऊन धामधूम करणार. तरी

† अखबार. § रंभाजी स. १७३५ च्या सुमारास मरण पावला, त्याचा पुत्र जानोजी. (पे. द. १०.९३.) $ इ. सं. वर्ष ८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुम्ही जमावानिशीं येणें,' अशी आज्ञा शाहूनें ५.११.१७१४ रोजीं केली.¶ लष्करच्या सरदारांस जमावानिशीं हुजूर बोलाविलें, (२०.५.१७१४).‡ आंगरे व थोरात यांचीं प्रकरणें याच कारस्थानामुळें उद्भवलेलीं असून आंगऱ्यांकडून लोहगड किल्ला घेऊन पश्चिम बाजूनें पुण्याचा बंदोबस्त मुद्दाम व त्वरेनें बाळाजीनें केला. लोहगडची सबनिशी भानु रामाजी महादेवास व मावळची मुज्मी हीर महादेवास देऊन आपल्या भरंवशाचे हे दोन इसम बाळाजीनें पुण्याच्या पश्चिम भागीं ठेवून दिले, आणि पुढें पूर्वेच्या बचावासाठीं सचिवाकडून पुरंदर किल्ला घेतला. स. १७१५ चे आरंभीं खंडेराव दाभाडे, रायाजी प्रभु, राजजी थोरात यांनीं गंगथडीचे बाजूस मोगलांवर मोठी धामधूम उठविली.§

बाळाजी या मोहिमेवर असतां शाहूनें खालील पत्र त्यास लिहिलेलें आढळतें. "रा. रा. बाळाजी पंडित प्रधान यांस आज्ञा केली ऐसीजे. अलीकडे तुमचें विनंतिपत्र येत नाहीं. सांप्रत तुम्ही कोठें आहां, काय मनसुबा करितां तें कळलें नाहीं. या प्रांतीं करवीरकरांनीं निजाम उल्मुल्क याचें सहाय करून घेऊन दंगा करण्याचा विचार केला हें वर्तमान विस्तारें तुम्हांस कळावें याजकरितां पत्रें लिहिलीं. सादर झालींच असतील. नबाबाचा अदूरपणाचा प्रकार व करवीरकरांची कोते अंदेशी हे दोन अर्थ एकत्र झाले आहेत. याचा परिणाम कळलाच आहे. तथापि तुम्हीं दूर देशीं असतां मनसुबा प्राप्त झाला याची तोड तुम्हांस कळेल त्या रीतीनें करालच. तुम्हांसारिखे अतुल पराक्रमी सेवक असतां, स्वामींनीं या मनसुब्याचा हृद्रोग वागवावा असा प्रकार नाहीं. देशीं फौजा आहेत, त्या जमा करविल्या आहेत, तुम्हीं तिकडील चार कामें सामान्य असतील तीं ठेवून सत्वर........"† शाहूनें सातारा प्रांतीं राहून फौजा जमविण्याच्या आज्ञा स. १७१४ त काढिलेल्या वर दिल्या असून बाळाजी पुण्याचे उत्तरभागीं असावा, आणि वरील पत्र या वेळचें म्हणजे स. १७१४ तलें असावें असें अनुमान होतें.*

¶ शा. रो. २०७. ‡ शा. रो. १. § रा. खं. ८–७५.

† हें पत्र रा. यशवंत राजाराम गुप्ते यांजकडून असेंच अपूर्ण मिळालें.

* शा. रो. १ व २०७, पे. द. ३०. ३०७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाहूच्या सुदैवानें स. १७१५ च्या एप्रिलांत दक्षिणेंतून निजामाची बदली होऊन तो रागारागानें ताबडतोब निघून उत्तरेंत गेला. औरंगाबाद येथें निजाम मोठ्या थाटानें राहत असे. स. १७१४ त त्यानें आपले दोन पुत्र गाजीउद्दीन व नासीरजंग यांचा मुंता–समारंभ मोठ्या थाटानें केला. त्या समयीं सर्व सुभ्यांचे मोठमोठे अंमलदार मोलवान नजराणे घेऊन औरंगाबादेस आले. मुबारीझ-खानानें भरपूर नजराणे पाठविले, पण स्वतः न आल्याबद्दल क्षमा मागितली. पश्चात् सय्यद हुसेनची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक होऊन तो ४ एप्रिल रोजीं दिल्लीहून निघाला आणि नोव्हेंबरांत बऱ्हाणपुरास व स. १७१६ चे आरंभीं औरंगाबादेस दाखल झाला, तेव्हां त्यानें राजजी थोरात व त्याचे बंधु यांची भेट घेऊन त्यांस पोषाख वगैरे दिले. याच वेळीं सय्यद हुसेन याजविरुद्ध दाऊदखान पन्नीस व इतर अंमलदारांस बादशहानें उठविल्यामुळें स्वसंरक्षणासाठीं सय्यदास शाहूशीं शत्रुभाव ठेवण्याची सोय राहिली नाहीं. समान संकटामुळें बाळाजी व सय्यद यांचा सलोखा अनायासें जडला. या खटपटीच्या मुळाशीं शंकराजी मल्हार असून निजामाशीं हुसेन सय्यदचें वांकडें होतें. सबब निजामानें जें कांहीं धोरण गेल्या दोन तीन वर्षांत चालविलें त्याच्याविरुद्ध हुसेन सय्यदाचा कटाक्ष होता, तो बाळाजीच्या पथ्यावर पडला.

हुसेन सय्यदाचें लक्ष कोल्हापुरच्या संभाजीपेक्षां शाहूचे ठिकाणीं जास्त लागल्यामुळें, इतउत्तर पुनः निजाम दक्षिणेंत येईपावेतों, संभाजीस शाहूविरुद्ध हालचाल करण्याची सोय राहिली नाहीं. या बदललेल्या परिस्थितीचा परिणाम लगेच दिसून आला. नोव्हेंबर स. १७१५ त 'बाळाजी विश्वनाथा-कडील व्यंकोजी ढमढेरे यानें फौजेनिशीं येऊन रंभाजी निंबाळकराचे ठाणेदार पुण्यांत होते ते उठवून दिले. पंतप्रधानाचें ठाणें बसलें,¶ मोगलांचा अंमलदार बाजी कदम यानें पेशव्याचा पक्ष धरला.† तरी पुण्यांत कांहीं दिवस दुतर्फा अंमल राहिला. स. १७१७ त रंभाजी निंबाळकराचा अंमल पुण्यांत होता.‡ शाहूचा व सय्यदांचा तह नक्की झाल्यावर मग पुणें प्रांत सर्वस्वी स्वराज्यांत आला (स. १७१८).§ म्हणजे दहा वर्षांच्या खटाटोपानें सातारा व पुणें या दरम्यानच्या अल्प प्रदेशाबाहेर शाहूचा प्रत्यक्ष अंमल नव्हता हें उघड आहे. बाळाजीचीं सर्व कारस्थानें व व्यूह त्याचे दोघे मुलगे जवळ राहून पाहत होते, तोच अनुभव पुढें त्यांस मार्गदर्शी झाला. सय्यदांचें सख्य

¶ ध. या. † रा. खं. २ पृ. २६. ‡ वतनप. व. नि. पृ. ५. § रा. खं. २२, गिजरे १०२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाहूलाही हवें होतें. आपली मातुश्री वगैरे सोडवून आणावयाची असल्यामुळें मोगल सुभेदाराशीं अगर बादशाही दरबाराशीं तुटून वागणें त्यास शक्य नव्हतें. म्हणून निजाम परत जातांच दक्षिणेंत शाहूच्या राजकारणास निराळें वळण ओघानेंच लागलें. यासाठीं या सय्यदांची पूर्वपीठिका व त्यांचीं कारस्थानें इतिहासांत महत्त्वाचीं असल्यामुळें तीं समजून घेणें अवश्य आहे. पर्यायानें त्यांचा व राजपुतांच्या धोरणाचा व कृत्यांचा मराठी राजकारणावर परिणाम कसा घडला तेंही कळून येईल.

५ सय्यदबंधु, पूर्वपीठिका व कारभार (स. १७१३-१८).—यांचें मूळ ठिकाण मेसापोटेमियांत वासित हें होय. तेथून एक पुरुष हिंदुस्थानांत येऊन सरहिंदच्या नजीक राहिला. पुढें त्याचीं चार कुटुंबें झालीं, पैकीं एक कुटुंब गंगायमुनांचे दुआबांत मीरत व सहारणपुर यांचे दरम्यान वस्ती करून राहिलें. कोणी म्हणतात 'बारा' नांवाचे गांवावरून या कुटुंबास बारा सय्यद म्हणूं लागले. कोणी सांगतात त्यांचे आरंभीं बारा गांव होते, त्यावरून त्यांचें टोपणनांव 'बारा' असें पडलें. अकबराचे फौजेंत कित्येक बारा सय्यद लष्करी नोकरीवर होते. दिल्लींत सय्यद बंधु कारभारी झाले, म्हणूनच बाळाजी विश्वनाथाचा प्रवेश तिकडील कारस्थानांत झाला.

औरंगजेबाचे पदरीं सय्यद अब्दुल्लाखान ऊर्फ सैयदमिया नांवाचा एक हुशार सरदार असून तो कांहीं दिवस विजापुर व पुढें अजमीर या प्रांतांचा सुभेदार होता. या अब्दुल्लाखानास पुष्कळ मुलगे होते, पैकीं हसनअली व हुसेन अली हे दोन पुढें विशेष प्रसिद्धीस आले, तेच इतिहासांत सय्यद बंधु या नांवानें ओळखले जातात. स. १७१२ त पहिल्याचें वय सुमारें ४६ व दुसऱ्याचें ४० होतें. पहिला अब्दुल्लाखान कुत्‌ब्-उल्मुल्क या नांवानें प्रसिद्ध आहे. तो १६९७-९८ त खानदेश, बागलाण, औरंगाबाद इत्यादि ठिकाणीं फौजदार होता. धाकटा भाऊ हुसेन अली हा शूर, धूर्त व निश्चयी असून तो अजमीर, आग्रा, इत्यादि ठिकाणीं निरनिराळ्या कामांवर होता. बहादुरशहाचे वेळेस वजिराचें व त्याचें बनलें नाहीं म्हणून ते बंधु फारसे पुढें आले नाहींत. तथापि शहाजादा अजीमुश्शानची त्यांजवर मेहेरबानी असल्यामुळें हुसेन अलीस स. १७०८ त बिहार प्रांताची, व अब्दुल्ला यास स. १७११ त अलाहबादची सुभेदारी मिळाली. या ठिकाणीं असतांच त्यांनीं फर्रुखसेयरचा पक्ष उचलिला आणि जहांदरशहाचा पाडाव करून फर्रुखसेयर यास तख्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळवून दिलें. पुढें जहांदरशहाशीं लढून फर्रुखसेयर बादशहा झाला त्या कामीं या दोघांनीं चांगला पराक्रम केला, यास्तव अब्दुल्लाखानास बादशहानें कुत्‌ब्-उल्मुल्क असा किताब व वजिरी देऊन, हुसेनअलीस अमिरुल-उमराव असा किताब व मीरबक्षी म्हणजे सेनापति केलें. अब्दुल्ला बहुतेक राजधानींतच असे. दिल्लीच्या या राज्यक्रांतीची हकीकत चित्तवेधक असून त्या घडामोडींतून या सय्यदांचा उत्कर्ष झाला.

फर्रुखसेयर हलक्या कानांचा असून एक निश्चय करून त्याप्रमाणें कधीं वागला नाहीं. सय्यदबंधूंशीं त्याचें पटलें नाहीं. त्यांजविरुद्ध त्याजकडे लोकांनीं गाऱ्हाणीं केलीं, त्यावरून तो त्यांस एकसारखा दुखवीत गेला. आपल्या बलाबलाचा विचार त्यानें केला नाहीं. उलट पक्षीं सय्यद बंधु मोठ्या सावधगिरीनें व एकमेकांच्या विचारानें वागत होते. फर्रुखसेयरनें जानेवारी १७१३ त दिल्लींत प्रवेश केल्याबरोबर नवीन नेमणुका करण्यासंबंधानें प्रथमच तंटा उत्पन्न झाला. झालेल्या राज्यक्रांतींत सय्यदांस पुष्कळशी संपत्ति मिळाली, त्याबद्दल बादशहास वैषम्य वाटूं लागलें. बादशहा शिकारीचें निमित्त करून वारंवार बाहेर जाई आणि तिकडे सय्यदांच्या नाशाचा कांहीं तरी गुप्त बेत करी, असा हा प्रकार सारखा सहा सात वर्षे चालला.

फरुख्सेयर गादीवर आला, तेव्हां राजपूत राजे विशेष बळावले होते. मारवाडच्या अजितसिंहानें स्वातंत्र्य धारण करून अजमीरचा बादशाही सुभा सुद्धां हस्तगत केला. तेव्हां त्याचा पाडाव करण्यासाठीं बादशहानें हुसेन सय्यदास त्याजवर रवाना केलें, आणि आंतून अजितसिंगास पत्र लिहिलें कीं, ‘तुम्हीं हुसेन सय्यदास मारून टाकावें, म्हणजे त्याची संपत्ति आम्ही तुम्हांस देऊं.’ ही स्वारी नोव्हेंबर १७१३ पासून जुलै १७१४ पावेतों झाली. हुसेन अली अजमिरावरून मेडत्यास गेला. अजितसिंग मागें हटत चालला. सय्यदाच्या तोफखान्यापुढें लढून निभाव लागत नाहीं असें पाहून, अजितसिंगानें शरण जाऊन तह केला, आणि आपली मुलगी इंद्रकुमारी बादशहास दिली.

इकडे बादशहानें अजितसिंगास लिहिलेलीं पत्रें सय्यदांचे हातीं लागून त्यांचें व बादशहाचें खूबच वांकडें आलें; आणि बादशहा आपला नाश करण्यास टपला आहे अशी त्यांची खात्री झाली. मीरजुम्ला, खान डौरान, महंमद अमीनखान वगैरे दरबारी सय्यदांचे विरुद्ध होते, ते बादशहाशीं सय्यदांचे विरुद्ध नानाप्रकारचे गुप्त बेत करूं लागले, त्यामुळें सय्यद दरबारास सुद्धां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाईनातसे झाले. पुढें पुष्कळांच्या मध्यस्थीनें उभय पक्षीं आणा शपथा होऊन सय्यदांची व बादशहाची तात्पुरती गोडी झाली. नंतर हुसेन सय्यदास बाहेर काढण्याकरितां बादशहानें त्यास निजामाचे जागीं दक्षिणच्या सुभ्यावर नेमिलें. त्यामुळें निजाम उल्मुल्कला संताप आला आणि लगेच तो दक्षिणचा कारभार सोडून ता. १३ जून, १७१५ रोजीं दिल्लीस दाखल झाला. रस्त्यांत हुसेन अली व निजाम एकमेकांच्या जवळून गेले, पण त्यांनीं गांठ सुद्धां घेतली नाहीं. यांत त्यांनीं बादशाही रिवाजही मोडिला. तथापि निजाम मोठा धूर्त असल्या-मुळें एकदम सय्यदांच्या विरुद्ध चाललेल्या कारस्थानांत उघड सामील झाला नाहीं. एप्रिल १७१७ त निजामाची नेमणूक मुरादाबादेस झाली. मुरादाबादचा सुभा हलका गणला जात असे, म्हणून तो निजामास आवडला नाहीं.

सय्यद हुसेनचा तीन वर्षांचा दक्षिणेंतील कारभार मराठ्यांच्या इतिहासांत महत्त्वाचा आहे. शंकराजी मल्हार व बाळाजी विश्वनाथ या दोन पुरुषांनीं सय्यदांशीं नवीन राजकारणाचा उपक्रम करून चढाऊ धोरण स्वीकारलें. हळू हळू सय्यदांच्या पाडावाचे अनेक प्रयत्न बादशहानें चालविले. त्यानें स. १७१६ च्या मार्चांत सवाई जयसिंगास माळव्याचे सुभ्यावरून आपल्या मदतीस बोलाविलें; पण जयसिंगानें बादशहास मनापासून साह्य केलें नाहीं. पुढें बादशहानें स. १७१८ त आपला सासरा अजितसिंग यास मोठ्या भरंवशानें आपल्या मदतीस बोलाविलें. परंतु अजितसिंग उलट सय्यदांसच सामील झाला. तेव्हां बादशहानें निजामास आपल्याजवळ आणिलें; तोही सय्यदांचे विरुद्ध वागेना, म्हणून त्यानें त्याची नोकरी काढून घेतली. अशा रीतीनें बादशहाचा पक्ष दिवसेंदिवस अगदींच दुर्बल झाला. पुढें प्रकरण चिडीस गेल्यानें दिल्लीस धडगत नाहीं असें पाहून अब्दुल्लानें आपल्या बंधूस दक्षिणच्या कामावरून सेप्टेंबर स. १७१८ त परत दिल्लीस बोलाविलें. अशा बिकट प्रसंगीं दक्षिणचा सर्व बंदोबस्त आपल्या मर्जीमाफक करून हुसेनअली, हवा मानवत नाहीं असें निमित्त करून, नोव्हेंबर १७१८ त परत निघाला, तो १७१९ च्या फेब्रुवारींत दिल्लीस पोंचला. बरोबर त्यानें मराठी फौज मदतीस नेली.

६ उत्तरेंतील राजपूत राज्यें; बदललेलें राजकारण—मराठे व मुसलमान या दोघांबरोबर तिसऱ्या एका पक्षाचा म्हणजे राजपूत राजांचा या विषयांत निकट संबंध येत असल्यामुळें पुढील कारस्थानें समजण्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजपुतांची या वेळची परिस्थिति थोडी स्पष्ट केली पाहिजे. राजपुतान्यांत मुख्य राज्यें तीन, उदेपुर, जयपुर व जोधपुर. प्रस्तुत समयीं उदेपुरास राणा अमरसिंह (स. १७००-१६) व राणा संग्रामसिंह (१७१६-३४) हे दोन मोठे हुशार राज्यकर्ते झाले. मात्र त्यांचें लक्ष स्वतःची राज्यवृद्धि करण्याकडे नसून, मुसलमानांशीं विरोध करून आपल्या घराण्याचें पावित्र्य व सन्मान कायम राखण्याकडे विशेष होतें. मारवाडांत जोधपुर येथें जसवंतसिंहाचा पराक्रमी पुत्र अजितसिंह (१६७८-१७२४), व त्याचा सवाईबेटा अभयसिंह (१७२४-१७५०) हे मोठे चळवळे असून, दिल्लीच्या कारस्थानांत विशेष लक्ष ठेवून स्वतःचा फायदा करण्यांत निमग्न असत. जयपुरचा राजा सवाई जयसिंह (१६९९-१७४३) हा विद्याभिलाषी व सौम्य वृत्तीचा असून, धाडसानें पुढें न पडतां, अंतस्थ खटपटी करणारा होता. शिवाय दुसरे पुष्कळ लहान संस्थानिक बादशाही फौजेंत असत. बुंदीचा बुधसिंह, कोटयाचा रामसिंह व दतियाचा दलपत बुंदेला हे औरंगजेबाच्या फौजेंत दक्षिणेंत लढत होते.¶ औरंगजेबाचे दोघे मुलगे राज्यासाठीं आपसांत लढले, तेव्हां बुंदीचा बुधसिंह, उदेपुरचा अमरसिंह व जोधपुरचा अजितसिंह यांनीं वडील पुत्र बहादुरशहा याचा आणि रामसिंह व दलपत बुंदेला यांनीं आजमशहाचा, असे पक्ष घेतले होते. जाजवच्या लढाईंत रामसिंग व दलपत बुंदेला मारले गेले. बहादुरशहानें बुधसिंगास 'रावराजा' असा किताब देऊन मोठ्या योग्यतेस चढविलें. जयसिंगाची बहीण बुधसिंगास दिलेली असून, जयसिंगाचें व त्याचें वांकडें होतें.

स. १७०८ त बहादुरशहानें कामबक्षावर दक्षिणेंत स्वारी केली तेव्हां जयसिंह व अजितसिंह यांस त्यानें आपल्या बरोबर घेतलें असतां, बादशहा नर्मदा पार होतांच, दोघेही मागच्या पायीं मागें फिरले ते उदेपुरास येऊन तेथें अमरसिंहाचे मसलतीनें त्रिवर्गांनीं बादशहाचे विरुद्ध स्वधर्मशुद्धीचा करार ठरविला (स. १७०९-१०). औरंगजेबाच्या धार्मिक दुराग्रहाचा हा परिणाम होय. आपल्या मुली मुसलमानांस द्यावयाच्या नाहींत, आणि इतःपर बादशहास कोणत्याही प्रकारें मदत अगर त्याची नोकरी करावयाची नाहीं, असा या कराराचा आशय होता. हा करार पार पाडण्यासाठीं बादशहाशीं झगडावें लागल्यास मराठ्यांची मदत आपणास मिळावी अशी तजवीज राजपुतांनीं करविली. सय्यदांचे

¶ या दलपत बुंदेल्यानें लिहिलेला त्या वेळचा इतिहास प्रसिद्ध आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारकीर्दीत राजपूत-मराठ्यांचें सख्य राहण्याचें हें एक कारण आहे. मराठ्यांशीं सख्य राखल्यामुळें रोगापेक्षां उपायच राजपुतांस जास्त अपायकारक झाला, अशी यासंबंधीं टॉडची टीका आहे. वरील उपक्रमानें उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचा संचार सुलभ झाला.§

वरील करार म्हणजे बादशहाचा उघड अपमान होय. अकबरच्या वेळेपासून राजपुतांच्या मुली बादशहाच्या घराण्यांत येत असून ते राजे बादशहाच्या पदरीं नोकरी करीत. हा प्रघात राजपुतांनीं उघडपणें सोडल्याबद्दल त्यांची खोड मोडण्याचा विचार सय्यदांनीं ठरविला. हुसेन सय्यदानें अजितसिंगावर स्वारी केली, (नोव्हेंबर १७१३–जुलै १७१४). राजपुतांनीं प्रथम सय्यदांचा पराभव केला. या प्रसंगीं त्रिवर्ग राजपुत राजे सांबर सरोवराचे कांठीं जमले; तीच त्यांनीं तीन राज्यांची सरहद्द ठरविली; आणि त्या सरोवरांतील मिठाचें उत्पन्न तिघांनीं सारखें वांटून घेण्याचा व पूर्वीचे करार बिनकसूर पाळण्याचा पुनः निश्चय केला. त्यानंतर त्रिवर्ग राजे पृथक् होतांच, सय्यद हुसेननें अजितसिंगास एकटेंच गांठिलें आणि त्याचा पाडाव करून त्यास शरण येण्यास भाग पाडिलें. अजितसिंगाचा नाइलाज असो, अथवा आपमतलबास्तव असो, त्यानें आपली मुलगी बादशहास देण्याची आणि मुलगा व आपण दोघांनीं बादशहास शरण जाऊन त्याची नोकरी करण्याची कबुली लिहून दिली. याप्रमाणें राजपुतांचा कट सय्यदांनीं फिसकटविला; आणि अजितसिंगाचा मुलगा अभयसिंग यास बादशहाच्या तैनातीस आणिलें (जुलै, १७१४). मुलगी इंद्रकुमारी मागून यावयाची होती, ती ता. २३ सेप्टेंबर, स. १७१५ रोजीं मोठ्या समारंभानें दिल्लीस पोंचली. नंतर चार दिवसांनीं तिला मुसलमानी दीक्षा देण्यांत येऊन बादशहाशीं तिचें लग्न सय्यद हुसेनच्या वाड्यांत मोठ्या थाटानें झालें. लग्नाची एकंदर व्यवस्था वजीर सय्यद अब्दुल्ला यानें ठेविली होती. दोन महिनेपावेतों दिल्लींत हा लग्नसोहळा अपूर्व झाला.

याप्रमाणें अजितसिंगास वठणीस आणल्यावर, बहादुरशहानें माफ केला होता तो जिझिया कर या सय्यदांनीं राजपुतांवर पुनः लागू केला. इनायतुल्ला नांवाचा एक वृद्ध इसम औरंगजेबाचे तालमेंत वसुलाच्या कामांत तयार झालेला दिल्लीस होता, त्यास सय्यदांनीं मुद्दाम या जिझियाच्या वसुलीकरितां

§ पहा मु. रि., भा. २, पृ. ३९५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुनः दिवाण नेमिलें. अजितसिंग व अभयसिंग यांनीं बादशाही कृपेचा फायदा घेऊन आपलें राज्य वाढविण्याचा उद्योग केला. अजितची नेमणूक गुजरातच्या सुभ्यावर झाली, तेव्हां स. १७१६ त बापलेकांनीं तिकडे जाऊन बराच नवीन प्रदेश हस्तगत केला. हे बापलेक भले कपटी व स्वार्थी होते. त्यांनीं आपल्या मतलबास्तव बादशहास मुलगी दिली, कीं खरोखरच तसें करणें त्यांस भाग पडलें, ह्याचा निर्णय होत नाहीं. एवढें खरें, कीं बादशहाकडे मुली देऊं नयेत हा करार मोडण्यास तेच प्रथम कारण झाले, आणि ह्यामुळेंच राजपुतान्यांत अंतर्वैमनस्यें उत्पन्न होऊन तेथें पुढें मराठ्यांचा प्रवेश झाला. जयपुरचा राजा सवाई जयसिंग याची व पेशवा बाळाजीची मैत्री शंकराजी मल्हारानें जुळवून दिली, ती जयसिंगाच्या मृत्यूपर्यंत कायम होती. राजपूत व मराठे दोघेही बादशाहींतील कमकुवतपणाचा फायदा घेऊन आपला मतलब साधूं लागले. जयसिंगाची थोडी जास्त माहिती येथेंच सांगितली पाहिजे.

७ जयसिंगाची माळव्याची सुभेदारी.—जयपुरचा राजा सवाई जयसिंग याचा व मराठ्यांचा संबंध सुमारें चाळीस वर्षे निकट होऊन त्या योगानें मराठ्यांचें उत्तरेंतील राजकारण पुष्कळसें बदलत गेलें. जयपुरच्या या राजांची कारणापुरतीच वंशावळ येथें दर्शविली आहे. हे बादशहाचे मांडलिक असल्यामुळें त्याच्या पदरीं नोकरी करीत. मयताच्या पश्चात् नवीन पुरुष गादीवर येण्यास बादशहाची मंजुरी लागे. सोबत दाखविलेले सर्व पुरुष औरंगजेबाच्या दक्षिण स्वारींत नोकरीवर असत. त्यांचें सर्व शिक्षण व लष्करी अनुभव त्यांस या नोकरींत मिळून हरएक प्रकारें बादशहाची मर्जी सांभाळून त्यांस वागावें लागे. रामसिंग हयात असतांच त्याचा पुत्र किशनसिंग दक्षिणेंत मारला गेला. रामसिंग स. १६८८ त मृत्यु पावल्यावर बादशहानें नातू बिशनसिंग यास ता. ३० एप्रिल, स. १६८८ रोजीं जयपुरच्या गादीवर बसविलें. तो स. १६९९ त मृत्यु पावला, तेव्हां त्याचा पुत्र जयसिंग यास बादशहाच्या हुकुमानें जयपुरची गादी मिळाली. तो दक्षिणेंत औरंगजेबाचे

मीर्झा राजा जयसिंग

रामसिंग (मृ. १६८८)   **कीरतसिंग**

किशनसिंग (मृ. १६८२)

बिशनसिंग (मृ. १६९९)

सवाई जयसिंग (मृ. १७४३)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लष्करांत वाढला. स. १७०२ च्या एप्रिलांत विशाळगड काबीज करण्यांत जयसिंगानें अप्रतिम धाडस प्रगट केलें. तो पुढें त्या बादशहाचे मृत्यूनंतर उत्तरेंत जाऊन तिकडील राजकारणांत भाग घेऊं लागला. त्याचें वजन व प्रतिष्ठा दरबारांत मोठी असल्यामुळें शाहूनें त्याच्याशीं स्नेहसंबंध विशेष राखला.

स. १७१३ त सय्यदांच्या विचारानें बादशहानें जयसिंगाची नेमणूक माळव्याचे सुभ्यावर केली. तयारी करून तो त्या सालच्या डिसेंबरांत दिल्लीहून उज्जनकडे येण्यास निघाला. बुंदी व कोटा येथें मुक्काम करीत तो स. १७१४ च्या फेब्रुवारींत उज्जनीस दाखल झाला. उत्तर–दक्षिणमधील व्यापाराचा व दळणवळणाचा मोठा मार्ग माळव्यांतून असल्यामुळें मराठे, अफगाण वगैरे लूटमार करून लोकांस उपद्रव देत तो बंद करण्याचें काम जयसिंगास करावयाचें होतें. कंपेलचा नंदलाल चौधरी त्याचा मुख्य मदतनीस होता. छत्रसाल बुंदेला व त्याचे पुत्र हेही त्याचें साह्य करीत. मराठ्यांच्या स्वाऱ्या माळव्यावर चालूच होत्या. स. १७१५ च्या एप्रिल ता. १–२ रोजीं खंडेराव दाभाडे व कान्होजी भोसले यांनीं तीस हजार फौजेनिशीं नर्मदा ओलांडून माळव्यांत प्रवेश केल्याची बातमी जयसिंगास आली. उज्जनजवळचीं गांवें लुटून त्यांनीं देपाळपुरचा विध्वंस केला. अशीच दुसरी एक टोळी बढवाह्जवळ नर्मदा उतरून कंपेल परगण्यांत शिरली. जयसिंग भेलशावर होता, त्यानें तेथून आपला दूधभाई रूपराम यास तावडतोब मराठ्यांवर पाठवून मागोमाग आपणही आला. बुधसिंग हाडा, छत्रसाल बुंदेला वगैरे अनेक सरदार जयसिंगाबरोबर होते. ता. १० मे रोजीं संध्याकाळीं उभय फौजांचा मोठा रणसंग्राम होऊन पुष्कळ मराठे कापले गेले, त्यांचें सामान व लूट जयसिंगानें काबीज केली. मराठे पळून पलसूद्च्या उताारावर मुक्कामास राहिले. जयसिंगानें भल्या पहांटे उठून त्यांजवर अकस्मात् हल्ला केला, तेव्हां सर्व लूट व जखमी लोक तसेच टाकून मराठे नर्मदापार जीव घेऊन पळाले. या बहादुरीबद्दल बादशहानें जयसिंगाचें व त्याच्या हस्तकांचें अभिनंदन करून मिळालेली लूट त्यांस बहाल केली. यापूर्वी मराठ्यांना असा अपयशाचा अनुभव कधीं आला नव्हता. जयसिंगानें माळव्याचा बंदोबस्त उत्कृष्ट केला.

पण ही व्यवस्था अल्पकाळच टिकली. बादशहा व सय्यद बंधु यांचें भांडण विकोपास चाललें, तेव्हां बादशहानें जयसिंगास त्वरेनें दिल्लीस बोलाविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिल्लीच्या भानगडींत पडण्याची त्याची बिलकुल इच्छा नसल्यामुळें स. १७१५ च्या ऑक्टोबरांत माळवा सोडून तो खुशाल जयपुरास जाऊन बसला. दूधभाई रूपराम यानें अल्पकाळ माळव्याचा बंदोबस्त ठेविला. संताजी भोसल्यानें स. १७१७ च्या आरंभीं पुनः मोठ्या फौजेनिशीं नर्मदा उतरून उज्जनला वेढा घातला; रूपरामास पकडून त्याजकडून भला मोठा दंड व हंड्या परगणा मिळविला. स. १७१७ च्या ऑक्टोबरांत महंमद अमीनखान याची नेमणूक माळव्यावर झाली आणि जयसिंगाचा हा पहिला कारभार संपला.¶

¶ सर जदुनाथकृत जयपुरचा इतिहास (अप्रकाशित).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी सत्तेला शिक्कामोर्तब

कालसूचि

१७१५ एप्रिल ते १७१८ नोव्हें०		—हुसेन सय्यद दक्षिणेंत.
१७१५ ऑगस्ट	२६	—बऱ्हाणपुरच्या लढाईंत दाऊदखान पन्नीचा मृत्यु.
१७१७ एप्रिल	२४	—अहंमदनगरास दाभाड्याकडून मोगलांचा पराजय.
१७१८ फेब्रु०	२८	—फर्रुखसेयरची पदच्युति, नवीन महंमदशहा.
१७१८ नोव्हें० ते १७१९ मार्च		—मराठे दिल्ली येथें, सय्यदहुसेन बरोबर.
१७१९ फेब्रु०	२३	—दिल्लींत बादशहा व सय्यद यांची भेट.
,, ,,	२८	—दिल्ली येथें कांहीं मराठ्यांची कत्तल, संताजी भोसले व बाळाजी महादेव भानु मारले गेले.
,, मार्च	३	—मराठ्यांचा चौथाईचा करार पुरा झाला.
,, ,,	१५	—सरदेशमुखीचा करार पुरा झाला.
,, ,,	२०	—बाळाजी विश्वनाथ सनदा घेऊन दिल्लीहून परतला.
,, जुलई	४	—बाळाजी सातारा येथें दाखल.
१७३१		—येसूबाईचा मृत्यु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६

मराठी सत्तेला शिक्कामोर्तब

१ हुसेन सय्यद दक्षिणेंत — २ चौथाईचा तह — ३ मराठ्यांचें दिल्लीस प्रयाण — ४ दिल्लींतील राज्यक्रांति, सनदांची प्राप्ति — ५ मातुःश्री येसूबाई

१ हुसेन सय्यद दक्षिणेंत (एप्रिल १७१५—नोव्हेंबर १७१८).—दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक होऊन, हुसेन सय्यद ता. ५ एप्रिल, १७१५ रोजीं दिल्ली सोडून निघाला. परंतु त्यास कारभार न देतां मारून टाकावें, असा बादशहानें दाऊदखान पन्नीस आगाऊच हुकुम पाठविला होता. हुसेन अली नर्मदेवर आला, तेव्हां त्यास बातमी लागली, कीं दाऊदखान पन्नी हा बऱ्हाणपुरपावेतों आपणांवर चालून आला आहे. दाऊदखानास त्यानें परत जाण्याचा हुकूम पाठविला; परंतु तो दाऊदनें मानला नाहीं. त्या वेळीं शाहूचा सेनापति नेमाजी शिंदे मोठ्या फौजेनिशीं बऱ्हाणपुरास येऊन, वरील दोघां मोगल सरदारांचा पुढें काय प्रकार होतो त्याजवर नजर देऊन बसला होता. बऱ्हाणपुरनजीक लालबागच्या मैदानांत दाऊदखान व हुसेनअली यांची ता. २६ ऑगस्ट, १७१५ रोजीं लढाई होऊन दाऊदखान मारला गेला. नंतर तीन वर्षेपावेतों हुसेन अलीनें दक्षिणचा कारभार केला. नेमाजी सिंद्यावर दाऊदखानाची मोठी भिस्त होती. पण त्यानें दुटप्पी वर्तन ठेवल्यामुळें दाऊदखानाचा नाश झाला असें खाफीखान सांगतो.

हुसेन अलीचा पाडाव करण्याविषयीं मराठ्यांसही अंतस्थ रीतीनें बादशहानें चेतविलें होतें. त्यावरून त्यांनीं मोगलांचे मुलखांवर हल्ले सुरू केले. शाहूनें सय्यदास पत्रें पाठविल्याचे उल्लेख आहेत. † खंडेराव दाभाडे यानें खानदेश व गुजरात या प्रांतांवर स्वाऱ्या करून, त्या दोन प्रांतांमधला दळणवळणाचा रस्ता आपल्या कबजांत घेतला, तेव्हां हुसेन अलीनें झुल्फिकारबेग नांवाच्या

---

† पे. द. ३० पृ. २३५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरदारास खंडेरावावर पाठविलें. खंडेरावानें युक्तीनें मोगलांची पांगापांग करून डोंगरी प्रदेशांत झुल्फिकारबेगसुद्धा त्याची फौज कापून काढिली. तेव्हां हुसेन अलीनें आपला दिवाण मुहकमसिंग व चंद्रसेन जाधव यांस दाभाड्यावर रवाना केलें. त्या वेळीं दाभाड्याचे मदतीस दावलजी सोमवंशी होता. मनसूरखान, ऐवजखान, तुरुकताजखान, करीमबेग वगैरे सरदार मराठ्यांच्या पाडावासाठीं कसून प्रयत्न करूं लागले. पुढें अहंमदनगरनजीक उभय पक्षांची निकराची लढाई होऊन जयापजयाचा निकाल लागला नाहीं. ‡ दाभाडे व सुलतानजी निंबाळकर यांनीं पुढें मोगलांचा पूर्ण पराभव केला, (शके १६३९ वैशाख वद्य ९, ता. २४-४-१७१७).

मराठ्यांवर मेहेरबानी करावी असें सय्यद हुसेनच्या मनांत मुळींच नव्हतें. मराठ्यांच्या बंदोबस्तासाठीं त्यानें फौजही मोठी जमविली. परंतु बादशहानेंच सय्यदांविरुद्ध सारखीं कारस्थानें चालविल्यामुळें हुसेनचा इलाज चालेना; आणि पुढें जेव्हां स्वतःच्याच अंगावर बाजू येण्याचा जोर दिसूं लागला, तेव्हां मराठ्यांशीं गोडी करून बादशहास शह देण्याचा विचार हुसेन अलीनें केला. शेखजादा अन्वरखान म्हणून बऱ्हाणपुरचा अधिकारी हुसेन अलीचा दोस्त होता, त्यानें मराठ्यांशीं स्नेह करण्याची आणि या कामीं शंकराजी मल्हाराची मध्यस्थी स्वीकारण्याची सल्ला हुसेन अलीस दिली. हा शंकराजी मल्हार पूर्वी राजारामाचे वेळेस सचिव होता, परंतु पुढें तें काम सोडून तो काशीस गेला, † आणि तेथून दिल्लीस जाऊन मराठ्यांच्या तर्फेनें अनेक कारस्थानें करूं लागला. 'शंकराजी मल्हारास बादशहानें मुद्दाम हुसेन अलीबरोबर कारभारी म्हणून दक्षिणेंत पाठविलें.' असें खाफीखान सांगतो. शंकराजीनें बाळाजी विश्वनाथ व चिमणाजी दामोदर यांचे मार्फत शाहूशीं वाटाघाट चालविली. तह ठरविण्याकरितां शंकराजी मल्हार साताऱ्यास आला.¶ तेथें शाहूनें त्याची बरदास्त फार चांगली ठेविली. तहाच्या वाटाघाटीचें वर्णन शाहूच्या चरित्रांत दिलेलें हृदयंगम आहे.

२ चौथाईचा तह.—बरेच दिवस खल होऊन शेवटीं हुसेन अलीच्या मार्फत शाहू व बादशहा यांचा तह मुक्रर झाला तो असा.—(१) शिवाजीच्या

‡ खं. २ पृ. २८; शा. रो. ३७३; इ. वृ. १८३७ ले. ११०; इ. सं. पे. द. पृ. १६.

† स्थि. बु. राजाराम, पृ. ४३. ¶ पे. द. ७.३४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेळचें स्वराज्य, तमाम गडकोट सुद्धां शाहूचे हवालीं करावें; (२) अलीकडे मराठे सरदारांनीं जिंकलेले प्रदेश म्हणजे खानदेश, गोंडवण, वऱ्हाड, हैदराबाद, कर्नाटक या भागांतले, यादींत नमूद केल्याप्रमाणें मोगलांनीं सोडून देऊन ते मराठ्यांच्या स्वराज्यांत दाखल करावे ; (३) मोगलांच्या दक्षिणेंतील मुलखांवर चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मराठ्यांनीं स्वतः वसूल करावे. या चौथाईचे बदल्यांत आपली पंधरा हजार फौज मराठ्यांनीं बादशहाचे मदतीस ठेवावी आणि सरदेशमुखीचे बदल्यांत मोगलांचे मुलखांत मराठ्यांनीं चोऱ्या वगैरेंचा बंदोबस्त करावा; (४) कोल्हापुरच्या संभाजीस शाहूनें उपद्रव करूं नये; (५) मराठ्यांनीं दरसाल बादशहास दहा लाख रुपये खंडणी द्यावी ; आणि (६) शाहूची मातुश्री, कुटुंब, संभाजीचा दासीपुत्र मदनसिंग वगैरे दिल्लीस बादशहाचे कबजांत आहेत, त्यांस सोडून स्वदेशीं पावतें करावें. असा या तहांतील कलमांचा मुख्य मतलब होता. §

थोड्या बहुत फरकानें हा तह स. १७१८ त हुसेन अलीनें मंजूर केला; मात्र त्याजबद्दलचें बादशहाचें फर्मान पुढें यावयाचें होतें. शाहूनें हा तह लगेच अमलांत आणण्यास सुरुवात केली, आणि 'स्वामींचें स्वराज्य देखील ठाणीं पातशहांनीं स्वामींस बहाल केलें आहे, त्याच्या सनदा अमीरुल् उमराव हुसेन अलीखान यांणीं दिल्या आहेत, ऐशियास मोगलाई तर्फेचा ऐवज मोगलांकडे अगर दुसरियाकडे न देणें, नक्त जमेच्या आकारापैकीं निंमे ऐवज मोगलांकडील हुजूर वसूल देणें,' असे शाहूचे हुकूम ता. १ ऑगस्ट, स. १७१८ चे आहेत. †

अशींच बाळाजीचीं अनेक पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. "प्रांत पुणें देखील ठाणें आम्हांकडे स्वराज्य नबाबापासून करार जालें आहे, तरी रंभाजी निंबाळकराकडे वसूल न देणें. वसूल द्याल तो दुप्पट घेतला जाईल. मारले जाल", असें ता. ३०.७.१७१८ चें आज्ञापत्र देशमुख देशपांडे यांस आहे. स्वराज्यांतील वसुलासाठीं स्वतः बाळाजी सातारा, वाई, भुइंज, उरळी अशा ठिकाणीं फिरत राहिला. महाराजांचे हुजूर राहणारी हुजरात नांवाची फौज

§ तह व करारमदार पृ. १–९; खं. ८ ले. ७८ मध्यें तपशील पहावा व पत्रव्यवहार ले. ७७, ७८, ८०; ऐ. प. ६; खं. २, पृ. ३१; चिटणीसकृत शा. च., पृ. ३८.

† खं. ३ [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या वेळीं सिद्ध होऊन तिचें चालकत्व बाळाजीनें स्वीकारिलें. ता. ११ ऑक्टोबर, स. १७१८ चें पत्र पुण्याच्या देशपांड्यांस लिहिलेलें पाहतां त्यावरून पुण्याच्या वसाहतीचा आरंभ कसा झाला आणि त्यांत पेशव्यांनीं किती लक्ष घातलें हें कळून येतें. ‡

या तहानें व त्याच्या वाटाघाटीनें महाराष्ट्रांत शाहूचें वजन वाढून त्याचा जम बसला. त्याचें कर्तृत्व लोकांस दिसूं लागलें, तशी त्याची इभ्रतही वाढत गेली. अष्टप्रधान व सरदार त्याचे हुकूम बिनतक्रार बजावून बाहेर संचार करूं लागले. राज्यकारभाराची व्यवस्था होण्याबरोबर मुलखांत शांतता व आबादानी नांदूं लागली. 'हुजूर बोलाविले असतां एक क्षणाचा विलंब व उजूर न करितां येऊन पावावें. सुभ्याची व पदाची बालमेल झाली आणि सनद गेली, म्हणजे तसेंच त्या क्षणीं काम त्याचे हवालीं करून हुजूर निघून यावें, कांहीं अवज्ञा करूं नये. सर्व निष्ठेनें चालूं लागले. §

मराठमंडळाचें लक्ष घरगुती भांडणांतून काढून बाहेरच्या उद्योगांत लावण्याचा बाळाजी विश्वनाथाचा मतलब सिद्धीस गेला, आणि मराठ्यांच्या उद्योगांस नवीन क्षेत्र प्राप्त झालें. बादशहाच्या तैनातीस आपली फौज देणें म्हणजे त्याच्या संरक्षणाची हमी आपल्याकडे घेतल्यासारखें होतें. मात्र शाहूनें बादशहास खंडणी कबूल केली, याचा अर्थ शिवाजीच्या वेळचें स्वातंत्र्य सोडून त्यानें बादशहाची ताबेदारी पत्करिली. चौथाई सरदेशमुखीचे हक्क मिळाल्यामुळें बाहेर संचार करण्याची मोकळीक मराठ्यांना प्राप्त झाली. काम पडेल तिकडे बादशहाची सेवा करण्याचें त्यांनीं पत्करिलें. स्वहित संभाळण्यासाठीं आजूबाजूच्या सत्ताधीशांसंबंधानें चढावाची राज्यपद्धति (vigorous policy) स्वीकारावी लागते तसा बहुतेक प्रकार मराठ्यांचा झाला. अर्थात् ह्या तहानें मराठशाहीच्या कारभारास निराळें वळण लागलें. नवीन जबाबदारी व नवीं कर्तव्यें उत्पन्न झालीं. पूर्वीची व्यवस्था बदलली. नवीन मनु सुरू झाला. मराठशाहीचें हें रूपान्तर बाळाजी पेशव्यानें उपस्थित केलें, आणि पुढील पुरुषांनीं त्याच्या परिपोषाचा उद्योग केला. याचे परिणाम

‡ रा. खं. ३ ले. ९९–१००; ऐ. सं. सा. ३.२८९; पे. द. ३० पृ. २४७; रा. खं. २ पृ. ३६.

§ [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काय झाले तें पुढें दिसून येईल. या नवीन राजकारणाचा उगम कसा झाला हें येथें लक्षांत येतें.

या वेळीं समस्त सरदार व सरकारकून शंकराजी मल्हारमुद्धा सातान्यास जमा झाले असून, $ तहाच्या वाटाघाटीची एकंदर हकीकत वारंवार शाहूस कशी कळविण्यांत येत होती, शाहूकडून त्यासंबंधानें लगोलग जबाबही कसे जात होते आणि तहांतील प्रातीपेक्षां मातुश्रीसंबंधानें शाहू किती आतुर होता हे प्रकार खालील पत्रांत स्पष्ट कळून येतात. हें पत्र यादवराव मुनशी यास लिहिलेलें आहे. हा शाहूनें दिल्लीस सय्यदांकडे बोलणें करण्यास पाठविलेला आपला वकील यादवराव• प्रभु पारसनीस होय. यादोराव वकील असा याचा तहांत उल्लेख आहे. ता. १ फेब्रु०, स. १७१५ रोजीं शाहूनें त्यास तीन गांवचा मुकासा इनाम दिला होता. ‡

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबीनाम संवत्सरे (२४ फेब्रुवारी, १७१८) फाल्गुन शु. ५ इंदुवासरे, क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपतिस्वामी याणीं रा. रा. यादवराव मुनशी यांस आज्ञा केली ऐसिजे. तुम्हीं माघ बहुल १३ चें विनंतिपत्र पाठविलें तें फाल्गुन शुद्ध ४ स प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जालें. सरदेशमुखीचा परवाना पहिले आला होता तो गलत करून हल्लीं नवा परवाना साध्य करविला, त्याची नक्कल काजीचे मोहोरेनिसीं पाठविली असे, व पहिले पेशकसी मोकरर जाली होती त्याचप्रमाणें जोर बजोर रदबदल करून परवान्याची नकल पाठविली आणि दुसरा परवाना जाला होता त्याचीही नकल स्वामीस कळावयास पाठविली आहे, यावरून सेवकाचे चाकरीचा मजुरा होईल, म्हणोन कित्येक प्रकारें लिहिलें, ऐशास जो पूर्वी रा. प्रधानपंतीं निर्वाह केला होता, त्या संबंधें दुसरी बोली असलीयाकरितां तुम्हीं सेवकलोक होतेस तुम्हांस जें लिहिणें तें ल्याहावें लागलें. येथील आज्ञेवरून तेथें तुम्हांस रदबदलेस जोर पोहोंचला, आणि पहिलेच मोकरर बेरजेवरी काम होऊन आलें. तथापि तुमच्या शहाणपणास अगर कष्ट मेहनतीस स्वामींनीं शब्द लाविला यैसा अर्थ नाहीं. ये प्रसंगीं तुम्ही श्रम साहस केले आहेती तदनुरूप तुमचें ऊर्जित करणें आवश्यकच आहे. तुम्हीं आपल्या मनांत कदापि विपर्यास

$ वतनपत्रें व निवाडे, ले. १७ महजरनामा ता. ६.१०.१७१८.

‡ ऐ. सं. सा. ३ ले. ३३६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न मानणें. पुढेंही स्वामिकार्यावरी येकनिष्ठपणें राहोन स्वराज्याची सनद सत्वरच तयार करून घेणें. रा. शंकराजी पंताच्या व तुमच्या लिहिल्यावरून चौथाई व सरदेशमुखीचा परवाना व स्वराज्याची सनद येसे तीनही मतलब तों विल्हे लागले. राहिले मातुश्री येसूबाईसाहेब व चिरंजीव मदनसिंग यांचें आगमन हुजुरून जालें आणि स्वामीची व त्यांची भेट जाली, म्हणजे नबाबाच्या वचनाप्रमाणें रा. शंकराजी पंत दरम्यान पडिले आणि तुम्हीं कष्ट मेहेनत केली त्याची सार्थकता होऊन अवश्य मतलब सिद्धीस पावले. तर मातुश्रीचे- विशीं व चिरंजीवांचेविशीं प्रतिक्षणीं स्मरण देऊन त्यांचें अविलंबें आगमन होय ते गोष्टी करणें. विस्तारें राजश्री शंकराजीपंत यांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. थैल्या निलकी सुमारें २५ देखील दोरण्या व लाख वजन पक्की येक सेर येसें जरूर जाणोन सत्वर पाठविणें. जाणिजे. बहुत काये लिहिणें. मर्यादेयं राजते. ”§

३ मराठ्यांचें दिल्लीस प्रयाण (नोव्हेंबर १७१८—जुलै १७१९).— करारप्रमाणें मराठ्यांची फौज खंडेराव दाभाडे याच्या हाताखालीं औरंगाबादेस येऊन उतरली. हुसेन अलीनें या तहाची खबर बादशहास देऊन त्याजकडून कबुलीचें फर्मान मागितलें. आपल्या रियासतींत अशा प्रबल मराठ्यांस आणणें बादशहास व त्याचे सल्लागारांस मुळींच रुचलें नाहीं म्हणून त्यानें तो नाकबूल केला. शिवाय हुसेनअलीचा नकशा उतरविण्याकरितां बादशहानें दक्षिण प्रांतांत पुष्कळ इसम नवीन नेमिले, परंतु त्यांस हुसेनअलीनें जुमानिलें नाहीं. बादशहाचें व सय्यदांचें वितुष्ट उत्तरोत्तर वाढत चाललें. बादशहानें निजाम उल्मुल्कला मुरादाबादच्या सुभ्यावरून काढून आपल्याजवळ बोलाविलें. सरबुलंदखानाकडे पाटणाचा सुभा होता, त्यास व अजितसिंगास गुजरातेंतून त्यानें आपल्याजवळ बोलावून घेतलें. या सरदारांच्या फौजा दिल्लींत आल्या, तेव्हां सय्यद अब्दुल्लानेंही आपली फौज वाढविली. प्रसंग लवकरच हातघाईवर येणार असा सुमार दिसूं लागला, म्हणून अबदुल्लानें भाऊ हुसेन यास ताबडतोब दिल्लीस बोलाविलें. वरील तहास अनुसरून हुसेनअलीनें मराठ्यांची फौज आपल्या मदतीस आणविली. हें सर्व तो बादशहाचे नांवानें करीत होता. दिल्लीस जाण्याचें हें कारस्थान शाहू व बाळाजी यांनीं अंगावर घेतलें.

§ हे पत्र रा. ब. रा. मुते यांनी मेहेरबानीने दिले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा प्रकार घडविण्यांत शंकराजी मल्हारबरोबर खंडो बल्लाळ, यादवराव मुनशी इत्यादि अनेक गृहस्थ प्रमुख होते. खंडेराव दाभाडे, उदाजी पवार व कान्होजी भोसले यांस फौजांबरोबर जाण्याची आज्ञा शाहूनें केली. कान्होजी स्वतः गेला नाहीं. त्यानें आपले बंधु संताजी व राणूजी भोसले यांस पाठविलें. बाळाजीनें आपला पुत्र बाजीराव व बाळाजी महादेव भानु फडणीस यांस बरोबर घेतलें. फौजेच्या खर्चाबद्दल नर्मदा नदी उतरल्यापासून परत येईपावेतों पन्नास हजार रुपये दररोज देण्याचा व बादशहाकडून वरील तहाच्या कबुलीचें फर्मान देवविण्याचा हुसेनअलीचा करार होता. बाजीरावास लष्करांत सरदार नेमून चिमाजी आप्पास महाराजांजवळ मुतालीक म्हणून ठेवण्याचा शाहूनें हुकूम केला.†

अर्विन लिहितो. 'हुसेन सय्यदानें बादशहावर शह बसविण्यासाठीं एक विलक्षण युक्ति योजिली. औरंगजेबाचा मुलगा अकबर संभाजीकडे येऊन पुढें इराणांत निघून गेला, त्यास मूइनुद्दीन नांवाचा मुलगा असून तो शाहूच्या हस्तगत झालेला आहे; आणि आपली मातुःश्री व बंधु दिल्लीस कैदेंत आहेत त्यांची सुटका केल्यास आम्ही मूइनुद्दीन यास तुमचे हवालीं करतों, असें शाहूचें बोलणें आपल्याकडे आलेलें आहे; अशी हकीकत हुसेन-अलीनें बादशहास कळविली. बादशहास ती गोष्ट मान्य होऊन त्यानें मूइनुद्दीन यास तावडतोब दिल्लीस पाठवावें, आणि आपण शाहूची मंडळी सोडतों असें कबूल केलें. हा सगळाच प्रकार बनावट होता. मूइनुद्दीन नांवाचा शहाजादा म्हणून कोणी नव्हताच; परंतु हुसेनअलीनें औरंगाबादेजवळ आपल्या मुक्कामाशेजारीं तंबू वगैरे लावून एक भव्य उतारा तयार केला, आणि शहाजादा आला असें दाखविण्याकरितां मिरवणूक काढून एक इसम तसा तयार करून ठेविलेला तेथें आणिला. पुढें रोजचे रोज हुसेनअलीनें या शहाजाद्यास जाऊन भेटण्याचे वगैरे बाह्योपचार यथास्थित केले. अशा रीतीनें दिल्लीपावेतों या राजपुत्राचें सोंग नेण्यांत आलें.' बहुधा हा प्रकार शंकराजी मल्हारच्या युक्तीनें शाहूची मंडळी सोडविण्यासाठीं उपयोजिला असावा. 'सियारुल मुताखरीन' यांत पृ. १०८ व पृ. १२९ वगैरे ठिकाणीं या शहाजाद्याची हकीकत आहे ती वाचकांनीं पहावीं.

† शा. रो. १०८. याची तारीख तिस्सां अशर छ २१ जिल्काद म्हणजे ६ ऑक्टोबर स. १७१८ होय. 'असरीन' शब्द चुकला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सय्यद हुसेननें दक्षिणेंतून निघण्यापूर्वी ठिकठिकाणीं आपल्या तर्फेचे कामगार नेमिले. आलमअली नांवाचा त्याचा पुतण्या होता त्यास दत्तक घेऊन आपला मुख्य प्रतिनिधि म्हणून औरंगाबादेस ठेवून, सैफुदीन अली नांवाचा त्याचा आणखी एक भाऊ होता, त्यास खानदेशचा कारभार दिला. शंकराजी मल्हारवर हुसेनचा मोठा भरंवसा होता, त्यास आलमअलीजवळ ठेवून त्याच्या सल्लयानें चालण्याविषयीं त्यानें आलमअलीस ताकीद दिली. त्याप्रमाणें शंकराजीपंत बाळाजी विश्वनाथाबरोबर दिल्लीस जाऊन परत आलमअलीजवळ आला. मराठ्यांशीं पूर्ण सख्य राखण्याची हुसेनची इच्छा असून, त्यांच्याच मदतीवर त्याची मोठी भिस्त होती. अशी सर्व तयारी करून स. १७१८ च्या नोव्हेंबरांत हुसेन अली औरंगाबाद सोडून निघाला. त्याजबरोबर अकरा बारा हजार मराठ्यांची फौज असून बाळाजी विश्वनाथ, खंडेराव दाभाडे, संताजी भोसले वगैरे सरदार होते. दररोज दर शिपायास एक रुपया रोजमुरा ठरला होता.‡ ता. १५ नोव्हेंबरचे सुमारास नगरहून स्वारी चालू झाली, ३० नोव्हेंबरचा मुक्काम बऱ्हाणपुर, १९ जाने., १७१९ नालछा, १६ फेब्रुवारी यमुना दक्षिणतीर इंद्रप्रस्थ. नंतर १ मार्चचे सुमारास मराठे परत निघाले ते १२ एप्रिलला सिरोंज, १७ एप्रिल भेलसा, २४ एप्रिल नर्मदा दक्षिणतीर, ७ मे, बऱ्हाणपुरवरून मृगारंभीं सातारा; असा एकंदर प्रवास झाला. बरोबरच्या मंडळींत खालील नांवें प्रमुख दिसतात. अंबाजी त्रिंबक, खंडेराव दाभाडे, संताजी व राणोजी भोसले, संताजी जाधव, केरोजी, आनंदराव व तुकोजी पवार, पिलाजी व सटवाजी जाधव, कृष्णाजी दाभाडे, शेख मिरा, बाजी कदम, शंकराजी मल्हार, मुहकमसिंग, नारो गंगाधर मुजूमदार, बाळाजी महादेव फडणीस, नारो शंकर, चिमणाजी दामोदर, आवजी निळकंठ इ०. महादेवभट हिंगणे, कर्वे उपाध्ये, वगैरे परचुरण मंडळी पुष्कळ होती, ती येथें सांगण्याची जरूरी नाहीं. मराठे लष्कराचा व सरदारांचा मानमरातब चांगला ठेवण्यांत आला. दिल्लींत कांहीं तरी मोठी गडबड उडाली आहे, अशा अफवा औरंगाबादेस सर्वतोमुखीं चालू होत्या. हुसेनअलीनें १४ डिसेंबर रोजीं बऱ्हाणपुर सोडिलें, आणि २६ डिसेंबर रोजीं उज्जेन सोडलें.

‡ या स्वारीचे तपशील पे. द. भाग ३० पृ. २४९–२६५ पावेतों दिलेले अभ्यसनीय असून त्यांत लष्करखर्चासाठीं सय्यदाकडून रकमा कसकशा जमा झाल्या व त्यांचा खर्च कसा झाला, तें कळून येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रस्त्यांत सवाई जयसिंग व मुहकमसिंग बुंदेला† हे त्यास येऊन मिळाले. मराठ्यांची सर्व व्यवस्था सय्यदाचे तर्फेनें शंकराजी मल्हार पाहत होता.

अशा तयारीनें हुसेनअली येतोसा पाहून बादशहाचें धाबें दणाणलें. वरचेवर मरंवशाचे सरदार पाठवून, हुसेन अलीची समजूत घालून त्यानें परत जावें म्हणून बादशहानें नाना उपाय केले. माळव्यांत असतांनाच मराठ्यांच्या सर्व मागण्या बादशहानें कबूल केल्या. तेव्हां हुसेनचीही इच्छा परत यावें अशीच होती. परंतु शाहूचीं बायकामुलें हस्तगत झाल्याशिवाय मराठे मागें फिरतना. त्यानें बादशहास कळविलें, 'अर्ध्या वाटेंतून मी असाच परत गेल्यास हे प्रबळ मराठे नाराज होऊन पुढें आमचा असा उच्छेद करतील कीं त्यांस आवरणें जड जाईल.' असें सांगून हुसेनअलीनें दिल्लीसच जाण्याचा विचार कायम केला. हें पाहून बादशहानें वजीर अबदुल्लाची नानाप्रकारें समजूत केली. अजितसिंगाचें व वजीर अब्दुल्लाखानाचें सख्य होतें, त्यांची जोडी फोडण्यासाटीं बादशहानें अजितसिंगास 'राजराजेश्वर' हा किताब देऊन गुजरातच्या सुभ्यावर पाठविलें, तसेंच जयसिंगास 'राजाधिराज' व 'राजेंद्र' हे किताब देऊन जवळ आणिलें.

स. १७१८ त मराठ्यांनीं माळवा प्रांतांत ठाणें दिलें, त्यांस काढून लावण्याकरितां बादशहानें निजाम उल्मुल्कचा चुलता महंमद अमीनखान याची त्या प्रांतावर नेमणूक केली. हुसेनअली येत आहे असें ऐकतांच अमीनखान हुकुमाशिवाय, माळव्याचा कारभार सोडून एकदम दिल्लीस आला, (जानेवारी

† मुहकमसिंगाचें नांव बखरींतून वगैरे आढळतें. हा सरदार नागोरच्या इंद्रसिंहाचा पुत्र स. १७०५ त औरंगजेबास दक्षिणेंत येऊन मिळाला, तो अजमशहाबरोबर उत्तरेंत गेला, तो स. १७१५ त हुसेन सय्यदबरोबर इकडे आला. 'जाजवच्या लढाईत रामसिंग बांडे यांनीं तलवार चालविली त्यांत कित्येक लोक मेले व जखमी झाले, ते समयीं मुहकमसिंग यांनीं बांड्यावर वार केले, तेणेंकरून शीर उडालें, धड राहिलें तें कबंध कांहीं वेळ नाचूं लागलें. लोकांस आश्चर्य जालें.' सय्यद हुसेनचा खून झाला तेव्हां मुहकमसिंग त्याजवळ होता. सय्यदांचे पश्चात् तो वजीर अमीनखानास शरण गेल्यावर त्यानें त्यास सहा हजारी मनसब दिली; आणि निजामाच्या मदतीस दक्षिणेंत पाठविलें, तेव्हां मुहकमसिंग व चंद्रसेन यांनीं शाहूच्या प्रदेशावर चाल केली असतां शाहूनें सरलष्करास त्यांजवर पाठवून त्यांचा पराभव केला. [भारतवर्षांतील गोविंद खंडोकृत शा. म. ब. पृ. ४२; खं. २ पृ. ३५; मॉ. रि. जुलई १९२३ पृ. ६५.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७१९), त्यामुळें बादशहाची महंमद अमीनखानावर मोठी इतराजी झाली. हाच सरदार पुढें सय्यदांचे पाडावांत मुख्य असून कांहीं दिवस वजिरीवर होता.

शेवटीं स. १७१९ च्या फेब्रुवारींत हुसेनअली दिल्लीस पोंचला. अडचणीच्या प्रसंगीं निजाम आपणास मनापासून साह्य करीत नाहीं असें पाहून बादशहानें त्यास बहारच्या सुभ्यावर पाटणा येथें पाठविलें आणि अजितसिंगास त्वरेनें बोलावून जवळ आणिलें. हुसेनअलीची समजूत कशी पाडावी हें बादशहास समजेना. दोघे सय्यद बंधु आपापल्या परी बंदोबस्तानें पुढें काय प्रकार होतो तें पहात पृथक् स्थळीं छावण्या देऊन दिल्लीच्या जवळ राहिले. हुसेनअली-जवळ तीस हजार फौज होती. बादशहा व शहर सर्व चपापून गेलें. मोठमोठे सरदार निरनिराळे बेत व बाटाघाटी करूं लागले. कांहींतरी भयंकर प्रकार होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. बादशहास पदच्युत करून त्याचे जागीं दुसरा इसम नेमण्याची तयारी सय्यदांनीं चालविली. जयसिंगानें बादशहास सल्ला दिली, कीं एकदम जाऊन सय्यदांवर हल्ला करावा. परंतु बादशहास इतकें धाडस नव्हतें; उलट वजीर अबदुल्लाचे सांगण्यावरून जयसिंगास परत आपले राज्यांत निघून जाण्याचा हुकूम बादशहानें स्वहस्तानें लिहून पाठविला. ता. २२ फेब्रुवारी रोजीं जयसिंग दिल्लींतून निघून गेला.

४ दिल्लींतील राज्यक्रान्ति व सनदांची प्राप्ति (मार्च १७१९).— ता. २३ फेब्रुवारी १७१९ रोजीं बादशहाची व सय्यदांची भेट सरकारवाड्यांत झाली. उभयतां सय्यद बंधु सर्व फौज घेऊन गेले. फौज बाहेर ठेवून आपण आंत शिरले. अजितसिंग जवळ होता. बादशहानें विचारिलें, 'मूइनुद्दीनखानास तुम्हीं कैद करून आणलें आहे म्हणून कळविलें तो कोठें आहे ?' हुसेननें उत्तर दिलें, 'शाहूची मंडळी सोडून द्या म्हणजे त्यास आणतों.' त्याप्रमाणें बंधु नांवाचा एक गृहस्थ, तीस वर्षें कैदेंत असलेला, बाहेर आणून मराठ्यांचे स्वाधीन करण्यांत आला. हा बंधु मदनसिंग असावा. दुसरे दिवशीं मूइनुद्दीन यास आणण्याचें ठरलें. सहा तास वादविवाद होऊन उभयपक्षीं गोडी झाली असा लोकांचा त्या वेळीं अंदाज झाला. पण वातावरण क्षुब्ध झालें तें निवळलें नाहीं. शिकारीच्या निमित्तानें बाहेर पडून हुसेनअलीचा खून करावा असा बादशहाचा बेत चालला होता. पण ही बातमी हुसेनास होतीच. ता. २७ रोजीं सकाळींच सय्यद अब्दुल्ला मुहकमसिंगास लाहोर दरवाज्यावर फौजबंद ठेवून आपण राजवाड्यांत गेला. इकडे हुसेनअलीनें आपली तीस चाळीस हजार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फौज शहरांत आणून ठिकठिकाणीं नाकेबंदी केली आणि मराठी फौज राजवाड्याचे बाहेर ठेवून आपणही राजवाड्यांत गेला. वजीर अब्दुल्ला व अजितसिंग रात्रभर वाड्यांत राहिले. बादशहाची व त्यांची पुष्कळ बोलाचाली व शिवीगाळ झाली. बादशहाचा राग अनावर झाला. सय्यदांनीं वाडा ताब्यांत घेऊन शहराची नाकेबंदी केली. ता. २८ फेब्रुवारी, स. १७१९ रोजीं सकाळीं दिल्लींत भयंकर देखावा प्रकट झाला. जिकडे तिकडे सय्यदांच्या फौजा दौडूं लागल्या. महंमद अमीनखान कांहीं लष्करी लोकांसह वाड्यांत जात असतां रस्त्यांत मराठ्यांची गर्दी होती, त्या गर्दीतून अमीनखानाचे लोक एकमेकांस लोटीत जाऊं लागले, तेव्हां त्यांची व मराठ्यांची मारामारी सुरू झाली. या मारामारींत मराठे पळून जात असतां त्यांचे लोक दोन हजारपर्यंत कापले गेले.†

इकडे सय्यदांनीं बादशहास कैद करून रफीउद्दराजत यास बादशाही तख्तावर बसविलें. त्यानंतर दोन महिन्यांनीं फर्रुखसियरचा खून करण्यांत आला. या कामांत अजितसिंगाचें सय्यदांस साह्य असल्यामुळें त्याची लोकांत मोठी नाचक्की झाली. रस्त्यानें अजितसिंग व त्याचे लोक जाऊं लागले म्हणजे नाना तऱ्हेच्या शिव्या देऊन लोक त्यांची उघड निंदा करीत. बुंदीचा राजा बुधसिंग यानें मात्र बादशहास झाली तेवढी मदत केली. त्यांत त्याचा चुलता जैतसिंग व त्याचे दुसरे पुष्कळ साथीदार मारले गेले. कोट्याचा भीमसिंग सय्यदांस सामील होता, त्यानें बुधसिंगाचा पाडाव केला. तेव्हां बुधसिंगानें दिल्लींतून पळून जाऊन आपला बचाव केला. सय्यदांचें प्राबल्य झाल्यावर जयसिंग वगैरे प्रमुख राजे बादशाहींतून आपलें अंग काढून आपापल्या राज्यांत निघून गेले. मुळापासून त्यांचें मन बादशहाशीं अनुरक्त नव्हतेंच.

लगेच माळव्याच्या सुभेगिरीवर निजामाची नेमणूक सय्यदांनीं करविली. होतां होईतों कोणास दुखवावयाचें नाहीं, नरमाईनें प्रसंग निभावून न्यावयाचा हा शाहूचा दंडक बाळाजीनें बरोबर पाळिला. दिल्ली येथें निजामानें पेशव्यास भाईचारा ऊर्फ मेजवानी केली. अर्थात् सनदा घेऊन परत येतांना निजामाकडून माळव्यांत बाळाजीस बिलकूल विरोध झाला नाहीं. उलट निजामानें बादशहापाशीं बाळाजी व अंबाजी त्रिंबक यांची विशेष तारीफ

† या राज्यक्रांतीचें व मराठ्यांच्या कत्तलीचें वर्णन 'सियारुल मुताखरीन' मध्यें भरपूर आहे, तें अभ्यासूंनीं अवश्य वाचावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली. सवाई जयसिंग, अजितसिंग यांनींही मराठ्यांचे करार पूर्णपणें पाळण्याचें कबूल केलें. गुजरात, माळवा या प्रांतांच्याही सनदा मिळवाव्या अशी शाहूची ताकीद बाळाजीस होती, पण ती सिद्धीस गेली नाहीं. तथापि पुढें तो उद्योग बाजीरावानें पुरा केला. पूर्वी ठरलेले करार कायम करून मराठे सरदारांस व फौजेस सय्यदांनीं दक्षिणेंत पाठविलें. मदनसिंग व बाया मंडळी कैदेंत होती, ती बाळाजी विश्वनाथाचे स्वाधीन करण्यांत आली. चौथाईचा करार ता. ३ मार्च, १७१९ रोजीं व सरदेशमुखीचा करार ता. १५ मार्च, १७१९ रोजीं पुरा झाला. हे दोन करार व स्वराज्याचा करार असे तीन मराठ्यांचे हातीं आले. ता. २० मार्च, १७१९ रोजीं बाळाजी विश्वनाथ दिल्ली सोडून परत निघाला. बाळाजी पुढें काशीयात्रा करून जून मासांत औरंगाबादेस व जुलैंत सातान्यास पोंचला. येसूबाई थोडे दिवस अगोदरच पुढें आली असावी. ‡

दिल्लीच्या दंगलीचें वर्णन टॉडच्या राजस्थानांत दिलेलें रसभरित आहे. स. १७१८ त अब्दुल्ला वजिराचें व बादशहाचें अगदींच फाटलें, तेव्हां बादशहानें अजितसिंगास गुजरातच्या कारभारावरून लगबगीनें दिल्लीस बोलाविलें. सर्वत्र भयाचीं चिन्हें फैलावलीं. कांहीं तरी भयंकर प्रकार होणार असा रंग दिसूं लागला. सय्यद हुसेनअली मराठ्यांची फौज घेऊन दिल्लीस पोंचला, त्या वेळीं त्याचा चेहेरा अक्राळविक्राळ दिसत होता. राजवाड्याजवळ त्याची नौबत वाजली तो आवाज भावी संकटाचा सूचक होता. हुसेनअली-बरोबर असंख्य घोडेस्वार होते, त्यांच्या पायांच्या धुळीनें सर्व शहर व्यापून गेलें. हे मराठ्यांचे स्वार होत. दिल्लीच्या उत्तरभागीं या फौजेचा तळ होता. पुढें अब्दुल्ला, अजितसिंग व हुसेन यांच्या गांठी पडल्या. बादशहानें भीत भीतच त्यांचें अभिनंदन केलें. त्याचे मोगल साथीदार आपल्या घरांत लपून बसले. जयसिंगाची स्थिति तेल संपलेल्या दिव्यासारखी झाली. अजितसिंगाच्या छावणींत बसून सय्यदांनीं आपले बेत ठरविले. ते तडीस नेण्यास अजितसिंग घोड्यावर बसून पुढें झाला. आपले राठोड साथीदार बरोबर घेऊन तो ठिकठिकाणीं पहारे बसवीत राजवाड्यांत गेला. प्रलयकालच्या अग्नीसारखा अजितसिंग चमकत होता. त्यानें सर्व खजिना लुटला. बादशहाच्या संरक्षणास कोणीही धावून आलें नाहीं. जयसिंग अगोदरच आपलें अंग काढून बाजूस राहिला. पुढें फर्रुखसेयरचा

‡ खं. १५, २९८; खं. २ पृ. ३२-३६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खून होऊन चार दोन महिने रक्तपात झाल्यावर सय्यदांनीं महंमदशहाची तख्तावर स्थापना केली. फरुखसेयरबरोबरच जयसिंगाची सर्व हिंमत खलास झाली. जयसिंगाचा सूड घ्यावा अशी सय्यदांची इच्छा होती, परंतु अजितसिंगानें जयसिंगावर शस्त्र धरण्याचें नाकारिलें. उलट त्यानेंच जयसिंगाचा बचाव केला. नवीन बादशहानें अजितसिंगास गुजरातची सुभेदारी दिली. तें काम स्वीकारून जयसिंग व बुधसिंग यांसह अजितसिंग निघून आपल्या मारवाडच्या राज्यांत गेला. पुढें वर्ष सहा महिन्यांत दिल्लीस सय्यदांचा पाडाव झाल्यावर अजितसिंगाचा सूड घ्यावा असें नवीन बादशहानें मनांत आणिलें, तें ऐकून अजितसिंगानें पुनः तरवार हातीं घेऊन अजमीर वगैरे मोगलांचीं ठाणीं व गुजरातपैकीं बराच भाग काबीज केला. त्याचा मुलगा अभयसिंग आपल्या नांवाचें सार्थक करून बापाचें साह्य मोठ्या तत्परतेनें करूं लागला. दोघांनीं मिळून बादशहाचा प्रदेश उध्वस्त करून थेट दिल्ली-आग्रापावेतों चाल केली. तेव्हां बादशहानें जयसिंगास मध्यस्थीस घालून अजितसिंग व अभयसिंग यांची समजूत केली. यानंतर ता. २३ जून, स. १७२४ रोजीं अजितसिंग मुलाच्या हस्तें मारिला गेला. अजितसिंग ता. १९ फेब्रुवारी, स. १६७९ रोजीं जन्मला तेव्हांपासून त्याचा प्रतिपाळ दुर्गादास राठोड यानें केला. पुढें तो मोठा बाणेदार निघून त्याचा बाप जशवंतसिंग यास औरंगजेबानें दुष्टपणानें वागविलें त्याचा भरपूर सूड त्यानें बादशाहीवर घेतला. जयसिंगास जसा आग्रा प्रांताचा लोभ होता, तसा अजितसिंग व अभयसिंग यांस गुजरातचा लोभ होता. यामुळेंच अभयसिंगाचें व गायकवाडांचें पुढें वांकडें येऊन त्यानें पिलाजी गायकवाडाचा खून करविला.

सय्यदांनीं फरुखसेयरवर जुलूम चालविला, त्यांत जयसिंगानें बादशहाचा पक्ष घेऊन सय्यदांस मदत केली नाहीं, सबब त्यांनीं त्यास दिल्लींतून काढून दिलें. त्या वेळचें एक पत्र, जयसिंगानें उदेपुरचा चतुर प्रधान बिहारीदास यास लिहिलेलें, फाल्गुन सं. १७७५ (माहे मार्च, १७१९) चें टॉडनें दिलें आहे तें असें.—

'अमीरुल्–उमराव हुसेन अलीखान येऊन दाखल झाले आहेत. त्यांच्या मार्फत बाळाजी पंडित यांजबरोबर करार ठरले आहेत. आमच्याशीं हुसेन अली मोठी दोस्ती दाखवितात. त्यांनीं आम्हांस दिल्लींतून निघून जाण्याची सूचना केली. किसनसिंग व जीवलाल यांनींही तीच सल्ला दिली. त्यावरून मी बादशहाकडे अर्जी करून निघून जाण्याचा हुकूम मागितला. त्याप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्हांस हुकूम मिळतांच फाल्गुन शुद्ध ९ (ता. १७ फेब्रुवारी, स. १७१९) रोजीं आम्ही छावणी उठवून निघालों. रावराजे बुधसिंग बुंदीकर यांसही त्या वेळीं आम्हीं आपले बरोबर बोलाविलें. परंतु त्यांस हें पसंत न पडतां, ते सय्यद अब्दुल्लाचे फौजेस जाऊन मिळाले. अजितसिंग व ते एकत्र झाले. कोटाचे भीमसिंगाची फौज येऊन त्याची यांची लढाई झाली, तींत जैतसिंग हाडा मारले जाऊन बुधसिंग पळून गेले आम्ही त्यांच्या मदतीस फौज पाठविली. बादशाहाची सर्व जिंदगी सय्यदांचे हस्तगत झाली आहे. सय्यदांना तुम्ही ओळखतांच. आम्ही आतां आपले राजधानीस जात आहों. राणासाहेबांस पुष्कळ गोष्टी कळवावयाच्या आहेत. सबब आपण अंबर येथें येऊन भेटावें. कळावें. '§

वरील हकीकती वाचून त्या वेळच्या भयंकर घडामोडींची कल्पना होते. वाचकांची समजूत स्पष्ट व खुलासेवार पडावी म्हणून या हकीकती तपशीलवार दिल्या आहेत. मराठे, मोगल व राजपूत या तिघांचा यांत संबंध कसा येतो हें ह्या तपशिलावरून कळून येईल.

दिल्लीच्या वरील प्रसंगांत निजाम उल्मुल्कनें मराठ्यांशीं सलोखा ठेवून पेशव्यास ' भाईचारा ' म्हणजे मेजवानी दिली. दिल्लीस विशेष मर्दुमकी गाजविण्याचा प्रसंग मराठ्यांस आला नाहीं. फक्त शहरच्या रस्त्यांत अमीन-खानाशीं मराठ्यांची मारामारी झाली तींत १५०० मराठे कापले गेले, त्यांत संताजी भोसले व बाळाजीपंत भानु हे दोघे प्रमुख गृहस्थ मृत्यु पावले. त्यांची भरपाई व फौजेचा खर्च सय्यदांपासून बाळाजीनें चुकवून घेतला. मातुःश्री-सह बाळाजी ता. ४ जुलै, स. १७१९ रोजीं सातार्‍यास दाखल झाला.

' महाराजांच्या भेटी झाल्या, मुलें माणसें भेटविलीं. मातुःश्रींची भेट झाली. यावरून बहुत संतोषी होऊन कृतार्थ झाले. सय्यदांकडून पन्नास हजार रुपये दररोज पावत होते, त्याजपैकीं निंमे फौजेस खर्च करून, बाकी खजिना बाळगून सातार्‍यास महाराजांचे दर्शनास गेले.'† दिल्लीच्या स्वारींतून आल्यानंतर बाळाजीपंतांनीं ऐशीं लक्ष वराई (?) व तीस लाख रुपये जामदारखान्यांत भरले व फौजेचे देण्याचा बोभाट महाराजांकडे तिळभर ठेविला नाहीं. वरकड सरदारांस कामगिरी सांगितली म्हणजे त्यांचे लोकांचा गवगवा सरकारांत पडून मनस्वी देणें लागत होतें. बाळाजीपंताचे कारभारापासून कोणास पैसा देणें पडूं

§ टॉड, भाग १, पृ. ३२३. † खं. ४-पे. ब.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नये असा तह झाला. ¶ येणेंप्रमाणें दिल्लीवरची ही पहिली स्वारी सफळ झाली. स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखीच्या बादशाही सनदा मिळाल्यानें मराठमंडळास आनंद झाला. शाहूस कृतार्थ वाटलें. संभाजीचा मराठी राज्यावरील हक्क कायमचा निकालास लागून शाहूची मालकी सिद्ध झाली. शिवाय या स्वारींत पैशाचीही प्राप्ती झाली. खर्च भागून बराचसा खजिना साताऱ्यास आला. सर्व सरदारांस व लोकांस बादशहाकडून वस्त्रें पोषाक वगैरे मिळाले. परसोजीचा दासीपुत्र संताजी भोसले पडला, त्याचा भाऊ राणोजी यास 'सवाई संताजीराव' असा किताब बादशहानें दिला. शाहूनें बाळाजी वगैरे मंडळीस सामोरे जाऊन बहुत सन्मान केला. त्यांनीं नजरा केल्या. ज्यांनीं कामें केलीं त्यांस बक्षिसें इनामें दिलीं. पांच महालांचें सरदेशमुखी वतन प्रधानपंतांस महाराजांनीं करून दिलें. सेनापति यांसही वतन इनाम गांव दिल्हे. भानूच्या कुटुंबास इनामें दिलीं. बाळाजी महादेव भानूचाच नातू पुढें प्रसिद्धीस आलेला नाना फडणीस होय.

बाळाजीपंत भानु चौथाईच्या सनदा घेऊन पेशव्याचे पालखींत बसून जात असतां दिल्लींतील लोकांच्या हस्तें मारला गेला, ही आख्यायिका खरी नाहीं. मात्र मराठे सनदा घेऊन जातात हा प्रकार दिल्लींतील लोकांस आवडला नाहीं ही गोष्ट खरी. बाळाजी महादेवाच्या मृत्यूचा उल्लेख शाहूनें ऑगस्ट, स. १७१९ च्या खालील आज्ञापत्रांत केला आहे. 'राजश्री बाळाजी महादेव भानु बाळाजी पंडित प्रधान यांजबरोबर मजमूनिसवतीनें फडाणिसी लिहिण्याचें प्रयोजन होतें, सबब पंडित प्रधान फौजेसहवर्तमान दिल्लीस गेले, तेव्हां बाळाजी महादेव स्वारीस होते. दिल्लीचे मुक्कामीं युद्धप्रसंग झाला ते समयीं बाळाजी महादेव मृत्यु पावले. याजकरितां रामाजी महादेव व जनार्दन बल्लाळ यांचें चालवणें स्वामीस आवश्यक जाणोन, स्वामी उभयतांवरी कृपालु होऊन मौजे बांकसई गांव इनाम दिला असे,' (२.८.१७१९). दिल्लीहून मंडळी परत आल्याबरोबर लगेच ही सनद देण्यांत आली आहे.

बाळाजीच्या या स्वारीनें मराठ्यांचा दृष्टिक्षेप नेहमींच्या राहणींतही पुष्कळच वाढला. दक्षिणच्या मानानें उत्तरेंतील समृद्ध राहणीची व बादशाही वैभवाची ओळख प्रथम मराठ्यांस होऊन, त्याची पुनरावृत्ति पुढें वारंवार होऊं लागल्यामुळें उत्तरेंतील रिवाज, राहणी व ऐषआराम यांचा फैलाव महाराष्ट्रांत होऊं लागला. भोजनाचे पदार्थ, कपडालत्ता, भाषा, रिवाज इत्यादि

¶ भा. व. श्या. म. व. पृ. ५३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबतींत महाराष्ट्रांतील जीवन हळूहळू समृद्ध व बादशाही थाटाचें होऊं लागलें. ही गोष्ट त्या वेळचे कागदपत्र वाचून मनांत येते.

५ मातुःश्री येसूबाई.—येसूबाईचा शेवट मोठा गोड झाला, आणि दक्षिणेंत येऊन दहा पांच वर्षांवर आपल्या भाग्यशाली पुत्राजवळ राहून नंतर ती निजधामास गेली. दिल्लीहून ती दक्षिणेंत मुळीं आलीच नाहीं, असा समज आहे तो खरा नाहीं. या संबंधानें येसूबाईच्या उत्तरकालीन चरित्राची थोडी परिस्फुटता करणें अवश्य आहे.

स. १६९० त येसूबाईला बादशहानें कैद करून आपलेजवळ ठेविलें, तेव्हां त्या संकटांत तिनें मोठ्या चतुराईचें वर्तन ठेवून स. १७०७ पर्यंत शिताफीनें दिवस काढिले. शाहूची बायको अंबिकाबाई ही शाहूची सुटका होण्यापूर्वीच वारली. पुढें त्याची आई येसूबाई व बायको सावित्रीबाई, संभाजीचा दासीपुत्र मदनसिंग आणि दुसऱ्या दोघी स्त्रिया दुर्गाबाई व जानकीबाई, बहुधा मदनसिंगाच्या बायका, आणि कांहीं नोकर, इतकी मंडळी दिल्लीस गेली. त्यांस बाळाजीनें सोडवून दक्षिणेंत आणिलें. येसूबाई दक्षिणेंत आली कीं नाहीं याजबद्दल संशय वाटण्याचें कारण नाहीं. § संभाजी आपल्या पत्रांत शाहूस लिहितो, 'मातुःश्री आऊसाहेब आली, तें वर्तमान अवगत झालें.' याशिवाय आणखी अनेक उल्लेख आहेत. दुसऱ्या एका पत्रांत संभाजी लिहितो, 'दैवगतीनें मा० सावित्रीबाईस परलोकवास झाला, म्हणोन वर्तमान अवगत होऊन परम श्रम प्राप्त झाले.' म्हणजे ही सावित्रीबाई शाहूची बायको, रुस्तुमराव जाधवाची कन्या, हीसुद्धा येसूबाईबरोबरच दक्षिणेंत येऊन पुढें केव्हांतरी वारली. येसूबाई मरण पावली तेव्हां खालील पत्र संभाजीनें शाहूस लिहिलें. शाहू व संभाजी यांचा स. १७३१ सालीं तह होऊन प्रेमभाव जडला, त्यानंतरचें हें पत्र बहुधा असावें. ‡

§ शिवछत्रपतीची सून, संभाजीची बायको व शाहूची मातुःश्री येसूबाई इजवर एक घाणेरडा आरोप एका मुसलमान किल्लेदारानें आणिल्याची हकीकत मॉडर्न रिव्ह्यूच्या जुलै, १९१६ च्या अंकांत प्रसिद्ध झाली, त्याचें निरसन प्रस्तुत लेखकानें 'नवयुग' मासिकाच्या मे, १९१७ च्या अंकांत केलें. आतां त्याच्या उल्लेखाचेंही कारण राहत नाहीं.

‡ हें व खालील पत्रें रा. य. रा. गुप्ते यांच्या श्रमानें उपलब्ध झालीं. वि. ज्ञा. वि. नोव्हेंबर १९२१. खं. १५. ३०१, महाराष्ट्र साहित्य मार्च १९२३, आणि नवयुग १९१७ मे, यांत वरील सर्व संदर्भ आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'श्रीमत् सकलतीर्थस्वरूप राजश्रिया विराजमान राजश्री शाहूराजे दाजी वडिलांचे सेवेसीं, अपत्य संभाजीराजे दंडवत विनंति उपरी. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. मातुःश्री येसूबाई साहेब यांसी वेथा होऊन कैलासवास जाला म्हणोन लिहिलें, त्यावरून ममताविषयें चित्तास परम खेद प्राप्त जाला. हा अयत्नी मार्ग ऐसाच आहे. वडील सर्वज्ञ आहे. विवेकेंकरून चित्ताचें सांतवन होय तें केलें पाहिजे. विशेष लिहावें तरी वडील सुज्ञ आहेत.'

संभाजी व येसूबाई यांचें लग्न स. १६६९ च्या सुमारास झालें, त्या वेळीं तिचें वय दहा वर्षांचें होतें असें धरल्यास, मरणसमयीं तिचें वय सत्तरांहून जास्त असलें पाहिजे. स. १६९० त रायगड किल्ला पडल्यावर ती झुल्फिकारखानाचे हातीं कैदेंत सांपडली, तेव्हां तिचें वय सुमारें ३० वर्षांचें असून तिच्याजवळ तिचा आठ वर्षांचा मुलगा शाहू व सुमारें तितक्याच वयाचा मदनसिंग आणि वडीलपैकीं शिवछत्रपतींची बायको सकवारबाई वगैरे मंडळी होती. येसूबाईचें माहेरचें नांव जिऊबाई होतें. §

येसूबाईची मान्यता मोटी होती. शाहू व संभाजी वगैरे तिला मोठ्या सन्मानानें वागवीत. संभाजीचा आदर तर वरील पत्रांत व्यक्त झालाच आहे. नानाप्रकारचीं संकटें भोगून शेवटीं सुखाचे दिवस शाहूस लाभले याचें श्रेय तो मातुश्रीस देई. एकंदरींत शिवाजी व जिजाबाई यांप्रमाणेंच शाहू व येसूबाई यांजबद्दल मराठमंडळास मोठा पूज्यभाव वाटे. येसूबाई व ताराबाई या जावा, परंतु त्यांच्या स्वभावांतील व कर्तबगारींतील अंतर लक्षांत ठेविल्यास ऐतिहासिक दृष्टीनें त्यांचीं चरित्रें मननीय वाटतील. तारीख २५.१.१७२० रोजीं येसूबाईनें रघुनाथ भट्ट सवलीकर वास्तव्य कऱ्हाड पृथ्वीप्रदाक्षिणा करून आले त्यास ३० होनांचें वर्षासन करून दिलें. †

शाहूचीं दोन लग्नें पूर्वी औरंगजेबानें केल्याचें मागें सांगितलें आहे. पैकीं एक बायको अंबिकाबाई शाहू कैदेंत असतांच वारली. दुसरी बायको सावित्रीबाई येसूबाईबरोबर दिल्लीस गेली, तीही परत दक्षिणेंत आल्यावर वारली. साताऱ्यास बाळाजी विश्वनाथाचे साह्यानें शाहूचा जम बसल्यावर त्यानें आणखी दोन लग्नें केलीं, एक राणोजी शिर्क्यांची कन्या सकवारबाई व दुसरी मोहित्यांकडील सगुणाबाई. या दोन अनुक्रमें थोरली धनीण व धाकटी राणी या नांवानें ओळखल्या जातात. या दोघींचीं लग्नें महाराजांनीं एकदमच केलीं असें

§ खं. ३. पृ. १५४. † इ. सं. पे. द. पृ. २५७ ले. २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खालील उल्लेखावरून दिसतें. "शाहूमहाराजांनीं पुरंदरास येऊन आपलीं दोन लग्नें केलीं, तीं गडाखालीं नारायणाचे देवळीं सरनाइकांचे आंबराईत केलीं." ‡ ता. ९.७.१७१४ च्या एका पत्रांत हुजूरच्या लग्नपट्टीचा उल्लेख आहे. 'सांप्रत राजश्रीचे व चिरंजिवाचे लग्नप्रसंगामुळें खर्चाची ओढ झाली' असें बाळाजी विश्वनाथ ता. ७.४.१७१७ रोजीं लिहितो. 'दरुणी महाल'चा उल्लेख २.६.१७१६ चा उपलब्ध आहे. 'लग्न राजश्री स्वामी' असे शब्द ता. ५.३.१७२१ च्या रोज खर्चांत आहेत. अशा या विसकळित उल्लेखांचा मेळ घालणें कठिण पडतें. याच्याच पुढें ता. २९.४.१७२१ रोजीं लग्नखर्च फत्तेसिंग भोसले याचा दाखल आहे. थोरली धनीण व धाकटी राणी असे शब्दप्रयोग रूढ होण्यास दोघींचीं लग्नें एकदम न होतां कांहीं अंतरानें झालीं असा तर्क केल्यास हीं लग्नें स. १७१४ व १७२१ या सालांच्या दरम्यान केव्हां तरी झालीं एवढेंच म्हणतां येईल. विरूबाई रक्षा शाहूजवळ अगोदरच होती, तिच्या संबंधानें वरील दरुणी महालचा उल्लेख असूं शकेल. दोनही राण्यांवर विरूबाईची देखरेख असे. सगुणाबाई धाकटी बायको ता. २५ ऑगस्ट, स. १७४८ रोजीं वारली आणि सकवारबाईनें सहगमन केलें.

‡ शि. च. सा. १ पृ. १०३; पे. द. ७.२०; पे. द. ३० पृ. २३४, २४१, २४३, ब. च. ले. १९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७

कारभाराची पहिली आंखणी

१ तीन पृथक् बाबती
२ एकंदर उत्पन्नाची वांटणी
३ या व्यवस्थेंतील दोष
४ सरंजामी पद्धत
५ सरंजामी पद्धत, बदलता काळ
६ मराठेशाहीच्या फैलावाचें बीज
७ मूळच्या उद्देशाचा विपर्यास
८ सरंजामी पद्धतीचा उपयोग

१ तीन पृथक् बाबती.—स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या हक्कांच्या तीन सनदा दिल्लींत बादशहाचें शिक्कामोर्तब होऊन बाळाजी विश्वनाथानें स. १७१९ त साताऱ्यास एकाच वेळीं आणल्या, त्यामुळें लोकभाषेंत त्यांचा उच्चार एकत्र होतो इतकेंच. पण त्या प्रत्येक बाबतीचें स्वरूप सर्वथा भिन्न आहे हें पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं, सबब तें स्पष्ट करणें जरूर आहे.

शिवाजीनें **स्वराज्य** स्थापलें, तें पुढें औरंगजेबानें जिंकलें. तें परत मिळविण्यासाठीं बादशहाशीं मराठ्यांनीं प्रचंड झगडा केला. पुढें शाहू दक्षिणेंत आला तेव्हां तें स्वराज्य बहुतेक मोगलांच्याच हातांत होतें. शाहूनें बादशहाची ताबेदारी कबूल केली तेव्हां तें पूर्वीचें स्वराज्य त्याच्या हवालीं करण्याची सनद बादशहानें स. १७१९ त दिली. या स्वराज्याचा विस्तार निरनिराळ्या वेळीं कमी जास्त होत गेला.

दुसरी बाबत **सरदेशमुखीची**. हिचा उगम शिवाजीच्याही पूर्वींचा, किंबहुना मुसलमानांच्या पूर्वींचा आहे. महाराष्ट्रांत वसाहती होऊन लावणी संचणी सुरू झाली तेव्हां सरकारदस्त ठरविण्यांत आला. तो वसूल करण्याचें सुलभ साधन म्हणून महालोमहालीं देशमुख नेमण्यांत आले, आणि ठरलेल्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा आपल्या मेहनतीबद्दल घेऊन बाकीची रक्कम त्यांनीं सरकारांत भरावी अशी योजना करण्यांत आली. अनेक गांवच्या पुष्कळ देशमुखांवर एक मुख्य असा सरदेशमुख नेमण्यांत आला. देशमुखाचें लिहिणें करण्यास कुळकर्ण्यांची नेमणूक झाली. अशी ही ग्रामव्यवस्था चालू असतां शिवाजीचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वराज्य निर्माण झालें. शिवाजीनें असें ठरविलें कीं छत्रपति हाच एकंदर स्वराज्याचा सरदेशमुख. तो हें वतन आपल्या मर्जीप्रमाणें पाहिजे त्यास देऊं शकेल. ही शिवाजीची योजना पुढें शाहूनें स्वीकारली. तो हक्क वसूल करण्यास मोगल अधिकारी हरकत करूं लागले, म्हणून शाहूनें त्याजबद्दलची सनद बादशहाकडून मिळविली. देशमुखीचें वतन आपलें पिढीजाद आहे असें मराठी सरदार कां समजत तें यावरून स्पष्ट होईल. हा हक्क मोगलांनीं मराठ्यांस नवीन दिला असें नाहीं. आणि तो स्वराज्याबाहेरील मोगल प्रदेशावर चालूही नव्हता.

चौथाईचा प्रकार तर अगदींच भिन्न आहे. शिवाजीनें औरंगजेबाशीं युद्ध सुरू करून मोगल प्रदेशावर स्वाऱ्या आरंभिल्या, तेव्हां लोकांनीं त्याजकडे विनवण्या केल्या कीं आम्ही गरीब रयत, आम्हांस उपद्रव करूं नये. त्यावरून शिवाजीनें जाहीर केलें कीं स्वराज्याबाहेरील प्रदेशांनीं आमच्या फौजेच्या खर्चा-साठीं सालोसाल चौथाईची रक्कम म्हणजे एकंदर वसुलाचा चौथा अंश आम्हांस देत जावा, म्हणजे आम्ही अशा मुलखास उपद्रव देणार नाहीं, उलट दुसरा कोणी चालून आला तर आम्ही त्याचें शासन करून देशाचें संरक्षण करूं. अशा रीतीनें स्वराज्याबाहेरचा मोगली प्रदेश कबजांत आणण्याची ही पद्धत शिवाजीनें आरंभिली, तिचा फैलाव पुढें मराठे सरदारांनीं औरंगजेबाशीं लढतांना केला. चौथाई वसूल करण्याच्या निमित्तानें माळवा, बंगाल वगैरे प्रांतांत मराठे संचार करूं लागले, तो उच्छेद बंद पाडण्यासाठीं बादशहानें दक्षिणच्या सहा मोगली सुभ्यांवर चौथाई हक्क वसूल करण्याची सनद शाहूस दिली. पुढें हा हक्क सर्व मोगल बादशाहीवर लागू करून मराठ्यांनीं आपली सत्ता देशभर वाढविली. **चौथाईचा हक्क स्वराज्यांत नसून, स्वराज्य म्हणजे संपूर्ण मालकीचा प्रदेश व त्याबाहेरचा मुलूख चौथाईचा करभार देणारा संरक्षित प्रदेश**, ही फोड अभ्यासकांनीं लक्षांत बाळगली पाहिजे. तीनही सनदां-तील हुकूम बरोबर पाळण्याबद्दल बादशहानें आपल्या प्रांतिक अंमलदारांस हुकूम सोडले. या चौथाईच्या पद्धतींचेंच परिणत स्वरूप वेल्स्लीची तैनाती फौजेची योजना होय. मराठ्यांच्या व वेल्स्लीच्या पद्धतींचें बीजतत्त्व एकच होतें. परदेश जिंकल्यावर तेथें शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी जेत्यांवर येऊन पडते. त्यास खर्च लागतो, तो कोणत्या तरी रूपानें पराजितांवर बसविण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येतो. मुसलमानांनीं सातव्या शतकांत इराण जिंकला तेव्हां तेथें जझिया कर त्यांनीं बसविला त्याचेंही प्रयोजन हेंच. 'परमुलखावर ताव मारून वाटेल तसें द्रव्य उकळण्याचा सोयीचा व हातांतला उपाय म्हणजे ही चौथाई' असें याचें वर्णन ओवेननें केलें आहे तें कांहीं खोटें नाहीं.† वेल्स्लीनें या पद्धतीचीं मुख्य तत्त्वें स्वीकारून, त्यांना विशिष्ट बंधनांचें स्वरूप दिलें. इंग्रज सत्ता सार्वभौम, या सत्तेच्या हुकमाशिवाय मांडलिकांनीं परराष्ट्रीय लोक नोकरींत ठेवूं नयेत, आपसांत किंवा परराष्ट्रांशीं युद्ध, तह वगैरे व्यवहार करूं नयेत अशा प्रकारचीं विशिष्ट बंधनें, फ्रेंच सत्तेचें उच्चाटन करण्याच्या हेतूनें, वेल्स्लीनें कराराच्या रूपांत स्पष्टपणें बनविलीं, पण तीं मराठ्यांच्या चौथाईंत प्रच्छन्न रूपानें होतींच.

या तीन बाबतींच्या वेगळया तीन सनदा बादशहाकडून बाळाजी पेशव्यास मिळाल्या, त्यांचा मतलब स्पष्ट करून सांगितला पाहिजे. मराठशाहीची रचना व विस्तार वरील तीन बाबतींवर अवलंबून आहे. या बाबतींच्या सनदा स. १७१९ सालच्या महंमदशहाच्या नांवानें लिहिलेल्या असून त्या सातारच्या महाराजांचे दप्तरांत ग्रँट डफनें पाहिलेल्या होत्या. स्वराज्याच्या सनदेंत प्रांतांचा उल्लेख आहे ते हे—१ पुणें, २ बारामती, ३ इंदापुर, ४ वाई, ५ मावळें, ६ सातारा, ७ कसराबाद (कऱ्हाड ?) ८ खटाव, ९ माण, १० फलटण, ११ मलकापुर, १२ तारळा, १३ पन्हाळा, १४ आजरें, १५ जुन्नर आणि १६ कोल्हापुर. कोप्पल, गदग, हल्याळ वगैरे तुंगभद्रेच्या उत्तरेकडील परगणे व शिवाजीनें जिंकलेले सर्व किल्ले आणि कोंकण यांचाही निर्देश स्वराज्यांत केलेला आहे. किल्ले वगैरे सर्व धरून एकंदर महाल ३५ ची याद असून, प्रत्येक महालापुढें त्यांतील तर्फा दाखविलेल्या आहेत. कोंकणांत खालील तर्फांचा उल्लेख आहे. ¶ रामनगर, गणदेवी सुद्धा, जव्हार, चौल, भीमगड, भिवंडी, कल्याण, राजपुरी, दाभोळ, जावळी, राजापुर, फोंडा, अंकोला व कुडाळ.

शहाजीच्या पूर्ववयांत पुणें व सुपें मिळून जी एक लहानशी जागीर होती, ती शिवाजीनें स. १६४४ त स्वतंत्र संस्थानाच्या पदवीस आणिली. विजापुरच्या आदिलशाहींतून स्वतंत्र झालेलें हें मावळांतील चिमुकलें संस्थान वाढत वाढत

† These imposts were a convenient pretexst for indefinite fiscal exaction and political interference.

¶ पहा खं. ८ पृ. १०३: तह व करारमदार पृ. ५, ६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स. १६७४ त सह्याद्रीच्या पूर्वेस व पश्चिमेस बागलाणपासून फोंड्यापर्यंत वीस तीस मैलांच्या अंतरानें पसरलें. ह्या प्रसाराला ‘ स्वराज्य ’ अशी संज्ञा मिळाली. पुढें शाहूच्या आगमनापर्यंत ह्या स्वराज्याच्या भानगडी कसकशा होत गेल्या, त्यांचें निवेदन मागें ठिकठिकाणीं आलें आहे. औरंगजेबानें ह्या स्वराज्याला आपली संमति कधींच दिली नाहीं. तो ह्या स्वराज्यांतील मुलखाची गणना आपल्या औरंगाबादच्या सुभ्यांत करी. त्यानंतर वरील तहानें जें स्वराज्य स. १७१९ त शाहूच्या पदरांत पडलें, त्यांत समावेश झालेल्या प्रांतांचा निर्देश वर केला आहे. ह्या स्वराज्याचा विस्तार एकसारखा सलग नव्हता. पश्चिमेस समुद्रकिनाऱ्यापासून पूर्वेस भीमा व नीरा ह्या नद्यांपर्यंत तें पोंचलें होतें. दक्षिणेस गदग, बल्लारी, कोप्पल, हल्याळ वगैरे कित्येक तुटक परगणे शिवाजीच्या वेळेपासूनच स्वराज्यांत होते. तंजावर व जिंजी ह्या प्रांतांना जोडून घेण्यासाठीं शिवाजीनें हे मधले मधले भाग मुद्दाम कबजांत ठेविले होते. खानदेश स्वराज्यांत नव्हता. त्याच्याबदलीं पंढरपुरच्या बाजूस कांहीं मुलूख वरील तहानें शाहूच्या ताब्यांत आला. ह्या स्वराज्याला लागूनच मोगलांचे सहा सुभे होते, त्यांचीं नांवें मागें सांगितलीं आहेत. तंजावर त्रिचनापल्लीसुद्धा ह्या सहा सुभ्यांवर चौथाई व सरदेशमुखी मराठ्यांनीं घ्यावी, असा हा नवीन ठराव झाला. यासंबंधाचें उत्पन्न व खर्च यांची एकबेरजी (ता. ३०.८.१७१९ ची) पाहण्यालायक आहे.§

पैकीं सरदेशमुखी हें मूळचें वतन होतें. मावळे देशमुखांस देशमुखी वतनें होतीं, तशाच प्रकारचें हें सरदेशमुखी वतन होय. ठरीव टापूंतील जमीनमहसूल गोळा करून सरकारांत भरणें व त्या टापूचा बंदोबस्त ठेवणें हें काम सरदेशमुखांचें होतें. ‘ तह लिहून दिल्हा ऐसा कीं यजमान खिदमतीच्या लाजिम्याविशीं कायावाचामनें सादर राहून, रयतीस आबादी विशेष होय व सरकारची दौलत व गुन्हेगारांचें पारिपत्य घडे तें करितील; व पंधरा हजार फौज सुभेदाराच्या समागमें चाकरीस ठेवून रयतीस आपल्याकडोन राजी राखतील; व उजाड गांवांची लावणी तीन सालांत करोन, ऐसा बंदोबस्त करितील जे दुष्टांचा उपद्रव होणार नाहीं. कदाचित् कोणाचे घरीं चोरी जाली किंवा कोणाचा माल चोरीस गेला, तरी चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास देतील. कदाचित् चोरास शिक्षा करोन चोरीचें ठिकाण न लागे, तरी चोरीचे मालाची निशा आपण करितील. शिवाय चवथ व सरदेशमुखींत अधिक लोभ धरणार नाहींत. अगर जाहीर

§ इ. सं. पे. द. पृ. १२८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाल्यास जे रुपये जादा तलबा करोन घेतील, ते सरकार-आलींत दाखल करितील. ऐसा तह असे.' हे करारांतील शब्द लक्षांत ठेवण्याजोगे आहेत.¶

भोसल्यांचीं सरदेशमुखी वतनें प्रथम ठिकठिकाणीं असून शाहू तर सर्व राज्याचा सरदेशमुख आपण असें समजे; आणि आपल्या तर्फेनें तो हाताखालीं इतरांच्या नेमणुका करी. सरकारच्या साऱ्यापैकीं शेंकडा दहा टक्के देशमुखांनीं घेण्याची पूर्वीची वहिवाट होती. आरंभापासूनच ठिकठिकाणचीं भोसल्यांचीं सरदेशमुखी वतनें साधेल त्या रीतीनें मिळविण्याचा शिवाजीचा उद्योग होता.† शहाजहान व औरंगजेब यांची व शिवाजीची त्यासंबंधानें बोलाचाली झाली, परंतु त्यांनीं शिवाजीचे सरदेशमुखीचे हक्क उघडपणें कबूल केले नाहींत. पुरंदरच्या तहांत चौथाईचा किंवा सरदेशमुखीचा उल्लेख नाहीं, असें प्रो. सरकार म्हणतात. स. १६६८ त शिवाजीनें ह्या दोनही बाबतींबद्दल आदिलशाहींतून तीन लक्ष व कुत्बशाहींतून पांच लक्ष रक्कम दरसाल घेण्याचा करार केला; आणि स. १६७१ त मोगलांच्या मुलखांतून हे हक्क शिवाजी राजरोस वसूल करूं लागला.§ त्यानंतर पोर्तुगीज लोकांकडून, बेदनूर व सोंधें येथील राजांकडून आणि पुढें कर्नाटकांतून हे हक्क शिवाजीनें सालोसाल वसूल केले.

आरंभीं शिवाजी सरदेशमुखीचा वसूल फक्त वतन म्हणून करी. परंतु पुढें जसजसा शिवाजीचा उद्योग वाढत चालला, तसतसे दुसऱ्या राज्यांचे संबंध जडत चालले. अशीं राज्यें एकदम जिंकून स्वराज्यांत येण्याजोगीं नव्हतीं. कोणीही जेता परराज्यें जिंकितो तीं एकदम जिंकीत नाहीं, क्रमाक्रमानें तीं कबजांत आणितो. अशा राज्यांवर शिवाजीनें चौथाईचा कर बसविण्याची नवीन कल्पना काढिली. एकंदर वसुलाचा चतुर्थांश त्या राज्यांनीं शिवाजीला द्यावा, आणि त्याचे बदल्यांत शिवाजीनें फौज ठेवून परशत्रूंपासून त्यांचें संरक्षण करावें, असा ह्या चौथाईचा अर्थ होता. स. १७१९ त बादशाहानें आपल्या दक्षिणेंतील सहा सुभ्यांवर चौथाई वसुलाचा हक्क शाहूस दिला; म्हणजे शाहूनें फौज ठेवून त्या सुभ्यांचें संरक्षण करावें, असा ह्या कराराचा अर्थ होतो. तैनाती फौजेची वेल्स्लीनें सुरू केलेली पद्धत अशाच स्वरूपाची पण ज्यास्त स्पष्ट व व्यापक होती. ज्या राज्यांच्या संरक्षणाची हमी इंग्रजांनीं घेतली त्यांची

¶ तह व क. पृ. २३. † खं. ८. ४. § शककर्ता शिवाजी, पृ. १४७ व १५०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ती हमी त्यांनीं पूर्णपणें पार पाडिली. मराठ्यांच्या हातून पुष्कळदा ही हमी पुरी पडली नाहीं, हें पानिपतच्या वगैरे स्वाऱ्यांवरून पुढें निदर्शनास येईल; आणि ही हमी पार पाडण्याकरितांच मराठे सरदारांस निरनिराळ्या ठिकाणीं स्वाऱ्या करण्याचा प्रसंग वारंवार येऊं लागला.

मराठ्यांचे त्रासापासून आपला बचाव करण्याच्या उद्देशानें शाहूच्या आगमनानंतर दाऊदखान पन्नीनें प्रथम त्यांस चौथाई देण्याचा करार केला, तो निजाम उल्मुल्कनें पाळिला नाहीं. तो पुढें हुसेन सय्यदनें कबूल करून मराठ्यांची मदत घेतली; आणि स. १७१९ त बादशहानें तो मंजूर केला. दिल्लीस मिळालेलें चौथाईचें फर्मान ३.३.१७१९ चें व सरदेशमुखीचें १४.३.१७१९ चें आहे. त्यानंतर सहा दिवसांनीं २०.३.१७१९ रोजीं बाळाजी दिल्लीहून परत निघाला. शाहूनें पंधरा हजार फौज मोगल सुभेदार सांगतील तेथें त्यांच्या मदतीस द्यावी, आणि दरसाल बादशहास दहा लाख रुपये खंडणीचे पाठवावे असा करार होता. दक्षिणच्या सहा सुभ्यांचें उत्पन्न त्या वेळीं सालाचें अठरा कोट रुपये ठरलेलें होतें. या वसुलावर शेंकडा १० सरदेशमुखीबद्दल व शेंकडा २५ चौथाईबद्दल, मिळून दरसालची रक्कम शेंकडा ३५ प्रमाणें मराठ्यांस मिळावयाची होती. हे आंकडे कागदावरच होते. प्रत्यक्ष वसूल होतांना मोठी मारामार पडे.

वरील हक्कांच्या बादशाही सनदा मिळाल्यानें आपण शिवाजीचे हेतु तडीस नेले असें मराठमंडळास वाटलें. पण उभयपक्षीं हा एक प्रकारें फसवाफसवीचा प्रकार होता. बादशहानें चौथाई कबूल करणें म्हणजे मराठ्यांच्या संरक्षणाखालीं जाणें असा अर्थ होय. उलट पक्षीं बादशहास मराठ्यांनीं खंडणी देणें म्हणजे 'आपण सार्वभौम व आम्ही ताबेदार' असा बादशहाचा समज मराठ्यांनीं कायम ठेविला. इंग्रजांना ज्याप्रमाणें तैनाती फौजेच्या पद्धतीनें हळूहळू सर्व देश आक्रमण करितां आला, तसाच चौथाईच्या सबबीवर मराठ्यांसही देशभर संचार करण्याची सबब सांपडली. मात्र जो करार व जबाबदारी आपण स्वीकारिली ती पूर्णपणें तडीस नेण्याची तजवीज ठेवणें मराठमंडळाचें कर्तव्य होतें. शाहूनें ही जबाबदारी परिस्थितीशीं झगडण्याकरितां अंगीकारिली, आणि मराठमंडळास नवीन कर्तव्य दाखवून दिलें. धोरण चांगलें मुत्सद्देगिरीचें होतें, परंतु त्यास लागणारें पैशाचें, फौजेचें व एकीचें बळ मराठमंडळास नसल्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वीकारिलेली जबाबदारी त्यांचे हातून पार पडली नाहीं हें वैगुण्य अखेरपर्यंत नडलें. अटकेवर जाण्याचें प्रयोजन यांत दिसून येतें.

२ एकंदर उत्पन्नाची वांटणी.—बादशहाकडून वरील हक्कांच्या सनदा घेऊन आल्यावर त्या उत्पन्नाची वांटणी ठरविण्याचें काम बाळाजीवर आलें, आणि तें त्यानें तत्कालीन परिस्थितीच्या मानानें कसें विल्हेस लाविलें हें सांगितलें पाहिजे. या व्यवस्थेचें स्वरूप पेशव्यांच्या बखरींत काव्येतिहाससंग्रहकारांनीं थोडक्यांत दाखविलें असून ग्रँट डफनेंही त्याची स्पष्टता व चर्चा बरीच केली आहे. तरी पक्षभेदामुळें भिन्न मतें रूढ असून सर्वांची एकवाक्यता होण्यासारखी नाहीं. व्यवस्थेंतील मुख्य मुद्दे सांगतां येतील ते असे.

सरदेशमुखी ही भोसले घराण्याची खासगत वतनी बाब असल्यानें वसुलावर दहा टक्केप्रमाणें या बाबतीचें होणारें सर्व उत्पन्न गादीचे मालकास द्यावयाचें, त्यावर दुसऱ्या कोणाचा हक्क नाहीं, असें ठरविण्यांत आलें. स्वराज्यांतील वसूल व मोगली सुभ्यांवरील चौथाईचा वसूल मिळून जें एकंदर उत्पन्न येईल तोच एकंदर मराठी राज्याचा वसूल होय. या वसुलापैकीं एक चतुर्थांश 'राजबाबती' म्हणून राजाचे खर्चास द्यावयाचा. वसुलाचे बाकीचे तीन चतुर्थांश म्हणजे शेंकडा पंचाहत्तर, 'मोकासा' या नांवानें इतर खर्चाकरितां ठेवावयाचे. या मोकाशांतून 'साहोत्रा' व 'नाडगौडा' असे दोन विभाग राजानें आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल त्यास देण्यासाठीं ठेवलेले होते. साहोत्रा म्हणजे एकंदर वसुलावर शेंकडा सहा, आणि नाडगौडा म्हणजे त्या वसुलाचे शेंकडा तीन. याप्रमाणें ज्या दोन बाबती ठरल्या त्यांपैकीं 'साहोत्रा' चा वसूल शाहूनें सचिवास दिला, आणि तो त्यानें स्वतः प्रांतांतून वसूल करून घ्यावा असें ठरविलें. 'नाडगौडा' ची बाबत शाहू निरनिराळ्या वेळीं मर्जीनुरूप पाहिजे त्यास देत असे. या दोन बाबतींचें शेंकडा नऊ हिस्से व पहिले राजबाबतीचे २५ हिस्से मिळून ३४ वजा केले म्हणजे एकंदर वसुलाचे शेंकडा ६६ प्रमाणें निव्वळ-मोकासा शिल्लक राहतो. हा भाग निरनिराळ्या सरदारांस जागिरीदाखल वाटून देण्यांत यावा असें ठरलें. अशा मुलुखगिरीसाठीं निरनिराळे प्रदेश निरनिराळ्या सरदारांस वाटून देण्यांत आले. राजाची मुख्य फौज पेशवे व सेनापति यांच्या हातांत असून, जेथें जरूर पडेल तेथें तावडतोब जाऊन देशाचा बंदोबस्त करावा अशी त्यांस शाहूची आज्ञा होती. शिवाय खानदेश व बालाघाटचा कांहीं भाग यांत पेशव्यानें वावर करावा, सेनापतीनें बागलाण व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुजरात प्रांतांतील वसूल करावा, सेनासाहेब सुभा कान्होजी भोसले यानें वऱ्हाड पाइनघाटचा प्रदेश व गोंडवणच्या पूर्वेकडील भाग यांत वहिवाट करावी, सरलष्कर यानें गंगथडी व औरंगाबादच्या बाजूस उद्योग करावा, फत्तेसिंग भोसल्यानें कर्नाटकचे बाजूस राहावें, प्रतिनिधीनें नीरेपासून वारणे-पर्यंतचा प्रदेश व हैदराबाद बेदरकडील मुलूख सांभाळावा, चिटणीस व आंगरे यांनीं कोंकणांत काम करावें, आणि पंतसचिवानें आपली पहिली जागीर संभाळून इतरत्र 'साहोत्रा' चा वसूल करावा, अशी सरदारांच्या उद्योगाची सामान्य वाटणी शाहूनें प्रथम करून दिली. एकानें दुसऱ्याच्या प्रांतांत जाऊं नये, अशी त्याच वेळीं ताकीद दिलेली होती. ज्या त्या बाजूची चौथाई वसूल करणें हें या मुलुखगिरीचें मुख्य प्रयोजन होतें. अर्थात् प्रत्येक सरदारानें आपल्या मुलुखगिरीचा हिशेब सरकारांत रुजू करावयाचा असा ठराव होता. जागिरींतील वसूल जरी ज्याचा त्यानें उगवा-वयाचा होता, तरी वरील व्यवस्थेनें बहुतेक सरदारांस राजबाबती, नाडगौडा, साहोत्रा वगैरे संबंधानें एकमेकांच्या मुलखांत उत्पन्नाच्या बाबी मिळाल्यामुळें, त्यांचे व्यवहार पृथक्‌पणें तुटले नाहींत. त्यांना आपल्या उद्योगासाठीं फौजा बाळगाव्या लागत. मुलुखगिरी करावी, पैसा वसूल करून आणावा, तेव्हां फौजेचा व आपला खर्च भागणार असा प्रकार झाला. म्हणजे अगोदर खर्च करावा लागून त्याचें उत्पन्न मागाहून यावयाचें होतें. जागीरदारांस देऊन टाकलेलें शेंकडा ६६ चें उत्पन्न, सरकारच्या खजिन्यांत जमा न होतां परभारें सरदारांनीं वसूल करावयाचें असून, त्यांतून त्यांना आपले खर्च भागवावयाचे होते. सरदेशमुखीचें उत्पन्न मात्र त्यांस राजाकडे पाठवावें लागे. तें वसूल करण्यासाठीं नायब किंवा अजहत सरदेशमुख, म्हणजे आपल्या तर्फेनें काम करणारे, शाहूनें ठिकठिकाणीं नेमून दिले. परंतु वसुलाच्या व्यवस्थेंत एकच निश्चित प्रकार कायमचा असा निर्माण झाला नाहीं. व्यक्ति, परिस्थिति बदलत गेल्या, त्या मानानें निरनिराळया पेशव्यांनीं व कारभाऱ्यांनीं त्या त्या वेळच्या जरुरीप्रमाणें भिन्न व्यवस्था ठरवून निर्वाह केला; आणि अमका फेरफार अमक्या वेळीं अमुक कारणानें झाला, अशी निश्चित माहिती आज मिळत नसल्यामुळें, सामान्य गोळाबेरीज तेवढीच आज आपणापुढें उपलब्ध होते. उदाहरणार्थ, कित्येक सरदारांकडून दरसाल एक ठरीव रक्कम सरकार-पोत्यास जमा व्हावी असे ठराव होते. फत्तेसिंग भोसल्यानें कर्नाटकांतून सात लाख,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रघूजी भोसल्यानें वऱ्हाडांतून दहा लाख, आंगऱ्यानें कोंकणांतून दोन तीन लाख, असे सालोसाल पाठविण्याचा रिवाज होता. सारांश, मुख्य सरकारास थोडी बहुत रक्कम देऊन आपण आपल्या टापूचा कारभार पूर्ण स्वतंत्रतेनें वाटेल तसा करावा अशी पद्धत पडली; आणि सरदार शिरजोर होऊन मुख्य सत्ता दुर्बल होतांच बेबंदशाही व अव्यवस्था माजली. प्रदेश संपूर्णपणें जिंकून तेथील व्यवस्था लागण्याचे पूर्वीच, नुसती लढाईंतील फत्ते ऐकिल्याबरोबर मुलखाची वांटणी व उत्पन्नाची बासलात लावण्याची वहिवाट पडली. त्यामुळें मुलूखगिरीच्या लालुचीनें पुष्कळसे सरदार भराभर बाहेर पडूं लागले, परंतु त्यांच्या स्वैर वर्तनास आळा न राहून स्वतंत्र पंथ काढण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली.

वसुलाची ही पद्धत मूळ बाळाजी विश्वनाथानें स्थापन केली. तिच्यांत थोडाबहुत फेरफार पुढें बाळाजी बाजीरावानें केला. थोरला माधवराव व नाना फडणीस यांनींही जरूर ते फेरबदल केले. तरी तिचा मूळ पाया या पहिल्या पेशव्याच्या हातचा आहे. स. १७१९ त दिल्लीहून आल्यावर त्यानें ही नवीन व्यवस्था ठरविली. ‘ अष्टप्रधान व सरदार यांस जातीचीं वतनें, दरखदार कारखानदारसुद्धा करून देऊन, त्यांस सरंजाम लावून, इनामगांव करून देऊन, बाकी फौजेच्या खर्चास नेमणूक व हुजूरखर्चाकडे नेमणुका केल्या. जास्ती खर्च लागल्यास हुजूरची आज्ञा घेऊन होईल तसें करावें.’ पत्रव्यवहार, हिशेब, खजिन्याचा सांभाळ अशा कामांसाठीं चिटणीस, फडणीस व पोतनीस हे कामगार प्रत्येक सरदारापाशीं व सुभेदारापाशीं नेमून दिलेले असत. महाराजां-पाशीं व अष्टप्रधानांजवळही हे कामगार असत, त्यांस दरखदार अशी संज्ञा होती. चिटणिसानें सर्व पत्रव्यवहार करावयाचा, फडणिसानें सर्व देण्याघेण्याचा हिशेब व झाडा ठेवावयाचा, आणि पोतनिसानें खजिना सांभाळून देवघेव करावयाची, अशी ही कामाची वांटणी होती. हे दरखदार पुरविण्याची पद्धतही ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. राजाच्या चिटणिसानें, फडणिसानें व पोतनिसानें पेशव्यांजवळचे व अष्टप्रधानांकडचे ते ते दरखदार नेमावे, उदाहरणार्थ पेशव्यांकडील चिटणिसानें शिंदे, होळकर वगैरे आपल्या सरदारांकडचे चिटणीस नेमावे, असा त्या वेळचा शिरस्ता होता. म्हणजे राज्यांतील एकूण एक चिटणीस पर्यायानें छत्रपतीजवळच्या चिटणिसानें तयार करून नेमावयाचे असें असल्या-मुळें त्या त्या कसबांत निपुण माणसें तयार झालीं. उलट पक्षीं त्यांत भाग घेण्यास इतरांस सारखी संधि न मिळाल्यामुळें, पुढें राज्यकारभारांत स्वार्थदृष्टि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बळावली. तथापि ज्यानें त्यानें आपलें कसब व धंदा आपल्याच हातांत ठेवणें असा तो मनु होता.

राज्याच्या उत्पन्नाची व खर्चाची वरप्रमाणें वांटणी केल्यावर पेशवे, प्रतिनिधि वगैरे अष्टप्रधान, व भोसले, आंगरे वगैरे सरदार, यांजकडून हुजूरकडील कारखान्यांचा दरमहाचा खर्च परभारें चालावा अशी व्यवस्था ठरविण्यांत आली. उदाहरणार्थ, सचिवाकडे हत्तीखाना, प्रतिनिधीकडे कोठी, पंतप्रधानाकडे इमारत, अशा रीतीनें प्रत्येक कारखान्याचे खर्च ज्यानें त्यानें आपापल्या वांटणीप्रमाणें भागवावे असा ठराव होता. त्या सर्व मंडळीकडून खर्चासाठीं वराता येत त्यांची जमा पोतनिसाकडे सरकारी पोत्यास म्हणजे खजिन्यास होई; परंतु या कारखान्यांचा खर्च, वेळचे वेळीं ज्या त्या सरदाराकडून येतो किंवा नाहीं, याबद्दलचा हिशेब ठेवून अडचण वाटल्यास जरुरीप्रमाणें हुजूरचे कानांवर घालून बंदोबस्त करण्याचें काम शाहूनें राजाज्ञाकडे दिलें. त्या कामावर पंताजी शिवदेवाची नेमणूक स. १७१६ त केली. हा पंताजी शिवदेव सोमण १७३१ त मरण पावला. राजाज्ञा हें पद पूर्वींच राजारामाचे वेळेस निघालें हें मागें सांगितलें आहे.

मराठ्यांची आपल्या मूळ वतनावर भारी आसक्ति असल्यामुळें, मुलुखगिरी करीत ते कोणत्याही दूरच्या प्रदेशांत गेले, तरी दक्षिणेंतील आपल्या पहिल्या वतनाची, देशमुखीची, किंवा पाटिलकीची त्यांस अत्यंत आस्था असे. शिंदे, होळकर, गायकवाडांचीं अशीं वतनें अद्यापि दक्षिणेंत आहेत. शिवाय नवीन जिंकलेल्या मुलखांतसुद्धां सर्व सरदारांचा मुलूख तरी प्रत्येकाचा एकाच ठिकाणीं स्वतंत्र वांटलेला असे असें नाहीं. मुलूख जिंकतांना ज्यांनीं साह्य केलें असेल, त्यांस त्याची वांटणी मिळे. एकट्या शिंद्यांचा मुलूख बऱ्हाणपुर गुजरातपासून गंगायमुनांच्या दुआबापर्यंत ठिकठिकाणीं पसरलेला होता. याच कारणास्तव हल्लींच्या अनेक संस्थानांचे प्रदेश अलग व दूर दूर तुटलेले दिसतात. तसेंच आरंभीं अग्रगण्य असलेले कित्येक सरदार नाहींसे होऊन मागाहून नवीन सरदार पुढें आले आणि जुने मागें पडले. कदम बांडे, महाडिक, दाभाडे व पिलाजी जाधव मागें पडले. सिंदे, होळकर, पवार प्रसिद्धीस आले. पटवर्धन, रास्ते वगैरे सरदार उत्तर-पेशवाईंत पुढें आले. मुलुखगिरीचें काम विशेषतः बाजीराव व बाळाजी बाजीराव यांच्या अमदानींत झालें; आणि त्यानंतर जशी जेथें स्थिति होती, तशी ती हळूहळू स्थिरावत गेली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाळाजी विश्वनाथानें ठरविलेल्या पद्धतीचें सामान्य स्वरूप वर सांगितलें, त्यावरून ती पद्धत त्यानें सर्व काळाकरितां कायमची ठरविली असें नाहीं. कोणतीही पद्धत जरुरीप्रमाणें बदलत जाते. बाळाजीनें पहिला उपक्रम करून दिला; असलेली स्थिति जमेस धरून त्यानें व्यवस्था केली. दाभाडे, बांडे, पवार, आंगरे, भोसले इत्यादि फौजबंद सरदारांनीं स्वपराक्रमानें आपल्या ताब्यांत आणलेले प्रदेश त्यांच्याकडे सोपवून त्यांना मराठशाहींत गोवून घेतलें. आणखी दहा पांच वर्षें तो जगता तर समग्र राज्यकारभाराची व्यवस्थित घटना कदाचित् त्यानें ठरवून दिली असती. तो कांहींसा एकाएकींच मरण पावला त्यामुळें ती पद्धत अर्धवट राहिली. ती कायम स्वरूपांत पुरी करण्याचें काम पुढें कोणीं केलें नाहीं. प्रसंगानुसार जरूर ते फेरफार होत गेले. निश्चित घटना ठरली नाहीं; म्हणून मराठ्यांचा राज्यकारभार बराचसा यदृच्छेनें बनत गेला.

३ या व्यवस्थेंतील दोष.—उत्पन्नाचा पैसा प्रथम सर्व मुख्य तिजोरींत येऊन पडला पाहिजे, अशी तजवीज या सरंजामी कारभारांत राहिली नाहीं हें तिचें मुख्य वैगुण्य होय. या पद्धतीनें ठिकठिकाणीं मराठ्यांच्या जागिरी उत्पन्न झाल्या, म्हणजे पर्यायानें त्यांचीं लहान लहान स्वतंत्र राज्यें बनलीं. शाहूच्या निर्वाहापुरतें थोडेंसें राज्य ठेवून बाकीच्याची विभागणी निरनिराळ्या सरदारांत करण्यांत आली. प्रत्यक्ष पेशव्यांकडे सोळा महाल, दोन किल्ले आणि पंचवीस लाखांचा सरंजाम होता.‡ याशिवाय त्यांचा वार्षिक तनखा तेरा हजार होन आणि सासवड, जळगांव वगैरे ठिकाणीं इनामें होतीं. यावरून इतर सरदारांच्या सरंजामाची कल्पना होईल. शिवाजी आपल्या अष्टप्रधानांस रोख तनखा देत असे. त्याची कामाची वांटणी स्पष्टपणें केलेली होती. पेशव्याच्या वरील व्यवस्थेंत कामाची वांटणी दिसत नसून, अष्टप्रधान जरी हयात होते तरी ते नामशेष होत चालले होते; आणि बरींचशीं कामें एकएका कर्तृत्ववान् व्यक्तीच्या हातीं संकलित होत होतीं. सारांश, अष्टप्रधानी राज्यपद्धति शिवाजीच्या मृत्यूनंतर उत्तरोत्तर बंद पडून हळूहळू ती कायमची खुंटली.

जागिरींच्या पद्धतींत दुसरें एक व्यंग नेहमींच कायम होतें. मोहिमा कोणीं व कोठें करावयाच्या याचा हुकूम स्वतः शाहू सोडीत असे. तो हुकूम अंमलांत आणण्याचें काम पेशवे वगैरे सरदारांचें असे; आणि प्रत्यक्ष फौजा लहान

‡ शा. च. पृ. ४२, ४६, ४७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठ्या जागीरदारांच्या हातांत असत. ही कामाची वांटणी गैरसोयीची असल्यामुळें कोणतीही मोहीम सुरक्षित तडीस जात नसे. मोहिमांवर गेलेले सरदार कंठशोष करून पैसा व फौजा मागत, त्या त्यांस वेळेवर मिळत नसत. रोकड तनखे देण्याऐवजीं मुलूखगिरीची पद्धत ठरविल्यानें हे दोष उत्पन्न झाले. लष्कराची अव्यवस्था† हें नेहमींच मराठी राज्यांतलें मोठें व्यंग असून, त्यामुळें राज्याचें नुकसान कसें झालें हें पुढें व्यक्त होईल. अलीकडेस प्रसिद्ध झालेले बरेचसे कागद ह्या अव्यवस्थेच्या हाकाटीनेंच भरलेले आहेत.

जागिरीची पद्धति अजीबात बंद करणें बहुतेक अशक्य होतें. परंतु जागिरी कायम ठेवावयाच्या तर त्यांचें स्वरूप निश्चित केलें पाहिजे होतें. जागीरदारांचा छत्रपतींशीं संबंध काय, त्यांजवर हुकुमत कोणीं कशी चालवावयाची, त्यांजकडून नोकरी कशी घ्यावयाची, इत्यादि प्रकार ठरविण्यास बाळाजी जगला नाहीं. पद्धतीचे दोष त्याच्या नजरेंत प्रत्यक्ष येईपावेतों तो जगला असता तर ते त्यानें कदाचित् सुधारले असते. नवीन पद्धत बांधतांनाच जागीरदारांचीं निर्बंधनें ठरलीं पाहिजे होतीं. युरोपांत मध्यकालीं फ्यूडल् लॉर्ड्स होते, त्यांच्याच सारखे हे नवीन स्वतंत्र जागीरदार एव्हांपासून निर्माण झाले. युरोपांतल्या लॉर्डांनीं जी बेबंदशाही उडवून दिली, तसाच कांहींसा इकडेही थोडाबहुत प्रकार घडून आला.

सर्व सरकारी नोकरांस रोख पगार देणें आणि त्यांच्या नोकऱ्या केव्हांही पिढीजाद न चालविणें हा शिवाजीचा नियम होता. शिवाजीचे कामगार वरचेवर बदलत; परंतु पिढीजाद नोकऱ्या चालविण्याचा प्रघात पेशवाईच्या वेळेपासून सर्रास चालू झाला. शाहूच्या अष्टप्रधानांची नांवनिशी पाहिल्यास, सचिव अल्पवयी नारो शंकर, अमात्य अंबूराव हणमंते, पंडितराव मुद्गलभट उपाध्ये, न्यायाधीश होनाजी अनंत, सुमंत महादाजी गदाधर व मंत्री नारो राम, हे सहा इसम शाहूच्या उपयोगी पडलेले म्हणून केवळ वतनांचा उपभोग घेण्याकरितांच नेमिलेले होते. न्यायाधीश व सुमंत आपलीं कामें बरीं करीत होते. अमात्याचें काम तर बाळाजीच पहात होता. दाभाडे व प्रतिनिधि वजनदार होते, म्हणून बाळाजीचा दाब त्यांजवर बसला नाहीं; बाकी त्यांचीं बरींचशीं कामें बाळाजी व त्याचे हस्तक बजावीत होते. ते उत्पन्नें खात व त्यांचीं कामें दुसरा करी, अशी पद्धत रुळत गेली. त्यांच्या ठिकाणीं लायक इसम नेमले

---

† Defective Military Organization.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असते, तर या प्रधानांचा एकमेकांवर दाब राहिला असता. यांत शाहूची व बाळाजीची जबाबदारी किती याचा निश्चय करणें शक्य नाहीं. कित्येक प्रधानांस पुढें पुढें कामगिरीच सांगण्यांत आली नाहीं. नारो शंकर सचिव बराच कर्तृत्ववान् होता, पण त्यास कोणी काम देईना. शाहूला अशा मंडळींची कींव येऊन तो त्यांस मुद्दाम कांहीं तरी काम सांगे, पण पेशव्यांस तें बहुधा पसंत नसे. एवंच अष्टप्रधान, जागीरदार वगैरे सर्व नोकर पिढीजाद बनले; इतकेंच नाहीं तर राज्यांतले लहान मोठे सर्व कामगार, कारकून शिपाईसुद्धां पिढीजाद नेमण्याचा प्रघात पडला. यामुळें नोकर सुधारण्याचा मुख्य मार्ग अजीबात बंद झाला; आणि उलट पक्षीं नोकरी बिघडत चालली. अष्टप्रधानांपैकीं आरंभीं कमाई करणारे पुरुष लायक व हुशार होते, परंतु पुढें त्या कुटुंबांचा ऱ्हास होत गेला. कोणत्याही घराण्याचा पिढीजाद वृत्तान्त पाहिला तर वरील परिणामांची सत्यता कळून येईल. राज्याचे नानाविध व्यवहार उत्तरोत्तर सुधारत व वृद्धिंगत होत जाण्याची सोय असली, तरच राज्य वृद्धि पावतें. हा प्रकार पेशवाईंत उलट झाल्यानें सुधारणेची वाढ खुंटली; त्याबरोबर राजा व प्रजा दोघेही हळूहळू स्वातंत्र्योपभोगास नालायक झाले.

जागीरदार नवीन न करण्याकडेच बाळाजीची प्रवृत्ति असून, तीन लाखांहून ज्यास्त उत्पन्नाचे जागीरदार त्याच्या वेळेस नव्हते. शिवाय बाळाजीनें प्रथम शिरजोर सरदारांशीं लढून त्यांजवर आपला शह बसविला आणि पाठीमागून त्यांस संतुष्ट ठेवण्याकरितां जागिरी दिल्या. याच कारणानें स्वतंत्र होणाऱ्या दाभाड्याशीं पुढें बाजीरावासही लढावें लागलें, तरी एकंदरींत ही पद्धति नाहींशी करण्याचा बाजीरावानें जोराचा प्रयत्न केलेला दिसत नाहीं. पिलाजी जाधव, रघूजी भोसले, उदाजी पवार, व थोड्या बहुत अंशानें आंगरे हे बाजीरावाचे वेळेस डोईजड झाले. शिंदे होळकरांनींही त्यांचा कित्ता पुढें कांहीं अंशीं उचलिला. डोईजड होणाऱ्यावर प्रथम शह बसवावयाचा, आणि मग त्याची समजूत करावयाची, हें तत्त्व इंग्रजांनींही पुढें सांभाळिलें, तें मराठशाहींत पाळलें गेलें नाहीं. एकदां सरदार प्रबळ झाल्यावर मग ते सरकारदेण्याचा पैसा पाठविण्यास नानाप्रकारच्या बयादा सांगूं लागले. (१) पायमल्ली म्हणजे फौजेच्या जाण्यायेण्यानें शेतें तुडविलीं जाणें, (२) दुष्काळ, (३) युद्धपरंपरा, इत्यादि कारणें सांगून ते दिवाण-देणें पाठवीनातसे झाले, त्यामुळें मध्यवर्ती कारभार लंगडा पडूं लागला. शाहूच्या अखेरीपर्यंत हा प्रकार त्याच्या वैयक्तिक इभ्रतीवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कसाबसा चालला, पण त्याच्या मृत्यूनंतर हे दोष उत्तरोत्तर राज्यास घातक झाले. एकंदरींत लष्कराची व वसुलाची अशा दोन्ही पद्धति मराठशाहींत लंगड्या होत्या, हें मुख्यतः ध्यानांत ठेवण्याजोगें असून, त्याची स्पष्टता पुढें होत जाईल.

४ सरंजामी पद्धत.—येथें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं शाहू किंवा बाळाजी विश्वनाथ यांनीं फक्त सरंजामदारांचा उपयोग करून घेतला, त्यांनीं ती पद्धत प्रथम निर्माण केली नाहीं. ती कशी निर्माण झाली त्याचें विवेचन पूर्वी करण्यांत आलें आहे.‡ वतनासंबंधानें मराठ्यांची आसक्ति सुप्रसिद्ध असून, त्यावरच त्यांचें राजकारण पुष्कळसें अवलंबून असे.

वतन हा शब्द आरबी असून त्याचा अर्थ स्वतःचें राहण्याचें ठिकाण असा आहे. सरकारची कामगिरी बजावणारास रोख पैशानें मोबदला देणें हा मार्ग राज्याचे दृष्टीनें श्रेयस्कर व सोयीचा असतो, परंतु त्याबद्दल जमिनी तोडून दिल्यानें सरकारचें नुकसान होतें, वतनदार लोक बंडें करितात, आणि अर्जक पुरुष पराक्रमी असला तरी पुढें नालायक इसमांस वतनें चालू राहिल्यानें, सरकारचाकरीस व्यत्यय येतो, असे या पद्धतीचे अनेक तोटे आहेत. देवस्थानांस किंवा सरकारचें अभीष्टचिंतन करणारांस रोख रकमा पोंचविणें हा पहिला मार्ग, परंतु त्या वेळीं पैशाची देवघेव हल्लींच्यासारखी मुबलक नसल्यामुळें अशीं वेतनें वक्तशीर पोंचूं शकेनात आणि देवपूजेचें काम बंद पडूं नये, म्हणून त्या ऐवजीं जमिनी तोडून देण्याचा प्रघात पडला. हा प्रघात देवस्थानांपुरता मोगल बादशाहींत उत्तर हिंदुस्थानांतही होता. परंतु सरकारची नोकरी करणारांस, फौज ठेवून सरकारास मदत करणारांस, अगर अन्य तऱ्हेनें स्वतःचा जीव वगैरे धोक्यांत घालून सेवा करणारांस जमिनी तोडून देण्याचा प्रघात नर्मदेच्या उत्तरेस फारसा नाहीं; हा प्रकार बहुधा दक्षिणेंत आहे. म्हणून वतन या शब्दास इकडे विशिष्ट अर्थ आला आहे.§

दक्षिणेंत अनेक प्रकारचीं वतनें प्रचलित आहेत.¶ गांवचा कारभार करणारा तो पाटील व त्याचें लेखन करणारा कुळकर्णी, हे तरी एक प्रकारचे

‡ स्थि. रा., प्र. ६, कलम ५, पृ. ९२

§ जेधे श.; स. प. पृ. १७७ व २१५; खं. ८, १०, ११, १७; खं. १५. २८१, २८३, २८४, २८६, ३४१, ३४२, ३४५, ३४६, ३४८, ३४९, ३५९, ३६५; खं. १६. २८; खं. १७. २०, २१.

¶ ... खंड ८.२७ यांत उपलब्ध आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वतनदारच होत. वऱ्हाडांत यांचेच पर्याय शब्द पटवारी व पांडे, आणि कानडी प्रदेशांत गौडा व कुळकर्णी होत. कित्येक गांवांचा गट करून त्याजवर देखरेख ठेवणारा तो देशमुख, त्यास मदत करणारा तो देशकुळकर्णी. देशपांडे आणि कानडींतील नाडगौडा, यांचा अर्थ एकच असे. हे शब्द प्रांतभेदानें व कालभेदानें अस्तित्वांत राहिले. मुकासा म्हणून एक बाब होती, ती चालविणारा तो मोकाशी; देसाई म्हणजे देशस्वामी अथवा देशमुख, आणि त्यांजवर सरदेसाई अथवा सरदेशमुख, अशी वतनदारांची परंपरा होती. दक्षिणदेशची सर्व सरदेशमुखी भोसले छत्रपति आपली समजत. बादशहाचे कैदेंतून येतांना शाहूनें प्रथम आपली सरदेशमुखी तिकडूनच बहाल करून घेतली होती, त्याच्या सनदा पुढें दिल्लीहून आल्या. तसेंच सरंजाम म्हणजे तर्तूद किंवा साहित्याची बेगमी. सरकारांतून कोणास कांहीं मानमरातब दिला, म्हणजे तो चालविण्याच्या खर्चासाठीं जें वेतन अगर जमीन द्यावयाची त्यास सरंजाम म्हणत.§ परंतु पुढें फौजेच्या बेगमीस मुलूख तोडून देण्याचा प्रघात चालू झाला, त्यासच सरंजाम हा शब्द विशिष्टार्थानें लावण्यांत येऊं लागला. कालभेदानें कांहीं वतनांचा संकोच झाला व कांहींचा विस्तार झाला. सारांश, राज्यांत विशिष्ट कामें करण्यासाठीं जे हक्क किंवा उत्पन्नें वंशपरंपरेनें देण्यांत आलीं, त्यांस वतन ही सामान्य संज्ञा प्राप्त झाली.

मोगल बादशाहींत जमिनीचीं वतनें वंशपरंपरा देण्याचा प्रघात नव्हता, हें वर सांगितलेंच आहे. मांडलिक राजे आपल्या फौजा घेऊन बादशहांची चाकरी करीत, परंतु त्यांचें स्वरूप सरंजामी पद्धतीचें नव्हतें. बादशाही सुभेदारांस सरंजाम नव्हते. सरंजामी वतनांचा अंमल बहुधा नर्मदेच्या दक्षिणेस महाराष्ट्रांतच जारी होता. इकडील डोंगराळ व दुर्गम प्रदेशांत वसाहती करणारांस महाप्रयास पडले. जंगलें तोडून, श्वापदें मारून, मुलखाची लावणी संचणी करण्यासाठीं व चोरीमारीचा बंदोबस्त ठेवून कारभार सुरळीत चालण्यासाठीं, बहामनी सुलतानांनीं किंवा तत्पूर्वीच्या राजांनीं, लोकांस जमिनीचीं वतनें देण्याचा प्रघात सुरू केला. त्या काळास असें करणें अपरिहार्य होतें. लोकांवरच बंदोबस्ताचा भार टाकण्यांत आला. जेधे, शिर्के, जगदाळे, सुर्वे, मोरे, महाडिक, भोसले, वगैरे अनेक लहान मोठे मराठे सरदार निजामशाही व आदिलशाही राज्यांत थोड्या बहुत फौजा बाळगून किल्ल्यांच्या वगैरे आश्रयानें मुलखांत

§ या शब्दाचा [illegible] ‘सरंजामी’ कागदांत व्यक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बंदोबस्त ठेवून आपापल्या वतनांत नांदूं लागले. पुढें त्यांचे वंशज आपल्या वतनांवर हक्क सांगतांना या मागील हकीकतींचा उल्लेख आपल्या तक्रारींत वारंवार करितात.

शिवाजीनें स्वराज्याचा उद्योग सुरू केला, तेव्हां मुसलमानी अंमलांतले हे वतनदार त्यास कसे आडवे आले आणि त्यांचा बंदोबस्त त्यानें कसा केला, हें महशूर आहेच. आपणास सामील न होणाऱ्या लोकांस बंडखोर ठरवून त्यांचीं वतनें शिवाजीनें काढून घेतलीं, आणि किल्ल्यांचा बंदोबस्त स्वतःचे हातांत घेऊन राज्याचा पाया घातला. त्यानें शक्य तितकीं वतनें व इनामें लोकांचीं काढून घेऊन त्यांस नक्त नेमणुका ठरवून दिल्या. यांस बटाईचा तह अशी कागदोपत्रीं संज्ञा आहे. दिल्लीहून सुटून आल्यावर त्यानें जीं दोन वर्षे राज्य-कारभारांत घालविलीं, त्या वेळीं हे बटाईचे तह त्यानें केले; व ते धार्मिक इनामांसही त्यानें लाविले. शिवाजीच्या कडक शिस्तीखालीं हे वतनदार कांहीं काळ त्यास शरण आले, तरी वतनांवरील त्यांची नैसर्गिक आसक्ति मात्र नष्ट झाली नव्हती. शिवाजीसुद्धां सर्वच वतनदारांस नाहींसे करूं शकला नाहीं, आणि असे प्रकार एकदम बंद होणें शक्यही नसतें.

शिवाजीचे पश्चात् औरंगजेबानें महाराष्ट्रावर स्वारी केली, तेव्हां संभाजीची त्रेधा उडून वतनदार लोकांचें पुनः फावलें. परंतु त्यानेंही वतनदारांस कसें जेरबंदांत धरलें त्याचें वर्णन पूर्वी येऊन गेलें आहे. § सरकारकामीं जीव खर्च केल्याबद्दलही संभाजी लोकांस जमिनी इनाम न देतां रोख पारितोषिकें देत असे. येसाजी कंक यानें फिरंग्यांशीं लढतांना बहुत कस्त केली व त्याचा पुत्र स्वामिकार्यावर मयत जाला, त्याबद्दल ता. २३.३.१६८५ रोजीं दोन हजार होन संभाजीनें बक्षीस दिले, यावरून जमिनीचें वतन देण्याकडे त्याचा कल नव्हता असें दिसतें.

९ सरंजामी पद्धत, बदलता काळ.—संभाजीचे पश्चात् परिस्थिति बदलली. औरंगजेब बादशहानें सर्व राज्य उद्ध्वस्त केलें, राजाराम पळून जिंजीस गेला, तिकडेही त्यास वेढा पडून तमाम मुलख मराठे व मोगल या दोघांच्या तडाख्याखालीं बेचिराख झाला. मोगल नवीन वतनें देऊन मराठे वतनदारांस फितवूं लागले. तेव्हां लोकांची धांदल उडाली. ' पहिले निजामशाही व आदिलशाही यांचे कारकीर्दीस वतनें चालत होतीं तेणेंप्रमाणें चालवावयाची

§ उ. सं., पृ. ८८; रा. खंड १५ ले. ३४२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आज्ञा करून अभयपत्र द्यावें,' अशा मागण्या वतनदारांनीं जिंजीस जाऊन राजारामाकडे केल्या तेव्हां 'ते प्रांताच्या कार्यभागास रामचंद्र पंडित अमात्य व शंकराजीपंत सचिव ठेवले आहेत ते वतनांचा निर्वाह करून सनदा देतील त्या स्वामींच्याच समजून स्वामी चालवितील. स्वामिकार्य करून आपला मुजरा करून घेणें, अभय असे,' म्हणजे तुमच्या वतनांस भय नाहीं, असें राजारामानें जाहीर केलें.

'हे मराठे लोक या प्रांतींचे वतनदार होत. यांणीं वतनावरी राहोन स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली व पुढेंही करीत आहेत, यास्तव यांजवरी चंदीचे मुक्कामीं स्वामी कृपाळु होऊन भूमि इनाम दिल्ही. यांणीं देशास येऊन वतनाची लावणी संचणी करून स्वामिकार्य केलें, राज्यांत एकनिष्ठपणें सेवा केली. हे मोख्तसर जमीदार व कामाचे व पातशाही जमीदार आहेत. हें महाराष्ट्र राज्य आहे. तुम्ही या राज्याची पोटतिडिक धरतां, तरी राज्यकारणाची चाल्ना करून जमाव करून सावध राहून स्वामिकार्य दृष्टीस पडलें तें मनास आणून लिहून पाठविणें. तुमची सरंजामी चालवूं. स्वामीच्या पायांशीं एकनिष्ठा धरून स्वामिकार्य करणें. औरंगजेबानें मराठे लोक मुसलमान केले, तमाम लोक बाटले तरी हिंमती धरणें. आपले वतनाचा हक्क लाजिमा इनाम व इसाफती कारकीर्द आदिलशाही पावेतों, त्यावर थोरले साहेबांचे कारकिर्दीस बटाईचा तह झाला त्यामुळें गांव दिवाणांत पावून हक्काची मोईन (म्ह० रोकड नेमणूक) दिवाणांतून करून दिली, तेणेंकरून आपली हैराणगी झाली. अन्नवस्त्राची विपत्ति झाली. पुढें लोकांनीं गनीमाशीं सामील होऊन फिसाती केल्या. आपण वतनदार लोक, एकनिष्ठ सेवा करून देश गनीमापासून सोडविला, पुढेंही जमाव करून घेतच आहों, म्हणून विदित केलें, त्यावरून तुमचे हक्क व इनाम इसाफतीचे [१] गांव तुम्हांस देवविले आहेत. ताम्राची फिसात झाली त्या प्रसंगीं आपण एकनिष्ठपणें राहून सेवा केली आहे. विलायती कूल खराब पडली होती, त्याची लावणी संचणी केली, फार मर्दुम्या करून राज्य मिळविलें, स्वामीकरितां खराब जाले व मारले गेले. हल्लीं जो कोणी वतनदार एकनिष्ठा धरून स्वामिकार्य करून देईल, त्यास इसाफती व वतनभाग चालला असेल तेणेंप्रमाणें मजरा असे. त्या प्रांते आलियावरी तुमची ही सरंजामी चालवूं. सालगुदस्त किल्ले रायगड मोगलांस कबज झाला, मुलखांत मोगलाईचा अंमल चालला, हल्लीं श्रीकृपेनें

[१] इसाफत म्हणजे संपूर्ण इनाम, ज्यांत सरकारचा अंश मुळींच नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्याचा मामला थाटत चालला, ऐशास बाजे वतनदार हुजूर येऊन अर्ज केला, कीं आम्हीं साहेबांशीं एकनिष्ठ आहों. पूर्वीं कैलासवासी स्वामींचे वेळेस आपलीं वतनें अमानत करून हक्काची मोईन (रोकड नेमणूक) करून देत असत. सांप्रत गनीमाचे धामधुमेमुळें व दुकाळामुळें रयत गेली, मेली, जुजबी राहिली त्यास खावयासी व रहावयासी नाहीं. तरी आमचीं वतनें आमचे हवालीं केलीं पाहिजेत, म्हणून अर्ज केला, तो मनास आणून समस्त वतनदारांचीं वतनें त्यांचे हवालीं केलीं असत (ता. ५.१०.१६९०). ' असा मजकूर निरनिराळ्या सनदांत आहे. 'लोकांचे सरंजाम ठरवून दिले असतील त्याप्रमाणें चालवूं ' असेही राजारामाचे उल्लेख आहेत. कित्येक कागदांत पंचसहस्रीचा उल्लेख असून दंडकप्रमाणें घोड्यास रातीब व स्वारास रोजमुरा देऊन स्वामी चालवितील, असे उल्लेख आहेत. ' मावळांचा मामला सुरळीत होऊन आबादानी व्हावी, तुम्हां लोकांचीं गोमटीं करावीं म्हणून महादाजी शामराज यास सुभा नेमून पाठविले आहेत. कदीम सेवेचे लोक आहेत त्यांचे कुल जमान महादाजी शामराज यांजवळ पाठविणें. त्याखेरीज तुम्हीं नवा जमाव करून सुभेदाराजवळ राहणें. गनीम कूल मारून काढणें. तुमचे हक्क हुजुरूनही चालवूं,' अशीं राजारामाचीं वचनें आढळतात.

वतनदारी व सरंजामदारी भिन्न होत. राज्याला अपाय सरंजामीनें झाला, वतनदारीनें नव्हे. सरदारांना फौजेच्या खर्चाकरतां मोठाले प्रदेश लावून दिले म्हणजे ते स्वतंत्र बनून मध्यवर्ती सत्तेला जुमानत नाहींसे होतात. पण याबाबत शाहू किंवा बाळाजी सर्वस्वी जबाबदार म्हणतां येणार नाहीं. शाहूच्या आगमनप्रसंगीं फौजबंद सरदार महाराष्ट्रांत चोहोंकडे फैलावले होते. त्यांना मान्यता देण्याशिवाय शाहूस मार्गच नव्हता. सरंजामदारीचें मूळ स्वरूप रूढ झालेलें शिवाजीनें जरी थोडें बहुत मर्यादित केलें, तरी विभिन्न परिस्थितींत तें पुनः जोरानें उद्भवलें. सरकारपाशीं पैसा नाहीं, राज्याचा वसूल बंद पडलेला, आणि शत्रूशीं झगडण्यास फौजा तर पाहिजेत, म्हणून बिनखर्चानें कामगिरी चालेल असा उपाय राजारामास अपरिहार्यतेमुळें स्वीकारावा लागला. ता. १.१०.१६९६ च्या सनदेंत खालील मजकूर आहे. ' फलटण महाल पूर्वीं आदिलशहाचे कारकीर्दीस आपले बाप यांस दरोबस्त इनाम दिला होता. शंभर स्वार चाकरीस यावे ऐसा निर्वाह होता, तेणेंप्रमाणें इनाम देवावा, शंभर स्वार चाकरीस देऊं म्हणून विदित केलें, त्यास शंभर स्वार चाकरीस द्यावे ऐसा निश्चय करून परगणा इनाम [illegible] करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप असणें.' अशाच मासल्याच्या आणखी पुष्कळांच्या सनदा त्या वेळीं झाल्या. राज्यावरचें अरिष्ट टाळण्यासाठीं या पद्धतीचा अंगीकार राजारामाच्या वेळीं करावा लागला. वतनदारांस कसें वागवावें या संबधानें सक्तीची राजनीति शिकविणारा खुद्द रामचंद्रपंत अमात्य आपला मुज्मूचा हुद्दा व त्याचें इनाम वंशपरंपरेनें चालवावें अशी मागणी करतो. 'स्वामींच्या राज्यानिमित्य श्रम साहस करून राज्याभिवृद्धि केली, याकरितां स्वामींनीं मुज्मूचा हुद्दा जीर्णोद्धार करून आपणांस सांगितला. परंतु हुद्दा म्हणजे भारगीर वस्तु आहे, (म्हणजे उत्पन्नाशिवाय त्याचा भार सहन होण्याजोगा नाहीं.) सबब इनामती व वतनें अजरामऱ्हामत वंशपरंपरेनें चालेत ऐशी आज्ञा केली पाहिजे, त्यावरून स्वामींनीं मेहरबान होऊन कदीम वतनें व नूतन इनामती देऊन पत्रें करुन दिल्हीं.' §

'पाटणकर हे वतनदार लोक, यांस सेवा सेना—पंचसहस्री सांगितली आहे. हें राज्य मराठे, देवाब्राह्मणांचें, पाटणकरांनीं जमाव केला, गनिमाच्या फौजा मारून दळ मेहनत खस्त झाले. कर्ज घेऊन आपला हिस्सा जमावाचे भरीस घालून राज्य रक्षावयाची महती केली. त्यावरून कृपाळु होऊन इनाम देहाय १२ दिल्हे.' कठिण प्रसंगीं सरकारास कर्ज दिल्याबद्दलही पुढें इनामें देण्यांत आलेलीं आहेत. †

'धामधुमीचे प्रसंगें स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली' असें वतनदार राजारामास वरचेवर बजावतात. या सेवेचा अर्थ असा कीं, (१) मोगलांस सामील न होतां (२) मुलखाची लावणी संचणी करितों, (३) स्वराज्यांत वसूल देतों, (४) फौज ठेवून चोऱ्या वगैरेचा बंदोबस्त करितों, (५) आणि सरकारासाठीं लढाया मारतों. अशा प्रकारची पंचाविध सेवा केल्याबद्दल हे वतनाचें बक्षीस मागतात. आपलें मागणें कबूल न केल्यास ते मोगलांस मिळण्याचा धाक घालीत. मोगल तर त्यांच्या वाटेल त्या मागण्या कबूल करीत. याशिवाय दुसरा वतनदारांचा वर्ग म्हणजे मूळच्या आदिलशाहींतला. आदिलशाही जिंकल्यावर त्यांतले वतनदार मोगलांचेच ताब्यांत गेले. त्यांस फोडून आपल्या बाजूस आणणें जरूर होतें. आणखी एक तिसरा वर्ग नवीनच वतनें संपादूं इच्छिणाऱ्यांचा होता.¶

§ स. प. पृ. १८७. या प्रकरणांतील ले. २३, २६, २७, ३०, ३१, ३२, ३५, ३८, ३९, ४३, ४४, ४५. ५२, ५३, वगैरे सनदा अशाच मासल्याच्या आहेत.

† स. प. [illegible] पृ. ६३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असलेलीं वतनें पुढें चालवूं व नवीन देऊं, अशीं लेखी वचनें हे मागूं लागले. तेव्हां त्यांस कायम आश्वासनें देणें चालकांस भाग पडलें. शत्रुपक्षीय बाहेरच्यांस ज्या सवलती देणें जरूर वाटलें, त्या आपल्या लोकांसही देणें अपरिहार्य झालें. कारण, न द्यावें तर हे म्हणणार, कीं आम्हींच काय असें पाप केलें, कीं आमचीं वतनें या नवीन वतनदारांप्रमाणें कायम चालूं नयेत? सारांश, आरंभीं हे वतनदार आर्थिक कारणांनीं उत्पन्न झाले आणि पुढें राज्यावर संकट आलें त्या धामधुमींत ते बद्धमूल बनले. राजाराम जिंजीहून परत आला तेव्हां स्वतःचें राज्य असें बिलकुल शिल्लक राहिलें नव्हतें, म्हणून वतनांच्या लालुचीवर लोकांस हाताशीं धरून त्यास उद्योग करावा लागला. वाटेल तशा सनदा दिल्या हें गैर झालें, याची जाणीव राजारामास व त्याचे मुत्सद्दी यांस असून, चंदीहून परत आल्यावर कोन्हेर पंडित न्यायाधीश नेमून त्यानें जुन्या वतनांचा तपास केला आणि 'तोंवर नूतन एकंदर कोणाकडे न चालविणें; कै. स्वामींच्या वेळेप्रमाणें बिलाकुसूर चालविणें असा हुकूम केला.' †

राजारामाचे पश्चात् थोडीबहुत स्वस्थता झाल्यावर चंदीहून दिलेल्या वतनांचा विचार मनांत आणितां राज्याचा बंदोबस्त न होतां सनदा दाखल झाल्या, 'ते समयीं ताराबाई साहेब व सर्व राजमंडळ मिळोन या संबंधानें नवीन निर्णय केला,' § आणि कित्येक सनदा रद्द केल्या. तरी वर सांगितलेलीं तत्त्वें बहुतेक कायम राहिलीं, आणि अनेक अमदानींत दृढ झालेली पद्धत सर्वस्वीं रद्द झाली नाहीं. ताराबाईनें सात वर्षें कशीबशी निभावणी केल्यावर शाहूचें आगमन देशीं झालें. त्याचीही हलाखी आर्थिक दृष्ट्या होतीच. ताराबाईशीं झगडण्याकरितां व लोकांस आपल्या बाजूस वळविण्यासाठीं त्याला सरंजामी पद्धतीचा अंगीकार विशेष जोरानें करावा लागला. धनाजी जाधव, आंग्रे, निंबाळकर, दाभाडे, अक्कलकोट व नागपुर येथील भोसले वगैरेंना मोठमोठे सरंजाम त्यानें आरंभींच तोडून दिले. शंकराजी महाडिकास शाहूची पहिली आज्ञा ता. ७.१०.१७०७ ची असून पुढें ता. २०.९.१७०९ रोजीं त्यास शाहूनें कुल अखत्यार देऊन कर्नाटकांत मुलखगिरीवर पाठविलें, आणि तिकडील पाळेगारांचे सरंजामाविषयीं आज्ञा केल्या. 'सर्वांस जमावानिशीं येण्यास सांगून स्वामी सर्फराजी करून चालवितील,' असे त्यानें हुकूम दिले. याच महाडिकास कोल्हापुरच्या संभाजीनेंही पुढें आपल्याकडे ओढण्यासाठीं फौजेचे बेगमीस सरंजाम करून दिल्हा.

† ता. १६-३-१६९० [illegible] खं. ३. [illegible] § खं. [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावरून हें उघड आहे कीं, सिंदे, होळकर, गायकवाड, पवार वगैरे सरदार पुढें सरंजामी झाले, ते पूर्वी चाललेल्या रिवाजानेंच झाले. सेनासाहेब-सुभा, सरलष्कर, सेनापति, सरखेल, प्रतिनिधि, सचिव ह्यांचे सरंजाम प्रथम चालू झाले त्या वेळीं बाळाजी विश्वनाथाचे साह्यानें अगर अनुमतीनें ते झाले असें म्हणतां येत नाहीं. असलेले प्रकार जमेस धरून पुढें बाळाजीनें कारभाराची व्यवस्था शक्य तितकी बसविली. बाजीरावाच्या पहिल्या दहा पांच वर्षांत शाहूचा विश्वास त्याजवर फारसा नव्हता, म्हणून बाजीरावावरही या पद्धतीची जबाबदारी टाकतां येत नाहीं. सरंजामी पद्धतीचे जे काय गुणदोष असतील ते पूर्व प्रघात व निरनिराळ्या वेळची परिस्थिति यांमुळें प्रथम निर्माण झाले, आणि शाहूनें त्यांचा परिपोष केला. त्याबद्दल एकाच इसमास जबाबदार धरतां येत नाहीं. बाकी अशा पद्धतीनें लोकांस मोठें उत्तेजन मिळालें, म्हणूनच मराठी राज्याचा विस्तार देशभर झपाट्यानें होऊन, दळणवळणाचीं साधनें नसतांही दूरदूरच्या प्रांतांत हे सरदार आपलें कायमचें वास्तव्य करून टिकाव धरूं शकले, आणि शेंपन्नास वर्षें राज्याचा बचाव झाला.

लष्करी सरंजाम देण्याचा प्रघात चालू झाला तेव्हां सामान्यतः खालील अटी प्रचारांत आल्या. उत्तर पेशवाईत थोरले माधवराव व नाना फडणीस यांचे कारभारांत सरंजामाचे नियम व्यवस्थित ठरलेले पाहण्यास सांपडतात, त्यांत आरमार, किल्ले वगैरेंचाही खुलासा दिसून येतो—

१ सरदारांनीं आपापल्या मुलखांत मुलकी व लष्करी अंमल चालवावा.

२ छत्रपति व त्याचे मुख्य प्रधान यांच्याशीं इमानानें वर्तोन हुकमाशिवाय कोणत्याही सरदारानें परराष्ट्रांशीं लढाई किंवा तह करूं नये.

३ ठरविलेला आकार सरकारांत भरावा.

४ चांगले लोक फौजेंत बाळगून सरकारांत हजिरी गणती बिनबोभाट देत जावी.

५ जागिरीच्या उत्पन्नाचे हिशेब सालोसाल रुजू करून सरकारचे दरकदार तपासतील त्यांस ते तपासूं द्यावे.

६ लोकांचीं, देवस्थानांची इनामें वगैरे असतील तीं शिरस्तेप्रमाणें चालवावीं.§

या अटी सरदारांनीं पत्करल्या. तात्पुरती एकी राहण्याचें एक कारण, प्रत्येक मराठा सरदाराचें महाराष्ट्रांत छत्रपतीच्या हद्दींत वतन किंवा इनाम असे,

§ थोरले माधवरावाची रोजनिशी, भाग १, ले. ३४१, ३६९, ३८१, ३८७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि अशा परंपरागत आलेल्या वतनावर त्या सरदारांची विशेष आसक्ति असल्यामुळें वतनाच्या लालुचीनें ते छत्रपतीशीं नम्रतेनें वागत.

मराठी राज्याची घटना, चौथाई सरदेशमुखीच्या हक्कांच्या द्वारें झालेला राज्याचा फैलाव आणि एकंदर राज्यव्यवस्थेचे गुणदोष यांच्या संबंधानें नाना प्रकारें विवेचन वेळोवेळीं निरनिराळया व्यक्तींनीं केलें आहे. त्या विवेचनांत लक्षांत ठेवण्याजोगे मुद्दे काय आहेत, त्यांचा उल्लेख येथवर केला आहे.

६ मराठशाहीच्या फैलावाचें बीज—स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी हे हक्क हळूहळू कसे फैलावत गेले हेंही पाहण्यासारखें आहे. सय्यदांपासून बाळाजी विश्वनाथानें मिळविलेल्या सनदांनीं,† स. १६७४ त शिवाजीच्या वेळेस जेवढें मराठ्यांचें राज्य होतें, तेवढें बहुतेक स्वराज्य म्हणून शाहूकडे कायम झालें. सय्यदांचा पाडाव झाल्यावर स. १७२१ त पूर्वीच्या सनदांची पुनरावृत्ति बाजीरावानें महंमदशहाकडून करून घेतली. पुढें या तीनही सनदांप्रमाणें अंमल करण्यास निजामानें हरकत केली, तेव्हां स. १७२५–२८ पर्यंत एक व स. १७३०–३१ त दुसरी अशा दोन मोहिमा करून शाहूनें निजामास व कोल्हापुरच्या राजास जाग्यावर बसविलें. तेणेंकरून निजामाचा मराठी राज्यांत दुफळी पाडण्याचा डाव बंद पडला, आणि मराठ्यांचे तीनही हक्क दक्षिणेंतील मुसलमानांच्या सहा सुभ्यांवर कायम झाले (स. १७३२). या वर्षापुढें निजाम-मराठ्यांचे झगडे झाले ते निराळ्या स्वरूपाचे, म्हणजे बाह्य प्रांतांसाठीं होते. प्रथम एखाद्या प्रांतावर वारंवार स्वाऱ्या करून त्यांतून सालोसाल चौथाईचे वगैरे हक्क वसूल करावयाचे, आणि असा क्रम कांहीं वर्षे चालल्यावर मग त्या प्रांताबद्दल त्या हक्कांच्या सनदा बादशहाकडून मागावयाच्या, हा मराठशाहीच्या फैलावाचा सामान्य क्रम बनला. दक्षिणचे सहा सुभे पदरांत पडल्यावर, बाजीरावानें तोच क्रम गुजराथ व माळवा या प्रांतांत चालविला आणि हे दोन कबजांत आल्यावर पुढील पेशव्यानें हिंदुस्थानच्या बहुतेक इतर प्रांतांस, म्हणजे उत्तरेस पंजाब, पूर्वेस बंगाल व दक्षिणेस म्हैसूर कर्नाटक, ह्या भागांसही आपल्या कक्षेंत आणिलें. पहिल्या तीन पेशव्यांचें हें उद्योगसातत्य स्मरणीय आहे. गुजरात, माळवा व उत्तर हिंदुस्थान या नवीन प्रांतांत मराठ्यांचा हा क्रम बहुतेक सिद्धीस गेला. तेव्हां बादशहानें त्यांचा अटकाव करण्याकरितां

† बाळाजी विश्वनाथानें बादशहाच्या सनदा आणल्या त्यांची इंग्रजी भाषांतरें डॉ. पवार यांनीं छापलेलीं पाहवीं. हि. रे. कमिशन प्रो. स. १९४०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुनः निजामाची मदत मागितली, म्हणून स. १७३७-३८ त बाजीरावाचा व निजामाचा झगडा झाला. त्यांत निजामाचा पाडाव होऊन शाहूच्या मृत्यूपूर्वी गुजरात, काठेवाड, निमच, माळवा, बुंदेलखंड, आग्रा, दिल्ली, दुआब, अयोध्या, गोंडवण, संबळपुर, ओरीसा, बंगाल इत्यादि मोगल बादशाहीच्या प्रांतांवर मराठ्यांनीं आपले हक्क लागू केले; आणि शाहूचे पश्चात् कर्नाटक व कांहीं अंशीं पंजाब या प्रांतांवरही पेशव्यांनीं मराठ्यांचा शह बसवून हातीं घेतलेल्या उद्योगाची तड बहुतेक हिंदुस्थानभर पोंचविली.

कै. रानडे यांनीं चौथाई व सरदेशमुखीच्या हक्कांची तुलना इंग्रजांनीं सुरू केलेल्या तैनाती फौजेशीं केली आहे. राष्ट्र वर्धिष्णु होऊं लागलें म्हणजे त्यास विशिष्ट पद्धति धारण करावी लागते. लोकांवर आपला दरारा बसवून आपणास आजूबाजूंचीं राष्ट्रें मान देतील अशी तजवीज ठेवावी लागते. यास इंग्रजींत 'vigorous policy' म्हणजे 'चढाईचें धोरण' म्हणतात. वेल्स्लीनें तैनाती फौजेचीं निश्चित बंधनें ठरवून ज्याप्रमाणें इतर सत्ताधीशांस मांडलिक बनविलें, तीच दृष्टि मराठ्यांच्या पद्धतींत व्यक्त होती.¶ केवळ स्वसंरक्षणाची सिद्धता करून वर्धिष्णु राष्ट्राचें भागत नाहीं; बचाव सोडून चढावाचें धोरण स्वीकारावें तेव्हांच त्याचा निभाव लागतो. प्रतिनिधि व बाजीराव यांचे भांडणाचा मूळ मुद्दा या तत्त्वाविषयीं होता; आणि शाहूनें बाजीरावाचें प्रतिपादन स्वीकारून तदनुसार आपल्या सरदारांस निरनिराळ्या ठिकाणीं चौथाई सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याची आज्ञा देऊन त्यांस संचारक्षेत्र विभागून दिलें. हे हक्क तलवारीच्या जोरावर मिळवावयाचे व तलवारीच्या जोरावरच राखावयाचे, असा जरी सिद्धान्त होता, तरी सरदारांच्या या कृत्यास निवळ देश जिंकण्याचें किंवा परापहाराचें स्वरूप येऊं नये म्हणून, ते हक्क वसूल करण्याची परवानगी लेखी सनदांनीं बादशहाकडून खटपटीनें मिळवावयाची, असा क्रम चालला. दक्षिणच्या सहा सुभ्या संबंधानें हे हक्क बाळाजी विश्वनाथानें पैदा केल्यावर त्यांचा विस्तार बाजीरावानें माळव्यांत,

¶ सोंधें संस्थाननें मराठ्यांशीं चौथाईचा करार केला त्यांत "शाहू छत्रपतींस पंचेचाळीस हजार रुपये प्रतिवर्षी पाठवावे. दुसरा हरएक शत्रु संस्थानावर चालून आला असतां त्याचा पराजय करून संस्थानचें आधिपत्य निर्विघ्न प्रकारें अनुभवूं द्यावें," असे शब्द आहेत. फ्रेंच वगैरे परकीयांस नोकरींत ठेवूं नये हें जादा कलम वेल्स्लीनें परिस्थितीमुळें घातलें, तें पेशव्यांचे वेळेस नव्हतें, पहा शि. च. सा. खं ३ पृ. १०७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाभाड्यानें गुजरातेंत व भोसल्यानें वऱ्हाडांत केला. पुढें राजपुताना, दिल्ली, दुआब, आग्रा, अयोध्या, बंगाल या प्रांतांतही मराठ्यांनीं हाच उद्योग फैलावला.

मराठी राज्याची शक्ति व दौर्बल्य हे दोनही प्रकार या उद्योगांत व्यक्त होतात.§ शाहूच्या आरंभीं जें 'स्वराज्य' म्हणून होतें तें त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस सर्व दिशांकडे वृद्धि पावलें; परंतु तत्त्वतः हा परिणाम केवळ तरवारीच्या जोरावर देश जिंकून झाला नाहीं. सर्व सरदारांना एकमेकांची मदत पाहिजे होती आणि ती मिळण्याची सोय व्हावी हा बाळाजीचा उद्देश. मोगल बादशाहीवर शस्त्र चालवून तें राज्य बुडवावें अशी शाहूची भावनाच नव्हती. ज्या बादशाहींत आपण वाढलों, तिला आपण साह्य करावें, तिचा आपण होऊन नाश करूं नये असें शाहू वारंवार म्हणे. 'आसमंतात् राजेरजवाडे वगैरे यांचे तह झाले आहेत. कोणी आपणाहून जबरदस्त असा दौलतदार जवळ नाहीं. एक श्री (शाहूमहाराज) दिल्लीस पाय लावील, तर वडिलांचा (शिवाजी-संभाजीचा) हेतु शेवटास न्यावा असा मनोदय होता, परंतु आमचे मातुश्रींना (बेगमेनीं) संगोपन करून त्यांजला (बादशहाला) मोहांत घालून, मातृपक्षीय करून, त्यांचे हातून आम्हांस ठिकाणीं बसविलें, तेव्हां मातृस्थानीं विरोध करणें कामाचें नाहीं असें मनांत येऊन, त्यांची (बादशहाची) स्वस्थता राखून संपूर्ण सत्ता वागवावी हा इरादा मनांतील, त्या समयीं आमचे मातुलांस शहाजाद्यांस दुर्बुद्धि होऊन आपसांत कलह करूं लागले. त्यांचा पक्ष धरून विचार करावा तरी, मागें दिल्लींत राहिले, त्यांनीं (मातुश्री व वकिलांनीं) समजूत करून (आमचें) संस्थान सांभाळिलें; आतां उलट मसलत करणें नीट नाहीं आणि आमचाही समय आला, त्यापेक्षां हें राज्य तुम्हीं रायास देऊन एकविचारें चालवा. एकमेकांस परस्परें अंतर देऊं नका.' असे विचार शाहूनें अंतकालीं प्रगट केलेले आहेत.† औरंगजेबाच्या मुलीनें शाहूचा बचाव व सांभाळ केला, तिला मातृस्थानीं व तिच्या बंधूंना मातुलस्थानीं शाहूनें मानलें, हा भाव वरील उताऱ्यांत व्यक्त आहे. अर्थात् यावरून मराठमंडळाचें उद्दिष्ट कार्य शाहूच्या मनांत कशा प्रकारचें होतें हें दिसून येतें. अशा रीतीनें तीस चाळीस वर्षें शाहूनें मराठशाहीचा कारभार केला.

§ See Ranade, Rise of the Maratha Power, P. 236 & 237.

† भा. क. शा. म. ची बखर पृ. ८१-८३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७ मूळच्या उद्देशाचा विपर्यास.—जोरानें चढावाचें युद्ध चालविल्याशिवाय राज्याचा बचाव होत नाहीं, आपली सत्ता आजूबाजूस सर्वांनीं मानली पाहिजे, हा जो राजनीतीचा सामान्य सिद्धान्त आहे, तो शाहूस चांगला माहीत होता, आणि त्याच सिद्धान्तानुसार त्यास आपल्या शक्तीचा प्रभाव निरनिराळ्या प्रांतांत दाखवितां आला. राजनीतीचा हा सिद्धान्त प्रतिनिधि वगैरे कित्येक मुत्सद्यांस उमगला नाहीं, आणि पेशवे व प्रतिनिधि असे दोन विरुद्ध पक्ष दरबारांत बहुत काळ कायम राहिले. त्यांस कोल्हापुर-सातारा या दोन राज्यांची दुफळी पोषक झाली. या विरोधाचा फायदा कित्येक आपमतलबी लोकांनीं घेतला. सरदार शिरजोरपणानें वागूं लागले म्हणजे त्यांस एका सत्तेखालीं नरम करणें जरूर पडतें. औरंगजेबाच्या वेळेपासून अनेक मराठे सरदार राजरोसपणें शत्रुपक्षास जाऊन मिळत. राजाराम व त्याचा मुलगा शिवाजी यांच्या कारकीर्दीत किती तरी मराठे सरदार मोगलांच्या बाजूस होते. पुढें तोच प्रकार निजामानें उचलिला. बाळापुर व पालखेड येथील लढायांत मराठे मराठ्यांच्या विरुद्ध लढले. डभईचा संग्राम तर बोलून चालून आपसांतला होता. यावरून आपली सरंजामी पद्धति राज्यास अपायकारक असून ती मोडली पाहिजे, बंडखोर सरदारांस मोडून करड्या हुकमतींत वागविलें पाहिजे, इत्यादि प्रकार बाजीरावास कळले. नानासाहेबानेंही तसा प्रयत्न केला. परंतु सरदारांची ही स्वतंत्रतेची व फुटीची भावना मराठशाहींतून साफ नाहींशी झाली नाहीं. नवीन जिंकिलेल्या मुलखांत हे सरदार आपणच केवळ स्वतंत्र संचार करूं लागले असें नाहीं, तर ते आपल्या टापूंत स्वतःच्या हस्तकांस स्वतंत्र इनामें देऊं लागले. इनामें देण्याचा अधिकार कोणीं वापरावयाचा याजबद्दल कांहींच निर्बंध नव्हता. या प्रघातास आळा घालण्याचें काम पुढें माधवरावानें व नाना फडणिसानें मनावर घेतलें, परंतु नारायणरावाच्या वधानें करडा धनी उरला नाहीं. प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांत खालील ठराविक वाक्यें आढळतात. 'तुम्हीं......चे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले वडील परंपरागत सेवा करीत आले, पुढेंही सेवा करावी हाच नियत कायावाङ्मनसा सेवकाचा आहे, दुसरा अर्थ नाहीं.'...'आम्ही कुटुंबवत्सल, योगक्षेम चालला पाहिजे, स्वामी कृपाळु आहेत '...' ऐशास, अमुक अमुक गांवचें वतन तुम्हांस वंशपरंपरेनें इनाम करून दिलें आहे, यास आमचे वंशापैकीं कोणी दखल करील त्यास शपथ असे.' याचा अर्थ असा कीं, राजारामाचे वेळेस पराक्रम करून राष्ट्रसेवा केल्याबद्दल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीं इनामें मिळूं लागलीं, तीं पुढें केवळ कुटुंबवत्सलतेमुळें, योगक्षेम चालण्यासाठीं, वाडवडिलांचे नांवावर लोकांस मिळूं लागलीं. हीजी पराक्रमाशिवाय बक्षीस उपटण्याची चटक राष्ट्रांत शिरली, तिच्या योगानें अवनति प्राप्त होऊन राष्ट्राचा व राज्याचा ऱ्हास झाला. 'गो–ब्राम्हणप्रतिपालन' या मोहक नांवाखालीं ब्राह्मणांनीं एक पै पासून लाखों रुपयांच्या वतनापर्यंत केवळ तपोनिष्ठतेबद्दल व राज्याचें अभीष्ट चिंतण्याबद्दल भिक्षेच्या नांवाखालीं इनामें उपटण्याचा सपाटा चालविला. पूर्वीचा दाखला व परंपरा यांस महत्त्व येऊन, गुणानें बक्षीस मिळविण्याची भावना लयास गेली. पराक्रम करणारा व न करणारा दोघेही सारखेच गणण्यांत येऊं लागले. हाच अधःपात होय.

८ **सरंजामी पद्धतीचा उपयोग.**—जागिरीच्या संबंधानें एक विशिष्ट मुद्दा कै. रा. ब. जोशी यांनीं लेखकाच्या नजरेस आणिला होता, त्याचा येथें उल्लेख करणें जरूर आहे. राज्यकारभाराच्या हल्लींच्या स्थितीवरून आपण तत्कालीन स्थितीचा अंदाज करितों. त्या वेळच्या स्थितिभेदाचे कित्येक महत्त्वाचे विशेष आपण ध्यानांत आणीत नाहीं. अलीकडच्या पांचपन्नास वर्षांत दळणवळणाचीं साधनें वृद्धि पावल्यानें एखाद्या मध्यवर्ती राजधानींतून दूरदूरच्या कोनाकोपऱ्यांपावेतों सरहद्दीचा बंदोबस्त योग्य रीतीनें होऊं शकतो. तशीं साधनें नसल्यास दूरच्या सरहद्दीच्या बंदोबस्तासाठीं कांहीं तरी विशिष्ट तजवीज सरकारास करावी लागते. या कामीं किल्ल्यांची योजना शिवाजीनें केली, परंतु राज्यविस्तार झाला म्हणजे ही किल्ल्यांची योजनाही पुरी पडत नाहीं. किल्लेदार फितूर होऊन शत्रूस सामील झाल्याचीं उदाहरणें पाहिजे तितकीं आहेत. अशा स्थितींत दूरदूरच्या प्रांतांत जागिरी देऊन आपल्या भरंवशाचे अनेक स्वतंत्र, नेट देऊन वागणारे, जबाबदार सरदार पेशव्यांस मुद्दाम बनवावे लागले. स्वतःच्या बचावासाठीं व निर्वाहासाठीं या जागीरदारांस जिवावर उदार होऊन शत्रूंशीं लढावें लागे, आणि सभोंवार शत्रु प्रबळ असल्यामुळें, आपल्या सरकाराशीं नम्रता ठेवून, त्याजकडून आपणास वेळेवर मदत येईल अशी तजवीज ठेवावी लागे. बुंदेलखंड, माळवा वगैरे दूरचे प्रांत पेशव्यांनीं जिंकिले, तेव्हां तेथें शिंदे, होळकर, पवार, बुंदेले वगैरे शूर सरदारांस कायमचें वास्तव्य करून पेशव्यांनीं ठेविलें नसतें, तर त्या अंदाधुंदीच्या काळांत सातारा राजधानींतून तेथील प्रदेशाचा बंदोबस्त राहूं शकला नसता. अक्कलकोटास फत्तेसिंग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भोसल्याची स्थापना झाली आणि मुरारराव घोरपड्यानें गुत्तीस राहून पन्नास वर्षें कर्नाटकास शह दिला. गुजरातेंत गायकवाडांची व वऱ्हाडांत भोसल्यांची स्थापना याच हेतूनें झाली. पुढें दक्षिण महाराष्ट्रांत पेशव्यांनीं पटवर्धनांची स्थापना केली तिचें प्रयोजन हेंच. अशा जागिरी निर्माण करितांना होतां होईतों आपल्या हुकमतींत वागतील असेच इसम प्रथम नेमण्यांत येत असत; पण पुढें अनेक कारणांनीं ते अनावर बनले.

रा. ब. जोशी यांच्या मतें जागीरदारीच्या पद्धतींत आणखी एक मुद्दा आहे. एकछत्री राज्य कोणत्याही कारणानें मोडलें तरी त्यांत असलेले बरेचसे जागीरदार अवशिष्ट राहतात. मराठ्यांचें राज्य नाहींसें झालें, परंतु त्या वेळचे अनेक जागीरदार आज इंग्रजी राज्याखालीं संस्थानांच्या रूपानें नांदत आहेत. परंतु मोगल बादशाहींत जागीरदार नसल्यामुळें, तें राज्य नाहीसें झाल्यावर मागें अवशेष कांहींच राहिला नाहीं. आजसुद्धां हिंदुस्थानांत एकंदर सहाशें संस्थानांपैकीं मुसलमानी संस्थानें फार थोडीं आहेत. इराण देश मुसलमानांनीं अल्प काळांत जिंकला. बंगाल प्रांत इंग्रजांच्या हातांत जाण्यास पांच वर्षें पुरलीं; परंतु महाराष्ट्र देश जिंकण्याचा प्रयोग इंग्रजांना शेंपन्नास वर्षें चालवावा लागला.

स. १०६६ त नार्मंडीच्या विल्यमनें इंग्लंड देश जिंकिला त्या वेळची परिस्थिति प्रस्तुत विषयासंबंधानें विचारार्ह आहे. आपल्या अनुयायांस इंग्लंडच्या जमिनी त्यानें वांटून दिल्या; आणि आपल्या भरंवशाचे फ्यूडल् लॉर्ड्स म्हणजे जागीरदार त्यानें निर्माण केले. परंतु हेच जागीरदार पुढें प्रबळ होऊन राज्यकर्त्यांस विरोध करूं लागले, तेव्हां त्यांस जिंकून ताळ्यावर आणण्याचें काम किती अवघड झालें ही गोष्ट इंग्लंडचे इतिहासांत महशूर आहे. तेव्हां सर्व राज्यांत दळणवळणाचे मार्ग बिनतोड शाबूत राखणें, किंवा आपल्या भरंवशाचे स्वतंत्र सरदार ठिकठिकाणीं ठेवून देणें, हे दोनच मार्ग राज्यकर्त्यांचे आटोक्यांत असतात. अकबरानें आपल्या राज्यांतील रस्ते व सरकारी टपाल यांची व लष्कराची सोय चांगली ठेविली, त्यामुळें जागिरी दिल्याशिवाय त्याला राज्याचा बंदोबस्त ठेवतां आला. परंतु त्यालासुद्धां दक्षिणेंतील डोंगराळ व अवघड मुलखांत या बाबतींत यश आलें नाहीं. प्रत्यक्ष रायगड व सातारा ह्या दोन राजधान्यांमध्यें सोयीचा रस्ता मुळींच नव्हता. राज्याला थोडी स्थिरस्थावरता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राप्त झाली, म्हणजे दळणवळणाचे मार्ग तयार करितां येतात. पेशव्यांना अशी संधिच आली नाहीं. शाहूची व्यवस्था लावण्यांत महाराष्ट्राबाहेर संचार करण्याची आवश्यकता मराठमंडळास उत्पन्न झाली; आणि ती भागवितांना त्यांना मोठमोठे नवीन जागीरदार ठिकठिकाणीं निर्माण करावे लागले. बडोदें, धार, देवास, इंदूर, उज्जैन, ग्वालेर, सागर, झांशी वगैरे दूरच्या ठिकाणीं मराठ्यांच्या टोलेजंग राजधान्या व हजारों कुटुंबांच्या वसाहती तयार होण्याचें प्रयोजन वरप्रमाणें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८

बाळाजी विश्वनाथाची अखेर

कालसूचि

१७०० ऑगस्ट	१८	—बाजीरावाचा जन्म.
१७१८ सेप्टेंबर – १७२० मार्च		—बाळाजीची कऱ्हाड-कोल्हापुरची मोहीम
१७१९ ऑगस्ट		—रामचंद्र महादेवानें कल्याण भिवंडी घेतली.
,, सेप्टेंबर		—पन्हाळ्यास थोराताशीं युद्ध, यशवंतराव थोराताचा मृत्यु.
१७२० मार्च		—उरुणवहें येथें बाळाजी व संभाजी कोल्हापूर कर यांची लढाई.
,, एप्रिल	२	—बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८

बाळाजी विश्वनाथाची अखेर

१ कऱ्हाड–कोल्हापुरची मोहीम २ बाळाजीचा मृत्यु व परिवार
३ बाळाजीची योग्यता ४ द्वादशसूत्री

१ कऱ्हाड–कोल्हापुरची मोहीम (१७१८ सेप्टें०–१७२० मार्च).— मोगलांच्या हातून स्वराज्य सोडविण्यासाठीं शाहू व त्याचे प्रधान यांचे प्रयत्न जितके कारस्थानानें तितकेच फौजेच्या जोरानेंही चालू होते. सय्यदांचे मार्फत तहाची वाटाघाट वर्ष दोन वर्षे चालू असतां, साताऱ्याच्या चहूं बाजूंचे मोगलांचे हस्तक शाहूला विरोध करीत असून त्यांतच कोल्हापुरकर संभाजी आपला लाग साधून घेत होता. हा विरोध इतका तीव्र होता, कीं सय्यदांचे मार्फत चाललेले करार सिद्धीस गेले नसते, किंवा दिल्लीची स्वारी यशस्वी झाली नसती, तर शाहूची स्थिति धोक्याची राहिली असती. स. १७१७ त थोराताचा बंडावा चालू असतां, दक्षिणेंत कऱ्हाड येथें मोगल अंमलदार पडदुल्लाखान निकरानें मोगलांची बाजू संभाळीत होता. स. १७१८ त तह झाल्यावरही वरिष्ठांचे हुकमास धाब्यावर बसवून, तो निघून जाईना. वारणा नदीच्या दोनही बाजूंस थोरात नांवाच्या दुसऱ्या एका घराण्याच्या पाटिलक्या असून, पांच असामी थोरात बंधु दोन छत्रपतींच्या भांडणांत आपला स्वार्थ साधीत होते. स. १७१८ चा पावसाळा संपत येतांच शाहूनें बाळाजीस घेऊन कऱ्हाडवर स्वारी केली आणि कऱ्हाड व इसलामपुर काबीज करून पडदुल्लाखानास घालवून दिलें. त्याच वेळीं शिदोजी थोराताकडून येळावींचें ठाणेंही शाहूनें हस्तगत केलें. शाहू परत येतांच थोरात बंधूंनीं संभाजीची मदत घेऊन पुनः वडगांव, शिराळें, आष्टें वगैरे ठाण्यांवर शह बसविला. बाळाजी इसलामपुरास होता, त्यानें पुनः शाहूस निकडीनें लिहून फौजेचें साह्य मागितलें. शाहूनें तावडतोब फत्तेसिंग भोसले व श्रीनिवासराव प्रतिनिधि यांस बाळाजीचे मदतीस पाठविलें. त्या वेळीं वडगांव येथें शाहू व संभाजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांच्या फौजांचा निकराचा सामना होऊन, संभाजीची दाणादाण उडाली; लूटही पुष्कळ मिळाली. ¶

पुढें तिकडील बंदोबस्त करून शाहूच्या फौजा परत आल्या, आणि लगेच स. १७१८ च्या नोव्हेंबरांत बाळाजी दिल्लीस गेला, तो पुढील जुलैंत परत आला. दरम्यान पुनः संभाजीच्या संबंधानें 'येरे माझ्या मागल्या' अशी स्थिति आली. मात्र बाळाजी यशस्वी होऊन आल्यामुळें शाहूची परिस्थिति एकदम बदलली. बादशाहीचा पाठिंबा त्यास मिळतांच विरोधकांचीं तोंडें बंद झालीं. या गोष्टीचा फायदा घेण्यास बाळाजीनेंही कमी केलें नाहीं. पुणें प्रांतांतील मोगलांचा अंमल यानंतर कायमचा उठला आणि न्याय-मनसुबीचें काम बाळाजीनें चालू केलें. ‡ रामचंद्र महादेव चासकरास पाठवून त्यानें स. १७१९ च्या ऑगस्टांत कल्याण भिवंडीचीं ठाणीं व प्रांत हस्तगत केला; § जानोजी ढमढेऱ्यानें पुण्याच्या उत्तरेचें पाबळचें ठाणें काबीज केलें. 'तिसां अशरमध्यें श्री. पाराशरवासी यांनीं वडगांवावरी मुक्काम केला असतां स्वामी सातारवासी यांची फौज येऊन युद्धप्रसंग झाले.' हा प्रकार जून १७१९ च्या पूर्वीचा आहे. तेंच काम पुरें करण्यासाठीं दिल्लीच्या कामगिरीची वासलात लावून नोव्हेंबरांत शाहू व बाळाजी फौज घेऊन दक्षिणेस संभाजीवर गेले. त्यांनीं आष्ट्याचें व येळावीचें ठाणें थोरातांकडून घेऊन यशवंतराव थोरातांचा पाठलाग चालविला. थोरात पन्हाळ्याकडे जात असतां शाहूच्या फौजेची व त्याची लढाई होऊन थोरात मारला गेला. लगेच बाळाजीनें लगट करून कोल्हापुरास वेढा घातला. स. १७१९ च्या डिसेंबरांत बाळाजी बेळगांव रुकडीकडे व त्यापुढील दोनतीन महिन्यांत तारळें डिग्रजकडे होता.† अशीं प्रकरणें चार पांच महिने चाललीं. ता. २०.३.१७२० रोजीं उरूणबहें $ येथें बाळाजी व संभाजी यांची लढाई झाल्याचा उल्लेख आहे.

२ बाळाजीचा मृत्यु (२.४.१७२०) व परिवार.—स. १७२० च्या मार्च महिन्यांत कोल्हापुरच्या मोहिमेवरून परत आल्यावर बाळाजी विश्वनाथ

¶ खं. ३, ४५३, व ५६६.

‡ पे. द. ३१. १२१ व ऐ. सं. सा. भा. १ ले. ५

§ पे. द. ३०. ३३९

† पे. द. ७. ३४–३७. व ३१. १२३.

$ कृष्णातीरीं इसलामपुरचे उत्तरेस. पहा खं. ६.५७. खं. ८ ले. ८१ चा कागद शाहू व संभाजी यांच्या या वेळच्या कलहाचा दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साताऱ्यावरून सासवडास गेला आणि तेथें चैत्र शु. ६ शके १६४२ शनिवार ता. २.४.१७२० रोजीं मृत्यु पावला. मृत्यूचें कारण नमूद नाहीं. परंतु दोन तीन वर्षें जी सारखी दगदग व काळजी पाठीस लागली होती ती वृद्धावस्थेंत दुःसह होऊन त्यास एकाएकींच मृत्यु आलेला दिसतो. त्याची अंत्यक्रिया सासवडास झाली. मृत्युसमयीं बाळाजी विश्वनाथाचें वय साठीच्या अंदाजांत धरल्यास त्याचा जन्म स. १६६० च्या आंत बाहेर असला पाहिजे.

या कुटुंबाचें वास्तव्य त्या वेळीं पुण्यास नव्हतें. बाळाजीस प्रचारांत बाळाजीपंत नाना असें म्हणत. त्याचें लग्नही राधाबाईशीं लहानपणींच झालें. शके १६०१ चें तिचें हस्ताक्षर उपलब्ध आहे.§ त्यास दोन मुलगे व दोन मुली असल्याचा उल्लेख आहे. वडील विसाजी ऊ० बाजीराव याचा जन्म ता. १८ ऑगस्ट, स. १७०० रोजीं झाला. धाकटा चिमणाजी आपा चारपांच वर्षांनीं लहान होता.‡ बाजीरावाचे पाठीवर मुलगी भिऊबाई, तिचे नंतर चिमाजी व सर्वांत धाकटी अनुबाई असा क्रम दिसतो. अनुबाई सर्वांची आवडती असून बंधु तिचे लाड पुरवीत आणि ओंवाळणी वगैरे घालून किंवा परदेशच्या अपरिचित चिजा वगैरे आणून तिला खूष ठेवीत, असें पे. द. खं. १८ तील पत्रांवरून अनुमान होतें. या चारही अपत्यांचे विवाहसंबंध जुळवितांना बाळाजीनें द्रव्यवान्, बुद्धिमान् व शाहूचे मर्जींतलीं सावकारी घराणीं मुद्दाम पसंत केलीं. बाजीरावाची बायको काशीबाई महादाजी कृष्ण जोशी शाहूचा सावकार याची मुलगी. 'बाळाजींनीं महादाजीपंतास म्हटलें जे, तुमची कन्या बाजीरावास करीन. बहुत बजीद जाले, तेव्हां कन्या दिली.' त्याच वेळीं बाळाजीनें वडील मुलगी भिऊबाई दुसरा सावकार बाबूजी नाईक बारामतीकर जोशी याचा भाऊ आबाजी यास देण्याचें ठरवून, दोनही लग्नें बहुधा एकदमच स. १७१०-११ चे सुमारें पेशवाई मिळण्याचे अगोदर केलीं. त्या वेळीं बाजीराव दहा वर्षांचा व भिऊबाई आठ वर्षांची असावी. भिऊबाई ता. ७ जून, १७४७ रोजीं वारली. चिमाजी आपाचें

§ वर पृ. ५० वरील टीप ¶ पहा. संपूर्ण कौटुंबिक तपशील शेवटीं पुरवणींत दिले आहेत.

‡ का. सं. प. या. पृ. ले. ४९५ व ४९६; पं. सं. वृ. पृ. १; ब्र. च. ले. १९ व ११४ भा. व. शु. पृ. ४; ख. ३. २९ (ता. ७.४.१७१७)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लग्न स. १७१६ त त्रिंबकराव पेठ्याचे बहिणीशीं झालें, तिचें नांव रखमाबाई. इचा मुलगा सदाशिवराव भाऊ. त्याचा मामा त्रिंबकराव पेठे. या लग्नासाठीं बाळाजीनें ब्रह्मेंद्रस्वामीचे पांच सातशें रुपये कर्ज काढून त्यास बाजीरावाची जामीनगत लिहून दिली होती. शेवटचें लग्न अनूबाईचें, बहुधा स. १७१९ त बाळाजी कोल्हापुराकडे असतां, तिकडील घोरपड्यांचे पदरचा व्यंकटराव नारायण जोशी इचलकरंजीकर घोरपडे याच्याशीं झालें. ती ता. ३०.१२.१७८३ रोजीं वारली. तिच्या लग्नानंतर लौकरच बाळाजी मृत्यु पावला. यावरून वाटतें, कीं बाळाजी अखेरपर्यंत पैशाचे अडचणींत असून आप्तस्वकीय व स्नेही सोबती यांचें बुद्धिसामर्थ्य व द्रव्यसाह्य मिळवून निभावणूक करीत होता. स्वत: त्यानें काशीस जाऊन यात्रा केल्याचा उल्लेख ना. रो. १.१६४ यांत आहे. दिल्लींतून परत येतांना तो अल्पकाल काशीप्रयाग करून आला असेल.

बाळाजीची बायको राधाबाई ही नेवऱ्याच्या बर्वे घराण्यांतली असून हुशार म्हणून नांवाजलेली होती. तिला लिहितां वाचतां चांगलें येत असे. पेशव्यांचे नासिकचे तीर्थोपाध्ये हिंगणे यांच्या चोपडींत राधाबाईचे हस्तलेख सांपडले आहेत. पुष्कळदां ही बाई राज्यकारस्थानें करी. अनेक कौटुंबिक व सामाजिक बाबतींत ती लोकहिताच्या दृष्टीनें वागत असे. घरांत सुनांवर, मुलांबाळांवर व कुटुंबावर तिची जरब विशेष असून, तिला सर्व लोक भिऊन वागत.

शिवाजीच्या खालोखाल जशी बाजीरावाची योग्यता समजली जाते, तशी जिजाबाईच्या खालोखाल राधाबाईची मानण्यास बिलकूल हरकत नाहीं. साध्या, काटक व साहसी वृत्तीचें वळण राधाबाईनें आपल्या व नातलगांच्या मुलांस लहानपणापासून लाविलें, तेंच त्यांच्या भावी उदयास कारण झालें. चहूंकडचीं राजकारणें तिला चांगलीं कळत आणि कठिण प्रसंगीं तिला मसलत विचारून तदनुसार तिचे पुत्र वागत. बाजीराव निजामाचे भेटीस जाणार हें ऐकून राधाबाईला मोगली काव्याची मोठी धास्ती वाटली. तसा इशारा बाजीरावास देणारीं राधाबाईचीं पत्रें पुष्कळ आहेत. राधाबाईनें काशीयात्रा केली, तो मराठशाहींतील एक महत्त्वाचा बनाव पुढें सांगण्यांत येईल. मातुश्रीच्या आशीर्वादापासून आपले सर्व कांहीं मनोरथ सिद्धीस जातात अशी त्या वीरपुत्रांची भावना [illegible] आंग्रे, निंबाळकर, [illegible] सरदार व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्मेन्द्रस्वामीसारखे सत्पुरुष तिला मोठा मान देत. घरांत बाजीराव-मस्तानीचा प्रेमसंबंध मात्र तिला अल्पकाळ अत्यंत दुःखद झाला.§

पुण्यांत गोविंद हरि पटवर्धन यांचे घरीं असलेली एक बटिक महारीण निवाली, त्यासंबंधानें ब्राह्मण मंडळींत गोंधळ उडाला, आणि पटवर्धनांवर वाळीत पडून मुलांबाळांस व मंडळीस मोठी अडचण उत्पन्न झाली. पेशवे नानासाहेब सातान्यास होता. अशा प्रसंगीं राधाबाईनें पुढाकार घेऊन ब्राह्मणांस जमवून त्यांजकडून पटवर्धनांचे मंडळीस प्रायश्चित्त देवविलें. या प्रकरणांत सातान्यास पंडितरावांनीं ढवळाढवळ करून शाहूचें मन बिघडवूं नये अशी तजवीज राधाबाईनें केली.‡ शके १६७३ श्रावण शु॥ ४ (स. १७५१) रोजीं पुण्यांत नानासाहेब पेशव्यानें रुपये घालून राधाबाईची तुला केली. ही बाई १९.४.१७५३ रोजीं वारली.

३ बाळाजी विश्वनाथाची योग्यता.— ‘महाराजांची सेवा निष्ठेनें करून, मर्द व शहाणे राज्यांत मनुष्य नाना, ऐसा लौकिक वाढवून, महाराजांची कृपा संपादून प्रधानपद मिळविलें; जीवाभ्यश्रम करून शत्रू पराभवातें पाववून महाराजांच्या राज्याचा बंदोबस्त केला.’ हा अभिप्राय रा. खं. ४, मधील पे. ब. चा थोडक्यांत निखालस यथातथ्य आहे.

बाळाजीनें (१) शाहूस कठिण प्रसंगीं मदत केली, (२) महाराष्ट्रीयांस नवीन उद्योगाचें पराक्रमक्षेत्र दाखवून दिलें, (३) हिंदुपदपातशाहीचा पाया घातला, (४) आणि वसुलाची व्यवस्था ठरविली. शिवाजीच्या वेळचीं धोरणें, कारस्थानें व उमेदी पुनः मराठमंडळाच्या दृष्टीपुढें बाळाजीनें या वेळेपासून नवीन स्वरूपांत खेळविल्या. औरंगजेबाची दक्षिणेंतील सबंध कारकीर्द त्यानें पाहिली होती. राष्ट्राची दैना कशी होत आहे, व तें दैन्य दूर करण्यास काय केलें पाहिजे, याची बाळाजीनें आपल्या मनाशीं विचक्षणा केली. तो केवळ कारकून नसून बऱ्याच योग्यतेचा मुत्सद्दी होता. शाहूची बाजू सावरून धरण्यांत बाळाजीनें विशेष करामत व हिंमत दाखविली. पेशव्यांच्या हातून अनेक चुका झाल्या असतील, परंतु बाळाजीस शाहूनें पेशवेपद दिलें, त्यास त्या वेळच्या मंडळीच्या मानानें, तो सर्वथैव लायक होता; आणि तें पद त्यानें

§ पे. द. भा. ९ मधील कौटुंबिक व्यवहाराचे कागद या बाबतींत अभ्यसनीय आहेत.

‡ ऐ. स्फु. ले. भा. ३ ले. ३ राधाबाईनें नानासाहेबास पत्र, ७ जुलै १७४६ चें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्लाघ्य वर्तनानें संपादन केलें. शाहूचा पक्ष उचलून धरिला हीच बाळाजीची मोठी कामगिरी होय. शाहूला बादशाहीचा पाठिंबा होता; बादशहाच्या पदरीं तो वाढल्यामुळें त्याच्या मनांत बादशाहीविषयीं पूज्यबुद्धि होती. मुसलमानांवर उघडपणें शस्त्र धरून त्यांचें राज्य बुडवून, त्या ठिकाणीं आपलें स्वतंत्र राज्य स्थापावयाचें हा जो बाणा शिवाजीचा होता, त्यास अनुसरून मराठमंडळ शाहूच्या आगमनापर्यंत वर्तत होतें. पण या धोरणाचें स्वरूप शाहूच्या आगमनानें बदललें. आपण बादशाहीचे साहाय्यक व्हावें, बादशाहीचीं सूत्रें आपल्या हातांत घेऊन तेथील राजकारणें चालवावीं ही शाहूची भावना होती.

मराठशाहीच्या धोरणांत या वेळीं मोठा फरक पडला, तो या भावनेनें होय. ताराबाईशीं झगडतांना, शाहूस बादशहाच्या कृपाछत्राचा उपयोग चांगला झाला. बादशहाचा पाठिंबा नसता तर शाहूला इकडे थारा मिळाला नसता. बाळाजी व शाहू यांनीं प्राप्त परिस्थितींत राष्ट्राच्या अभ्युदयाचें हें नवीन धोरण ठरविलें. तीस वर्षांच्या तीव्र झगड्यांत मराठ्यांची शिपाईगिरी चांगली तयार झाली होती. वऱ्हाडपासून कर्नाटकपावेतोंच्या प्रदेशांत हजारों लहान मोठे मराठे सरदार फौजा बाळगून मराठशाहीच्या नांवानें वावरत होते. व्यक्तिशः ते स्वतंत्र होते, आणि त्यांस मध्यवर्ती बंधारण जें पूर्वी होतें, तें राजारामाच्या मृत्यूनंतर ढिलें पडून त्यांना आपल्या जबाबदारीवर कामगिरी पार पाडणें भाग पडलें. या त्यांच्या कार्यांत एकसूत्रता निर्माण करणें जरूर होतें. युद्धशिक्षण मिळालेल्या मराठे शिपायांस कांहीं तरी योग्य कामगिरी एकदम देण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. निराळाच कांहीं तरी विशिष्ट कार्यभाग उत्पन्न करून, त्या कामीं या शिपाईगड्यांचा उपयोग केला नाहीं तर ते आपसांत झगडून नाश पावतील, आणि तेणेंकरून अल्पावकाशें मराठशाहीचा अंत होईल, अशी धास्ती होती. हा परिणाम टाळण्यासाठीं मोगल बादशाहींत गडबड उडाल्याबरोबर शंकराजी मल्हारमार्फत सय्यद बंधूंशीं संगनमत करून, शाहूनें बाळाजीच्या विचारानें दिल्लीची नवीन कामगिरी मोठ्या उल्हासानें अंगावर घेतली. मराठशाहींतील दुफळी मोडण्याचा हा एक सुलभ उपाय होता; आणि तो बाळाजीनें तडीस नेला. सय्यदांकडून शंकराजी मल्हार बोलणें करण्यास साताऱ्यास आला, तेव्हांच या कामगिरीचा तेथें खल झाला. बाळाजीच्या मृत्यूनें या धोरणांत फरक पडला नाहीं. बाजीरावानें तें जास्तच निकरानें पुढें चालविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अष्टप्रधानसंस्थेचा लोप होऊं देणें आणि जागिरी देण्याचा वाढलेला प्रघात बंद न करणें, या दोन बाबती सकृद्दर्शनीं दोषार्ह वाटल्या, तरी परिस्थितीमुळें शाहूला व पेशव्याला त्या स्वीकाराव्या लागल्या. अष्टप्रधानांत जे लायक निपजले त्यांस शाहूनें भरपूर उत्तेजन दिलें. नालायक इसम मागें पडणें हा कोणत्याही व्यवहाराचा परिणाम दिसतो. सरंजामी पद्धतीमुळें पुढें अखेरपर्यंत बरेवाईट परिणाम काय झाले याचें थोडें दिग्दर्शन येथेंच करणें युक्त होईल.

स्वतंत्र जागिरींत कोट वगैरे बांधून बंदोबस्त करण्याचा उद्योग प्रत्यक्ष शाहूसही पसंत नव्हता. पेशव्यांनीं पुण्यास कोट बांधण्यास सुरुवात केली ती गोष्ट शाहूनें मना केली. पिलाजी जाधवानें, शाहूचें न ऐकतां, चंद्रसेनाच्या पाठवळानें जाधवांचे वाडीस कोट बांधला, तो बंडखोर थोराताचे मात्र कसा उपयोगीं पडला, याचें वर्णन शाहूनेंच एका पत्रांत केलें आहे. § यावरून जागीरदारांस नरम करण्याचा उपक्रम पेशव्यांनीं केला असता तर त्यास शाहूनें हरकत घेतली नसती असें म्हणतां येतें. जुने जागीरदार पेशव्यांच्या अंकित राहत ना, म्हणून त्यांस आपल्या भरंवशाचे नवे सरदार निर्माण करावे लागले. त्यामुळें मराठमंडळांत नेहमींच असंतोष माजून अखेरपर्यंत दुफळी कायम राहिली. जागीरदारीच्या पद्धतीमुळें मुख्य तिजोरींत पैसा येईनासा झाला; आणि पेशवे सदैव कर्जबाजारी राहिले. जागीरदारांस वठणीस आणण्यांतच पेशव्यांच्या शक्तीचा व्यय होऊं लागला. इकडे जागीरदारांचीही तीच स्थिति झाली. प्रथम मुलुखगिरीसाठीं त्यांस कर्ज काढावें लागे. स्वारी होऊन जय मिळाल्याची वार्ता आल्याबरोबर प्रांताच्या वसुलासंबंधानें सरकारचे फडणीस सरदारांकडे घेणें काढीत; परंतु इकडे सरदारांच्या हातांत वसूल पडण्यास मोठी मारामार पडे. एकदम पुष्कळ ठिकाणीं असे उद्योग चालू ठेविल्यामुळें, सरदारांस लागणारी फौजेची वगैरे मदत पेशव्यांकडून वेळेवर पोंचत नसे. जागिरी दिलेले प्रदेश सर्व जिंकलेले नसून जिंकावयाचे असत, आणि तेथील वस्तुस्थिति मुख्य सरकारास कळत नसल्या-मुळें, नानाप्रकारचे गैरसमज उत्पन्न होत. वस्तुस्थिति कळण्याकरितां पेशव्यांनीं आपले वकील ठिकठिकाणीं ठेवून दिले, त्यामुळें ज्यास्तच घोटाळे उडूं लागले. वसुलाच्या व हिशेबाच्या तक्रारी नेहमीं कायम राहून, इकडे मुलूखगिरी करणारे सरदार व तिकडे सरकारचा कारभार पाहणारे पेशवे व त्यांचे हस्तक,

§ रा.खं. २ पृ. ६६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोघेही सदा कावलेले असत. नोकर लोक कर्जापायीं नाडलेले असून मुलूखगिरीवर गेलेले सरदार हिशेब देत नसत, आणि हिशेब दिलाच तर ते उलट कर्ज मोठें दाखवीत; आणि कर्ज फिटल्याशिवाय हस्तगत झालेले महाल सोडून देण्यास ते तयार नसत. मराठशाहींतील ही अंदाधुंदी नेहमींच चालू होती.

पैसा हीच कोणत्याही राज्याची सर्वांत मोठी शक्ति होय. ती शक्ति सांभाळण्यासाठीं उपाय योजणें हें राज्यचालकांचें पहिलें कर्तव्य असतें. आपल्या खर्चास बाळाजीनें पाहिजे तेवढा तनखा नगदी घ्यावयाचा होता; पुरंदर किल्ला सचिवाकडून काढून स्वतःकडे न घेतां, तो त्यानें शाहूच्या हवालीं करावयाचा होता; म्हणजे स्वतंत्र जागिरीचें स्वरूप त्यास आलें नसतें. हें उदाहरण बाळाजीनें स्वतःच घालून दिलें असतें तर, प्रथम लहान लहान जागिरी कबजांत आणून, सरकारची म्हणून नवीन फौज तयार केल्यावर तिच्या साह्यानें स्वातंत्र्येच्छु सरदारांस कबजांत आणण्यास पुढें अडचण पडली नसती. सारांश, पेशवाई मिळाल्यानंतर बाळाजीच्या हातांत अधिकार होता; संधि होती; राज्यव्यवस्था ठरवावयाची होती; शिवाजीचा नमुना डोळ्यांसमोर होता; असें असतां त्यानें नवीन पद्धत स्वीकारली ती यशस्वी झाली नाहीं. तथापि हा प्रश्न केवळ पुढील परिणामावरून तपासणें योग्य होणार नाहीं. त्या वेळीं शक्य काय होतें हेंच पाहिलें पाहिजे. त्यासाठींच बाळाजीच्या व्यवस्थेचे साधकबाधक मुद्दे जे वारंवार दाखविले जातात, ते तात्पर्यानें वर नमूद केले आहेत. प्रत्येकाला आपापल्या भावनेनुसार त्याचें बरें वाईट सार काढतां येईल.

अव्यवस्था हा एकट्या बाळाजीचाच दोष नसून, तें एक मराठ्यांचें राष्ट्रीय वैगुण्य आहे. निरनिराळ्या कामांत व्यक्तिशः पराक्रम गाजविणारे इसम मराठेशाहींत कांहीं थोडे निपजले नाहींत. पण राष्ट्रीय स्वभावच असा कीं, आम्हीं बहुशः व्यक्तीच्या नफानुकसानीकडे प्रथम लक्ष देतों, एकंदर राज्याचे कल्याणाचा विचार सहसा मनांत आणीत नाहीं. आपण सर्व एका राज्यचक्राचे घटकावयव आहों आणि एका अवयवापेक्षां एकंदर राज्यचक्र व्यवस्थित ठेवण्याकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे, असा विचार करण्याची सवय आम्हांस नाहीं. हा दोष मराठशाहीच्या कारभारांत दिसतो. तत्कालीन परिस्थितींत शाहूचा पक्ष वर आणण्यांत बाळाजी कितीही निष्णात असला, तरी राज्य म्हणजे काय, त्याच्या शक्तीचे उगम काय आहेत, ते शाबूद राखण्यास काय केलें पाहिजे, या गोष्टीचा नीट विचार करून राज्यकारभाराची उभारणी त्याचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातून झाली नाहीं. अनेक उलाढाली करणें, प्रसंगीं न डगमगणें, धरलेला पक्ष सिद्धीस पोंचविणें, अनेक विरुद्ध पक्षांची समजूत घालणें, या बाबतींत तो निष्णात होता. म्हणून त्याच्या या गुणांचा उपयोग शाहूस झाला, तसाच त्याच्या कुटुंबास व आतस्वकीयांसही झाला. नवीन होतकरू माणसें पैदा झालीं आणि त्यांस पराक्रम गाजविण्याची संधि मिळाली. बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाल्यापासून ब्राह्मणांचीं पुष्कळ घराणीं हळूहळू पन्नास वर्षांत उदयास आलीं. त्याचप्रमाणें शिंदे, होळकर, पवार, जाधव, गायकवाड वगैरे कित्येक मराठ्यांचीं घराणीं पेशव्यांचेच प्रोत्साहनानें पुढें आलीं. पराक्रम पुष्कळांच्या अंगीं असतो, पण तो बाहेर पडण्यास संधि मिळाली पाहिजे. जेधे, जाधव, घोरपडे, गुजर, मोहिते, निंबाळकर इत्यादि मराठे घराण्यांस अव्वल मराठशाहींत प्रोत्साहन मिळालें, तसें तें पुढें बऱ्याच अंशीं ब्राह्मणांस मिळूं लागलें. मराठ्यांचीं घराणीं सर्वस्वी नाहीशीं झालीं नाहींत, पण कित्येकांस ब्राह्मण सरदारांच्या हाताखालीं दुय्यम प्रतीनें राहवें लागलें. हा फेरफार केवळ यदृच्छेनें झाला, मुद्दाम करण्यांत आला असें म्हणतां येत नाहीं. जो कोणी राज्यकारभाराचें काम अंगावर घेतो, त्यास स्वतःच्या भरवंशाचींच माणसें मदतीस घ्यावीं लागतात. तथापि एकंदरींत सर्व लोकांच्या हितासाठीं हें राज्य आहे, ही शिवाजीच्या वेळची भावना उत्तरोत्तर लयास गेली, आणि यांतच मराठशाहीच्या नाशाचें बीज कायम राहिलें. कारकुनी व हिशेबी पेशाच्या कामांत बाळाजी निपुण होता. ओसाड पडलेल्या मुलखाची आबादानी करणें, लोकांच्या हक्कांची पायमल्ली होऊं न देणें, सरकारसारा दक्षतेनें वसूल करणें, ह्या जमीनमहसुलाच्या बाबतींत बाळाजी विशेष कुशल होता; किंबहुना, हाच त्याचा मोठा गुण म्हटला तरी चालेल. जमिनीची व वतनांची वहिवाट त्यानें प्रत्यक्ष केली होती, आणि लोकांच्या अडचणी व तक्रारी काय असतात, हें त्यास चांगलें ठाऊक होतें. 'अलीकडे धामधुमीमुळें मुलखाचा सत्यानाश झाला, रयत देशांतरास गेली, मुलखांत काठवण झालें. त्यावरून तुमचा अर्ज खातरेस आणून महामुरीवर नजर देऊन, सातसालां इस्तावा कौल दिल्हा असे. तरी तुम्ही रयतेचा दीलदिलासा करून मुलूख महामूर करणें, आणि लागले ढेपेस सातसालां तनखा उगवणें बाबती देखील. जास्ती आकार लागणार नाहीं. अभय असे.' असें आज्ञापत्र ११ ऑक्टोबर, १७१८ त पुणें प्रांताचे देशमुख देशपांड्यांस काढिलेलें आहे.‡ रा. यशवंतराव गुप्ते लिहितात¶—

‡ खंड २, पान ३६. ¶ वि. ज्ञा. वि. जून, स. १९०९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'श्रीमंत बाळाजी विश्वनाथ हे वसुलाचे कामीं फारच दक्षता ठेवीत. ते जमिनीचा धारा वसूल करण्यांत मुळींच कसूर करीत नसत. श्रीमंत व गरीब यांस एकच न्याय मिळे. छत्रपतीचे नातलगांची सुद्धां वसुलाचे बाबतींत बाळाजी भाडभीड ठेवीत नसत. बिघडून गेलेली शिस्त त्यांनीं पुनः लावून दिली. 'कान्होजी राजे शिर्के हे फार प्रबळ व पुंड झाल्यामुळें आम्हांस अत्यंत उपसर्ग लागतो व सरकारचा धारा बुडतो,' अशी तक्रार बाळाजी विश्वनाथ याजकडे वडस्तें व त्याचे आसपासचे गांवीं राहणाऱ्या लोकांनीं केली. त्यावरून त्यांनीं कान्होजी राजांस लिहिलें कीं, 'पौंडखोरें येथें तुम्हांस इनाम गांव आहेत, त्यांशिवाय दुसरे गांवीं तुम्ही शेतें करितां म्हणून विदित झालें, त्यास दुसरे गांवीं शेतें केलियास बाबती मावळ-शिरस्त्याप्रमाणें देणें. बोभाटा आलियास कार्यास येणार नाहीं.'

स्वकीय व परकीय अधिकारापन्न व्यक्ती आणि परिस्थितीचे मुख्य धागे-दोरे पूर्णपणें ओळखून त्यांचा उपयोग मराठ्यांच्या राज्यवृद्धीकडे करण्यांत बाळाजीचें कौशल्य अप्रतिम दिसून आलें. बादशाहींतील कर्ती माणसें जयसिंग व सय्यदबंधु यांचा स्नेह संपादून निजामाला त्यानें दूर ठेविलें. मराठ्यांच्या उत्कर्षास मुख्य विरोध निजामाचा होता ही खूणगांठ लक्षांत घेऊन, बाळाजीनें युक्ति करून निजामाची व सय्यदांची फूट उत्पन्न केली. या संबंधांत शिया व सुंनी या दोघांचा परस्पर द्वेष होता, तो बाळाजीच्या पथ्यावर पडला. सय्यद बंधु शियापंथी व निजाम सुंनी असल्यामुळें त्या उभयतांमध्यें एक प्रकारचा धर्मद्वेष मूळचाच होता. बाळाजीनें सय्यदांच्या अडचणीचा फायदा घेऊन आपले हेतु सिद्धीस नेले आणि निजामास बाजूस काढिलें. हा डाव अशा बुद्धिकौशल्यानें त्यानें खेळविला कीं बाहेर बभ्रा न होतां परभारें मराठ्यांचे उद्देश सिद्धीस गेले. जयसिंगाशीं स्नेह जोडून त्याचे मार्फत ह्या अंतस्थ गोष्टी बाळाजीनें हलके हलके व मोठ्या धूर्ततेनें जुळवून आणिल्या. हीच त्याची प्रशंसनीय कामगिरी म्हटली पाहिजे. नानातऱ्हेचे मतलब साधण्यांत, प्रतिपक्षांचीं मनें वळविण्यांत, वसुलाची व्यवस्था लावून सनदापत्रें लिहिण्यांत, बाळाजीचा उपयोग शाहूस होऊन, पेशवा बहिरोपंत या कामांत सर्वस्वी नालायक ठरला आणि बाळाजी पुढें आला. बाळाजीच्या एकनिष्ठ सेवेचा मोबदला म्हणूनच बाळाजीचे पश्चात् शाहूनें बाजीरावास लगेच पेशवाई दिली.

बाळाजीची कामगिरी खालीं द्वादशसूत्रींत दाखविली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ बाळाजी विश्वनाथाची द्वादश सूत्री.—बाळाजीपंत पेशव्यानें काय कामगिरी केली असें कोणीं विचारल्यास खालील ऱ्हस्वोत्तरें सहज देतां येतील —

१ अल्पसंख्य मराठ्यांकडून बलवान मोगलांस कबजांत आणण्याचा प्रयोग सिद्ध करून दाखविला.

२ समान संकटाचा फायदा घेऊन राष्ट्रैक्य बनविलें.

३ मोगल बादशहांनीं भेदनीतीचा प्रभाव चालविला तो पंतानें हाणून पाडिला.

४ आपसांत लढून नाश पावणाऱ्या मराठ्यांना उद्योगास बाहेर क्षेत्र देऊन पराक्रमी बनविलें.

५ घरोघर सेनानायक निर्माण केले, देशभर नवीन राजधान्या उभारल्या.

६ स्वतः दिल्लीवर जाऊन मराठ्यांची राज्यघटना सिद्ध केली.

७ बाजीराव व त्याचे सहायक यांस पुढील मार्ग दाखवून दिला.

८ निर्धन महाराष्ट्रास सधन बनविण्याचे उपाय निर्माण केले.

९ महाराष्ट्र-धर्माचा पुरस्कार पूर्वी अवलंबिलेला पुढें वर्धमान दशेस पोंचविला.

१० मराठ्यांच्या अनुकरणानें राजपूत, बुंदेले, जाठ, शीख इत्यादि राष्ट्रिकांस स्वोद्धाराचा कित्ता घालून दिला.

११ कोल्हापुरकर संभाजी, निजाम वगैरे विरोधकांस आहारीं आणिलें.

१२ आणि सर्वांत मोठें काम म्हणजे शाहू छत्रपतीच्या द्वारें हिंदु राष्ट्राचें संघटन केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूची

[आंकडे पृष्ठांचे]

[चौथाई सरंजामी वगैरे सामान्य विषय बाळाजी विश्वनाथचे पेट्यांत पहावे.]

अजमशहा—२०, मृ. २५

अजितसिंग राठोड–हुसेनसय्यदकडून पराभव १२६, १२९,१२७, बादशहाविरुद्ध करार १२८, १३०, किताब १४३, १४५, १४६, मृ० १४७.

अनूबाई, बाजीरावाची बहीण–१८५, १८६.

अंबाजी त्रिंबक पुरंदरे—७०, बाळाजीची सुटका ८१, ९९, दिल्लीस १४२.

अंबिकाबाई (सिंद्याकडील), शाहूची स्त्री–दिल्लीस मृ० १५०, १५१.

अंबू पांडे (अमृतराव बांडे पहा.)

अंबूराव हणमंते—४५.

अभयसिंग—१२९, १३०, बापाचा खून १४७.

अमीनखान—१२६, माळव्यावर नेमणूक १३२, इतराजी १४४, १४५.

आनंदराव महादेव पोतनीस—४६.

आप्पाजी माणकेश्वर आंबीकर—८१, ८४.

आलमअली—११८, १४२.

इंद्रकुमारी—लग्न फर्रुखसेयर १२७, १२९.

उदाजी चव्हाण—६९, ८५ पूर्ववृत्त, कैद व मृ. ८६.

उदितसिंग–विशाळगड सोडला १०४.

उद्धव योगदेव राजाज्ञा—३०, ४६

ऐवजखान—१२१, १३६.

औरंगजेब—मृ. १९, माळव्याची हयगय २४, दुष्काळीचा प्रयत्न ३८.

कचेश्वर बावा ब्रह्मे—४२.

करीमबेग जुन्नरचा—६१, १३६.

कान्होजी आंगरे—५४, पूर्ववृत्त ८९–९१, शाहूशीं मिलाफ व विरोध ९२, बाळाजी पेशव्याची भेट व तह १००–१०२, शाहूशीं भेटी १०२, सीदी शरण १०५, इंग्रजांशीं युद्ध १०५–११०, पालखी व इनाम ११०.

कान्होजी राजे शिर्के—शाहूचा सासरा–७०.

कान्होजी भोसले—२७, ३३ सेनासाहेब सुभा ९९, माळव्यावर आक्रमण १३१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कासबक्ष—मृ. २६, ३०, ३८, ५८.
कृष्णराव खटावकर राजे—७२.
कृष्णाजी दादाजी प्रभु—५६.
कृष्णाजी दाभाडे—१४२.
कृष्णाजी परशुराम—विशाळगड प्रतिनिधि ९८, विशाळगड सोडविला १०४.
केरोजी पवार—५३, ६७.
केसो त्रिमल पिंगळे—२४, ३३, ५५.
खंडेराव दाभाडे सेनाखासखेल—४६, ५३, वतनजप्त ५६, शाहूशीं विरोध ६७, सेनापति ९९, १२३, माळव्यावर आक्रमण १३१, १३५, १४२.
खंडो बल्लाळ चिटणीस—३७, ४०, ९६, प्रतिनिधीचा बचाव ९७.
खेम सावंत—५४, ६०.
गणेश शंकर सरनाईक चांबळीकर—३३
गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि—३०, ३१, पुत्र महादाजी ४५, प्रतिनिधि ४५, ५३, ५८, बहादूरशहाची भेट ५९.
गिरजोजी यादव—५४, ७४.
चंद्रसेन जाधव—५६, सेनापति ५७, मुतालिक शंभुसिंग ६०, ६२, शाहूवर उठावा ६४, ६७, ताराबाईशीं मिलाफ ७०, सेनापतिपद काढलें ७१, ७८, १३६.
चार्लस् बून, इंग्रज गव्हर्नर—१०७
चिमणाजी दामोदर—३२, ४०, दिल्लीस १४२.
चिमाजीआपा—१८५.
छत्रसाल बुंदेला—जयसिंहाचा साह्यकारी १३१.
जयसिंग (सवाई)—शाहूस पाठिंबा ३०, १२७, १२९, माळव्यावर नेमणूक व वंश १३०, विशाळगडचा पराक्रम १३१, मराठ्यांचा पराभव १३१, १३२, किताब १४३, १४६, पत्र १४७.
जहांदरशहा—११७, १२६.
जोत्याजी केसरकर—सनदा आणल्या ३०, ३७.
झीनतुन्निसा बेगम—२१, शाहूस निरोप २२.
झुल्फिकारखान—२०, २८, ३७, ११८, मृ. ११९.
ताराबाई—२८, शाहूस विरोध ३२, ३४, राज्यावर हक्क ३५, ३८, रामचंद्रपंताची समजूत ४२, शाहूशीं पहिला तह ५२, रांगण्यावर ५४, सावंताशीं संधान ५४, ६०, पन्हाळ्यावर कायमपणा ६१, चंद्रसेनाशीं कारस्थान ६५, कैद ७४, येसूबाईशीं तुलना १५१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुकोजी गुजर—९३.

तुरुकताजखान—७२, ८०, १३६.

त्रिंबक शिवदेव—सचिवाचा मुतालिक ५५.

दमाजी थोरात—५३, ६७, दंगा व शेवट ७७-८३.

दाऊदखान पन्नी—६४, ६८, ७२, मृ. ७९, ११७, ११८.

दादाजी नीलकंठ सरनाईक—३३.

धनाजी जाधव जयसिंगराव—३५, लढाई व वस्त्रें ३९, पुणें प्रांत सोडविला ५३, मृ. ५३ व ५६, योग्यता ५७.

नंदलाल चौधरी—१३१.

नारो गंगाधर मुजूमदार–५२, १४२.

नारोमहादेव इचलकरंजीकर–४२, ६३.

नारो राम—४१, ४५.

नारो शंकर सचिव—४३, ४५, ६९, कैद ८१, दिल्लीस १४२.

निळो बल्लाळ चिटणीस—कैद ९३.

निजाम उल्मुल्क—२०, ७९, ९३, ११७, ११८, घराणें ११९, जन्म १२०, दक्षिणचे व्यूह १२२, १२४, दिल्लीस १२७, माळव्यावर नेमणूक १४५.

नेमाजी सिंदे—२४, २७, ३०, ३२, ३३, ३७.

पंताजी शिवदेव, सचिवाचा मुतालीक–३३, ४५, राजाज्ञा ४६, ८३

परशुरामपंत प्रतिनिधि—३५, ३७, ३९, ४१, साताऱ्यास कैद ४२, व ४४, ४५, प्रतिनिधि पद ४६, कैद ५३, चंद्रसेनास मिलाफी ६७, शिक्षा ७१, प्रतिनिधि पद ९३ व ९५, ९७ मृ. ९८.

परसोजी भोसले—२४, ३२, ३३, ३७, ४०, ४६, मृ. ९९.

पिराजी घोरपडे—ताराबाईचा सेनापति ४५.

पिलाजी जाधव–बाळाजीचा साह्यकर्ता ७०, ७१, ८२.

पोर्तुगीझ—इंग्रजांस सामील १०९.

फत्तेसिंग भोसले—शाहूचा मानीव पुत्र ३९, दाभाड्याचें वतन दिलें ५६.

फर्रुखसेयर—११७, १२६, सय्यदांविरुद्ध खटपटी १२७, पदच्युति १४४.

बहादुरशहा—पदप्राप्ति २५, मृ. २६, शाहूस सल्ला ३०, ५८, ६०, दरबारांतले पक्ष ११६, मृ. ११७.

बहिरोपंत पिंगळे, पेशवा—४५, ७०, कैद ९३, ९६, सुटका १०१.

बहीरजी घोरपडे, हिंदुराव—३७, ५४, ६३.

बाजी कदम—८४, ८५, १२२, १३४, १४२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजीराव पेशवा—पहिला अनुभव ७०, इंग्रजांवर चढाई १०९, पूर्वायुष्य १८५.

बापूजी सोनाजी दिवे, परसोजीचा कारभारी—३२, ५६.

बालकृष्ण वासुदेव हणमंते—अंबूराव पहा.

बाळाजी महादेव भानु—१४१ दिल्लीस मृ. १४९.

बाळाजी विश्वनाथ—२२, राजपुतांशीं स्नेह २३, पुरंदरे घरोबा ३१, खेडच्या लढाईंत ४१, ४४, पूर्वपीठिका ४९-५०, बंधु व मुद्रा ५१, ब्रह्मेंद्रस्वामींकडून पुरस्कार ५२, पुणें प्रांत सोडविणें ५३, महादाजी कृष्णाचा पाठिंबा ५७, सेनाकर्ते ५८, फौजेची सिद्धता ६०, हरणावरून चंद्रसेनाशीं तंटा ६९, कारस्थानी ७२, ८०, थोरातकडून कैद ८०, त्याचें पारिपत्य ८१-८३, सुपें सोडून पुण्यास ८४, सिंहगड पुरंदर काबीज ८५, पेशवाईचीं वस्त्रें ९४-९५, आंगऱ्याशीं समेट १००-१०४, सीदीची शरणागति १०५, पुण्यांत अंमल १२२, १२४, अतुल पराक्रमी सेवक १२३, सय्यदांशीं मिलाफ १२७, व करार १३७, मतलब १३८, दिल्लीस प्रयाण १४०, कत्तल १४५ व १४८, निजामाचा भाईचारा १४५ व १४८, परत स्वारी १४६, स्वारीचे परिणाम १४९, स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी सर्व पृथक् १५३–१५५, स्वराज्याची मर्यादा १५५, सरदेशमुखीचें प्रयोजन १५६, चौथाईचा अर्थ १५८, उत्पन्नाची वाटणी १५९, वसूल व दरखदार १६१, जागिरींची निर्मिती १६३, सरंजामी १६६, ग्रामसंस्थेचे घटक १६७, वतनदारीचे दोष १६९, स्वामिसेवेचा अर्थ १७१, सरंजामीचे नियम १७३, तिचा उपयोग १७८, कोल्हापुरकडील मोहीम १८३, मृ० व परिवार १८४, योग्यता १८७, गुणदोष १९०–१९२, द्वादशसूत्री १९३. (बाळाजीचे व समस्त पेशवे कुटुंबांतील व्यक्तींचे सर्व खासगी तपशील आरंभींच्या वंशावळीच्या टिपणांत दिले आहेत.)

ब्रह्मेन्द्रस्वामी—५१.

भगवंत रामचंद्र अमात्य—७६.

भवानीबाई, धाकट्या शिवाजीची स्त्री, रामराजाची आई—७४.

भवानीबाई, शाहूची बहीण—८० शंकराजी महाडिक ५६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिऊबाई, बाजीरावाची बहीण–१८५.
मदनसिंग—२६, वृत्त २७, ३७, १३७, सुटका १५०.
मल्हार तुकदेव पुरंदरे—३१, ३२.
महादाजी कृष्ण जोशी, पोतदार—३०, ४६, ५७, ७१, १८५.
महादाजी गदाधर सुमंत—४५.
महादाजी यमाजी बोकील—३३.
महादेव भट हिंगणे—१४२,
मातबरखान कल्याणचा—मृ० ६०.
मानसिंग मोरे—३३, ६२, ६७, सेनापति ८१, कमी ९९.
मीर शहाबुद्दीन—निजामउल्मुल्कचा बाप ११९, मृ. १२०.
मुन्यिमखान वजीर—२८, मृ. ११८.
मुहकमसिंग—७२, ८०, १३६ पूर्ववृत्त १४३, दिल्लीच्या बंदोबस्तास १४४.
मोरोपंत सबनीस—३०.
मोहनसिंग रावळ—३०, ३१.
यादवराव प्रभु, मुनशी, पारसनीस—शाहूचें पत्र १३९.
यादो गोपाळ—शाहूचा घरोबा ६२.
येसूबाई, शाहूची मातुश्री—दिल्लीस ३०, ३७, सुटकेचा विचार ६२, करार १३७, १३९, सुटका १४६, शाहूची भेट १४८, जीवनचारित्र १५०–१५१.
येसूबाई सचिव—४३, ८१.
रखमाबाई—चिमाजी आपाची स्त्री–१८६.
रखमाजी किन्हळे—३३
रंगराव उद्धव राजाज्ञा—४६
रंभाजी निंबाळकर—२७, ३७, ५३, ६२, ६४, ७९, ८०, पूर्ववृत्त ८३, किताब व पुण्यांतून उच्छेद ८४, खंडेराव दाभाडे याशीं युद्ध १२२, १२४, १३७.
राजजी थोरात—३७, ६२, ६७, ७९, १२३.
राजसबाई, ताराबाईची सवत—७४, मृ. ७५.
राणोजी भोसले—१४२, सवाई संताजी किताब १४९.
राधाबाई, बाळाजी वि० स्त्री–हस्ताक्षर ५०, १८५, १८६.
रामचंद्र त्रिंबक वाकनीस—३३
रामचंद्र नीलकंठ अमात्य—३६, प्रतिनिधीशीं विरोध ४१, वसंतगडावर कैद ४१, ५३, ५५, शेवट ७५, आज्ञापत्र ७६, ९६.
रामचंद्रपंत पुंडे, मंत्री—४५
रामाजी नारायण कोल्हटकर—परसोजीचा गुरु, ५५.
रामाजी महादेव भानु—१२३.
रायभानजी भोसले—२०, २७, ३८, ३७, ६० मृ. ६२.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रायाजी मल्हार प्रभु—३२, ५३, ५५, १२३.

रुस्तुमराव जाधव, शाहूचा सासरा—३१, ३३,

लोदीखान—पराभव ५३, मृ. ५७, ५९, ६०.

विठ्ठल विश्वनाथ भट, बाळाजीचा भाऊ—५०.

विठोजी चव्हाण—७९, मृ. ८६.

व्यासराव, चंद्रसेनाचा कारभारी–६९.

शंकराजी नारायण, सचिव—३६, ३७, आत्महत्या ४३.

शंकराजी मल्हार, सय्यदांचा वकील-तहाची वाटाघाट १३६, १३९, १४०, १४१, १४२.

शंकराजी महाडिक—ल० शाहूची वहीण भवानीबाई, ५६ वतन.

शंभुसिंग जाधव—५६.

शहाजी निंबाळकर—६७, १२२.

शाहू—पहिली मुक्तता २०, उत्तरेकडे प्रयाण, दक्षिणची वाट, सुटकेचा करार, नांवाची उत्पत्ति २१, सातारा काबीज २२, उत्तरेकडे दृष्टिक्षेप २४, बादशाही पाठिंबा २५, बहादूरशहाचें बोलावणें, सल्लागार २७, अर्ज २८, जन्म व कैद २९, दक्षिणेंत प्रयाण ३०, अहंमदनगरचा व्याप ३३ व ३९, ताराबाईस इशारा ३४, मराठमंडळाशीं परिचय ३७, बलाबल व दुफळी ३८, पारद-गढी व फत्तेसिंग ३९, खेडची लढाई ४०, सातारा काबीज, राज्याभिषेक, नेमणुका ४३–४४, आढावा ४६, रांगणा-मोहीम ५३, दाभाडे वतन जप्त ५६, बहीण भवानीबाई महाडिक ५६, सातारा प्रांत व तोफांची मागणी इंग्रजाकडे ६१, चौथाईची मोहीम ६३, चंद्रसेन बंडावा ७१, गोड स्वभाव ७५, कठिण प्रसंग ८०, बाळाजीस पत्र १२३, सय्यदांचा करार १३६, मातुश्रीची सुटका व भेट १४८–१५१, बायका व लग्नें १५१–१५२ [बराच तपशील बाळाजी विश्वनाथचे सदरांत मिळेल.]

शिवाजी, ताराबाई पुत्र—(ताराबाई पहा) ज. ७४, बायका, मृ. ७५.

शुक्रजी, शाहूचा सोबती—३०.

शेख मिरा—४४, १४२.

श्रीपतराव प्रतिनिधि—खटावकराचा पाडाव ७३, ९८.

सकवारबाई, शाहूची थोरली राणी, कन्या राणोजी शिर्के याची १५१.

सकवारबाई, थोरले शिवाजीची राणी—३७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सगुणाबाई मोहिल्यांकडील, शाहूची धाकटी राणी—१५१.

संताजी जाधव—५६, सेनापति ७१.

संताजी पांढरे—६७.

संताजी भोसले—परसोजीचा दासीपुत्र १३२, १४२ दिल्लींत मृ. १४८.

सभाचंद खत्री—११७.

संभाजीराजे कोल्हापुरकर—ज. ७४, ९६, १३७, शाहूस पत्रें १५०, १५१.

संभाजी छत्रपति—वधाचा परिणाम १९.

सय्यद हुसेनअली (हुसेन सय्यद पहा.)

सावित्रीबाई—रुस्तुमराव जाधवाची कन्या, शाहूची राणी—दिल्लीहून परत १५०, १५१.

सुजनसिंग रावळ—३१.

सुलतानजी निंबाळकर—८०, ९९.

हणमंतराव निंबाळकर—१२२, याचा पुत्र हैबतराव.

हमीदखान—बंकापुरचा ६३, चंद्रसेनाशीं सलूख ६४.

हरजीराजे महाडिक—५६. याचा पुत्र शंकराजी.

हुसेन सय्यद—७९, ११८, १२४, पूर्वपीठिका १२५, १२७, राजपुतांवर जझिया १३०, दक्षिणचा कारभार १३५. शाहूशीं करार १३६, दिल्लीस १४०, खोटा शहाजादा १४१, दिल्लीची भीषणता १४४.

हैबतराव निंबाळकर—हणमंतरावाचा पुत्र ३२, ३३, सरलष्कर ४६, ६७ मृ० ९९, मातुश्री तुळसाबाई, १००.

होनाजी अनंत, न्यायाधीश—४५.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांच्या राज्यकथा

लेखक—रा. ब. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

मराठशाहींतील या रोमांचकारी कथा वाचतांना आबालवृद्ध रंगून जातील.

पृष्ठें २०७, आर्टपेपरवरील सुंदर आठ चित्रें,

किंमत एक रुपया

केशव भिकाजी ढवळे : श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar